# इतिहास-विहार

अर्थात्

## केळकरांचे इतिहासविषयक लेख

लेखक

नरसिंह चिंतामण केळकर

प्रथमावृत्ति–सन १९२६

किंमत १ रुपया

प्रकाशक
काशिनाथ नरसिंह केळकर, बी. ए. (टिळक)
सदाशिव पेठ, पुणें.

# राष्ट्रवीर
# ग्यारिबाल्डी
यांचें चरित्र

लेखकः—न. चिं. केळकर

तरुण विद्यार्थ्यांचे व मुलांचे हातीं देण्यास एक योग्य व सुंदर पुस्तक

कि. १॥ रु.–ट. खर्च वेगळा.

केसरी कचेरी, पुणें शहर

मुद्रक
अनंत सखाराम गोख[illegible]
'विजय' प्रेस, ५७० शनवा[illegible]

# अनुक्रमणिका


१ इतिहास व इतिहाससंशोधन ... ... ... १
२ शनिवारवाड्याचा जीर्णोद्धार ... ... ... ४
३ ऐतिहासिक लेखसंग्रह ... ... ... १६
४ ६५ वर्षांपूर्वीचें पुणें... ... ... ... २१
५ प्रो० रॉलिनसन यांचें शिवचरित्र ... ... २६
६ ऐतिहासिक आठवणी व सद्यःस्थिति ... ... ३१
७ शंभर वर्षांपूर्वी ! ... ... ... ... ३३
८ साऱ्या धर्मक्षेत्रांचें एकच नशीब ! ... ... ३९
९ दिल्लीचा ऐतिहासिक चित्रपट ... ... ... ४८
१० मराठ्यांचे ऐतिहासिक पोवाडे ... ... ... ६९
११ ऐतिहासिक लेखसंग्रहाचें परीक्षण ... ... ७८
१२ मराठ्यांच्या इतिहासाचा उद्धार... ... ... ११५
१३ मुंबई व इंग्रज ... ... ... ... १३२
१४ उमाजी नाईकाचें चरित्र ... ... ... १३५
१५ आर्य नौकानयन ... ... ... ... १४२
१६ झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांची पुण्यतिथि ... १५०
१७ हिंदुस्थानची प्राचीन संस्कृति ... ... ... १५३
१८ शिवचरित्र प्रदीप—परीक्षण ... ... ... १७८
१९ पानिपतचे धर्मवीर ... ... ... ... १८२

# केळकरांचे लेख

## इतिहास व इतिहास-संशोधन*

"मी स्वतः कोणी मोठा इतिहासकार किंवा इतिहाससंशोधक नाहीं. तथापि या विषयाची मला विशेष आवड आहे. ज्या संस्थेच्या वाढदिवसानिमित्त आजचें व्याख्यान आहे तिचा जन्म १० वर्षांपूर्वी झाला. त्याहिपूर्वी ३०।३५ वर्षे इतिहास-संशोधनास सुरवात झालेली असून या अवधींत या विषयाची जी मेहनत मशागत झाली तिचेंच फळ प्रस्तुत संस्था हें होय. इतिहास-संशोधनावर पुष्कळांचे पुष्कळ आक्षेप आहेत. एक म्हणतो नवा इतिहास बनवितां येत नसला म्हणजे जुन्याची आठवण होते! पण शनवारचा वाडा बांधतां आला नाहीं म्हणून त्याचे पाये उकरून जुनी मांडणी-मोडणी दाखविणें हेंहि एक कामच आहे. हल्लींहि इतिहास बनत नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. आज घडत असलेल्या इतिहासाचेंहि पन्नास वर्षांनीं चीज होईल. सरकारी पब्लिकवर्क्स-खात्याप्रमाणें एकीकडे नवी इमारत बांधणें व दुसरीकडे जुन्या इमारतींची रिपेरी करणें हीं दोनहि कामें बरोबर चाललीं पाहिजेत. ऐश्वर्यसंपन्न जिवंत राष्ट्रेंहि आपल्या जुन्या इतिहासाचें संशोधन करितात. जगांत आज आपल्या डोळ्यांदेखत नवा इतिहास कर्तेपणानें घडविण्याचें श्रेय इंग्लंडइतकें दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रास लाभत नाहीं. तथापि इंग्लंडचे लोक अद्यापि इंग्रजी इतिहासाचें संशोधन करितात. ब्रिटिश म्युझियममधील जुनींपुराणीं हजारों

---

* भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या वाढदिवशीं झालेलें व्याख्यान. (ता. २० जुलै १९२०)

हस्तलिखितें, सनदा, शिक्के वगैरे पाहिले म्हणजे मनुष्य थक्क होऊन जातो. नेबूरनें रोमन् इतिहासाचें संशोधन व मॅक्समुल्लर प्रभृतींनीं वैदिक इतिहासाचें संशोधन केलें त्याला स्वदेशाचा अभिमान हेंहि कारण नव्हतें. आणि खरोखरच हा निःस्वार्थी आनंद आहे. संशोधकाला हर्ष, अमर्ष, खेद हे मुळींच नसतात. त्याला पानपतच्या पराभवाचीं पत्रें सांपडोत, नारायणरावाच्या वधाचीं सांपडोत किंवा सवाई माधवरावाच्या रंगपंचमीच्या विलासाचीं सांपडोत त्याला तीं सर्वच सारखींच प्रिय असतात. मनुष्य निःस्वार्थी असून उत्साही असला म्हणजेच त्याला विक्षिप्त म्हणूं लागतात. संशोधक हा मोठा 'रोमँटिक' प्राणी आहे. कित्येक इतिहास-संशोधक स्वतःस या उत्साहभरांत हास्यास्पदहि करून घेतात, नाहीं असें नाहीं. याचें उत्कृष्ट वर्णन 'पिक्विक पेपर्स' नामक इंग्रजी कादंबरींत आहे. एका खुळ्यानें एक शिलालेख आणला त्याची सतरा संशोधकांनीं सतरा पाठांतरें बनविलीं तरी त्यांतून कांहींच अर्थ निघेना तेव्हां पन्नास विद्वान् सभासदांकडून त्यावर पन्नास निबंध लिहिले जाऊन तुंबळ रणें माजलीं, व शेवटीं अकल्पित रीतीनें असें उघडकीस आलें कीं यांतील दगड तेवढा फार प्राचीन—सर्वच दगड प्राचीन असतात—पण त्यावरील लेख मात्र अगदीं ताजा. मला वाटतें विश्वगुणादर्शकाराच्या हातीं 'संशोधक' सांपडता तर त्यानें खालच्या दोन श्लोकांतल्याप्रमाणें त्याची स्तुतिगर्भनिंदा केली असती.

" उद्ध्वस्तवर्णरुचिचित्रकलापहर्म्यः
 विच्छिन्नलेखनपुराणशिलासनस्थः ।
दुष्कीटभुक्तशतपत्रपटोत्तरीयः
 निर्मूल्यनाणकगणैः परिपूर्णकोशः ।
नष्टाधिकारपरिहासितगर्वमुद्रः
 संदेहवृत्तिवशबृंहणयंत्रदृष्टिः
श्रद्धावितर्कपरिचारकवेष्टितांगः संशोधकः
 खलु प्रशास्ति विशून्यराज्यम् ॥ "

यांत वर्णन केल्याप्रमाणें या संशोधक महाराजांचा वाडा रंग उडून गेलेल्या चित्रांनीं भूषित असतो, त्यांचें सिंहासन म्हणजे पुसट लेख असलेला

जुना दगड, त्यांचीं राजवस्त्रें म्हणजे कसरीनें खाल्लेले जुनाट कागदपत्र ! त्यांच्याहि खजिन्यांत नाणीं भरलेलीं असतात पण बाज़ारांत एकहि चालत नाहीं. मन संशयानें ग्रासल्यामुळें डोळ्याला नेहमीं Magnifying glass लागून राहिलेला. आसपास अंधश्रद्धा व तर्कवितर्क यांचा गराडा. अशा शून्यराज्यांत राज्य करणाऱ्या या राजाची मुद्रा म्हणजे शिक्कामोर्तबहि आहे. पण त्याच्या आज्ञापत्रानें बोटभर जमीनहि कुणाला दिली घेतली जात नाहीं आणि सैन्यदळच काय पण एखाद्या झाडाचें दळ म्हणजे पानहि तो हालवूं शकत नाहीं. मार्क ट्वेनच्या Prince and Pauper या कथानकांतील तोतया राजपुत्राला राजवाड्यांतल्या जड शिक्कामोर्तबाचा उपयोग बदाम फोडून खाण्याला तरी झाला. आमच्या संशोधकाला मिळालेल्या शिक्क्यानें आज्ञापत्र चालत नाहीं व त्यानें तो बदामहि फोडणार नाहीं. हा सर्व विनोद झाला पण तो स्तुत्यर्थ आहे. अर्थात् जी त्यांची थट्टा म्हणून दिसते ती सर्व निःस्वार्थी व शुद्ध ज्ञानाभिलाषी इतिहाससंशोधकाची निर्भेळ स्तुतीच आहे. संशोधक हा एक कृमि आहे. पण तो भक्षक कृमि नसून रक्षक कृमि आहे. संशोधक हे काळाचे शत्रू होत. काळ मोकळा सोडला तर तो क्षणशः व कणशः सर्वनाश करीत असतो. पण संशोधक हे काळाच्या चाळणीचीं भोकें शक्य तितकीं निरुंद करीत असतात. इतिहास-संशोधनानें राष्ट्रस्मृतीचा तंतू अखंड राहतो व स्मृतिपरंपरा ही आनंद उत्पन्न करणारी असून व्यवहारालाहि उपयोगी असते. संशोधन करून इतिहास रचण्याचा फायदा कित्येकांस समजत नाहीं. इतिहासाचा तरी उपयोग काय ? तो वाचून मनुष्य शहाणा होतो या म्हणण्यांत फारसा अर्थ नाहीं. Knowledge comes but Wisdom lingers ( ज्ञान धांवतें पण शहाणपण रांगतें ) हीच म्हण खरी. इतिहासज्ञानानें खरोखरच मनुष्य शहाणा होता तर (History repeats itself) इतिहासाची पुनरावृत्तिच होते ही म्हण पडली नसती. पुनरावृत्ति होते याचा अर्थ पूर्वीं ज्या स्थितींत मनुष्य जसा वागला त्या स्थितींत तो तसाच फिरून वागणार मग इतिहास वाचून तरी काय करावयाचें ? एका अर्थानें हें खरें आहे. पण इतिहासाला व्यावहारिक(Applied) ज्ञान न म्हणतां शुद्ध (Pure) ज्ञान म्हटलें तरी त्याचें संशोधन अनिर्वाह्यच ठरतें. संशोधनाच्या परिसानें जुनें व नवें यांचें क्षणांत मधुर मीलन

होतें. ययातिप्रमाणें जुना काळ हा नव्या कालापासून तारुण्य घेतो, व पुरू-प्रमाणें नवी पिढी आपल्या गत इतिहासापासून वार्धक्याचें ऐश्वर्य मिळविते. संशोधन हें कधींहि फुकट जात नाहीं. त्याच्या आधारानें बनविलेले सिद्धान्त पुढेंमागें खोटे ठरोत; परंतु पुराव्याचें साधन या दृष्टीनें संशोधित द्रव्य नित्य आहे. शेवटीं संशोधकांना एकच सूचना करावयाची ती ही कीं, त्यांनीं निर्विकार मनानें सत्यान्वेषणाचीच दृष्टि ठेवली पाहिजे व साधनें मिळवितांनाहि महत्त्वाचीं कोणतीं व टाकाऊ कोणतीं, दुर्मिळ कोणचीं व सुलभ कोणचीं याचा विवेक ठेवला पाहिजे. Archaelogy आणि Architecture किंवा Antiquity व Art या जोड्या केवळ समानार्थक शब्दांच्या असें मानलें जाऊं नये. कालानें होणारा नाश टाळणें हें जसें अवश्य तसेंच क्षुद्र गोष्टींचा नित्य नाश करीत राहणें हेंहि अवश्य आहे. मृतांनींच जर जगाची सर्व जागा अडविली तर जित्यांनीं जावें कोठें ?”

# शनिवारवाड्याचा जीर्णोद्धार

केसरी, ९ ऑगस्ट १९२१

रिकामटेकड्या गणिती लोकांनीं केलेल्या गमतीच्या अनेक हिशेबांपैकीं एक हिशेब असा आहे कीं, पृथ्वीच्या पाठीवर जितकीं माणसें जिवंत आहेत त्यांच्यापेक्षां मेलेल्यांचीच संख्या अधिक भरेल. त्याच प्रकारचा दुसरा एक हिशेब असा कीं, पृथ्वीच्या उघड्या पाठीवर आज जितकें वैभव जागतें आहे त्यापेक्षां तिच्या झांकल्या उदरांत निद्रित वैभव अधिक भरलेलें आहे. हा हिशेब सगळ्या जगासंबंधानें खरा आहे कीं नाहीं हें ठरविण्याला अर्थात् सगळी पृथ्वी उकरून काढावी लागेल. परंतु निदान एखाद्या ठिकाणीं जेथें हें उकराउकरीचें काम कांहीं सुगाव्यानें बरेंचसें केलें जातें तेथें तरी हें निद्रावश वैभव हटकून सांपडतें यांत शंका नाहीं. हें उकराउकरीचें काम म्हणजे एक प्रकारें उंदीरघुशीचेंच काम होय; व या दृष्टीनें सरकारच्या प्राचीनवस्तुसंशोधक खात्याला विनोदानें उंदरां-घुशींचें खातें असें नांव कोणीं दिल्यास तें शोभण्यासारखें आहे. साध्या

उंदीर-घुशी या उकराउकरीनें चांगल्या इमारती उध्वस्त करितात व या अलौकिक उंदीर-घुशी उध्वस्त इमारती फिरून चांगल्या नीटनेटक्या करितात. उंदीर-घुशींची ती एक जात स्वार्थी व ही दुसरी परोपकारी इतकाच फरक !

मुंबईसरकारच्या प्राचीनवस्तुसंशोधक खात्यानें पुणें येथील शनिवार-वाड्यांत हल्लीं 'उकराउकरी'चें काम चालविलें आहे, त्यावरून वरील सर्व सिद्धांतांचें समर्थन करितां येण्यासारखें आहे. बरोबर दोन वर्षांपूर्वी या वाड्याच्या तटांच्या आंत काय दिसत होतें व तेथेंच आज काय दिसत आहे याची तुलना करून पाहणारास किती तरी आश्चर्य वाटेल. एका अर्थानें या ठिकाणीं ज्या वस्तूंचें संशोधन घडलें त्या फार प्राचीन किंवा पुरातन आहेत असें नाहीं. कारण सन १७२१ सालीं, म्हणजे आज बरोबर दोनशें वर्षांपूर्वी, या जागेवर मोठ्या खर्चानें उकरून उद्धार करण्यासारखें वैभव कांहींच नव्हतें. तेथें त्या वेळीं फक्त मुळामुठा नदींत जाळें टाकून मासे मारणाऱ्या कोळ्यांचीं कांहीं खोपटें होतीं. त्याचप्रमाणें सन १९१९ च्या ऑगस्ट महिन्यांत या वाड्याकडे डोकावून पाहणाराला इतकेंच दिसलें असतें कीं, ईशान्यकोपऱ्याला कोणीं कांहीं फुलझाडें लावलीं आहेत, उत्तरेस तटाला लागून मातीच्या ढिगावर पोलिसांकरितां खोपटें बांधलेलीं आहेत, दक्षिणेला जुन्या पायावर न्यायकोर्टाची एक इमारत आहे, व आसपास उंचसखल जागेंत गवत व रानवेली यांचीं झुडपें बनून पाय ठेवण्याला भीति वाटेल असें जंगल माजलेलें आहे. वास्तुदेवतेला श्रीमंती-चा कंटाळा आल्यावर कंगाल भिकाऱ्याचा वेश घेण्यांत फार हौस वाटते असें म्हणतात तसा प्रकार या वाड्यांत झाला होता. आणि विधीची विचित्रलीला अशी कीं, ज्या जागेवर पूर्वी पेशव्यांचा मुख्य चौक व दिवाण-खाना होता त्याच जागेवर मुन्सफकोर्टाचे शौचकूप उभारण्यांत आलेले होते ! पण दैवानें किंवा वैराग्यानें आणलेल्या विद्रूपपणाचा असा कळस झाला म्हणजेच जीर्णोद्धाराचें नवें युग सुरू होतें.

शनिवारवाड्याची जागा कोर्टाकरितां दिली त्यापूर्वी ती डेक्कन एज्यु-केशन सोसायटीच्या न्यू इंग्लिश स्कूलला देण्याचें सरकारनें ठरविलें होतें. पण कित्येक राजकारणी इंग्रजांना कुशंका येऊन त्यांनीं ती देणगी माघारीं

घेतली. न्यू स्कूलवाल्यांच्या हातीं ही जागा जाती तर शनिवारवाड्यांतील सर्व पटांगण हल्लींहून अधिक साफसुफींत राहिलें असतें. कारण तेथें मुलांचें खेळण्याचें मैदान बनलें असतें. कोर्टाकडे जागा गेल्यानें तितकीहि साफ-सुफी राहिली नाहीं. कारण बागबगीचावर खर्च रिकामा कोण करतो? अलीकडे शनिवारवाड्याच्या उपयोगाची तिसरी एक कल्पना निघाली होती. लॉर्ड रे साहेबांच्या नांवानें पदार्थसंग्रहालय करण्यासाठीं सरकारचे व म्युनिसिपालिटीचे मिळून सुमारें ४० हजार रुपये शिल्लक आहेत. ते खर्चून रेसाहेबांचें स्मारक येथें करावें असाहि विचार चालू होता. हें घडून येतें तर भलत्या ठिकाणीं भलतीच गोष्ट होऊन शिवाय बागेवर निराळा खर्च करावा लागला असता. पण ही कल्पनाहि रहित होऊन या जागेवर एक इटालियन पद्धतीचा नुसता बगीचा करावा अशी योजना पुढें आली. कांहीं वर्षांपूर्वी लॉर्ड कर्झन यांनीं प्राचीन–वस्तुरक्षणाच्या प्रेमानें फुटकळ खर्चाच्या पुष्कळ गोष्टी करविल्या, त्यांपैकीं शनिवारवाड्याच्या वांट्याला फक्त एक शिलालेख आला. आंतील जीर्णोद्धार तसाच राहिला. परंतु, भांबुर्डें व पुणें शहर यांच्या दरम्यान नदीवर पूल, पलीकडे नवें रेल्वे-स्टेशन व नवें गांवठाण वगैरे बांधण्याची कल्पना निघाल्यापासून, व विशेषतः शनिवारवाड्यालगतच हा पूल बांधावयाचा ठरल्यापासून त्या वाड्याचें काय करावें, अर्थात् समोर होणाऱ्या सुधारणांचा फायदा घेऊन खुद्द वाड्याचा जीर्णोद्धार कसा करावा, या विचाराकडे सरकारी इंजिनियरांचें लक्ष अधिक वेधलें. इतक्यांत प्राचीनवस्तुसंशोधक व संरक्षक खात्याची दृष्टि इकडे गेली, व गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड यांच्याहि मनांत शनिवारवाड्याच्या जीर्णोद्धाराची प्रेरणा झाली. यामुळें इतर सर्व विचार बाजूस राहून, वाड्याच्या मैदानांत पसरलेल्या मातीच्या टेंकड्या उकराव्या व त्याखालीं गुदमरून गेलेलें ऐतिहासिक शिल्पवैभव मोकळें करून दर्शनाकरितां सुरक्षित ठेवावें हीच मार्मिक विचारसरणी प्रभावी होऊन खर्चास मंजुरीहि मिळाली. गव्हर्नरसाहेब झाले तरी त्यांनाहि खर्चाच्या कामीं इतरांचा प्रतिबंध होऊं शकतो. पण सर जॉर्ज लॉइड यांनीं या कामीं नेट धरला; शिवाय लॉर्ड चेम्सफर्ड यांनाहि एक वेळ अभावितपणें आणून वाडा दाखवून त्यांचीहि सहानुभूति त्यांनीं या कामीं मिळविली असें म्हणतात.

कसेंहि असो, गव्हर्नरसाहेबांची सहानुभूति व प्राचीनवस्तुसंशोधक खात्याची आस्था यांच्या संयोगानें दोन वर्षांपूर्वीपासून जीर्णोद्धाराच्या कामास सुरुवात होऊन आज, प्रत्यक्ष न्यायकोर्टाच्या इमारतीखालीं सांपडलेल्या जागेशिवाय इतर सर्व जागेवरील माती निघून जुन्या इमारतीचे अवशेष मोकळे झाले आहेत, व आजच्या अर्धवट स्थितींतहि ते जाऊन पाहणारास आनंदाश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाहीं.

नवीन इमारती बांधण्याला खर्च लागतो. पण जीर्णोद्धारालाहि खर्च लागत नाहीं असें नाहीं. शनिवारवाड्याचेंच उदाहरण घेतलें तर आजपर्यंत त्यांतील नुसती माती उकरून काढावयाची म्हटलें तरी त्याला किती पैसा लागला असेल याची कल्पना, वाड्याच्या चारहि तटांच्या बाहेर तटाइतक्या उंचीचे प्रचंड राडयारोडयांचे पडलेले ढीग ज्यांनीं पाहिले असतील त्यांना सहज करितां येईल. या कामीं आजपर्यंत झालेला हजारों रुपयांचा खर्च सर जॉर्ज लॉइड यांच्या प्रेरणेनें स्वतः सरकारनेंच सोसला आहे. पण इतरांनाहि या जीर्णोद्धाराचें महत्त्व वाटल्याशिवाय राहणें शक्य नाहीं. कोणत्याहि शहरची म्युनिसिपालिटी म्हटली म्हणजे शहरांतील ऐतिहासिक वस्तूंचें रक्षण करणें हें तिचें एक स्वाभाविक कर्तव्यच आहे. नव्या काय व जुन्या काय कोणत्याहि पद्धतींत ग्रामदेवता ही मानावीच लागते, व हल्लींच्या अश्रद्धाळू काळांतहि शहर म्युनिसिपालिटी ही ग्रामदेवतेचें मूर्त स्वरूपच मानण्यास हरकत नाहीं. पुणें शहर म्युनिसिपालिटीनें कांहीं दिवसांपूर्वीं कौन्सिलर मराठे यांच्या सूचनेवरून पुणें शहरच्या इतिहासाला पांचशें रुपयांचें बक्षीस ठेवून तो इतिहास लिहविला. त्याच धोरणानें शनिवारवाड्याच्या जीर्णोद्धाराला तिनें एक महिन्यापूर्वीं दोन हजार रुपयांची वर्गणी मोठ्या आनंदानें दिली, व प्रस्तुत कार्याला आणखीहि वर्गणी देण्याला कमिटी माघार घेणार नाहीं असें आम्हांस वाटतें.

पण या मोठ्या कार्याच्या खर्चाचा बोजा केवळ सरकार किंवा म्युनिसिपालिटी यांजवरच न पडतां इतिहासप्रिय धनिक लोकांनीं या कार्यास मदत करणें उचित आहे. निदान महाराष्ट्र व उत्तर हिंदुस्थान यांतील मराठे सरदार व संस्थानिक यांनीं या कार्याला सढळ हातानें मदत केली तर त्यांनीं एका अर्थानें आपल्याच जीर्णोद्धाराचें कार्य केल्याचें श्रेय त्यांना

लाभेल. कारण हे सरदार, संस्थानिक व शनिवारवाडा यांचा संबंध किती प्राचीन व जिव्हाळ्याचा आहे हें कोणासहि नव्यानें सांगण्याचें कारण नाहीं. या बहुतेकांचें राजकीय व ऐतिहासिक वैभव या वाड्यांत लहानाचें मोठें झालें व सन्मान पावलें. त्यांच्या पूर्वजांनीं सन १७३० पासून पुढील सत्तर वर्षांत ज्या कामगिऱ्या केल्या व महाराष्ट्राच्या इतिहासांत भर घातली त्यांचा परामर्ष येथेंच घेण्यांत आला. त्यांची कारवाई येथेंच घडली व त्यांच्या मुत्सद्देगिरीचा विजयहि येथेंच झाला. लोण घेऊन येणाऱ्या गड्यानें हांक मारली असतां पाटीवाल्याला जसें सक्तीनें तोंड फिरवावें लागतें तसें दैवहि इतिहासाचें तोंड फिरवून जुन्याचा विसर पाडतें; व जी गोष्ट अदृश्य विधि अमूर्त हातांनीं घडवून आणतो तिची साथ करण्याकरितांच कीं काय अग्निप्रलय हेहि अवतरून जुन्या वास्तू जाळून पोळून, पाडून नष्ट करून टाकीत असतो. आज हिंदुस्थानांतील लोकांच्या वैभवबुद्धीवर पडलेली जळिताची राख जशी स्वदेशाभिमानाच्या सोसाट्याच्या वाऱ्यानें पार उधळून जात आहे आणि आंतील महत्त्वाकांक्षेची रचना दृष्टीस पडूं लागली आहे, त्याचप्रमाणें शनिवारच्या वाड्यांतील मातीचे डोंगर प्राचीन-वस्तुसंशोधक खात्याच्या प्रयत्नानें उकरून निघून जुन्या इमारतीचे अवशिष्ट दृष्टिगोचर होऊं लागले आहेत. अशा वेळीं राजेरजवाड्यांनीं व इतर सरदारांनीं मनावर घेतल्यास संयुक्त बलानें त्यांना हें जीर्णोद्धाराचें काम सहज पार पाडतां येईल. हें कार्य वास्तविक सर्व सरकारच्याहि खर्चानें होणें गैर नाहीं, उलट योग्यच आहे. कारण ज्या मराठेशाहीचें पांच कोटींचें राज्य इंग्रज सरकारला मिळालें तिचें हें लहानसें दगडाविटांचें स्मारक शाबूत ठेवण्यास त्यांनीं जरूर तो सर्व खर्च केला तर तें योग्यच होईल. पण कुटिल राजकारणी दृष्टीनें पाहतां कोणी असाहि प्रश्न विचारूं शकेल कीं, प्रतिपक्षाच्या गतवैभवाची तरी आठवण सरकारनें जगाला काय म्हणून करून द्यावी ? पण सुदैवानें ब्रिटिश सरकारच्या राजनीतीच्या विषारी जंगलांत प्राचीनवस्तुसंशोधकबुद्धीची सुवासिक मंजरी एकादे ठिकाणीं तरी फुललेली आढळते, व ती ज्या ठिकाणीं आढळेल तेथें निर्विकार मनानें तिचें चीज करणें हेंच माणुसकीस शोभणारें आहे. या दृष्टीनें पाहतां सर जॉर्ज लॉईड यांच्या इतर अनेक कृत्यांचा आम्हाला निषेध करावासा वाटत असला तरी या एका बाबतींत त्यांनीं

जी सुसंस्कृत मनाला योग्य अशी मार्मिक बुद्धि दाखविली तिचें आम्ही आनंदानें अभिनंदनच करतों. पण या जर्णोद्धाराच्या कामीं केवळ सरकार सर्व खर्च करण्याला तयार असलें तरी तो त्यालाच करूं देणें हें आमच्या संस्थानिकांना व सरदारांना शोभणार नाहीं. म्हणून त्यांनींहि या कामीं शक्य असेल ती मदत करावी असें कोणासहि वाटेल.

असो ! प्राचीनवस्तुसंशोधक खात्याकडून जीर्णोद्धाराचें काय काम झालें व त्यानें वाडयाची नवीन माहिती काय मिळाली वगैरे गोष्टींचा पूर्वापार वृत्तांत पुढील लेखांत आम्ही देणार आहों.

— २ —

शनिवारवाड्यासंबंधानें जुन्या कागदपत्रांतून एके ठिकाणीं समग्र दिलेली अशी माहिती मिळत नाहीं. परंतु यत्नपूर्वक अनेक कागदपत्रांतून मिळविल्यास चालचलाऊ माहिती मिळते, ती थोडक्यांत खालीं देत आहों.

पहिल्या बाजीरावाच्या कारकिर्दीच्या प्रारंभीं पेशव्यांची कायमची वस्ती पुरंदरास असून पुण्यास ते फक्त जाऊनयेऊन राहत. १७२१ सालीं बाजीरावानें बापूजी श्रीपत याजकडे पुण्याच्या सुभेदारीचें काम सांगितलें. बापूजीचा कारभारी रंभाजी जाधवराव यानें उदमी लोकांना कौल देऊन पुण्यांत अमदानी करविली. नंतर पेशवे व पुरंदरे या उभयतांना पुण्यास कायमची वस्ती करण्याचें योजिलें. पैकीं पुरंदऱ्यांकरितां नदीकांठीं अरबांची गढी किल्ले हिसार नांवाची होती ती मोडून मैदान केलें (सन १७२८), व त्यांत पुरंदरे यांचा वाडा बांधला. पुरंदऱ्यांच्या माडीवरून सन्मुख दिसेल अशा जवळच्या म्हणजे हल्लींच्या ठिकाणीं पेशव्यांनीं आपला वाडा बांधला. या ठिकाणीं कसब्याची मावळवेस होती तिच्याजवळ कोळी व कोष्टी लोकांची वस्ती होती, त्यांना मंगळवार पेठेंत मोबदला जागा देऊन ही जागा वाड्याकरितां घेतली. वाडा बांधण्यास ता. १० जानेवारी सन १७३० रोजीं सुरुवात झाली. वाडा तयार नसल्यामुळें जुन्या कोटांत मंडप

घालून नानासाहेब पेशव्यांचें लग्न केलें. वाड्याची वास्तुशांत ता. २२ जानेवारी सन १७३२ रोजीं झाली. बाजीरावानें बांधलेला वाडा फक्त दुमजली व तीनचौकी होता. त्याला १६११० रुपये खर्च आला होता.

प्रथम १७३१सालीं वाड्याभोंवतीं कोटाची भिंत बांधण्यास प्रारंभ झाला; पण शाहुमहाराजांना ही गोष्ट पसंत नव्हती म्हणून काम थांबविलें. सातार्‍याहून पुरंदरे बाजीरावास खासगी पत्रांत सूचनार्थ लिहितात कीं, " हवेलीभोंवतीं बुरूज न घालितां चार दिवाळा मात्र करावी. जुनें काम आहे तें कांहीं फार पक्कें नाहीं, परंतु उगीच भयासुर दिसतें. त्यास पांढर्‍या भिंतीचें, बाहेरील अंग सारवावें म्हणजे डोळेफोड दिसणार नाहीं." पुढें नानासाहेब पेशव्यांच्या कारकिर्दीत सन १७५५ सालीं कोटाचें काम पुरें झालें. सन १७५२ सालीं दिल्लीदरवाजा बांधला, व १७६० सालीं वाड्याला दगडी बुरूज बांधण्यांत आले. बाहेरच्याप्रमाणें आंतहि नानासाहेब पेशव्यांनीं वाड्याचें काम वाढवून सातमजली केलें. त्यानंतर पुढेंहि अनेक कामें वाड्यांत नवीं झालीं. नाना फडणविसांनीं सवाई माधवरावांकरितां मेघडंबरी बांधली. फडाचा चौक मोठा केला (१७८८). दुसर्‍या बाजीरावानें दादासाहेबांच्या बंगल्याजवळ सातमजली बंगला बांधला (१७९८). पण अखेरचें बांधकाम होण्याचे आधींच वाडयांत आग लागण्यास सुरुवात झाली होती.

या वाडयांत पेशव्यांची वस्ती पाऊणशें वर्षांहून अधिक झाली नाहीं. दुसरा बाजीराव अखेरपर्यंत या वाडयांत राहिला नाहीं. त्याचे कारकिर्दीत शुक्रवारचा वाडा बांधल्याचें टिपण पेशव्यांच्या रोजनिशींत सांपडतें; व खडकीच्या लढाईच्या दिवशीं बाजीरावसाहेब ज्या घरांतून अखेर बाहेर पडले तो शुक्रवारचा वाडाच असावा. शनिवारवाडयाच्या बरोबर बांधलेलें व अजूनहि नांदतें राहिलेलें एखाददुसरें घर पुण्यांत सांपडणें अशक्य नाहीं. पण या वाडयाचें वैभव पाऊणशें वर्षांतच खालावलें! येऊनजाऊन सवाई माधवरावांचा मुक्काम काय तो या वाडयांत विशेष पडला. कारण थोरले बाजीराव नानासाहेब व थोरले माधवराव हे बाहेर मुलुखगिरीवर बरेच दिवस असत.

या पाऊणशें वर्षांत शनिवारवाड्याला तीनदां आग लागली. पहिली आग सवाई माधवरावांच्या कारकिर्दीत एका लहानशा भागास लागली

होती. "शके १७१३ ज्येष्ठ शुद्ध पंचमी (रोजीं) श्रीमंतांचे वाड्यांत कळशी बंगला सातमजली होता त्यास आग लागून जळाला व कोठी जळाली" (७ जून १७९१) असा उल्लेख एका ऐतिहासिक टिपणांत सांपडतो (भा. इ. सं. इतिवृत्त शके १८३५–पृ. ३९१). दुसरी आग सन १८११ सालीं लागली तेव्हां अस्मानी महाल जळाला. तिसरी आग सन १८२८त लागली व तिनें सर्व वाडा जमीनदोस्त झाला. या आगीचें साल सन १८२२ असें सुमारें नऊ वर्षांपूर्वी इतिहाससंशोधकमंडळापुढें वाचलेल्या एका टिपणांत श्रीमंत आबासाहेब मुजुमदार यांनीं ठरविलें होतें व हें टिपण केसरींत तेव्हां प्रसिद्ध झालें होतें. परंतु इतिहाससंशोधनाचेंहि संशोधन व दुरुस्ती होऊं शकते. त्याप्रमाणें श्री० मुजुमदार यांनींच सुमारें चार वर्षांपूर्वीं याच मंडळापुढें वाचलेल्या एका टिपणांत ती केली आहे. या नवीन माहितीप्रमाणें वाडा जळाल्याची तारीख २१ फेब्रुवारी सन १८२८ ही ठरते. ही तिथि गुरुवार फाल्गुन शुद्ध षष्ठीसह सप्तमी शके १७४९ सर्वजितनाम संवत्सरे अशी आहे.

मुंबई गॅझेटिअरमध्यें गुरुवार फाल्गुन शुद्ध षष्ठी अशी तिथि दिली आहे. परंतु शक दिला नसून सन १८२८ पाहिजे तो १८२७ असा दिला आहे. आग पंधरा दिवस जळत होती असें गॅझेटिअरमध्यें म्हटलें आहे. पण श्रीमंत मुजुमदार यांच्या दप्तरांतील कागदपत्रांवरून आग फक्त दोन दिवस टिकली असें दिसतें. या पत्रांतील एक उतारा खालीलप्रमाणें आहे. " शुद्ध सप्तमी गुरुवारीं थोरला वाडा शनिवारचा येथें अग्नीचा उपद्रव होऊन चौसोपी व आरसेमहाल, गणपतीचा रंगमहाल वगैरे दरोबस्त काम जळालें. मोठा प्रलय झाला. (या गोष्टीला) आठ दिवस झाले. चुकून पांचपन्नास खण राहिले. साहेबांनीं प्रयत्न केला; तथापि उपाय चालला नाहीं. दोन दिवस आगीचा उपद्रव होता." वरील पत्रांत शुद्ध सप्तमी लिहिण्याचें कारण त्या वेळचें पंचांग पाहतां असें दिसतें कीं, या गुरुवारीं सूर्योदयाला षष्ठी होती, पण ती फक्त नऊ साडेनऊ घटका होती. आग दोनप्रहरीं लागली असा याच कागदोपत्रीं दुसरे ठिकाणीं उल्लेख आहे. अर्थात् आग लागण्यापूर्वीं तिथि बदलून षष्ठीची सप्तमी झाली होती. शनिवारवाड्यावर संगमरवरी स्मरणशिला सरकारनें बसवली आहे त्यावर

सन १८२७ हें आगीचें साल म्हणून दिलें आहे. पण तें चुकीचें असल्या-मुळें त्याची दुरुस्ती होणें जरूर आहे. गॅझेटियरमध्यें आरसेमहाल आगींतून बचावला असें दिलें आहे, पण तें चूक आहे हेंहि वरील उताऱ्यावरून सिद्ध होतें. उतारा ज्यांतून घेतला तें पत्र शनिवारवाड्यापासून दोनशें पावलांच्या आंत राहणाऱ्या मनुष्यानें आगीनंतर एका आठवड्यानेंच लिहिलें आहे.

पुण्यांतील पेशव्यांचे बहुतेक वाडे जळाले. शुक्रवार वाडा १८०३ सालीं बांधला तो १८२० सालीं बहुतेक जळाला. तसेंच बुधवारचा वाडा व विश्रामबागवाडा १८७८ सालीं एकाच रात्रीं जळाले. पैकीं बुधवारवाडा सर्व जळाला, विश्रामबागेचा मागचा कांहीं भाग शिल्लक राहिला.

शनिवारवाड्याच्या तटाच्या आंतील जागा सुमारें साडेचार–पांच एकर भरेल. पेशवाईअखेर ही बहुतेक जागा इमारती, हौद व बगीचे यांनीं व्यापिली होती. पटांगण असें फार थोडें होतें. आंत घोड्यांची व हत्तीं-चीहि पागा होती; परंतु घोडे फेरणें, कवाईत घेणें वगैरे कामें दिल्लीदर-वाजाबाहेरील विस्तीर्ण पटांगणांतच होत असत. वाडा एकंदर सातमजली होता. पण प्रत्येक मजल्याची उंची सरासरी आठनऊ फुटांपेक्षां अधिक होती असें वाटत नाहीं. हल्लीं सरकारी खात्यानें जेवढ्या भागांतील माती उकरली आहे त्यांत सुमारें पांच चौक, बगीच्याची कांहीं दालनें आणि पाण्याचे अनेक हौद व कारंजीं हीं उघडकीस आलीं आहेत. दिल्लीदरवाजांतून आंत गेल्यावर नगारखान्याची उंच दगडी भिंत आहे तिच्यावर 'किर्ती-मुखाचा' दगड अद्यापि दिसतो. वाड्यांतील मुख्य इमारतीची मध्यरेषा दाखविणारी ती खूण असावी. इमारत कशा घाटाची असावी याची कल्पना हल्लीं उकरून काढलेलें जोतें व आंतील निरनिराळ्या चौकांची जोतीं यावरून येते. पण उभा वाडा पाहून लिहिलेलें असें सविस्तर वर्णन आढळत नाहीं. सवाई माधवरावांच्या वेळच्या गणपति-महालांतील एका दरबाराचें चित्र छापलेलें प्रसिद्ध आहे. त्यावरून थोडीशी कल्पना डोळ्याला येते. बाकीची स्थूल कल्पना नानावाड्यांतील किंवा फडणविसांच्या वाड्यां-तील छतें, कलमदानें वगैरेंवरून येण्यासारखी आहे.

भिंतींचें रंगरोगण किंवा चित्रें यांचे अवशेष कोठें राहिलेले नाहींत.

परंतु पाण्याचे हौद, नळांचें काम, उछ्वास व सांडपाण्याच्या निकालाच्या मोऱ्या या पाहतां त्यांच्या रचनेंत मिजासीइतकेंच उपयुक्ततेकडे व टिकाऊ-पणाकडे लक्ष दिलेलें दिसून येतें. हल्लीं सर्व शहराकरितां मिळून पाण्याचा पुरवठा एकच असतो; पण जुन्या काळीं मोठमोठ्या राजेरजवाड्यांप्रमाणें मोठमोठे सरदारहि आपापले पाण्याचे खजिने व नळ वेगळे बांधीत. पेशव्यांनीं आपलें पाणी कात्रज येथें तलाव बांधून त्यांतून आणलें. याचें काम सन १७२९ सालीं सुरू झालें व तें १७३७ सालीं पूर्ण झालें. पुढें तेवीस वर्षांनीं मूळचा खापरी नळ काढून दगडी नळ घालण्यांत आला. नाना फडणविसांनीं नऱ्हें येथून खजिना व नळ बांधून त्याचें पाणी सदाशिव पेठच्या हौदांत आणून सोडलें तें ज्येष्ठ शुद्ध पंचमी शके १७१० रोजीं असाहि उल्लेख सांपडतो. पाणीपुरवठ्याच्या कामीं आजच्या इंजिनिअरां-इतकेंच त्या वेळचे लोक वाकबगार होते असें दिसतें. मुसलमानांचा तर या कामीं हातखंडा होता. दिल्ली, विजापूर, औरंगाबाद, अहमदनगर वगैरे ठिकाणीं जुने पाण्याचे खजिने व हौद यांची नुसती चैन होती याचा भक्कम पुरावा अद्यापहि मिळतो.

शनिवारवाड्यांत उकरून काढलेल्या जागेंत लहानमोठीं बरींच कारंजीं आहेत. पण त्यांतील दोन विशेष चित्ताकर्षक आहेत. पैकीं मोठें कारंजें वाड्याच्या मागील चौकांत व हल्लींच्या न्यायकचेरीच्या इमारतीच्या वायव्य-कोंपऱ्याला लागून आहे. तें उत्कृष्ट कमलाकृति असून त्याचा घेर सुमारें ऐशीं फूट आहे. त्यांत सोळा पाकळ्या असून दरपाकळींत सोळा लहान कारंजीं मिळून १९६ कारंजीं उडत होतीं. एवढें कारंजें किंवा अशा घाटाचें कारंजें हिंदुस्थानांत कोणत्याहि इमारतींत आढळत नाहीं असें सरकारी संशोधक खात्याचें मत दिसतें. टाइम्सच्या बातमीदारानें याचें नुकतेंच वर्णन केलें त्यांत तो म्हणतो कीं, एका रोम शहरा-खेरीज जगांत इतर कोठेंहि इतक्या तोट्यांचें कारंजें नाहीं; मग हें कितपत खरें असेल तें असो. वाड्यांच्या पूर्वांगास निघालेले हौदहि प्रेक्ष-णीय आहेत. एका हौदांत चार भिंतींना कोनाडे ठेवलेले असून चार बाजूंनीं पाण्याचे रुंद पातळ प्रवाह पडावे व या कोनाड्यांतून ठेवलेल्या रंगीबेरंगी दिव्यांच्या प्रकाशानें या कृत्रिम धबधब्यांवर अंधाऱ्या रात्रीं

इंद्रधनुष्याचो देखावा दिसावा अशी योजना असल्याचें कित्येकांना वाटतें. गणेश-दरवाजाजवळील खजिन्यांतून पाणी निघालें म्हणजे तें अनेक नळांनीं हौदांत पडून किंवा एका हौदांतून दुसऱ्या हौदांत जाऊन सांडपाण्यासह अखेर पश्चिम अंगास बांधलेल्या पक्क्या नहरांतून नदीला नेऊन मिळविलें होतें. वाड्यांतील बहुतेक नळ तांब्याचे असून ते गंजूं नयेत म्हणून त्यांच्या अंगाबरोबर राळ, त्यावर खादी, त्यावर ताग व त्यावर चुना अशा बंदोबस्तानें ते झांकून जमिनींत गाडलेले आहेत.

शनिवारवाड्याचें वर्णन परकीयांनीं केलेलें क्वचित् आढळतें. एका मुसलमान सरदाराच्या पत्रांत हें वर्णन अवघ्या दोन वाक्यांत केलें आहे तें असें—"बाहेरून पाहतां हा वाडा नरकासारखा दिसतो व आंत स्वर्गासारखा दिसतो." पारसनिसांच्या इतिहाससंग्रहांत साहेब लोकांनीं केलेल्या या वाड्याच्या वर्णनाचे एकदोन उतारे आहेत. सन १७९१ सालीं सर चार्लस मॅलेट यांजबरोबर मेजर प्राइस हा वाड्यांत गेला होता. त्याच्या उल्लेखांतून खालील वाक्य घेतलें आहे. "वाड्यांतील दिवाणखाना खूप प्रशस्त व जंगी होता; पण आंत अत्यंत साधेपणा होता. लांकडांतील खोदीव कामापेक्षां शोभादायक असें त्यांत कांहींएक नव्हतें. सर्व बैठकीवर पांढरी शुभ्र चादर एकजात पसरली होती." १८०३ सालीं लॉर्ड व्हॅलेनशिया त्यानें दुसऱ्या बाजीरावाची गांठ शनिवारवाड्यांत घेतली, त्याच्या वर्णनांतून खालील वाक्यें घेतलीं आहेत. "आम्ही जिन्याच्या तोंडाशीं पालख्यांतून उतरलों. वर चढून गेल्यावर एका लहानशा खोलींतून दरबारच्या दिवाणखान्यांत प्रवेश केला; आम्ही जाऊन थोडा वेळ उभे राहिल्यावर पेशवे येऊन गादीवर बसले. * * * हा वाडा सामान्यरीत्या सुंदर आहे. मात्र तो अत्यंत स्वच्छ दिसतो. दरबारचा दिवाणखाना फार मोठा आहे. लांकडी खांबावर सुंदर नक्षीकाम कोरलेलें आहे." १८१८ सालीं कर्नल फिट्झ क्लॅरेन्स यानें दुय्यम रेसिडेंट मि० कोटस् याचेबरोबर जाऊन वाडा पाहिला. या वेळीं पेशव्यांची वस्ती वाड्यांतून उठली होती. तो म्हणतो—"* * * आंतील चौकाच्या भिंतींवर पौराणिक देवता, हत्ती, घोडेस्वार वगैरेंचीं वेडींवांकडीं बरींच चित्रें काढलेलीं आहेत. वाड्यांतील मोठा चौक नागपूरकर भोंसल्यांच्या वाड्याच्या चौकापेक्षां

अधिक सुंदर आहे. सर्व वाडा तुळतुळीत दिसतो. बाजीराव विशेष प्रसंगाशिवाय येथें येत नसल्यामुळें अव्यवस्था दिसते. एका सुंदर दालनांत मार्क्विस वेल्स्लीची उभी तसबीर टांगलेली आहे. दोन मोठे रंगीत ग्लोब (खगोल, भूगोल) जवळच होते. त्यावर लॅटिन अक्षरें लिहिलेलीं असून क्षितिजें दाखविणाऱ्या पट्टया रुप्याच्या होत्या. १७८८ च्या पूर्वी इंग्लंडच्या राजानें पेशव्यांना हे ग्लोब नजर केले होते. गणपतीच्या दिवाणखान्याचें लांकडी छत गोल आहे. दालन सुमारें ५० फूट लांब व खूप उंच आहे. उंचावर चौफेर गॅलरी आहे. ही इमारत आरसेमय आहे. इंग्रजी बिलोरी झुंबरें पुष्कळ आहेत. सर्व शोभिवंत वस्तूंना गवरुण्या घालत्या होत्या. वाड्यांत एक मोठें इंग्रजी घड्याळ होतें तें मात्र बरोबर चाललें होतें! चित्रांचीं अनेक इंग्रजी पुस्तकें होतीं. जवळच एक खगोलयंत्र मोडून पडलें होतें. त्यांत सूर्यग्रहमाला वगैरे यथाप्रमाण गोलकांनीं दाखविलीं होतीं. देशी नक्षीवाल्यांनीं काढलेला एक नकाशा होता. पण बापू गोखल्या-जवळ यापेक्षां अधिक चांगला नकाशा असावा, कारण त्याशिवाय इतके दिवस तो आम्हांला झुकांडी देऊन कसा पळूं शकतो!"

वरील वर्णनानंतर शंभर वर्षांनीं या वाड्याची राख सावडली जाऊन आज त्याचे नुसते अस्थिरूप पाये लोकांना दिसत आहेत. पण आतां सर्वच मनु पालटला असून जुनी पेशवाई तर गेलीच, पण त्यानंतरच्या इंग्रजी नोकरशाहीचेहि दिवस भरत आले आहेत. अठराव्या शतकाच्या विशींत बांधलेल्या, एकोणिसाव्या शतकाच्या विशींत नाश पावलेल्या, व विसाव्या शतकाच्या विशींत पाये उकरून काढलेल्या या वाड्याला एक-विसाव्या शतकाच्या विशींत काय दिसणार आहे तें परमेश्वराला माहीत!

वाचनालय ता. सातारा

# ऐतिहासिक लेखसंग्रह

[ भाग अकरावा ]

प्रसिद्ध इतिहाससंशोधक वासुदेवशास्त्री खरे यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहाचा अकरावा भाग नुकताच हातीं आला तो वाचून पाहतां नेहमींप्रमाणेंच मनोरंजक व ऐतिहासिक माहितीनें परिपूर्ण आहे असें दिसून येतें. या सहाशें पृष्ठांच्या खंडांत सन १७९८ चा सप्टेंबर ते सन १८०० चा फेब्रुवारी, म्हणजे सतरा महिन्यांचे अवधींत लिहिलीं गेलेलीं पटवर्धनी दप्तरांतील सुमारें साडेसातशें निवडक पत्रें संग्रहित केलीं गेलीं आहेत. सदरहू काल लक्षांत घेतला असतां तो किती महत्त्वाचा आहे व त्याविषयीं माहिती देणारीं हीं पत्रें किती महत्त्वाचीं असतील याची कल्पना सामान्य वाचकासहि करतां येईल. त्यांतल्या त्यांत या खंडांत चतुरसिंगाचें बंड, महादजी शिंद्याच्या मरणोत्तर झालेल्या शिंद्याच्या दरबारांतील कलहाचे दुष्परिणाम, करवीरकर महाराज व पटवर्धन यांचा बेबनाव, पट्टणकुडीची लढाई, परशुरामभाऊचा मृत्यु, करवीरकरांवरील स्वारी, टिपूवरील अखेरच्या स्वारीची कांहीं हकीकत, धोंडजी वाघाचें बंड, पुणें दरबारांतील इंग्रजांचीं कारस्थानें, घाटग्याचा अत्याचार वगैरे प्रकरणांसंबंधाचीं पत्रें विशेष मनोरंजक आहेत. शिवाय नेहमींच्या पद्धतीप्रमाणें ऐतिहासिक-लेखसंग्रह-कर्त्यांनीं प्रत्येक मोठ्या प्रकरणास प्रस्तावना लिहून ऐतिहासिक चर्चेचें सूत्र सुसंगत रीतीनें जोडलेलें असून ठिकठिकाणीं खुलाशाकरितां उपयुक्त टिपणेंहि दिलेलीं आहेत.

समकालीन लोकांनीं लिहिलेल्या पत्रांतील माहिती इतिहाससंशोधनाला केव्हांहि विशेष ग्राह्य मानिली जाते. त्यांतूनहि पटवर्धनी दप्तरांतील पत्रें सर्वसाधारण रीत्या नीटनेटकीं पद्धतशीर लिहिलेलीं आढळतात. त्यांत दिलेली हकीकत सर्व हिंदुस्थानची असली तरी ती प्रायः दक्षिण महाराष्ट्राच्या दृष्टीनें लिहिलेली असते. शिवाय दक्षिण महाराष्ट्रांतील प्रसिद्ध ऐतिहासिक स्त्रीपुरुषांचा सूक्ष्म इतिहास त्यांत वाचावयास मिळतो. यामुळें हे कागदपत्र सहजच मनोरंजक वाटतातच, पण त्यांतूनहि शास्त्रीबोवांची मांडणी,

खुलासे व प्रस्तावना अशाच स्वरूपाच्या असतात कीं, त्यांच्या योगानें विचारसंगति सुलभ होते. खरेशास्त्री यांच्या इतिहाससंशोधनाच्या या कार्याला सुमारें पंचवीस वर्षांपूर्वीपासून सुरुवात झालेली असून त्यांनीं सर्व-प्रकारें प्रतिकूल व परावलंबी अशा परिस्थितींत पटवर्धनी दप्तराचे हे अकरा खंड म्हणजे सुमारें सवासहा हजार मोठ्या आकाराचीं पृष्ठें, नियमित रीतीनें प्रसिद्ध केलीं हें पाहून, परिस्थितीवरहि हुकमत चालविणाऱ्या त्यांच्या प्रबळ इच्छाशक्तीचें कौतुक करावें तितकें थोडें असेंच म्हणावें लागतें.

या सहाशें पृष्ठांच्या ग्रंथांतील सर्व मनोरंजक बाबी सांगण्यास स्थला-वकाश मिळणें शक्य नाहीं. तथापि मासल्याकरितां म्हणून कांहीं थोड्या निवडून देतों. चतुरसिंगाचें बंड फार वेळ टिकलें नाहीं. पण हें कां घडून आलें व त्यानें थोडक्यांत किती पराक्रम केला हें वाचण्यासारखें आहे. पुण्याच्या विश्रामबागेसंबंधीं माहिती या खंडांत आढळते. पंढरपुरास चंद्र-भागेंत स्नान करून पुंडलिकाच्या देवळाभोंवतीं प्रदक्षिणा घालून मृत्यु पावलेल्या डुकरीची कथा तत्कालभावनादर्शक अशीच आहे! दौलतराव शिंदे व शिंदेघराण्यांतील बाया यांच्या दरम्यानचा कलह व बायांवर मारे-करी घालण्यापर्यंत आलेली पाळी वगैरे वृत्तांत मोठा अद्भुतसा वाटतो. करवीरकर महाराजावर गुलाबखान रोहिल्यानें हल्ला केला व मारेकरी घातल्याचा आरोप परशुरामभाऊंवर निष्कारण आला, याचा खुलासा या खंडांत आहे. किरकोळ लढायांचीं वर्णनें अशीं दिलेलीं आढळतात कीं, जसे कांहीं वर्तमानपत्रांचे खास बातमीदारच रणक्षेत्रांवरून लिहीत आहेत. तसेंच समुद्रावरील एका वादळाचें वर्णनहि चांगलें आहे. पटवर्धनघराणीं व करवीरकर महाराज यांच्या वैमनस्याची हकीकत वाचीत असतां हल्लीं चालत असलेले प्रकार अगदींच नवे नसून त्यांचें मूळ शेंसवाशें वर्षांहून अधिक जुनें आहे असें हा खंड वाचणारास कळून येतें. कऱ्हाडे, चित्पा-वन वगैरेंच्या तंट्याची हकीकत यांत आली आहे. वेठबिगारीचा प्रकार शंभर वर्षांपूर्वीं कसा होता याचीहि माहिती यांत मिळते. श्रद्धाळूपणा, धर्मभोळेपणा कितपत होता याविषयीं या खंडांत माहिती वाचावयास मिळेल. परशुरामभाऊंस चहा व कॉफी लागत असे, त्यांची चहादाणी रुप्याची होती, नाना फडणविसांना तंबाखूचें, विशेषतः तपकिरीचें व्यसन

होतें, वगैरे व्यक्तिविषयक गमतीच्या गोष्टीहि यांत वाचावयास मिळतात. टिपूचा मोड झाल्यावर इंग्रजांनीं पेशव्यांवर खोगीर ठेवण्याचा प्रयत्न कसा केला; इंग्रज प्रबळ झाले, कलकत्ता वगैरेपर्यंत त्यांचा प्रांत झाला वगैरे चिंता नानास कशी पडली; विलायतच्या राजाचें फर्मान पेशव्यांस सादर करण्याच्या निमित्तानें आपला बहुमान करून घेण्याचा इंग्रजांचा कावा नानाच्या शहाणपणानें कसा बिघडला; गोखले व धोंडजी वाघ यांच्या वैमनस्यास प्रारंभ कसा झाला; पटवर्धनी घराण्यांत भाऊबंदकी कशी माजली; अरब, पठाण वगैरे लोक मस्त होऊन गरिबांस व श्रीमंतांसहि कसा उपद्रव करीत वगैरे गोष्टींसंबंधानें माहिती फारच मनोरंजक वाटते. शंभर-सवाशें वर्षांपूर्वीं मनुष्यस्वभाव किंवा राजकारण हें आजच्याहून कांहीं वेगळें होतें असें नाहीं. परंतु आरशांत आपलेंच प्रतिबिंब पाहिलें असतां जशी क्षणभर मौज वाटते, तसाच प्रकार इतिहासाचे अस्सल कागदपत्र वाचीत असतां होऊन, श्रेणारास बोधहि मिळतो.

शेवटीं या खंडांतील दोन मनोरंजक गोष्टी देतों. पहिली इंग्रजांच्या काव्याविषयीं. त्यासंबंधीं खालील उतारा वाचावाः—

"गेल्या दोन वर्षांत इंग्रजांनीं आपली फौज निजामअल्लीकडून त्याच्याच राज्यांत चाकरीस ठेवविली व तें राज्य पर्यायानें कबजांत आणल्यासारखें केलें. टिपू एवढा बलिष्ठ असतां त्याचें राज्य तर त्यांनीं सबंध बुडविलें. याप्रमाणें हिंदुस्थानांत ते प्रबल सत्ताधीश होऊन बसले तेव्हां पेशवाईदरबार आपलें वर्चस्व कबूल करतो कीं नाहीं हें चांचपून पहावें असें त्यांच्या मनांत आलें. त्यांनीं विलायतच्या बादशहाचें म्हणून एक फर्मान बरोबर देऊन चौघे गोरे वकील पुण्यास पाठविले. त्या चौघांनीं बाजीरावसाहेबांस सांगितलें कीं, 'आम्ही विलायतच्या बादशहाचें फर्मान तुम्हास आणलें आहे, त्याचा तुम्ही गौरवपूर्वक स्वीकार करावा. तो गौरव तुम्ही पांच प्रकारांनीं करावा, असें आमचें म्हणणें आहे. ते पांच प्रकार हे कीं— १ या फर्मानाचा स्वीकार करण्यासाठीं श्रीमंतांनीं मुद्दाम बाहेर डेरे द्यावे व तेथें दरबाराचा समारंभ व्हावा, २ आम्ही फर्मान घेऊन येऊं तेव्हां श्रीमंतांनीं आम्हांस सामोरें यावें, ३ मागें वकीलमुतलखीच्या वेळेस फर्मानबाडीचा समारंभ झाला होता तसा याहि वेळेस थाटमाट व्हावा, ४ आम्ही

दरबारांत फर्मान हजर करूं तेव्हां सन्मानार्थ श्रीमंतांनीं उभें राहून तें हातीं घ्यावें, ५ त्या प्रसंगानिमित्त खुशालीच्या शंभर तोफा माराव्या. याप्रमाणें इंग्रजांनीं डाव टाकतांच बाजीरावसाहेब संकटांत पडले व त्यांनीं नानाकडे विचारावयास पाठविलें कीं, या प्रसंगीं कसें वागावें व इंग्रजांस काय उत्तर द्यावें? राज्यकारभाराची आस्था जरी नानांस बिलकूल राहिली नव्हती तरी पेशवाईचा अभिमान त्यांच्या मनांत जाज्वल्य होता. त्यांनीं इंग्रजांचा कावा ओळखून पांच कलमांचीं उत्तरें सांगितलीं—१।२।३ फर्मान घेण्याकरितां मुद्दाम डेरे देणें व तें घेऊन येणाऱ्यांस सामोरें जाणें व फर्मानबाडीचा समारंभ करणें हे सन्मान फक्त दिल्लीपतीखेरीज पेशवेसरकार कोणासहि देत नाहींत. मागें माधवराव बल्लाळ यांच्या वेळीं असेंच विलायतच्या बादशहाचें पत्र घेऊन माष्टिन आला होता त्यानें नेहमींच्या दरबारांत पत्र आणून दिलें तसेंच याहि वेळेस व्हावें; ४ श्रीमंतांनीं पत्र उभें राहून घ्यावें असें इंग्रज म्हणतात, तर जेव्हां श्रीमंत दरबारांत जातील तेव्हां बसण्यापूर्वीं इंग्रजांनीं त्यांस पत्र द्यावें म्हणजे झालें! श्रीमंतांनीं तें पत्र त्यांच्या हातून घेऊन वाचण्याकरितां मुनशीच्या हवालीं करावें; ५ हा खुशालीचा विशेष प्रसंग समजून शंभर तोफा माराव्या असें इंग्रज सांगतात, पण तसें करण्याचें कारण नाहीं. खुशालीच्या इतर सामान्य प्रसंगाप्रमाणें तोफांचे वीस बार मात्र करावे. या बाबतींत इंग्रजांनीं पुष्कळ तक्रार व जिकीर केली. तथापि त्यांचें कांहीं चाललें नाहीं, आणि अखेर नानांच्याच म्हणण्याप्रमाणें छ. ११ साबानी (७ जानेवारी १८००) विलायतच्या बादशहाचें पत्र वाचण्याचा हा समारंभ घडून आला!"

दुसरी गोष्ट करवीरकर महाराजासंबंधाची. परशुरामभाऊ पटवर्धन व त्यांचे समकालीन छत्रपति शिवाजीमहाराज यांचें हाडवैर असल्याचें प्रसिद्धच आहे. परशुरामभाऊ कैदेंतून सुटल्यावर करवीरकरांवर स्वारी करण्याचें काम त्यांजकडे आलें व याच स्वारींत पट्टणकुडीच्या लहानशा लढाईत परशुरामभाऊंचा पराभव झाला. होणार वेळ आली म्हणजे अशीच येते. भाऊंना तीन जखमा लागून ते पडल्यावर त्यांना आपल्यासमोर घोड्यावर घालून करवीरकरांच्या एका सरदारानें महाराजांपुढें नेलें, तेव्हां महाराजांनीं 'मारा' असा हुकूम करतांच भाऊंना घोड्यावरून खालीं ढकलण्यांत आलें, व

जवळच उभे असलेल्या छत्रपतींच्या शिपायांनीं त्यांजवर अनेक वार करून त्यांचा प्राण घेतला. या गोष्टीस अनुलक्षून एक गृहस्थ एका पत्रांत लिहितात, "छत्रपति म्हणवितात, पण कर्म अंत्यजाचीं करितात." पण पुढें एके-प्रसगीं पटवर्धनांनींहि हेंच कर्म केलें! विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, कैद होऊन आलेल्या जखमी प्रतिपक्षी योद्धयास बहुमानपूर्वक उपचार करून जगवावें तें न करितां, बेशुद्ध स्थितींत त्यास घोड्यावरून ढकलून पाडून मारविणाऱ्या छत्रपतींनीं त्यांच्या तेराव्या दिवशीं भाऊंच्या चिरंजीवाला दुखवट्याचा आहेर पाठविण्यास कमी केलें नाहीं! बहुधा याच दरबारी दाखल्याच्या आधारावर हल्लींचे करवीरकर छत्रपति यांनीं, लो० टिळकांना जन्मभर अनेक प्रकारें छळूनहि त्यांच्या मरणानंतर तेराव्याच्या प्रसंगीं टिळकांच्या चिरंजीवांना दुखवट्याचा आहेर पाठविला असावा. या दुसऱ्या आहेराची गोष्ट अवघ्या पावणेदोन वर्षांपूर्वीं घडली असल्यामुळें लोकांच्या लक्षांत ताजी आहे; व ज्यांना ती आठवत असेल त्यांना खरे-शास्त्री यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांतील एतद्विषयक भाग वाचून इतिहास हा स्वतःची पुनरावृत्ति करीत असतो ही म्हण पटल्यावांचून राहणार नाहीं. इतिहासानें जुनेंनवें बेमालूम रीतीनें सांधलें जातें व कालाच्या ओघाबरोबर मानवी भावनांचा ओघहि अखंड वाहत असल्याचें प्रत्ययास येतें हाच इतिहासाचा खरा उपयोग, व तो खरेशास्त्र्यांच्या प्रस्तुतसारख्या ग्रंथांनीं चांगला साधतो.

# ६५ वर्षांपूर्वीचें पुणें*

'६५ वर्षांपूर्वीचें पुणें' असा आजचा विषय आहे. ६५ वर्षांपूर्वीचें पुणें ज्यांनीं पाहिलें आहे अशा वृद्ध गृहस्थांनीं आपल्या जुन्या आठवणी म्हणून या विषयाबद्दल कांहीं सांगण्यांतच खरोखरी औचित्य आहे. त्या वेळीं ज्यांना जन्मून १०–१२ वर्षें झालीं असतील अशी तेव्हांची रा० बापू पुरुषोत्तम जोशी, रावसाहेब सीतारामपंत पटवर्धन वगैरे मंडळी येथें असती तर त्यांनीं आपल्या लहानपणाच्या आठवणी म्हणून तरी कांहीं सांगितलें असतें, पण तेही येथें नाहींत. माझें वय ४१–४२ वर्षांचें असून आजाची हकीकत नातू सांगावयास लागला असें जरी वाटण्याचा संभव असला तरी तसाच विश्वसनीय पुरावा असल्यावर त्या वेळची हकीकत सांगण्यास कोणतीहि हरकत नाहीं. तुम्ही ही हकीकत सांगणार तरी कशी ? एखादा महात्मा तर तुम्हांस वश नाहींना ? असा कोणी प्रश्न करील. पण महात्मा वश करण्याच्या मार्गांत मी अजून पडलों नाहीं. सुखसंचारक कंपनीचा एखादा त्रिकालदर्शी आरसा तरी आपल्याजवळ असेल ? छे, तसा कांहीं त्रिकालदर्शी आरसा मजजवळ नाहीं; पण तत्कालदर्शी मात्र एक आरसा आहे व तो म्हणजे येथील सुप्रसिद्ध ज्ञानप्रकाशाचें पहिल्या दोन वर्षांचें फाईल होय. अशा तऱ्हेच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या हकीकतीस विश्वसनीय म्हणण्यास मला कांहीं हरकत वाटत नाहीं. इतकें जुनें फाईल ज्ञानप्रकाशआफिसांतसुद्धां कदाचित् नसेल. पण रा. ब. गोपाळराव हरि देशमुख यांचा पुस्तकसंग्रह, डॉ० नानासाहेब व इतर देशमुखबंधु यांनीं लोकमान्य टिळकांच्या स्वाधीन केला त्यांत मला हें सांपडलें. कल्पनेचें चित्र खरोखरी रम्य असतें. वर्डस्वर्थनें 'यारो' हें एक रमणीय व सुंदर स्थल आहे असें ऐकलें होतें; म्हणून त्यावर 'यारो अनव्हिजिटेड' असें एक रम्य काव्यही त्यानें केलें; पण तेंच यारो प्रत्यक्ष पाहिल्यावर त्याची निराशा झाली. तसें आपल्या कल्पनेंतल्या पुण्याचें होईल किंवा नाहीं हें सांगतां यावयाचें नाहीं. कल्पनेपलीकडे जाऊन त्याचें प्रत्यक्ष

* वसंतव्याख्यानमालेंतील व्याख्यान, ता. १२ मे १९१४

वर्णन केल्यावर आपणांस तें रम्यतर वाटेल कीं अरम्यतर वाटेल सांगतां येणार नाहीं. निदान कल्पना करण्यास तरी कांहीं हरकत नाहीं. पुणें कसें असेल याची कल्पना करा पाहूं ! अगदीं पहिली गोष्ट म्हणजे त्या वेळीं लोकांना त्रास द्यावयाला म्युनिसिपालिटी नव्हती ! आजच्या कांहीं खाणाखुणांवरून त्या वेळीं गांवांत नाले होते व बुधवारांत जावयाचें म्हणजे नाला ओलांडून जावें लागे. त्या वेळचे अरुंद, आंधळे व मुके रस्ते; रस्त्यांतून असलेला गलिच्छपणा तर विचारायलाच नको. रात्रीं पहावें तर जिकडे तिकडे अंधाराची रोषनाई; शहरचा आतांचा पश्चिमभाग अगदीं ओसाड असून नारायणपेठेंतून जावयाचें म्हणजे भीति वाटत असे, म्हणतात. आतां त्या वेळचीं माणसें कशीं होतीं ? त्यांचीं पागोटीं किती मोठीं होतीं ? त्यांच्या अस्तन्या किती पिळदार होत्या ? त्या अस्तनींत किती वार कापड मावत असे, वगैरेंची कल्पना करणेंही फारसें कठीण नाहीं.

६५ वर्षांपूर्वीचा काळ म्हणजे १८४८–४९ चा काळ; या काळास संधिकाल म्हणतां येईल. या वेळीं पूर्वीचा पेशवाईचा प्रकाश मावळला होता व नव्या मनूचा–इंग्रजीचा–प्रकाश अजून पडावयाचा होता. पेशवाईचें तेज गेल्यामुळें व नवीन प्रकाश अजून पडला नसल्यामुळें आसपास काय चाललें आहे, याचें त्यांना ज्ञान नव्हतें. त्या वेळीं जुनीं प्रसिद्ध अशीं माणसें कोणतीं हें आतां फारसें चांगलें माहीत नाहीं. आतां प्रसिद्ध असलेल्या कांहीं जुन्या मंडळीपैकीं त्या वेळीं कांहीं ऐन उमेदींत होती, कांहीं अजून शिकत होती व कांहींचें बालपणहि संपलें नव्हतें. डॉ० भाऊ दाजी त्या वेळीं २७, सर टी. माधवराव २०, दादाभाई २०, मंडलीक १५, वामन आबाजी मोडक १२, वागळे ९ व माधवराव रानडे ६ वर्षांचे होते. लोकमान्य जन्माला येण्यास अजून आठ वर्षें अवकाश होता तर ना. गोखल्यांना १५ वर्षें होता. या काळचें पुण्याचें वर्णन करायचें म्हणजे त्या वेळची शहराची रचना कशी होती हें प्रथम सांगूं. आतां जीं पेठांचीं नांवें आहेत तीं त्या वेळीं असलीं तरी त्या वेळीं रविवार–मालकमपुरा, सोमवार-शहापुरा, मंगळवार–शाहिस्तेपुरा, बुधवार–माहिनाबाद, शनिवार–मुरजुदाबाद, रास्ते–शिवपुरी, भवानी–शेरबत, वेताळ–गुरुवार, अशीं नांवें माहीत होतीं. (वक्त्यांनीं अमृतेश्वर, ओंकारेश्वर वगैरे जुनीं देवळें कोणीं बांधिली

यांची माहिती फाईलमधून वाचून दाखविली ). पुण्याची एक वेळची खानेसुमारी १॥ लाख होती. घरांची संख्या चौदा हजार होती; ती आतां १३॥ हजार आहे. 'पुणें शहराचे रस्ते व डागडुजी व पाण्याचे हौद वगैरे दुरुस्त राहावे यास्तव खर्चपट्टी बसवून वीस हजार रुपये काढावे आणि कमिटी नेमावी याविषयीं सरकारास परवानगीकरितां लिहून गेलें आहे.' या उताऱ्यावरून पाहतां म्युनिसिपालिटीची कल्पना त्या वेळीं होती. त्या वेळची पुण्याची रोजची मृत्युसंख्या ६—७ होती तर ती आतां ९ आहे. शहरांत आगीपासून वगैरे संरक्षण करण्याकरितां आगीचे यंत्र असल्याबद्दलचा उल्लेख नाहीं. शहरच्या संरक्षणाकरितां एकंदर थोडेसेच शिपाई होते. रात्रीं आठ वाजतां भरबुधवारांत दरवडे पडल्याचा उल्लेख आहे! गांवांत पोळ फार होते व त्यांच्या वारंवार होत असलेल्या टक्करींत कांहीं मुलें मेलीं, असाही उल्लेख सांपडतो.

सरदार पुरंदरे, आबासाहेब ढमढेरे, बाळाजीपंत नातू, गोपाळराव देशमुख, बाळाजी नाईक वगैरे मंडळी प्रसिद्ध होती. त्याचप्रमाणें सात्त्विक व दयाळू साहेब लोकांत मि० ब्राऊन व मि० टर्कीन यांची गणना होती. मेकॉलें-साहेबांच्या विचारांची पुनरुक्ति येथें त्या वेळीं होऊं लागून पाठशाळा मोडून कॉलेजें काढण्याचा विचार चालू होता. शहरांत एकंदर २२ शाळा असून त्यांत ११२६ मुलें शिकत होतीं. सध्यां एकाच शाळेंत इतकीं मुलें आहेत. वकिली व मुनसफी या दोन परीक्षा चालू होत्या व पुण्याच्या अदालतींत वकिलांची गर्दी झाल्यामुळें त्यांपैकीं कांहीं दुसरीकडे पाठवावे असा विचार चालू होता. दक्षिणेच्या परीक्षेस मात्र ४०० वर विद्यार्थी बसत होते. तेव्हांपासूनच चालत आलेल्या दोन संस्था म्हणजे एक नेटिव जनरल लायब्ररी व दुसरी डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी या होत. लोकांत वाचनाभिरुचि वाढली पाहिजे व वर्तमानपत्रें निघालीं पाहिजेत असे विचार उद्भवूं लागले होते, हें ज्ञानप्रकाशास आलेल्या पत्रावरून दिसून येतें. पाश्चात्य देशांत मायक्रॉस्कोप निघून बरींच वर्षें झालीं होतीं. पण तो या वेळीं नुकता हिंदुस्थानांत आला व तो दाखविण्याकरितां साहेब लोक आमच्या लोकांना घरीं बोलावीत असत. हिंदुस्थानांत अजून आगगाड्या आल्या नव्हत्या; पण त्यांचीं लहान लहान

'मॉडेल्स' मुंबईच्या टाउनहॉलांत ठेविलेलीं होतीं व संस्थानिक वगैरे मंडळी तीं पाहण्यास जात असत. टपालाच्या सोईकरितां बैलगाड्या ठेविलेल्या होत्या. येथून टपाल प्रथम पनवेलीस जावयाचें व नंतर मचव्यांतून मुंबईस न्यावयाचें, अशी व्यवस्था होती. पुण्याची सांपत्तिक स्थिति कशी होत चालली होती हें एकानें वर्तमानपत्रांतून ओरड केली आहे त्यावरून कळून येतें. त्या वेळीं पुण्यांतील बाजारभाव होते ते पुढीलप्रमाणें:—

-ज्ञानप्रकाशपुस्तक १—३० एप्रिल सन १८४९.

निरख.

| दररुपयास | दररुपयास |
|---|---|
| तांदूळ ४ पायली कैली. | गूळ १२ शेर वजनी |
| हरभरे ७ पायली " | तूप २॥।- शेर " |
| गहूं ६॥। पायली " | साखर ४ शेर " |

आपल्याकडे कापूस पिकतो मग कापड कां होऊं नये? प्रयत्न केला तर करतां येईल, अशी कल्पना त्या वेळींही लोकांना आली असा उल्लेख आहे. त्या वेळीं पुण्यास क्रॉनिकल, व मुंबईस टेलिग्राफ, कूरिअर, प्रभाकर, ज्ञामेजमशेट, ज्ञानोदय, समाचारदर्पण वगैरे प्रमुख वर्तमानपत्रें निघत होतीं. 'वाचून काय ध्वज लावणार'! असें म्हणणारा व 'वाचनांतच सर्वस्व आहे, त्यांतच आपला तरणोपाय आहे' असें म्हणणारा असे दोन पक्ष त्या वेळीं अस्तित्वांत होते. निमसरकारी पत्रें काढण्याविषयीं त्या वेळींहि प्रयत्न झाला होता. ज्ञानप्रकाशाचे त्या वेळचे संपादक रा. कृष्णाजी त्रिंबक रानडे हे होते. हें पत्र शिळाछापावर छापलें जात असे. त्याची वार्षिक वर्गणी १० रु. असून वर्गणीदार १०० होते व एवढ्या वर्गणीदारांच्या संख्येचा संपादकांना मोठा अभिमान वाटत असे! पुण्यांतील पाठशाळा काढून तेथें कॉलेजें स्थापावीं असा मजकूर ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झाला होता. त्याबद्दल संपादकांना बहिष्कृत करावें, अशीहि एका गृहस्थानें सूचना केली होती. आपले विचार लोकांना कळवावे म्हणून तेव्हांची शास्त्री मंडळीहि एक मराठी वर्तमानपत्र काढणार होती. तेव्हांच्या सुशिक्षित मंडळींचाहि शास्त्रीमंडळीवर कटाक्ष होता, ज्ञानप्रकाशांतील नवीन कवितेचा मासला पहा—

आर्या.

प्रथम परीक्षा द्याव्या जिल्हे जज्जासमीप हो जावें ।
प्रश्नोत्तरें समइकें देउनि सर्टीफिकीट हो घ्यावें ॥

श्लोक.

प्राक्तनें मिळे मुनसफी जरी । तरि मनाशि ये बहुत गुर्गुरी ।
द्रव्य मद्य हें मानवी तसें । लागतें मना इंक्तती पिसें ॥ १ ॥

सामाजिक चालीरीतींसंबंधानें त्या वेळींहि वर्तमानपत्रांतून वाद चालत असे. एक गृहस्थ आपल्याबरोबर गाडींत एका स्त्रीस घेऊन बुधवारांतून गेला, त्याबद्दल जिकडे तिकडे चर्चा सुरू झाली. त्याविषयीं ज्ञानप्रकाशकारांनीं 'त्यानें आपली स्त्री किंवा बहीण बरोबर घेतली असेल' अशा तऱ्हेच्या उदार दृष्टीचें ( Charitable view ) विधान करून त्या वेळींही त्याचा कैवार घेतला होता. पोषाखाबद्दल विचार केला तर त्या वेळीं पोषाखाची कांहीं तरी ठरीव पद्धति असे. पण सध्यां पुण्याच्या पोषाखाबद्दल कांहीं ठरीव असें सांगतां येणार नाहीं. करमणुकीसंबंधानें विचार केला तर त्या वेळीं नाटकें मुळींच नव्हतीं. तमाशे व सर्कशी हींच काय तीं करमणुकीचीं साधनें. 'दारू म्हणजे काय हें आम्हांस ठाऊकहि नव्हतें; पण इंग्रजी राज्यापासून हा दुर्गुण आमच्यांत शिरला' असे उद्गार तेव्हांपासून ऐकूं येऊं लागले. राजकारणाबद्दल लोक विचार करीत नव्हते असें नाहीं; पण संस्थानिक राजे हे मूर्ख, पराधीन अशी मात्र सार्वत्रिक समजूत होती. केव्हां केव्हां इंग्रजी राज्याविषयीं प्रतिकूल मतेंहि बाहेर पडत असत.

# प्रो० रॉलिनसन यांचें 'शिवचरित्र'*

या उत्सवांत त्या वर्षी सांपडलेल्या कागदपत्रांवरून महाराजांच्या इतिहासासंबंधानेंहि चर्चा करण्याचा प्रघात आहे. दोन वर्षांपूर्वी अशाच एका इतिहासाच्या प्रमेयासंबंधानें मी बोललों होतों; पण या दोन वर्षांत तशा प्रकारची चर्चा करण्याजोगे महत्त्वाचे कागदपत्र सांपडले आहेत असें मला वांटत नसल्यामुळें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या प्रो० रॉलिनसन यांच्या शिवचरित्रासंबंधानें मी चार शब्द सांगणार आहें. हें पुस्तक जरी लहान आहे तरी शिवाजीमहाराजांच्या चरित्राबर युरोपियनानें स्वतंत्र रीतीनें लिहिलेलें असें हें पहिलेंच पुस्तक आहे. ग्रँट डफच्या मराठ्यांच्या इतिहासांत शिवाजी हा मराठी राज्याचा संस्थापकच होता म्हणून त्याच्यासंबंधानें बरींच पानें खर्ची पडलीं आहेत. त्याचप्रमाणें प्रिंझलनें केलेल्या एका मराठ्यांच्या बखरीच्या भाषांतरांतहि शिवाजी महाराजांचें चरित्र आलें आहे. पण केवळ महाराजांच्या चरित्रालाच वाहिलेलें असें हें इंग्रजींतील पहिलेंच पुस्तक होय असें म्हणावयास हरकत नाहीं. शिवाजीसंबंधानें लिहिणारे सर्व इतिहासकार शिवाजीला लुटारू, दगलबाज वगैरे विशेषणें देतात पण तशा प्रकारचे शब्दप्रयोग या पुस्तकांत नाहींत. प्रत्यक्ष बखरीचें भाषांतर करितांनादेखील मूळ बखरींत असणें संभवनीय नसलेलें शिवाजीच्या स्वभावाचें वर्णन पूर्वग्रहदूषित झालेल्या प्रिंझलनें केलें आहे. प्रो० रॉलिनसन साहेबहि या दोषापासून सर्वस्वीं अलिप्त राहिलेले नाहींत. युरोपियन इतिहासकारांनीं शिवाजीवर निंदाव्यंजक शब्दांचा, तर न्या० रानडे यांनीं आपल्या 'Rise of the Maratha Power' या पुस्तकांत स्तुतीचा भडिमार केला. म्हणून हे दोनहि मार्ग सोडून मीं मध्यममार्ग स्वीकारला आहे, असें प्रो० रॉलिनसनसाहेबांनीं म्हटलेलें आहे पण गुणदोषविवेचनात्मक असा मध्यम मार्ग स्वीकारून त्यांनीं शिवाजीसंबंधानें जे कांहीं उद्गार काढिले आहेत तेहि वस्तुस्थितीला धरून नाहींत. त्यांनीं शिवाजी महाराजांच्या इतिहासासंबंधानें प्रसिद्ध असलेले ग्रंथ व चरित्रें वाचलीं असतीं व त्यांचें अंतःकरण

---

*ता. २० जून १९१६ रोजीं किर्लोस्कर थिएटरांत श्रीशिवाजी उत्सवामध्यें झालेल्या व्याख्यानाचा सारांश.

पूर्वग्रहानें दूषित नसतें तर असे उद्गार त्यांनीं खचित काढले नसते. हिंदु-पादशाहीस्थापनेच्या उच्च आकांक्षेनें प्रेरित होऊन शिवाजीनें राज्य स्थापलें, मोंगल व विजापूरकर यांच्याशीं मोठ्या मुत्सद्दीगिरीनें वागून त्यानें त्यांच्यावर आपला पगडा बसविला, शिवाजीच्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी होत गेल्या तरी तो धर्मबुद्धीपासून कधीं ढळला नाहीं, शिवाजीनें आपल्या राज्याची व्यवस्था फार उत्तम ठेविली होती वगैरे गुण प्रोफेसरांनीं वर्णन केले आहेत हें दृष्टीचा कोन बदलल्याचें लक्षण म्हणा किंवा कांहीं म्हणा, त्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत यांत शंका नाहीं.

पण शिवाजीचें कितीहि गुणवर्णन केलें तरी त्यांनीं शिवाजीबद्दल काढलेल्या कांहीं दोषारोपांच्या उद्गारांवरून त्यांनीं केलेलें हें गुणदोषविवेचन निःपक्षपातीपणाचें झालें नाहीं, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. विजापूरची आदिलशाही मोडकळीस आली आणि मोंगलांनीं येथें ठेवलेले सरदार मोंगलपादशाहीवर संकट आल्यामुळें देश सोडून निघून गेले ही संधी साधून शिवाजीनें येथल्या जहागिरी बुडवून देश काबीज केला, याबद्दल रॉलिनसन साहेबांनीं शिवाजीला दोष दिला आहे. पण स्वराज्यस्थापनेच्या कामीं चालून आलेल्या संधीचा शिवाजीनें योग्य फायदा घेतला याबद्दल त्याला दोष न देतां उलट परिस्थितीचा योग्य फायदा घेतल्याबद्दल त्याची तारीफच केली पाहिजे. लोभमूलक दृष्टि ठेवून शिवाजीनें कोंकणप्रांत जिंकला असें प्रोफेसरसाहेब म्हणतात. पण ज्यानें सबंध महाराष्ट्र जिंकला, त्याला आपण देश जिंकावयाचा व कोंकण दुसऱ्याकरितां राखून ठेवावयाचें असें थोडेंच होतें. देशाबरोबर महाराष्ट्रांत समावेश होत असलेला कोंकणप्रांतहि जिंकला यांत लोभीपणा कोणता दिसून आला कांहीं कळत नाहीं. कर्नाटक प्रांत जिंकण्यांत शिवाजीचें अदूरदर्शित्व दिसून आलें व या कामीं त्यानें मोठा अन्याय केला असें प्रोफेसरसाहेबांचें म्हणणें आहे. दूरदर्शित्व किंवा अदूरदर्शित्व हें भविष्यकालावरून ठरवावयाचें असतें. तेव्हां या दृष्टीनें पाहिलें असतां संभाजीनंतर सर्व महाराष्ट्र देश मोंगलाच्या ताब्यांत गेल्यावर कर्नाटकांतील जिंजी किल्ला मराठ्यांच्या ताब्यांत होता म्हणूनच राजारामाला त्या ठिकाणीं जाऊन मराठी राज्य कायम ठेवण्याविषयीं खटपट करतां आली. अर्थात् यांत शिवाजीचें दूरदर्शित्वच दिसून आलें. शिवाय मुसल-

मानांना जाऊन मिळालेल्या आपल्या भावाला शासन करण्याकरितांच त्यानें जहागिरीचा वांटा मागितला यांत शिवाजीनें कांहीं अन्याय केला असें नाहीं. शिवाजीच्या अंगांत येण्यासंबंधानें असाच वाद असून या बाबतींत शिवाजी हा धर्मवेडा, किंवा आपल्या अंगांत येतें असें लोकांना भासविण्याइतका तो अप्रामाणिक होता अशा दोन गोष्टी संभवतात. पैकीं तो धार्मिक बुद्धीचा होता तरी तो भाविक भाबडा भोळसट होता असें म्हणतां यावयाचें नाहीं. त्याच्यावरचा अप्रामाणिकपणाचा आरोप तर सपशेल खोटा आहे. उत्पन्न झालेल्या अनक बिकट संकटांना शिवाजीनें स्वतः जातीनें तोंड दिलें; अंगांत आल्याचा बहाणा करून व देवीचें खोटें वाक्य सांगून दुसऱ्या कोणाला तरी त्यानें संकटाच्या तोंडीं दिलें असें झालें नाहीं. अंगांत येण्यासंबंधानें प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टींतदेखील जर प्रेक्षकांत मतभेद दिसून येतो, तर ३०० वर्षांपूर्वीं शिवाजीच्या अंगांत येत होतें कीं नाहीं याबद्दल आज वादविवाद करीत बसण्यांत तात्पर्य काय ? येवढें खरें कीं, आणीबाणीच्या प्रसंगाला कर्त्या व आत्मप्रत्ययी पुरुषाच्या तोंडून आपल्यावर परमेश्वरी कृपा आहे, अमुक एक असें व्हावें अशी परमेश्वराची इच्छा आहे व त्याप्रमाणें तें घडून येणारच असें स्वाभाविकपणें उद्गार निघतात. नेपोलियननें फर्स्ट कॉन्सल होण्याच्या प्रसंगीं, सीझरनें तुफानांत सांपडल्या वेळीं, व ऑरेंजच्या वुइल्यमनें समरांगणांत आपल्या आसपास गोळ्यांचा भयंकर वर्षाव होत असतांना परमेश्वरासंबंधानें असेच आत्मप्रत्ययाचे उद्गार काढले होते, अशीं इतिहासांत उदाहरणें आहेत. फक्त कर्ते पुरुषच अशा प्रकारचे आत्मविश्वासाचे उद्गार काढतात. व त्यांवर अर्थातच लोकांचा विश्वास बसतो. शिवाजीमहाराज असेच श्रद्धावान् व आत्मप्रत्ययी होते, तेव्हां त्यांनींहि वेळोवेळीं असे आश्वासनपर व उत्तेजनपर उद्गार काढणें शक्य आहे.

शिवाजीमहाराजांचें चरित्र लिहितांना त्यावेळच्या हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या व सध्याच्या राज्यकारभाराच्या पद्धतींत तुलना करून, त्यावेळीं प्रातिनिधिक राज्यपद्धति हिंदुस्थानच्या लोकांना ठाऊक नसून मौर्य-घराण्यांतील राजांपासून चालत आलेल्या राज्यपद्धतीप्रमाणेंच शिवाजीच्या वेळींहि हिंदुस्थानचा कारभार चालला होता व हल्लींहि तसाच म्हणजे एकतंत्री चालला

आहे; तेव्हां आजच नांवें ठेवण्यासारखें काय आहे, असें सध्यांच्या राज्यकारभारासंबंधानें आपलें मत प्रो० रॉलिनसन यांनीं दिलें आहे. प्रातिनिधिक राज्यपद्धतीचें तत्त्व आम्हांला माहीत नव्हतें हें जरी खरें मानलें तरी त्या वेळीं आमच्याच देशांतील लोक आमच्यावर राज्य करीत होते हें तरी खरें आहेना? मग त्यापूर्वीच्या कालाप्रमाणें व सध्यां संस्थानांत चालू असलेल्या राज्यपद्धतीप्रमाणें हिंदी अधिकारीवर्गाच्या हातांत राज्यसूत्रें देण्याबद्दल प्रो० रॉलिनसन हे सरकाराजवळ शिफारस करतील काय? विसाव्या शतकांतील पाश्चात्य सुधारणेच्या व नीतिमत्तेच्या मापानें शिवाजीचे गुणदोष मोजं नयेत किंवा त्या दगडावर शिवाजीचा स्वभाव कसोटीस लावूं नये; शिवाजीच्या काळचा समाजच अज्ञानांधकारांत बुडून गेलेला व अत्याचारी होता (Dark & Violent) असें विधान करून व शिवाजीची तरफदारी करण्याचा आव घालून त्या वेळच्या महाराष्ट्रीय समाजालाच नांवें ठेवण्याचा प्रोफेसरसाहेबांनीं अत्यंत निंद्य प्रयत्न केला आहे. पाश्चात्य नीतिमत्तेचें माप म्हणजे काय हेंच मला कळत नाहीं. सुधारणा झाल्या किंवा शिक्षण वाढलें म्हणजे नीतिमत्ता वाढतेच असें नाहीं, तर उलट जास्तच गुन्हे होऊं लागतात असें स्पेन्सरनेंच एके ठिकाणीं म्हटलें आहे. Dark & Violent age प्रमाणें त्या कालांत समाजांत विशेष क्रूरपणा आढळून येत होता, त्या वेळचे लोक लांचलुचपत घेणारे होते तेव्हां अशा समाजांत शिवाजीनें लांचलुचपत देऊन किल्ले घेतले, किंवा एकाएकीं हल्ले करून किल्ले घेतले हें ठीकच झालें असें प्रोफेसरसाहेबांचें म्हणणें आहे. पण ज्या पाश्चात्य समाजाच्या नीतिमत्तेची प्रोफेसरसाहेब बडेजावी सांगतात त्या समाजांत त्या वेळीं कोणते प्रकार घडत होते हें त्या वेळच्या इंग्लंडचा इतिहास वाचणारांच्या तेव्हांच लक्षांत येण्यासारखें आहे. सन १६५० ते १६८५ च्या दरम्यानच्या काळांत इंग्लिश लोकांत राष्ट्रीय चारित्र्य वसत नव्हतें, इंग्लिश समाजांत नीति कशी ती नव्हती, धनी चाकराला व नवरा बायकोला बदडून काढी अशा प्रकारचा क्रूरपणा कुटुंबांत दिसून येत असे; ड्रेक व रॅले हे नवीन भूमीचा शोध लावणारे महात्मे नसून निवळ चांचे लोक होते व सोन्याच्या खाणी असलेलीं बेटें शोधून काढण्याकरितां हे धाडसाचीं कामें करीत. पायाला खोडा घातलेल्या गुन्हे-

गाराचा लोक दगड व विटा मारून छळ करीत व प्रसंगीं त्याला ठारहि मारीत. परवां परवां १८८२ च्या सुमारास हिंदुस्थानांतील बंगाल प्रांताची इंग्लंडशीं तुलना करून पाहिली असतां बंगालच्या ३० पट गुन्हे इंग्लंडांत होतात असें आढळून आलें, असें पी. एन्. बोस नांवाच्या एका गृहस्थांनीं सर वुइल्यम हंटर यांच्या लेखाच्या आधारें आपल्या 'Illusions of New India' या पुस्तकांत लिहिलें आहे. त्याचप्रमाणें लांचलुचपतीसंबंधानें शिवाजी महाराजांना नांवें ठेवणारांनीं १८०० सालांत आयर्लंडचें पार्लमेंट जेव्हां इंग्लिश पार्लमेंटला जोडण्यांत आलें त्या वेळीं इंग्लंडचे मुख्य प्रधान पिट यांनीं, त्यांच्या मंत्रिमंडळानें व हिंदुस्थानचे गव्हर्नर–जनरल व त्या वेळचे आयर्लंडचे व्हाइसरॉय लॉर्ड कॉर्नवालिस यांनीं आयरिश पार्लमेंटनें आपलें थडगें आपणच उकरून ठेवण्यास तयार व्हावें म्हणून लांचलुचपतीचे कोणते अनन्वित प्रकार केले हें इतिहासज्ञांना सांगावयास पाहिजे असें नाहीं. फार कशाला १७ व्या शतकांतील महाराष्ट्रीय समाजाला नांवें ठेवणाऱ्या व विसाव्या शतकांतील पाश्चात्य सुधारणेचा टेंभा मिरविणाऱ्या प्रोफेसरसाहेबांनीं सध्यां युरोपांत काय चाललें आहे इकडे थोडेंसें लक्ष दिलें असतें तर फार बरें झालें असतें. आज अर्धे युरोप दुसऱ्या अर्ध्याला रानटी, क्रूर, विश्वासघातकी इत्यादि शेलकीं विशेषणें कशीं देत आहे व सध्यांच्या प्रसंगीं तेथें कोणते अनन्वित प्रकार चालले आहेत इकडे प्रोफेसरांचें लक्ष गेलें असतें तर आमच्या समाजाला त्यांनीं इतकीं नांवें खालीनें ठेवलीं नसतीं. तथापि एकंदरींत प्रो. रॉलिनसनसाहेबांनीं कांहीं चुका केल्या असल्या तरी शिवाजीमहाराजांसंबंधानें युरोपीय ग्रंथकारांची दृष्टि आतां निवळत चालली आहे. ती पूर्ण बदलली म्हणजे हा कलुषित पूर्वग्रहरूपी समंध पूर्णपणें गाडला जाईल यांत शंका नाहीं व तसा दिवस सुदैवानें लवकरच येईल अशी मला आशा आहे.

ग्रंथालय ... ना ...

# ऐतिहासिक आठवणी व सद्यःस्थिति*

रा. शि. म. परांजपे यांचें तात्त्विक व्याख्यान व रा० अळेकर यांचें व्यावहारिक व्याख्यान या दोघांचें एकत्र मनन केल्यास विषयास पूर्णता येते. परांजपे यांनीं मनाच्या शक्तीचें उत्कृष्ट वर्णन केलेलें आहे. मनाच्या शक्तीबद्दलचा सिद्धांत आपल्या जुन्या व पाश्चात्य वाङ्मयांतहि प्रतिपादन केलेला आहे. बायरनचें 'प्रिझनर ऑफ शिलॉन' हें काव्य वाचल्यास, शरीर बंदिवान होऊन पडलें तरी मन स्वातंत्र्याच्या वातावरणांत कसें नांदूं शकतें हें कळून येईल. पण मनाच्या मदतीनें शुद्ध हवेंत जाऊन कल्पनासुख भोगण्याचा आनंद नुसत्या विपन्नांनाच नव्हे तर संपन्नांनाहि आवडतो. संपन्न झाला तरी त्याची सुस्थिति सर्वांगांनीं पूर्णतेस गेलेली असते असें नाहीं. श्रीमंत लोकांना ईश्वरानें सुस्थितींत उत्पन्न केलें म्हणून त्यांच्यामध्यें राष्ट्रीय हितबुद्धि नसते असें म्हणणें हा अन्याय होईल. इटालीचा अभ्युदय होण्यास दरिद्री ग्यारिबाल्डीप्रमाणें संस्थानिक व्हिक्टर इमान्युएल याचीहि राष्ट्रीय हितबुद्धि उपयोगी पडली, किंबहुना त्या वेळीं राष्ट्रीय पुढारी होण्यास असा संपन्न व स्वार्थत्यागी संस्थानिक न मिळता तर इटालीला स्वातंत्र्य मिळतेंचना! राष्ट्रांच्या दृष्टीनें पाहतांहि, आहे ती सुस्थिति गमावण्यास तीं तयार नसलीं तरी जुन्या ऐतिहासिक आठवणी राष्ट्रं त्याज्य मानीत नाहींत. अमेरिका व इंग्लंड यांची आज दोस्ती असली तरी, जुलईची ४ थी तारीख आली म्हणजे, आपण पूर्वी इंग्लंडशीं लढून या दिवशीं स्वातंत्र्य मिळविलें या गोष्टीचा उत्सवसमारंभ अमेरिकन लोक करणारच! फ्रान्स व इंग्लंड यांची आज दोस्ती आहे तरी इंग्लंडची शत्रू जी जोन ऑफ आर्क तिचा उत्सवसमारंभ फ्रेंच लोक करणारच! तात्पर्य, ऐतिहासिक आठवणी व वस्तुस्थिति यांचा विरोध बिनतोड आहे असें मानण्याचें कारण नाहीं. म्हणून महाराष्ट्राची आजची जी स्थिति आहे ती असतांहि इतिहासाच्या उच्च पर्वतावर मधूनमधून चढून तेथील ताजी हवा पोटांत घेणें हें सर्वस्वीं युक्तच आहे.

---

* श्रीशिवाजी उत्सवांत अध्यक्ष या नात्यानें केलेलें भाषण. ता. १२ जून १९१७

पण इतिहासाच्या पर्वतशिखरावर ताजी हवा घेत सदैव राहतां येत नाहीं व राहून चालत नाहीं हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. बाराहि महिने पर्वत शिखरावर घालवितां आलें व खालच्या व्यवहाराच्या जाचांतून मुक्त होतां आलें तर तें कोणासहि हवेंच आहे, पण तें होणार कसें? इतिहास स्वादासंबंधीं दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, इतिहास हा मनुष्याच्या हातीं एखाद्या सोन्याच्या गटाप्रमाणें संकलित ज्ञान देतो; पण तें सोनें कोठें कसें किती किंमतीस मोडावें व खावें याचें तारतम्यज्ञान स्वतः मनुष्यास असावें लागतें. कित्येक वेळां इतिहास हा मार्कट्वेननें एका विनोदी गोष्टींत सांगितल्याप्रमाणें, १०००० पौंडांइतकी मौल्यवान् चलनी नोट आपल्या स्वाधीन करतो, पण अट अशी घालतो कीं, ती मोडू तर नये, पण ती दाखवून बाजार तर करून यावा. परिस्थितीमुळें अव्यवहार्य असणारे असे इतिहासाचे जे अनुभव ते या चलनी नोटीसारखे असतात. त्यांचा प्रत्यक्ष उपयोग करतां येत नाहीं म्हणून त्यांच्या पतीवर जो व्यवहार सिद्धीस नेतो त्यानेंच खरोखर शहाणपणानें इतिहास वाचला. इतिहास वाचल्यानें किंवा ऐतिहासिक स्थळें पाहूं गेल्यानें भुतें अंगांत संचारणें हें स्वाभाविक असेल, पण याहि बाबतींत दोन गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. भुतांतहि सुष्ट व दुष्ट असे दोन प्रकार असतात, म्हणून दुष्ट भुतांनीं आपल्या अंगांत संचरूं नये अशाविषयीं खबरदारी घेतली पाहिजे. पहिल्या बाजीरावाचें भूत अंगांत शिरावें म्हणून शनिवारवाड्यांत गेलें आणि तेथें आनंदीबाईचेंच भूत अंगांत शिरलें तर काय उपयोग? दुसरी गोष्ट अशी कीं, भूतेंसुद्धां चाणाक्ष असतात. तीं देखील परकायाप्रवेशाच्या कामीं पात्रापात्रतेचा विचार चांगलाच करतात. रायगडावर आजवर हजारों माणसें गेलीं असतील व पुढेंहि जातील, पण शिवाजीच्या भुताला फार तर कोणत्या तरी एकाच शरीरांत प्रवेश करतां येणार व सत्पात्र मिळेपर्यंत तो प्रवेश होणारहि नाहीं. शिवाजीचें भूत कुडी पाहील ती आपल्या गुणासारखे गुण ज्या कुडींत आढळतील तीच पाहील व तींतच प्रवेश करील. शिवाजी हा जातीनें धाडशी होता. कदाचित् ज्यांत प्राणहि जातील अशा प्रसंगीं तो स्वतः जातीनें हजर असे. अशा प्रसंगीं तो केवळ आपल्या अनुयायांवर काम सोंपवीत नसे. शिवाजी हा स्वार्थत्यागी, अत्यंत उद्योगी, व परिस्थितीचा विषाद मानून बाजूस



शंभर वर्षांपूर्वीचें पुणें

बसून केवळ जुने इतिहास वाचीत नसे. परिस्थिति बिकट तर खरीच व खुद्द शिवाजीलाहि तिच्यापुढें कैक वेळां नमावें लागलें. तथापि नाइलाज म्हणून तेथें परिस्थितीचा पाय आपल्या छातीवर सोसून व साधेल तेथें परिस्थितीच्या छातीवर आपला पाय देऊन शक्य तितकें डोकें वर उचलणारा कट्टा कर्मयोगी शिवाजी होता. व्यक्तिनिष्ठ स्वातंत्र्यबुद्धि व परिस्थिति हीं दोनहि ईश्वरनिर्मितच आहेत.

# शंभर वर्षांपूर्वी*

कांहीं वर्षांपूर्वी '६० वर्षांपूर्वीचें पुणें' या विषयावर मीं या मालेंतच व्याख्यान दिलें होतें; पण तोच विषय थोडा व्यापक दृष्टीनें आपणापुढें मांडावा या हेतूनें 'शंभर वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र' या विषयावर मी आज बोलणार आहें. त्या वेळीं केवळ स्थलवर्णन व लोकवर्णन देऊन मीं पुण्याची माहिती सांगितली होती. आजच्या विषयाला 'मराठेशाहीच्या निधनाचें शतसांवत्सरिक श्राद्ध' असेंहि नांव देतां येईल. कारण १८१७ सालींच पेशवाई नष्ट झाली. आपण नेहमीं श्राद्धें करतों, म्हणजे एका प्रकारानें आपल्या वाडवडिलांची आठवणच करतों. तेव्हां या दृष्टीनेंच नष्ट झालेल्या पेशवाईची मी आपल्यास आठवण देणार आहें. आज १९१७ सालीं हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे या नात्यानें आपण सरकारपाशीं हक्क–काळ्या-गोऱ्यांचे–स्वराज्याचे हक्क मागत आहोंत, पण तेच आम्ही महाराष्ट्राचे लोक आज शंभर वर्षांपूर्वी आपल्या स्वतःचें असलेलें 'निर्भेळ स्वराज्य' घालविण्याच्या उद्योगांत होतों. आपल्या देशाच्या इतिहासांतील शतमानें हे मैलाचे दगड कल्पून असेंच मागें जाऊन आपण विचार करूं लागलों असतां असें दिसतें कीं, १७१७ सालीं बाळाजी विश्वनाथास नुकतीं पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं होतीं व त्यानें दिल्लीस जाऊन व चौथाई–सरदेशमुखीच्या सनदा बादशहाकडून मिळवून हिंदुस्थानच्या साम्राज्यविषयक धोरणांत मराठेशाहीचा प्रवेश केला होता. त्याच्याहि मागें १०० वर्षें जाऊन

* वसंतव्याख्यानमालेंतील व्याख्यान–ता. ८ मे १९१७.

पाहिलें तर १६१७ सालीं शहाजीराजांनीं मलिकंबरच्या साहाय्यानें निजामशाहीचें संरक्षण करून व त्या दरबारीं मराठ्यांचें वर्चस्व स्थापन करून मराठेशाहीचा पाया घालण्याचा प्रयत्न चालविला होता असें आढळून येईल. याप्रमाणें १६१७ पासून १८१७ पर्यंत अवघ्या दोनशें वर्षांत महाराष्ट्र-महोदयाचा पूर्वरंग व उत्तररंग होऊन ता. १७ नोवेंबर १८१७ सालीं शनिवार-वाड्यावर इंग्रजांचें निशाण लागलें, तेव्हां पेशवाई नष्ट होऊन मराठेशाहीची इतिश्रीहि झाली. पेशवाई बुडाली म्हणजे सर्व मराठेशाही बुडाली असें म्हणण्याचें कांहीं कारण नाहीं, असें म्हणणारा एक पक्ष आहे. १८४८ सालीं मराठेशाहीची परिसमाप्ति झाली हें जरी खरें, तरी मराठेशाहीचा मुख्य व महत्त्वाचा घटक या नात्यानें विचार केला म्हणजे पेशवाई बुडाली तेव्हांच मराठेशाहीचा सूर्य अस्तास गेला असें म्हणण्यास मला कांहीं हरकत वाटत नाहीं. १८०३ सालीं असई मुक्कामीं मराठेशाहीचे मुख्य आधारस्तंभ शिंदे यांचा पराभव करून त्यांच्याशीं इंग्रजांनीं स्वतंत्र तह केला, तेव्हांपासूनच मराठेशाही नष्ट होण्याच्या मार्गास लागली व तिला पूर्ण नष्ट होण्यास १८०३ पासून १८४८ पर्यंत म्हणजे ४५ वर्षें लागलीं. १८१७ सालीं राज्यक्रांतीचें निदर्शक असें निशाण शनिवार-वाड्यावर लागलें. त्या वर्षाचा इतिहास सांगतांना आज शंभर वर्षांपूर्वीं बरोबर आजच्याच तारखेस काय घडलें हें पाहण्याजोगें आहे. आज शंभर वर्षांपूर्वीं ता. ८ मे रोजींच पुण्याचे लोक जागे झाले तों पुण्याला चोहोंबाजूनें इंग्रजांचा वेढा पडलेला त्यांना आढळून आला. पुण्याचे चौफेर पांच मैल क. स्मिथ यांच्या सैन्यानें हा वेढा घातला होता व पुण्याच्या दक्षिणेस इंग्रजांच्या सैन्याचें हेड क्वार्टर असलेल्या पर्वतीजवळ एल्फिन्स्टन-साहेब लष्करी शिपायांकडून सलामी घेत फिरत होते. बडोद्याचा दिवाण गंगाधरशास्त्री पटवर्धन याचा खून करविणाऱ्या त्रिंबकजी डेंगळ्यास आपल्या स्वाधीन करण्याबद्दल बाजीरावाकडून वचन घ्यावें व मुकाट्यानें तसें वचन न मिळाल्यास तें सक्तीनें घ्यावें, या हेतूनें हा वेढा घालण्यांत आला होता. गंगाधरशास्त्र्याचा खून त्याच्या बडोद्यांतील प्रतिस्पर्ध्यांनीं मारेकरी घालून केला, त्यांत त्रिंबकजी डेंगळ्याचें अंग नव्हतें. इंग्रजांनीं कांहीं तरी 'कुभांड' रचलें. पेशव्यांबरोबर लढून त्यांना जेरीस आणावयाचें होतें

म्हणून पुण्याला वेढा घातला असें बखरकारांनीं म्हटलें आहे. आपल्या मार्गांत आड येऊन आपले हातपाय पसरण्याच्या कामीं अडथळा करणाऱ्या मनुष्यावर खुनाचे आरोप करावयाचे, हा मुत्सद्दीगिरींतील त्रिकालाबाधित नियम आहे. तेव्हां त्यास इंग्रज लोक तरी कसे अपवाद असणार? हा वेढा कांहीं एकाएकीं पडला नाहीं. त्रिंबकजी डेंगळ्याला स्वाधीन करण्यासंबंधानें यापूर्वीं बरेच दिवस वाटाघाट चालली होती; पण ता. ७ मे रोजीं एलफिन्स्टनसाहेबांनीं या बाबतींत निकराचें बोलणें चालविलें. तेव्हां आणखी कांहीं कालहरण करून आपली सैन्याची तयारी करण्यासाठीं मुदत मागण्याची पेशव्यांच्या दरबारांत युक्ति काढण्यांत आली. ही युक्ति ओळखून एलफिन्स्टनसाहेबांनीं मुदत दिली नाहीं; पण पुण्यांतील दोन गृहस्थांनीं साहेबांकडून मुदत मिळाल्याचें खोटेंच सांगितल्यामुळें बाजीराव अगदींच गाफिल राहिले, त्यामुळें क.स्मिथ यांस पुण्यास वेढा घालतांना एकहि गोळीबार करावा लागला नाहीं. स्वतःची कोणतीहि तयारी नसतांना वेढा पडल्यामुळें बाजीराव अडचणींत सांपडलेला पाहून इंग्रजांनीं बाजीरावसाहेबांकडून वसईच्या तहाचा पुनरुच्चार करून घेतला व रायगड, पुरंदर, सिंहगड हे तीन किल्ले आपल्या स्वाधीन करावे, सब्सिडिअरी फौज ठेवण्याकरितां सव्वीस लक्षांचा मुलूख तोडून द्यावा व शिंदे, होळकर वगैरे नर्मदेच्या उत्तरेकडील सरदारांशीं पेशव्यांचे कोणत्याहि प्रकारचे हक्कसंबंध नाहींत अशा प्रकारच्या अटी त्यांच्याकडून कबूल करून घेतल्या. एकहि गोळीबार न निघतां पुण्यास वेढा पडावा व पाहिजे त्या अटी लिहून देण्याइतकी बाजीरावाची दुर्बळ स्थिति व्हावी याला अनेक कारणें होतीं. त्यांपैकीं सर्वांत मुख्य कारण म्हटलें म्हणजे बाजीरावावर त्याच्या हाताखालचे सर्व सरदार नाराज होते, हें होय. शिंदे व होळकर इंग्रजांशीं स्वतंत्र तह करून पेशवाईपासून अलग झाले होते, बाळाजी विश्वनाथापासून सर्व पेशव्यांनीं साताऱ्याच्या गादीचा मान राखला होता; पण बाजीरावानें साताऱ्याचे त्या वेळचे महाराज प्रतापसिंह यांना बदींत ठेवून या प्रांतांतहि आपल्याला अप्रिय करून घेतलें होतें. बाजीरावाच्या या कृत्यानें संतापून जाऊन प्रतापसिंहाचा चुलता चतुरसिंग यानें बंड केलें; पण त्रिंबकजी डेंगळ्यानें त्याचा पराभव करून त्यालाहि कैदेंत टाकलें. शाहूमहाराजानंतर आपला मान राखून घेणारा

राजाहि सातारच्या गादीवर बसला नाहीं. सातारा प्रांतांत पेशव्यांसंबंधानें अप्रियता वाढविण्यास कोल्हापुरास मराठ्यांची गादी स्थापन करणारी ताराबाई हीच मुख्यत: कारणीभूत झाली होती. सातारची व कोल्हापूरची गादी एक करूं नये असें शाहूमहाराजांकडून निधनसमयीं बाळाजी बाजीरावांनीं लिहून घेतलें होतें, तरी या गाद्यांमधील वितुष्ट काढून टाकण्याचा त्यांनीं प्रयत्न केला होता, पण ताराबाईच्या दुस्वासामुळें ही गोष्ट साध्य झाली नाहीं. मराठेशाहींत कलहाचें बीज पेरणारी व पेशव्यांचें ऐश्वर्य पाहून मनांतून जळफळणारी ही बाई दीर्घायुषी होती व १७६१ सालीं पानपतच्या लढाईनंतर भाऊसाहेब व विश्वासराव यांच्या मरणाची बातमी ऐकून स्वतःची धन्यता मानून ती आपल्या वयाच्या ८२ व्या वर्षी मरण पावली. आज शतकानुशतकें कोल्हापूरचा व पुण्याचा कायमचा द्वेष आहे; पण सातारच्या महाराजांना कैदेंत टाकून बाजीरावानें पेशवाईसंबंधानें तिकडल्या प्रांतांतील लोकांच्या मनांतहि आपल्याबद्दल तिटकारा उत्पन्न केला होता. बाजीराव महत्त्वाकांक्षी होता, हुशार होता, धूर्त होता व पेशव्यांचें वर्चस्व हिंदुस्थानांत पुनः स्थापन करावें असें त्याला वाटत असे. पण करारी व दृढबुद्धीचा नसल्यामुळें त्याचे कोणतेहि हेतु सिद्धीस गेले नाहींत. ता. ८ मे सन १८१७ सालच्या या वेढ्यानंतर गोसावी, अरब, पठाण, पेंढारी वगैरे लोकांचें नवीन सैन्य ठेवून इंग्रजांना तोंड देण्याची तयारी त्यानें चालविली होती, पण पेशव्यांच्या दरबारांतील हर-घटकेस बित्तंबातमी ठेवणाऱ्या एलफिन्स्टनसाहेबांनीं ही तयारी होण्यापूर्वींच कलकत्ता, मद्रास वगैरे ठिकाणांहून सैन्य आणवून बाजीरावाचा हा प्रयत्न सिद्धीस जाऊं दिला नाहीं. मराठेशाही स्थापन झाल्यापासून सुरू असलेली सरंजामी पद्धति मोडून पदरच्या सरदारांच्या जहागिरी जप्त केल्यामुळें इतर कोणी सरदार बाजीरावास येऊन मिळाले नाहींत व सवाई माधवरावाच्या वेळीं नानाफडणिसाचा उजवा हात असलेले पटवर्धन सरदारहि आपल्या कांहीं जहागिरी गेल्यामुळें खडकी व अष्टीच्या लढाईच्या वेळीं आपल्या धन्याच्या गादीवर आलेल्या बिकट प्रसंगीं बाजीरावाला साहाय्य न करितां उदासीन राहिले. बापू गोखल्यानें मात्र शेवटपर्यंत बाजीरावाची पाठ सोडली नाहीं. खडकीच्या लढाईनंतर पळतांना बाजीरावानें सातारच्या

महाराजांना आपल्याबरोबर घेतलें होतें. पण अष्टी येथें पराभव होऊन बाजीरावानें जेव्हां पळ काढला त्या वेळीं सातारच्या महाराजांना इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत घेतलें. सातारच्या महाराजांना आपल्या हातीं धरावयाचें हा इंग्रजांचा प्रयत्न यापूर्वीं तीन वर्षें चालू होता व त्याप्रमाणें महाराजच स्वतः होऊन अष्टीच्या लढाईच्या वेळीं इंग्रजांच्या स्वाधीन झाले असें म्हणतात. प्रतापसिंहमहाराज हातीं लागल्यावर एलफिन्स्टनसाहेबांनीं त्यांना सातारच्या गादीवर नेऊन बसविलें. पुढें ता. ३ जून १८१८ सालीं बाजीरावानें पेशवाईचें तिलोदक इंग्रजांच्या हातावर कसें सोडलें ही हकीकत प्रसिद्धच आहे. बाजीरावानें जहागिरी जप्त केल्यामुळें त्याच्या हाताखालचे सर्व सरदार त्याच्यावर नाराज होते; पण १८१७ च्या सुमारास खुद्द पुण्यांतील लोकहि बाजीरावावर संतुष्ट होते असें नाहीं व त्यामुळेंच पुण्याला प्रत्यक्ष वेढा पडला तरी कोणींहि त्याचा प्रतिकार केला नाहीं. पुण्यांत त्या वेळीं बाजीरावाच्या कारकीर्दीबद्दल असंतुष्ट असलेले लोक होते एवढेंच नव्हे तर बेटावर असलेल्या एलफिन्स्टनसाहेबाला शहरांतील व दरबारांतील बित्तंबातमी देणारे चुगलखोरहि पुण्यांत जिकडे तिकडे पसरले होते. या सीक्रेटसर्विसमधील अग्रगण्य म्हणजे एक खुश्रुशेट मोदी नांवाचे पार्शी गृहस्थ व दुसरे बाळाजी नारायण नातू हे होत. पैकीं खुश्रुशेट मोदींनीं बाजीरावांना व एलफिन्स्टनसाहेबांना दोघानांहि खुष ठेवून दोघांकडूनहि बक्षिसें उपटण्याचा प्रयत्न केला होता, पण तो एलफिन्स्टनसाहेबांच्या हुशारीमुळें साधला नाहीं. बाळाजी नारायण नातू मात्र पहिल्यापासूनच सर्वस्वी इंग्रजांचे नोकर म्हणूनच काम करीत होते. शनवारवाड्यावर इंग्रजांचा बावटा लावणाऱ्या बाळाजीपंत नातूंना पुढें कसा पश्चाताप झाला हें त्यांनीं एलफिन्स्टनसाहेबांस पाठविलेल्या त्यांच्या स्वदस्तुरच्या पत्रांतील एका उताऱ्यावरून कळून येण्यासारखें आहे. "बाजीरावसाहेब पळून गेले त्या वेळेस पेशवे यांचे वाड्यावर बावटा लावावयास रॉबिनसनसाहेब (रॉबर्टसन) यांजबरोबर मलाच पाठविलें. मी जात नव्हतों तेव्हां तुम्ही भितां कीं काय म्हणूं लागले; सबब गेलों; यामुळें बाजीरावसाहेब व त्यांचे राज्यांतील सारे लोकांची मजवर दुष्मानी. सारे लोक एकीकडे व मी एकटा कंपनीचे लष्करांत होतों. सरकारांत माझे तर्फेचा अर्ज करावा व जर माझें इनाम-

पेन्शन सरकारांत वापस घेतलें असतां मजवर कोणाचा वहीम राहणार नाहीं, असें असल्यास वापस घ्यावयाचें ठरवून मला काशीस जाण्याची रजा द्यावी." शंभर वर्षांपूर्वीच्या पेशवाईच्या निधनकालचा हा असा इतिहास आहे; पण त्यांतूनहि आपणांस पुष्कळ शिकण्यासारखें आहे. ६००० हजार मैलांवरून मूठभर इंग्रज लोक हिंदुस्थानांत येतात काय, हिंदुस्थानच्या तीन टोंकावर आपल्या वखारी घालतात काय, व पुष्कळसे आमचेच लोक आपल्या पदरीं ठेवून आमच्याच राज्यांतून आपल्या सैन्याच्या हालचाली करून आमचेंच राज्य कसें घेतात; याचा विचार केला असतां सर्वस्वी परक्या लोकांच्या देशांत आपली सत्ता स्थापन करणें यांत इंग्रजांचें शहाणपण दिसून आलेंच, पण आपलें राज्य घालविण्याच्या बाबतींत आमची आपसांतील दुहीच मुख्यतः कारणीभूत झाली आहे हेंहि त्याबरोबर ध्यानांत ठेवलें पाहिजे. १०० वर्षांपूर्वीच्या स्थितींत व आजच्या स्थितींत पुष्कळ अंतर पडलें आहे. पूर्वीसारखें निर्भेळ स्वराज्य मिळविण्याची खटपट आज आम्ही करीत नसून काळ्यागोऱ्यांच्या शबल स्वराज्याचे हक्क आम्ही सरकारपाशीं मागत आहोंत, पण हे हक्कसुद्धां थोड्याथोडक्या कारणांनीं आपसांतील दुही कायम ठेवण्याची बुद्धि जोंपर्यंत आपल्यांत आहे तोंपर्यंत ते आम्हांला मिळावयाचे नाहींत. आपणांला आपल्या राज्यकर्त्यांकडून जें कांहीं मिळवावयाचें तें एकमतानें जोराचा प्रयत्न करून मिळविण्याचा प्रयत्न केल्यासच आपल्याला या स्वराज्याच्या चळवळींत यश येईल.

# साऱ्या धर्मक्षेत्रांचें एकच नशीब

— १ —

महायुद्धांतून चांगल्या गोष्टी कोणत्या निघाल्या व वाईट कोणत्या निघाल्या यांची बेरीज–वजाबाकी करून शिल्लक काय उरतें हें अजमावण्याचें काम फारच कठीण आहे. तथापि कांहीं चांगल्या गोष्टी घडणार असें उघड दिसतें. त्यांपैकींच एक ही कीं, ज्यू लोकांना हजारों वर्षांनंतर पाय टेकण्याला स्वतःची म्हणून भूमि मिळणार. ज्यू किंवा यहुदी लोक फार जुनेपुराणे आहेत. ज्या ख्रिस्ती धर्माला सुरू होऊन आज सुमारें दोन हजार वर्षें होत आलीं, त्याचा प्रारंभ व ज्यूइश राष्ट्राचा ऱ्हास या गोष्टी समकालीन होत, येवढें सांगितलें म्हणजे ज्यू लोकांच्या जुनाटपणाची कल्पना येईल. ख्रिस्ती धर्मानें यहुदी धर्माला मागें टाकलें, तर त्याच्या पूर्वीं यहुदी लोकांचेंहि राज्य नाश पावून त्याची वाताहात होऊन परक्यांच्या अमला-खालीं जावें लागलें होतें. ख्रिस्ती धर्म पुढें आल्यापासून तर काय बोला-वयासच नको. यहुद्यांनीं प्रत्येक ख्रिस्ती राष्ट्रांत आळीपाळीनें आसरा घेऊन पाहावें, पण प्रत्येक राष्ट्रानें त्यांना महारोगग्रस्ताप्रमाणें दूर लोटावें असेंच घडत आलें आहे. भारतीय वीर अश्वत्थामा, कपाळांतला मणि काढून घेतला गेल्यामुळें, जखम भरायला तेल मागण्याकरितां अमर होऊन जग-भर हिंडत असतो असें म्हणतात; तीच स्थिति प्रत्यक्ष ज्यूइश लोकांची आहे. वॉंडरिंग ज्यू हें नांव त्यांना त्यांच्या जगभर परिभ्रमणामुळेंच मिळालें आहे. म्हटलें तर जगांतील सर्व देशांत त्यांची वस्ती आहे; पण स्वतःचा म्हणावयाला त्यांचा असा देश एकहि नाहीं. तथापि धन्य त्या ज्यूइश लोकांची कीं, सर्व जगभर उपरी म्हणून राहणाऱ्या व सर्वत्र निंदा व हेटाळणी पावलेल्या या लोकांनीं आपल्या जन्मभूमीची आठवण टाकली नाहीं; एवढेंच नव्हे तर 'कधीं काळीं जिहोवा देवाच्या कृपेनें पॅलेस्टाईन प्रांतांत फिरून आपली सत्तेची म्हणून लहानशी भूमि होईल व राष्ट्र या नात्यानें आपण फिरून तेथें नांदूं' अशी आशा त्यांनीं निरंतर उराशीं बाळगली. या दृढविश्वासाचें फळ म्हणूनच कीं काय त्यांना या महायुद्धांत ही संधि

मिळाली. कारण सिरिया, मेसोपोटेमिया, पॅलेस्टाईन वगैरे मुसलमानी अमलाखालच्या प्रांतांत आतां दोस्त राष्ट्रांची हुकमत चालू लागली असून त्यांना ज्यूइश लोकांची दया येऊन म्हणा, किंवा आपण उपकृत केलेल्या संपन्न लोकांचें एक लहानसें राष्ट्र मुसलमानी मुलखांत निर्माण करून मुसलमानांच्या उरावर ठेवावें म्हणून म्हणा, दोस्त राष्ट्रांनीं ज्यूइश लोकांकरितां पॅलेस्टाईन प्रांतांत कांहीं भाग राखून ठेवून त्यांच्या स्वाधीन करण्याचा निश्चय केलेला दिसतो... दोस्त ख्रिस्ती राष्ट्रें क्षणभर ज्यूइश लोकांचें जुनें धर्मवैर विसरून गेलीं असून मुसलमानांचा नक्षा कसा कमी होईल याच विचारांत गढून गेलीं आहेत.

सुमारें दोन वर्षांपूर्वी लंडन येथील आल्बर्ट हॉलमध्यें एक मोठी सभा भरून पॅलेस्टाईन प्रांताची मँडेट किंवा हुकमत नव्या तहांत इंग्लंडनें स्वीकारली याबद्दल अभिनंदन प्रदर्शित करण्यांत आलें. अध्यक्षस्थानीं लॉर्ड रॉथ्सचाइल्ड, इंग्लंडांतील प्रमुख ज्यूइश उमराव, होते. शिवाय २८ देशांतील ज्यूइश लोकांचे प्रतिनिधीहि आले होते. मुख्य भाषण मि. बालफोर यांचें झालें. त्यांत त्यांनीं असें बोलून दाखविलें कीं, अरब लोकांना इंग्रजांनीं तुर्कांच्या जुलमापासून सोडविलें हें ध्यानांत घेऊन अरबांनीं ज्यूइश लोकांना पॅलेस्टाईन प्रांतांत गुण्यागोविंदानें नांदूं द्यावें. लॉर्ड रॉबर्ट सेसिल यांनीं तर, राष्ट्रसंघाच्या कल्पनेच्या बरोबरीनें ज्यूइश लोकांच्या पॅलेस्टाईनमधील पुनःप्रतिष्ठापनेला महत्त्व आहे असें सांगितलें. एकंदरीनें रंग असा दिसतो कीं, ज्यूइश लोकांचा पैसा व इंग्रजांची राजसत्ता यांच्या जोरावर पॅलेस्टाईन प्रांतांत एक प्रकारची सामाजिक व धार्मिक उत्क्रांति होणार. एवढी मात्र गोष्ट खरी कीं, इतर अनेक युरोपियन राष्ट्रांपेक्षां इंग्लंडनें ज्यू लोकांना अधिक सदयतेनें वागविलें आहे...

रोमन कॅथोलिक पंथाचा अंमल इंग्लंडांत असेपर्यंत ज्यूइश लोकांना तेथें पाऊल ठेवतां येत नसे. ऑलिव्हर क्रॉमवेलच्या वेळीं त्यांना इंग्लंडांत येण्याची परवानगी मिळाली, व ज्यांचा जर्मनी, रशिया वगैरे राष्ट्रांत असह्य छळ होईल ते इंग्लंडमध्यें येऊन सुखानें राहत. १८४६ सालापर्यंत या लोकांना इंग्लंडांतहि जमीन धारण करतां येत नसे, व नागरिकांचे कोणतेहि मुलकी हक्क त्यांना नसत. यापूर्वी बरींच वर्षें ज्यूइश लोकांना हे

हक्क द्यावे अशी उदारपणाची चळवळ सुरू होती. १८३३ सालीं ज्यू व कॅथोलिक यांना बहिष्कारांतून मुक्त करण्याचा प्रश्न पार्लमेंटपुढें आला, तेव्हां मेकॉलेनें त्यांच्यातर्फे केलेलें सुंदर भाषण पुष्कळांनीं वाचलेंच असेल. वर सांगितलेल्या लॉर्ड रॉथ्सचाइल्डचा पूर्वज लंडन शहराकडून पांच वेळां निवडून आला, पण शपथविधीच्या बंधनांमुळें त्याला मत देण्याचा अधिकार मिळेना, पण पुढें १८६६ पासून तो कायद्यानें सरास मिळाला. १८३२ पर्यंत ज्यूइश लोकांना लंडनमध्यें दुकान घालूं देत नव्हते. पण इतर राष्ट्रांप्रमाणें इंग्लंडांत त्यांचा छळ असा फारसा झाला नाहीं. अलीकडे तर धनाढ्य ज्यूइश लोकांनीं पैशांच्या जोरावर बहुमानाच्या व खानदानीच्या सर्व पदव्या मिळविल्या असून इंग्रजी राजकारणांतहि त्यांचा सर्वत्र प्रवेश झाला आहे. हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी मि० मॉंटेग्यु हे ज्यू आहेत. ग्लॅडस्टन्साहेबांचे प्रतिस्पर्धी लॉर्ड बीकन्सफील्ड हे ज्यू होते ही गोष्ट प्रसिद्ध आहे. आमचे व्हाइसरायसाहेबहि ज्यूच आहेत.

ज्यूइश लोक व पॅलेस्टाईन प्रांत यांच्याप्रमाणेंच जेरुसलेम या धर्मक्षेत्राचेंहि भाग्य उदयास येणार असें दिसतें. खिस्ती धर्माच्या स्थापनेपूर्वी तें प्रथम स्थानिक मूर्तिपूजकांच्या हातीं होतें. त्यांचा नाश करून ज्यूइश लोकांनीं तें आपल्या ताब्यांत घेतलें. पॅलेस्टाइन प्रांत रोमन लोकांच्या अमलाखालीं गेल्यानंतर ज्यू लोकांचे थोडे दिवस सुखाचे गेले. पण कॅलिग्युलासारख्या दुष्ट बादशहाकडून पुढें त्यांची विटंबना झाली. नेरोच्या राज्यांत ज्या वेळीं रोम जळालें त्या वेळीं जेरुसलेमहि जाळण्यांत आलें. जस्टिनियन बादशहाचे कारकीर्दींत तेथें पहिलें खिस्ती देऊळ बांधण्यांत आलें. रोमन बादशाहीचा नाश झाल्यानंतर इराणचा बादशहा खुश्रु यानें जेरुसलेम हस्तगत केलें. या वेळीं खिस्ती धर्माच्या द्वेषानें ज्यूइश लोकांनीं या इराणी राजाच्या स्वारीला मदत केली. याहि वेळीं हें शहर अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडून तींत तीनशें वर्षें राखून ठेविलेल्या पवित्र वस्तु एका दिवसांत नाश पावल्या. पुढें मुसलमानी धर्मप्रसारकांच्या स्वाऱ्या परदेशावर सुरू झाल्या. तेव्हां खलीफ ओमर यानें जेरुसलेम घेतलें. मुसलमानांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें लगेच तेथें मशीद उभारण्यांत आली. व मक्का, मदिना हीं पवित्र क्षेत्रें बाजूस पडून जेरुसलेम हेंच मुसलमानी धर्माचें मुख्य क्षेत्र होतें कीं काय अशी

भीति मुसलमानांना पडली ! यानंतर जेरुसलेम तुर्कांनीं हस्तगत केलें. आणखी बऱ्याच वर्षांनीं फिरून खांदेबदल होण्याची पाळी येऊन इजिप्शियन लोकांनीं तें तुर्कांपासून हस्तगत केलें. अखेर १०९९ सालीं खिस्ती क्रुसेडर लोकांनीं तें तुर्कांपासून सोडवून घेतलें; या खिस्ती सैनिकांचा पुढारी बॉयलन यानें तेथील हजारों मुसलमानांची कत्तल करून खिस्ती राज्य स्थापलें. पूर्वीं ज्यूइश लोकांनीं खुश्रूला मदत करून येथें खिस्ती लोकांची कत्तल केली होती, त्याचें उट्टें या वेळीं खिश्चन लोकांनीं ज्यूइश लोकांची कत्तल करून काढलें. पण हें खिस्ती राज्य फ़ार दिवस नांदलें नाहीं. ११८७ सालीं तुर्की सुलतान सलाउद्दीन यानें ज़ेरुसलेम फिरून हस्तगत केलें. १२२८त फ्रेडरिक बादशहानें जेरुसलेम सुलतानापासून सोडवून घेतलें. पण १२४३ त कॅरिझमियन नामक रानटी लोकांनीं तें हस्तगत केलें. अखेर १२९१ त सुलतान खलील यानें वेढा घालून जेरुसलेम हस्तगत केलें. तेव्हांपासून या खिस्ती मक्केवर मुसलमानांची सत्ता फिरून स्थापित झाली.

यानंतर दुसरीहि एक गोष्ट घडली, ती युरोपांतील धर्मसुधारणा ऊर्फ 'रेफर्मेशन्.' या सुधारणेमुळें खिस्ती पवित्र क्षेत्रांसंबंधाचाअभिमान शिथिल झाला व रोमन कॅथोलिक पंथांत दोन तट जे पूर्वींच झाले होते त्यांतील ग्रीक चर्चपंथी लोकांखेरीज कोणाहि खिस्त्यांना जेरुसलेमचें महत्त्व उरलें नाहीं. ग्रीक कॅथोलिक पंथाचे लोक मुख्यतः रशियांतच आहेत व ते मात्र पौर्वात्य भावनेप्रमाणें जेरुसलेमला यात्रेचें ठिकाण मानितात. किंबहुना याचमुळें रशिया व तुर्कस्थान यांचें वैर अखेरपर्यंत चालू होतें. क्रिमियन युद्धांत रशियानें तुर्कांपासून खिस्ती धर्मक्षेत्रें परत हस्तगत करून घेण्याचा आपला उद्देश आहे असा बहाणा केला होता. पण या वेळीं इंग्लंड हें खिस्ती राष्ट्र असूनहि त्यानें तुर्कस्थानाचेंच साहाय्य केलें. शेवटीं तहाच्या वेळीं मात्र तुर्की अमलांतील खिस्ती धर्मक्षेत्रांकडे जाणाऱ्या यात्रेकरूंना त्रास देऊं नये वगैरेबद्दल एक शर्त त्यांकडून मान्य करवून घेण्यांत आली. हल्लीं खिस्ती लोकांची वस्ती येथें फारच थोडी आहे, तेथें एकहि प्रसिद्ध असें खिस्ती देऊळ नाहीं. खिस्ती लोकांपेक्षांहि मुसलमानांना जेरुसलेमचा अभिमान वाटतो. तेथें त्यांची वस्ती बरीच आहे, व मोठ्या मशिदीहि आहेत. खिस्ताचा वध या शहरीं झाला, इतक्या आठवणीपुरताच खिस्ती लोकांचा जेरुसलेम-

शीं संबंध आहे! पण ज्यूइश किंवा यहुदी लोकांचें प्रेम जेरुसलेमवर असण्यास अनेक कारणें आहेत. मुख्य हें कीं, येथेंच त्यांचें शेवटचें राज्य नांदलें व जेरुसलेम ही ज्याची मुख्य राजधानी तो पॅलेस्टाईन प्रांत हाच त्यांचा स्वदेश. आज पॅलेस्टाईन त्यांच्या स्वाधीन केलें म्हणजे जगांतील सर्वच ज्यू लोक उठून येथें येऊन राहतील असें नाहीं. पण ज्यू लोकांची एक वसाहत हल्लीं पॅलेस्टाईनमध्यें वसली असून ती फैलावत आहे व उत्कर्ष पावत आहे खास. यावरुन त्यांच्या राष्ट्रीय भावनेंत खरेपणा दिसतो. ज्यू लोकांमध्यें द्रव्यलोभाशिवाय इतर दुर्गुण बरेच कमी असतात. शिवाय त्यांची परंपरा जुनी आहे; व बाहेर जगांत त्यांचा आजवर पुष्कळ छळ झाला आहे, ही गोष्ट लक्षांत घेतां त्यांना स्वदेश परत मिळाला तर कोणासहि तें बरेंच वाटेल!

— २ —

सर्व धर्मांतील पवित्र क्षेत्रांचें नशीबच असें दिसतें कीं, तीं विधर्मी लोकांच्या अमलाखालीं राहावीं. श्रीक्षेत्र प्रयाग व काशी हीं वरील सिद्धांताचींच उदाहरणें होत. काशी हें आद्य हिंदुधर्मक्षेत्र आहे. बरींचशीं क्षेत्रें नद्यांच्या संगमामुळें पवित्र मानलीं जातात. खुद्द गंगा आठशें मैल लांब असतां प्रयाग व काशी हीं ठिकाणें क्षेत्रें बनण्याला संगमच कारणीभूत आहेत. प्रयागास गंगा व यमुना यांचा संगम प्रसिद्धच आहे; पण काशी हेंहि एक संगमस्थान आहे; हें तितक्या प्रमुखपणें लक्षांत येत नाहीं. हा संगम गंगा व वारणा किंवा वाराणशी या नद्यांचा होय. वाराणशी नदीवरूनच बनारस हें नांव काशीस पडलें आहे. बौद्धधर्मापूर्वी काशी हें क्षेत्र पवित्र मानलें जात होतेंच, पण गौतमबुद्धानेंहि आपल्या धर्मदिग्विजयाचा प्रारंभ करतांना २५०० वर्षांपूर्वी श्रीकाशीसच आपल्या कार्यसंचाराची मुहूर्तमेढ रोंविली. त्या वेळीं काशीचा विस्तार हल्लींप्रमाणें केवळ गंगेच्या कांठानें नसून, गंगा व वाराणशी यांच्या चिमट्यांत दोनहि नद्यांच्या कांठीं होता. बुद्धानें पसंत केलेलें स्थान सारनाथ हें होय. तें पूर्वी काशीपासून हल्लींइतकें तुटून नव्हतें. बुद्धाच्या उपक्रमामुळें काशीस हिंदुधर्म खालावला

आणि सुमारें आठशें वर्षेपर्यंत काशी हें हिंदुधर्मक्षेत्रापेक्षां बौद्धक्षेत्र म्हणण्यास-च अधिक लायक होतें !

चवथ्या शतकापासून काशीस बौद्धधर्माचें महत्त्व कमी होऊन पुनः हिंदुधर्माचें वर्चस्व प्रस्थापित होऊं लागलें होतें. आद्य श्रीशंकराचार्यांनीं काशीस हिंदुधर्मजागृति केली; तरी चिनी प्रवासी ह्युएनसन सातव्या शतकांत काशीस गेला, तेव्हां तेथें ३०-३५ बौद्ध मठ व विहार होतेच. पुढें बौद्धधर्माचा पुरा पाडाव झाल्यावर हिंदू लोक काशींत देवळें बांधूं लागले, व नवी वस्ती गंगेच्या कांठीं होऊं लागली. सुमारें पांचशें वर्षांनीं (११९४ सालीं) महंमद घोरी यानें बनारस घेतलें, व तेथून पुढें इंग्रजांच्या हातीं जाईपर्यंत सुमारें सहाशें वर्षेपर्यंत बनारस हें क्षेत्र मुसलमान लोकांच्याच हातीं राहिलें. नद्यांच्या संगमामुळें शहरांना धर्म-दृष्ट्या पवित्रपणा येतो, तसेंच राजकीयदृष्ट्याहि त्यांना सहजच महत्त्व येतें. कारण पूर्वींच्या काळीं शत्रूपासून बचाव करण्याला नदी आडवी करण्या-सारखें उत्कृष्ट साधन नव्हतें. नद्यांच्या संगमाच्या ठिकाणीं दोन बाजूंनीं दुस्तर असा खंदक आपोआप लाभतो. जगांतील राजधान्यांपैकीं बऱ्याचशा राजधान्या संगमाजवळ असलेल्या आढळतील. परशत्रु येतो तो प्रथम राजधानी हस्तगत करितो. पण धर्मक्षेत्रेंहि हस्तगत केल्याशिवाय त्याचें खरें समाधान होत नाहीं. शत्रु विधर्मी असला म्हणजे तर क्षेत्रें जिंकून घेण्याची ही हौस विशेष दिसून येते. महंमद घोरीनें काशीक्षेत्र घेतलें, तें तेथें राजधानी होती म्हणून नव्हे तर तें पवित्र हिंदुधर्मक्षेत्र होतें म्हणून ! मुसलमान हे राज्यप्रसाराइतकाच धर्मप्रसारहि प्रिय मानीत असत. औरंग-जेबाच्या आधीं, व विशेषतः त्याचे कारकीर्दींत, नव्या मुसलमानी इमारती बांधल्या गेल्याच, पण जुन्या हिंदू इमातरीहि बाटवून विशेष उपयोगांत आणल्या गेल्या. अल्लाउद्दीन यानें काशींतील एक हजार हिंदू देवळें बाटविल्याची दंतकथा आहे. पण खुद्द औरंगजेबाच्या वेळीं बाटविलेलीं देवळें व बांधिलेल्या मशिदी काशींत आज प्रत्यक्ष दृष्टीस पडतात. विश्वे-श्वराच्या जुन्या देवळावरील मशीद पाहिली म्हणजे मुसलमान लोकांनीं पूर्वीं हिंदूंचा धर्मच्छल जाणूनबुजून कसा केला हें प्रत्यक्ष दृग्गोचर होतें ! असो; दिल्लीच्या बादशहानंतर बनारस ही अयोध्येच्या वजिराच्या ताब्यांत

गेली व अठराव्या शतकांत वज़िराकडून ती इंग्रजांनीं घेतली. बनारसच्या हल्लींच्या महाराजांचे पूर्वज या वज़िरांचेच आश्रित होते, पण पुढें लवकरच वजिराचा अंमल झुगारून देऊन ते स्वतंत्र बनले. येथपासून बनारसेस फिरून हिंदु राजाची वस्ती सुरू झाली, तरी खरा अंमल किंवा अधिराज्य मुसलमानांचेंच होतें. इंग्रजांच्या राज्यांत काशीस दोन बंडें झालीं. एक चेतासिंगाचें व दुसरें १८५७ सालचें. पण या दोनहि बंडांच्या हेतूंत धर्मबुद्धीचा, म्हणजे श्रीक्षेत्र सोडवून घेण्याचा मागमूस नव्हता; व खरें बोलावयाचें तर ब्रिटिश सरकारच्या हातून धर्मदृष्ट्या गैरवर्तन असें काशीस घडल्याचें लोक सांगत नाहींत.

काशींत मुसलमानांचा अंमल शिथिल झाला, पण इंग्रजांचा अंमल अद्यापि पक्का स्थापित व्हावयाचा होता. अशा या संधिकालांत, मराठ्यांचें वर्चस्व हिंदुस्थानांतल्या इतर भागांप्रमाणें तें उत्तरहिंदुस्थानांतहि होतें. आणि मराठ्यांच्या मनांत काशी व प्रयाग दोनहि सोडवून घ्यावयाचीं होतीं, यांत शंका नाहीं. पण त्यांना तीं केव्हांहि प्रत्यक्ष सोडवून घेतां आलीं नाहींत, ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे. होळकर व शिंदे दोघांच्याहि मनांत बनारस घेण्याचें फार होतें. आणि पहिल्याच धडाक्यास हें काम व्हावयाचें, पण दुर्दैवानें काशींतील ब्राह्मण रहिवाश्यांना हवें तितकें ध्येय नसल्यामुळें त्यांजकडून, मराठ्यांना जी मदत या कामीं व्हावयाची ती झाली नाहीं, इतकेंच नव्हे तर या कार्यास ते एकप्रकारें आडच आले. मराठी ऐतिहासिक साधनांच्या तिसऱ्या खंडांत कायगांवकर दीक्षितांस लिहिलेलें एक पत्र आहे. त्यांत खालील मजकूर आढळतोः—"मल्हारजीचे चित्तांत कीं मशीद विश्वेश्वराची ज्ञानवापीजवळील ते पाडून देवालय करावें. परंतु पंचद्राविडी ब्राह्मण चिंता करितात कीं, हे मशीद प्रसिद्ध आहे. पातशहाचा हुकूम नसतां पाटील देऊळ करील तर एखादा पातशहा दुष्ट झाला म्हणजे ब्राह्मणांस मरण येईल; जीवच घेईल. यवन प्रबल, या प्रांतीं विशेष आहेत. सर्वांचे चित्तास येत नाहीं.. दुसरे जागा बांधिले तरी बरें आहे. ब्राह्मण चिंता करितात **** दुर्दशा होईल. गंगासमर्थ मना करिसा कोणी नाहीं. मना करावें तरी पाप कीं देवाची स्थापना. मना करावी हा दोष परंतु ब्राह्मणा संकट न पडे तें करावें हें पुण्य विशेष. याजवर मशीद पाडूं लागतील तेव्हां सर्व

ब्राह्मण मिळतील आणि श्रीमंतास विनंतिपत्र पाठवितील ऐसा विचार झाला आहे." पुढील वर्षी ही गोष्ट प्रत्यक्ष घडूनच आली. जानेवारी १७४३ त नानासाहेब पेशवे प्रयागास यात्रेकरितां गेले. फेब्रुआरींत काशीजवळ पोंचले व काशी हस्तगत करावी अशा विचारानें ढाला काशीकडे फिरविल्याहि. तेव्हां काशीचा मुसलमान अधिकारी सफदरजंग यानें घाबरून जाऊन सर्व शिष्ट ब्राह्मणांना बोलावून आणून तंबी दिली कीं, तुमच्या ब्राह्मण राजांनीं काशी घेण्याचा बेत केला आहे, त्यांना परत फिरवा. नाहीं तर तुम्हां सर्वांना मुसलमान करीन. तेव्हां त्याच दिवशीं चारशें ब्राह्मण उघडेबोडके काशीबाहेर पेशव्यांच्या छावणींत गेले, व तुम्हीं काशी घेतली तर इतके ब्राह्मण आज जुलमानें बाटविले जातात असें सांगितलें. तेव्हां पेशव्यांनीं विचार केला कीं, इतक्या ब्राह्मणांना दुःख होतें तर काशीक्षेत्र हस्तगत करण्याचे भरीस आम्ही पडत नाहीं. शेवटीं काशी जिंकावयाची तर राहिलीच, पण खुद्द नानासाहेबांना गंगास्नान कसें घडतें हीच पंचाईत पडली! शेवटीं या उघड्याबोडक्या ब्राह्मणांच्या मेळ्यांतून ते काशीस जाऊन गंगास्नान करून आले. पेशव्यांनीं इतका विचारीपणा दाखविल्यावर सफदरजंगाला निदान अशा थोर मनुष्याचा सन्मान आपल्याहातून झाला नाहीं याबद्दल वाईट वाटलें!

ही वेळ अशी टळली, पण काशी आपल्या स्वाधीन करून घेण्याची मराठ्यांची इच्छा शिल्लकच होती. १७५१ सालीं पठाणांनीं प्रयाग व काशी दोनहि लुटून आपला अंमल बसविला. या गोष्टीमुळें वरील कल्पनेस अधिकच जोर आला. १७५४ सालीं सफदरजंगानें काशींत मराठ्यांचा अंमल बसवून देतों म्हणून कबूल केलें होतें; पण पेशव्यांनीं बाबूराव महादेव हिंगणे यांना काशीस अंमल बसविण्याकरितां प्रत्यक्ष पाठविलें तेव्हां सफदरजंग टाळाटाळ करूं लागला. पुढें पानिपतचा पराभव झाल्यामुळें ही कल्पना मागें पडली. परंतु थोरल्या माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीच्या अखेर महादजी शिंदे व विसाजी कृष्ण बिनीवाले यांचा जम उत्तरहिंदुस्थानांत बराच बसला, व शहाअलम बादशहास फिरून दिल्लीस गादीवर बसविण्यासारखें मातब्बर राजकारण मराठ्यांच्या हातीं आलें, तेव्हां बादशहाकडून काशी व प्रयाग बक्षिसादाखल मिळविण्याची कल्पना सहजच सुचली. पण तें

त्याहि वेळीं घडलें नाहीं. माधवरावांच्या मनांत निराशेचें शल्य मरेपर्यंत राहिलें होतें! तें जाण्याची आशा नाहींशी झाल्यावर थेऊर मुक्कामीं नऊ कलमांची याद त्यांचे हेतु पुरे करण्याकरितां झाली, त्यांत श्रीक्षेत्र काशी-प्रयागाविषयीं दोन तीन कलमें आहेत. एका कलमाचे शब्द खालीलप्रमाणें आहेतः—"श्रीकाशी व प्रयाग हीं दोनही स्थळें सरकारांत यावीं असा तीर्थरूपांचा बेत होता त्यास प्रस्तुत करावयाजोगे दिवस आहेत. दहावीस लक्षांची जहागीर मोबदला पडली तरी दोनही स्थळें हस्तगत करावीं. प्रयत्न करावा." या कलमावर मुख्य मुत्सद्द्यांनीं 'सदरहू लिहिले अन्वयें शपथपूर्वक करूं' असें लिहून दिलें. पुढें लवकरच सालबाईचे तहाचे वेळीं हा योग आला. दरम्यान श्रीक्षेत्र इंग्रजांचे पुरें कबजांत आलें होतें, पण अर्थात् तें जिंकून घेणें अशक्य म्हणून मोबदल्यानें मिळविण्याची खटपट करण्याकरितां या तहाच्या सतरा कलमी यादींत 'श्रीकाशी व प्रयाग दोनही तीर्थांच्या जागा आहेत त्या आम्हांकडे द्याव्या', असें एक कलम घातलें गेलें होतें. पण तहनामा करवून देण्याची भिस्त महादजीवर होती, व महादजींनीं या कामीं शैथिल्य दाखविलें म्हणा, अगर इंग्रजांनीं त्यांची विनंति मान्य न केली म्हणा, हें विशिष्ट कलम उगवितां आलें नाहीं एवढें खरें. महादजी व नाना फडणीस हे वारल्यानंतर या कामीं लक्ष घालण्यासारखा मातब्बर मनुष्य कोणी राहिला नाहीं. बाजीराव एका अर्थानें धार्मिक म्हणजे स्नानसंध्याशील होता, पण ज्यानें हातीं असलेलें सर्व राज्य गमाविलें तो धर्मक्षेत्राची सुटका कोठून करणार?

# दिल्लीचा ऐतिहासिक चित्रपट*

ता. १२ डिसेंबर १९११ हा दिवस हिंदुस्थानच्या इतिहासांतील अत्यंत महत्त्वाच्या दिवसांपैकीं एक मानिला जाईल. कारण या देशांत गेलीं तीन शतकें उदयास येत असलेल्या एकछत्री राजसत्तेच्या प्रतिनिधीचा सिंहासनाधिष्ठानसमारंभ आजच्या दिल्लीदरबारानें होणार आहे. इतिहास आणि काळ यांची समव्याप्ति असल्यामुळें इतिहास प्रतिक्षणीं एक एक पाऊल पुढें टाकीतच असतो. पण रस्त्यानें होणारा प्रवास मोजायला जसे मैलांचे दगड, जप मोजायला जसे माळेचे मणी, किंवा काळ मोजायला जसे घड्याळाच्या तबकडीवरील अंक, तसे इतिहासगणनेला लोकोत्तर राष्ट्रीय प्रसंग उपयोगी असतात. या दृष्टीनें पहातां सन १८५८ सालीं हिंदुस्थानचा राज्यकारभार इंग्रजी पार्लमेंटानें आपणाकडे घेतल्याचा कायदा आणि राणीचा जाहीरनामा हा या शतकांतील असला पहिला, आणि आजचा दरबार हा दुसरा लोकोत्तर प्रसंग होय. १७५७ ची प्लासीची लढाई ही जशी लष्करी दृष्टीनें, १८५८ चा कायदा हा जसा राज्यघटनेच्या दृष्टीनें, तसाच १९११ चा दिल्ली दरबार हा राजा आणि प्रजा यांच्या दरम्यानच्या खास नात्याच्या दृष्टीनें इतिहासकारांच्या ताम्रपटावर खोदून ठेवण्यासारखा प्रसंग होय. प्लासीस जें बीज १७५७ सालीं पेरलें गेलें, त्याला १८५८ सालीं अंकुर फुटले; आणि आजच्या दरबारानें त्या अंकुरापासून झालेल्या वृक्षाला फुलें आलीं. यापुढची पायरी म्हणजे ब्रिटिश साम्राज्यांतील इतर भागांप्रमाणें हिंदुस्थानला स्वराज्य मिळून त्याच वृक्षाला फळ येणें ही होय. हें फळ हिंदुस्थाननें चाखण्याच्या वेळेपर्यंत जगण्याइतका दीर्घ आयुर्दाय आज जिवंत असलेल्या कोणाहि मनुष्यास मिळणें हें ईश्वरी नियमाप्रमाणें बहुधा अशक्यच आहे. भीष्म जसे उत्तरायणाची वाट पहात शरपंजरीं पडले होतें, त्याप्रमाणें स्वदेशाच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा उदय पाहण्याकरितां घोटाळणारा जीव—तो भीष्माचार्यांप्रमाणें इच्छामरणी नसल्यानें—ती प्रिय गोष्ट घडून येईपर्यंत धरून

---

* तारीख १२ डिसेंबर १९११.

राहणें कोणाहि देशाभिमानी मनुष्यास शक्य नाहीं. म्हणून त्याला त्या भावी गोष्टीची मनानें नुसती कल्पना करून समाधान मानणें प्राप्त आहे. पण मागील पिढीच्या वैभवाच्या आठवणीइतकीच भावी पिढीच्या वैभवाची आकांक्षा मनुष्यमात्रास प्रिय असते. जॉर्ज बादशहांची हिंदुस्थानच्या भावी वैभवाची कल्पना कदाचित् आमच्या कल्पनेसारखीच तंतोतंत नसेल; परंतु ज्या सहानुभूतीचें मर्यादाक्षेत्र अधिकाधिक वाढत जावें असें राजपुत्र या नात्यानें त्यांनीं १९०६ सालीं बोलून दाखविलें व ज्या वाढत्या अंगाच्या सहानुभूतीचा उल्लेख त्यांनीं राजा व बादशहा या नात्यानें परवां मुंबईंस फिरून एकवार केला, त्या सहानुभूतीची अंतिम परिणाति आम्ही प्रजाजन म्हणतों त्या प्रकारच्या राष्ट्रीय स्वातंत्र्यांत झालीच पाहिजे, हें थोड्याशा विचारांअंतीं राजेसाहेबांसहि कळून येण्यासारखें आहे. आणि हें राष्ट्रीय स्वातंत्र्य हिंदुस्थानास मिळालेलें त्यांना स्वतःला दिसणें शक्य नसलें तरी, राजांच्या पिढीचा सांधा खासगी व्यक्तीपेक्षांहि अधिक बेमालूम जडत असल्यामुळें आज ज्या सहानुभूतीनें त्यांचें अंतःकरण इतकें व्यापलें आहे तिचें अंतिम कार्य त्यांना, त्या वेळीं इंग्लंडच्या गादीवर असलेल्या वंशजांच्या द्वारें, अनुभवावयास सांपडेल यांत संशय नाहीं. येवढी प्रस्तावना करून बादशाही दिल्ली शहराच्या ऐतिहासिक चित्रपटाकडे आपण क्षणभर नजर टाकूं.

## कुरुक्षेत्राचें महत्त्व

भरतखंडाच्या अतिप्राचीन काळापासून आजपर्यंतचा इतिहास व्यापक व स्थूल दृष्टीनें पाहणारांच्या डोळ्यांपुढून या देशांतील कांहीं स्थळें न हलतां सदैव कायमचींच नजरेंत भरलेलीं असतात. भरतखंडाच्या उत्पत्तीपासून पश्चिमेस सिंधुसरस्वती नद्यांचा व पूर्वेस गंगायमुना नद्यांचा प्रवाह जसा अखंड चालूच राहिला आहे, त्याप्रमाणें स्यमंतपंचक ऊर्फ कुरुक्षेत्र, पानपत, हस्तिनापूर, दिल्ली ह्या टापूच्या ऐतिहासिक महत्त्वाचा ओघहि आजतागायत अखंड वाहत आला आहे. भरतखंडांतील बहुतेक सर्व स्वकीय-परकीय सार्वभौमांचें वसतिस्थान या टापूमधीलच असून, या देशाची ऐतिहासिक भवितव्यता निश्चित करणारे आजपर्यंतचे सर्व युद्-

संग्राम याच पुरातन रणभूमीवर झालेले आहेत. भरतभूमीचें रक्षण करण्या-ऐवजीं स्वतःच्या दुष्कृत्यांनीं भूभार झालेल्या उन्मत्त व मदांध क्षत्रियांस आणि राजांस मारून परशुरामानें त्यांच्या रक्ताचे पांच मोठे डोह ह्या 'स्यमंतपंचकां'तच निर्माण केले होते; व पुढें ह्याच डोहांचीं तेथें ऋषींच्या आशीर्वादानें पवित्र तीर्थें झालीं! कुरुराजानें या स्थलीं केलेल्या महान् तपश्चर्येच्या पुण्यानें या स्थलास कुरुक्षेत्र हें पावित्र्यदर्शक नांव मिळालें. याच कुरुक्षेत्रांत पुढें चंद्रवंशीय व पुरुकुलोत्पन्न हस्तिराजानें जगप्रसिद्ध हस्तिनापूर नगर वसविलें. या नगराच्या स्थापनेसंबंधानें व नांवाच्या उत्पत्तीसंबंधानें एक निराळीच गोष्ट पुराणांतरीं आढळते. ससा शिकारी कुत्र्यांचा पाठलाग करतांना ज्या जागेवर दिसला ती यशस्वी समजून जसा पुण्यांतील शनवारचा वाडा तेथें बांधण्यांत आला, तसाच एक चमत्कार पुरातनकाळीं दृष्टोत्पत्तीस आल्यानंतर हस्तिनापूर नगर वसविण्यांत आलें. अत्रिपुत्र सोमऋषि वनांत हिंडत असतां एके स्थळीं, एका पक्ष्यानें झपाट्या-नें येऊन एका प्रचंड हत्तीस उचलून भरारीसरशी आकाशांत नेल्याचें त्यास दिसलें. अर्थात् ही भूमि यशस्वी मानून तेथें त्यानें नगर वसविलें व त्यास 'हस्तिनापूर' हें नांव ठेवलें. ह्याच हस्तिनापुरांत पुरुवंशीय राजे अखेरपर्यंत राज्य करीत असून कौरवपांडवांच्या भाऊबंदकीचे तंटे व अखेरचें संहारक भारतीय युद्ध याच नगरांत व नजीकच्या कुरुक्षेत्रांत झालें. धृतराष्ट्र-पंडुराजापर्यंत कुरुदशाची व पुरुवंशाची राजधानी येथेंच होती. परंतु कौरव व पांडव यांच्या भाऊबंदकीचें, लहानपणच्या खोड्या व कुचेष्टा हें स्वरूप जाऊन त्यास द्वेषाचें व हाडवैराचें स्वरूप येऊं लागलें. तेव्हां हस्तिनापूरचे जोडीस इंद्रप्रस्थ नांवाचें नवें नगर वसलें. पांडव सर्व संकटांतून निभावून आणि द्रुपदराजाशीं शरीरसंबंध करून हस्तिनापुरास परत आल्यावर उभयतांची भाऊबंदकी सान्निध्यानें विकोपास जाऊं नये, म्हणून धृतराष्ट्रानें पांडवांस अर्धें राज्य तोडून दिलें; व हस्तिनापुराच्या नैर्ऋत्येस ५० मैल दूर असलेल्या खांडववनांत नवें नगर वसविण्याची त्यांस परवानगी दिली. इंद्रप्रस्थ ऊर्फ अर्वाचीन दिल्ली या शहराचा पाया याप्रमाणें भाऊबंदकीवर उभारल्यामुळेंच कीं काय, आजपर्यंतच्या इतिहासांत बहुतेक प्रसंगीं तिजवर असल्याच भाऊबंदकीमुळें अनेक विपत्ति आल्या आहेत.

## इंद्रप्रस्थाची स्थापना

पांडवांच्या या इंद्रप्रस्थ नगराच्या संबंधाचें जें वर्णन महाभारतांत दिलें आहे त्याकडे ऐतिहासिक दृष्टीनें पाहतां त्यांतून पुढील हकीकत निष्पन्न होते. ह्या खांडववनास त्या वेळीं असुर नांवाच्या राक्षसजातीची व तक्षक नांवाच्या नागजातीची बरीच वस्ती होती. या वनाचा एका बाजूचा भाग रान तोडून मोकळा केल्यावर तेथें पांडवांनीं आपलें नगर वसविलें व त्यास प्रारंभीं खांडवप्रस्थ असें नांव दिलें. या नगराचे भोंवतीं त्यांनीं समुद्रप्राय खंदक खणले व गगनचुंबित तट उभारले! पंख पसरलेल्या गरुडाकार वेशी, बुरूज व गोपुरें यांजवर नगरसंरक्षणार्थ अनेक शक्ति, शतघ्नी वगैरे शस्त्रास्त्रें चढवून ठेविलीं. नगराबाहेर अनेक बागबगीचे, राया, लताकुंज, कृत्रिम पर्वत वगैरे विहारस्थळें व पुष्करिणीहि त्यांनीं तयार केल्या. अशा प्रकारचें उत्कृष्ट नगर व तेथील युधिष्ठिराची न्यायी राजसत्ता पाहून देशोदेशींचे व्यापारी, कारागीर व विद्वान् ब्राह्मण तेथेंच येऊन राहूं लागले. या नगराचें वैभव आणि विस्तार इतका वाढला कीं, तेथील रहिवाशांस ती दुसरी इंद्राची अमरावतीच वाटे; आणि म्हणून त्यांनीं आपल्या नगरास अभिमानपूर्वक इंद्रप्रस्थ (हल्लींचें इंद्रपत ऊर्फ पुराणाकिल्ला—हा सांप्रतच्या दिल्लीचे दक्षिणेस दोन मैलांवर आहे) हें नांव दिलें. पण इंद्रप्रस्थ नगराच्या वाढत्या वैभवास व विस्तारास नगराची संकुचित मर्यादा पुरेनाशी झाली. सांप्रतकाळीं देशाची संपत्ति व लोकसंख्या वाढूं लागली म्हणजे त्याची गर्दी मोडण्यासाठीं जशी परदेश जिंकून वसाहती निर्माण करण्याची आवश्यकता उत्पन्न होते, तसाच प्रकार इंद्रप्रस्थासंबंधानें झाला. नगरानजीकचें सबंध खांडववनच मोकळें करून तेथें वसति करण्याची जरूर पांडवांस भासूं लागली. ह्या वनांत वरचेवर मोठमोठे वणवे पेटून त्याचा बराच भाग पूर्वीं मोकळा होत असे; पण पुन्हा पाऊस पडून तेथें दाट जंगल वाढे. इंद्रप्रस्थनगर स्थापन झाल्यानंतर सात वेळां याप्रमाणें खांडववनांत मोठमोठे वणवे पेटले, पण सातहि वेळां पुन्हा तेथें अरण्य वाढलें. अखेर पांडवांनीं सर्वच वन, वणवे पेटले असतां, जास्त पेटवून देऊन तेथें पुन्हा जंगल वाढूं द्यावयाचें नाहीं असा बेत केला. ही

कामगिरी मुख्यतः श्रीकृष्णार्जुनांकडे देण्यांत आली. त्यांनीं पंधरा दिवसांत सर्व खांडववन जाळून टाकून मोकळें केलें. अर्थात् त्या वनांतील तक्षकांची व असुरांची बहुतेक वस्ती या अग्निप्रळयांत सांपडून नाहींशी झाली; उरलीसुरली कृष्णार्जुनांच्या बाणांस बळी पडली. तक्षक राजा व त्याचा पुत्र अश्वसेन आणि असुरांचा कुशल शिल्पी, मयासुर यांचे मात्र प्राण या अग्निप्रळयांतून वांचले. यांपैकीं पहिले दोघे कुरुक्षेत्रांत जाऊन राहिले व मयासुर आपल्या या नव्या प्राणदात्या यजमानांचे नोकरीस राहिला.

## दिल्लींतील पहिला राजवाडा

जाळून टाकल्यामुळें मोकळ्या झालेल्या ह्या खांडववनांत आपणासाठीं एक उत्कृष्ट व प्रचंड सभा–म्हणजे राजवाडा–प्रथमतः बांधवावा, असें पांडवांनीं ठरविलें. तें काम करण्यास अर्थातच मयासुर एका पायावर तयार झाला; व त्यानें या कामीं आपल्या आसुरी शिल्पविद्येचा व असुरांच्या संपत्तीचा पांडवांसाठीं पूर्ण उपयोग केला. हिमालय पर्वताचे पलीकडे कैलासाचे उत्तरेस मैनाक पर्वतानजीकच्या बिंदुसरोवराजवळ वृषपर्वा नामक असुरराजानें मोठा यज्ञ करून राजवाडे बांधले होते; तेथें पांडवांच्या राजवाड्यास उपयोगी पडतील अशा अनेक उत्कृष्ट शिला, रंग, चूर्णें वगैरे सामुग्री व सानें वगैरे खनिज संपत्ति होती. ती सर्व तेथें जाऊन मयासुरानें इंद्रप्रस्थास आणली; आणि नुकत्याच जाळलेल्या खांडववना-मध्यें त्यानें या असुरांच्या सामुग्रीचा उपयोग करून चवदा महिन्यांत दहादहा हजार हात लांबीरुंदीचा अत्युत्कृष्ट राजवाडा पांडवांसाठीं बांधला! या राजवाड्याच्या भिंती, खांब, तट, कमानी वगैरे सर्व रत्नांनीं मढविलेलीं होतीं. राजवाड्यांत ठिकठिकाणीं अनेक चित्रें, व केवळ प्राण मात्र नाहीं इतके हुबेहुब केलेले पुतळेहि ठेवले होते. राजवाड्याच्या आवारांत मया-सुरानें अनेक रत्नांनीं बनविलेलें कृत्रिम सरोवर तर अत्यंत आश्चर्यकारक होतें. हा राजवाडा बांधण्यासाठीं बिंदुसरोवराजवळून आणलेले आठ हजार राक्षस मयासुरानें या राजवाड्याचें संरक्षणासाठींच ठेवून घेतले; मयासुराच्या ह्या अद्वितीय कौशल्याचें चीज करण्याचे हेतूनें पांडवांनीं उदारपणें या राज-वाड्यास 'मयसभा' असेंच नांव दिलें. या मयसभेचा प्रथम-प्रवेशसमारंभ

अत्यंत थाटाचा झाला. त्या समारंभास तपोनिष्ठ ऋषी व विद्वान् ब्राह्मण यांजबरोबरच आतांप्रमाणें क्षत्रिय राजे, आणि नामांकित मल्ल, नट, गवई वगैरे तमासगीर मंडळीहि जमली होती.

## दिल्लींतला पहिला राज्याभिषेक

पांडवांच्या ह्या अफाट इंद्रप्रस्थ नगरांत व मयनिर्मित राजवाड्यांत लवकरच राजसूय व अश्वमेध हे यज्ञ झाले. त्यांचें विस्तृत व आश्चर्यकारक वर्णन महाभारतांत असून तत्कालीन भरतखंडाच्या वैभवाचा व संपत्तीचा त्यावरून सहज अंदाज बांधतां येतो. भरतखंड व नजीकचे देश यांतील राजांवर दिग्विजय करून पांडवांनीं आपलें वर्चस्व स्थापन केल्यावर, हे सर्व राजे अमूल्य करभारासह या यज्ञसमारंभास आले, तेव्हां हस्तिनापूर किंवा इंद्रप्रस्थ नगरांत सबंध जंबुद्वीपांतीलच संपत्ति व वैभव एकवटलेलें आहे, असा भास होत असे ! राजांनीं आणलेल्या नजराण्यांत व त्यांचे बरोबरहि अनेक बहुमूल्य रत्नें, सोन्याचीं नाणीं, भांडीं व अलंकार, रत्नखचित व हस्तिदंती मुठीच्या आणि आकाशाप्रमाणें नीलवर्ण तलवारी, जडावाचीं चिलखतें, उत्तम शृंगारलेले रथ, बारीक व तलम अशीं रेशमाचीं व लोंकरीचीं वस्त्रें, भरजरी झुली घातलेले हत्ती व हत्तिणी, बाल्हीक (बल्क), आनर्त (काठेवाड) व वनायु (इराण) या देशचे जगप्रसिद्ध घोडे वगैरेंचीं केवळ वर्णनें वाचणाराहि त्या काळच्या वैभवानें दिपून जातो. भारतीय युद्ध संपून सर्व भरतखंड निष्कंटक झाल्यावर धर्मराजानें हस्तिनापुरांत केलेला नगरप्रवेश व त्यानंतर त्यास झालेला राज्याभिषेक यांचेंहि सुंदर वर्णन महाभारतांत आढळतें. या नगरप्रवेशाचे वेळीं युधिष्ठिरासाठीं नवीन रथ तयार केला असून तो तलम लोंकरीचीं वस्त्रें व मृगाजिनें यांनीं मढविला होता, व त्यास सोळा पांढरे बैल जुंपले होते. मिरवणुकींतून जाणाऱ्या या रथाचें सारथ्य भीम करीत होता; अर्जुनानें धर्माचे मस्तकावर तारांकित शुभ्र राजछत्र धरलें होतें, आणि नकुलसहदेव चामरें उडवीत होते; या रथाचे मागून युयुत्सु व श्रीकृष्ण जात असून त्यांचे मागें पालखींतून धृतराष्ट्र, व गांधारी वगैरे राजस्त्रिया चालल्या होत्या. त्यांचेमागून क्रमानें अनेक रथ, हत्ती, पायदळ व स्वार असे चालले होते. नगराचे वेशींत

पाण्यानें भरलेले नवे असे मंगलसूचक कुंभ ठेवले होते; व पांडवांचे स्वागतार्थ ठिकठिकाणीं सुंदर व कुलीन कुमारिका उभ्या होत्या. धर्मांचें स्वागतार्थ नागरिकांनीं नगर व राजरस्ते पांढऱ्या फुलांच्या माळा व पताका यांनीं शृंगारले असून मधून मधून सुगंधित धूपहि जळत होते. पांडवांचा रथ नगरांत येतांच चंद्रोदयाच्या वेळीं समुद्राच्या लाटा उसळतात त्याप्रमाणें राजरस्त्यांत जनसमुदाय उसळत होता; व भोंवतालचीं घरें स्त्रीपुरुषांचे भारानें कांपत होतीं! स्त्रियांचें लक्ष अर्थात् वैभवशाली द्रौपदीकडेच विशेष ओढलें होतें. मिरवणूक आटोपल्यानंतर युधिष्ठिराचा राज्याभिषेक समारंभ झाला. त्या वेळीं धर्मराजा पूर्वाभिमुख असलेल्या सुवर्णसिंहासनावर बसला; त्याचे दोहों बाजूस भीमार्जुन बसले असून समोर श्रीकृष्णादि यादव वीर होते; कुंती व नकुलसहदेव एकीकडे होते व दुसरीकडे धृतराष्ट्र विदुरादि अवशिष्ट कौरवपक्षीय मंडळी बसली होती. प्रथमतः धर्मानें पांढरीं फुलें, अक्षता, भूमि, सोनें, रुपें व माणकें यांस हस्तस्पर्श केला. नंतर प्रधान व मंत्री यांनीं राजाजवळ जाऊन त्यास नमस्कार केल्यावर व्याघ्रचर्मानें मढविलेल्या व मजबूत अशा अष्टकोनी सर्वतोभद्र आसनावर युधिष्ठिर व द्रौपदी हीं येऊन बसलीं. त्यांनीं राज्याभिषेकविधीप्रमाणें होम केल्यानंतर श्रीकृष्णांनीं स्वतः उठून कुरुक्षेत्र दणदणविलेल्या आपल्या पांचजन्य शंखांतील उदकानें त्यांस राज्याभिषेक केला. शंखांतून अभिषेकाच्या धारा पडूं लागतांच दुंदुभी वगैरे वाद्यांचा एकच गजर होऊन त्या योगानें धर्मास राज्याभिषेक झाल्याचें वृत्त राजवाड्याबाहेरच्या सर्व लोकांस विदित झालें.

## आर्य राजनीतीचा मासला

महाभारतांतील वर्णनावरून त्या काळचें दिल्ली शहर, तेथील राजांचें वैभव, नगरप्रवेश व राज्याभिषेकसमारंभ आणि राजसूय-अश्वमेधादि मोठे प्रसंग यांची जशी ओळख होते, तशीच त्या काळच्या राजनीतीची व राजांच्या कर्तव्याचीहि माहिती देणारे अनेक भाग महाभारतांत वर्णिले आहेत. त्या सर्वांचा परामर्ष घेणें या लेखांत शक्य नाहीं व जरूरहि नाहीं. परंतु मयसभा निर्माण झाल्यानंतर लवकरच तेथें नारद आले; त्यांनीं

धर्मराजास प्रश्नरूपानें जी उत्तम राजनीति उपदेशिली आहे, ती कोणच्याहि प्रसंगीं पाहण्यासारखी आहे. किंबहुना, नारदांच्या ह्या 'कच्चित्प्रश्ननीति' रूपानें हिंदुस्थानांतील उत्तम राजनीति व राजनिष्ठा जगांतल्या सर्वच राजांस पुन्हा प्रश्न विचारीत आहे असा, ही नीति वाचणारांस भास झाल्यावांचून रहात नाहीं. नारदांची ही 'कच्चित्प्रश्ननीति' सर्व देशच्या व सर्व कालच्या राजांस व राज्यकर्त्यांस पुढील आशयाचे प्रश्न करीत आहे:—

"राजाचें राज्य टिकण्यास धर्म व अर्थ या दोहोंचेंहि बळ पाहिजे असतें. राजानें अर्थाविषयीं लोभ धरून धर्म बुडवूं नये; धर्माकडे लक्ष देऊन अर्थाकडे दुर्लक्ष करूं नये; किंवा तात्कालिक सुखावर लुब्ध होऊन धर्म व अर्थ ह्या दोन्हींविषयीं उदासीन बनूं नये. राजा, तूं असाच वागत आहेसना ? तुझे राज्याधिकारी पुरुष ऐश्वर्यमदानें धुंद व कर्तव्यपराङ्मुख होऊन स्वतःच्या व तुझ्या भावी नाशास कारणीभूत होत नाहींत ना ?

विजयो मंत्रमूलो हि राज्ञां भवति भारत !

राजाचा विजय त्यास जो सल्ला मिळेल त्यावरच अवलंबून असतो; तर तुझे सल्लागार मंत्री वृद्ध, कुलीन, सदाचरणी, स्वामिनिष्ठ असेच आहेत ना ? कृषिकर्म, व्यापार वगैरे थोड्या भांडवलावर होणाऱ्या व पुढें जास्त नफा मिळवून देणाऱ्या धंद्यांस तूं उत्तेजन देतोसना ? निदान हे व्यवसाय करणारांस तूं अडथळे तरी करीत नाहींस ना ? तुझ्या राज्यांतील आचार्य म्हणजे गुरु सर्व कुमारांना—तरुण पिढीला—सर्व विद्या—विशेषतः धनुर्विद्या शिकवून वीर बनवीत आहेत ना ? शत्रूच्या गुप्त बातम्या काढण्यास गुप्त हेर अवश्य ठेवलेच पाहिजेत; पण आपले अधिकारी प्रजेस पाळतात कीं गांजतात, हें पहाण्यासाठीं आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याचे मागें तूं तीन तीन गुप्त हेर ठेवले आहेस ना ?

कच्चिन्नोग्रेण दंडेन भृशमुद्विजसे प्रजाः ।

वरचेवर कडक शासन करून तूं प्रजेला उद्विग्न व असंतुष्ट करीत नाहींस ना ? 'उग्रप्रतिग्रहीता'—'जबर कर कडकपणें वसूल करणारा' अशीं नांवें तुला लोक ठेवीत नाहींतना ? युद्धांत पराभूत करून एकदां जिंकल्या-वर मग जिंकलेल्यांना तूं पुत्रवत् मानीत आहेसना ? सर्व प्रजाजनांशीं सारखा

वापून ते आपल्या कुटुंबांतलेच आहेत असें तूं मानतोस ना ? राजा हा आपला मातापिताच आहे, असें प्रजाजनांस वाटत आहेना ?

कच्चिदायस्यचार्धेन चतुर्भागेन वा पुनः ।
पादभागैस्त्रिभिर्वापि व्ययः संशोध्यते तव ॥

स्वस्ताईचे वेळीं उत्पन्नाचा $\frac{1}{2}$, मध्यम स्थितींत उत्पन्नाचा $\frac{1}{4}$ व दुर्भिक्षाचे वेळीं उत्पन्नाच्या $\frac{3}{4}$चे आंत तुझ्या राज्याचा खर्च आहेना ? तूं राष्ट्रास पीडा देत नसून तुझे शेतकरी संतुष्ट आहेतना ?

कच्चिद्राष्ट्रे तडागानि पूर्णानि च बृहंति च ।
भागशो विनिविष्टानि न कृषिर्देवमातृका ॥

मोठमोठे व पाण्यानें भरलेले तलाव शेतांस पाणी देण्यासाठीं तूं योग्य अंतरानें बांधले आहेसना ? आकाशांतून देव पाऊस पाडतील तेवढ्यावरच तुझ्या राज्यांतील शेती अवलंबून नाहींना ? तुझ्या राज्यांतल्या शेतकऱ्यांजवळची भरपूर पोटगी व बींबियाणें कमी कमी होत नाहींतना ? कारागिरांस लागणारें भांडवल व धंद्याचीं हत्यारें वगैरे साधनें तूं त्यांस चार चार महिन्यांनीं पुरवितोसना ? तूं व तुझे अधिकारी, लोभ, मोह किंवा अभिमान यांस वश होऊन रयतेस न्याय देण्याकडे दुर्लक्ष करीत नाहींतना ? तुझ्या कृत्यामुळें प्रजेंत दुःख किंवा क्रोध उत्पन्न होत नाहींना ? खरोखर निष्पाप, कुलीन व सदाचरणी अशा पुरुषांवर खोटे आरोप येऊन त्यांस तुझे राज्यांत विनाकारण शासन झालेलें नाहींना ! ”

नारद-नीतीनें विचारलेल्या या व इतर प्रश्नांस आत्मविश्वासपूर्वक प्रामाणिकपणें जो राजा 'होय' असें उत्तर देऊं शकेल किंवा 'एवं करिष्यामि यथा त्वयोक्तम्' असें वचन देऊन नंतर 'उक्त्वा तथाचैव चकार राजा' असें वागणाऱ्या युधिष्ठिराचें अनुकरण करील त्याचे राज्यास काळाचीहि भीति बाळगावयास नको.

## दिल्लीचे जुने हिंदु राजे

पांडवांच्या अमदानींत दिल्ली शहर अर्थातच विशेष भरभराटीस चढलें व पुढेंहि पांडवांनंतर 'पुरोत्तम' म्हणजे सर्व नगरांमध्यें श्रेष्ठ अशी त्या शहराची ख्याती इतिहास-पुराणांतरीं चालत आलेली होती. पांडवांनंतर

यादव वंशाची एक शाखा दिल्ली येथें राज्य करीत होती. अनिरुद्धाचा मुलगा वज्र याला दिल्ली येथेंच राज्याभिषेक झाल्याचा उल्लेख आहे. पौराणिक काल आणि ऐतिहासिक काल यांच्या दरम्यानच्या मंद संधिप्रकाशांत इतर अनेक गोष्टींप्रमाणें दिल्लीचा वृत्तांतहि लोपून गेलेला आहे. ऐतिहासिक कालाच्या प्रारंभीं दुसऱ्या शतकांत धाव नामक राजा दिल्लीस राज्य करीत असून हल्लीं त्याचा एक जयस्तंभ तेथें आहे. अकराव्या शतकांत दिल्लीस अनंगपाळ नांवाचा क्षत्रिय राजा राज्य करीत होता हेंहि निश्चित आहे; व येथपासून पुढें झालेले निरनिराळे राजवंश व त्यांतील प्रसिद्ध पुरुष यांची सर्व संगति लागते—किंबहुना ही संगति पटविणाऱ्या इमारती अद्यापि दिल्लीस उभ्या असून प्रत्यक्ष पहाण्यास सांपडतात. दहाव्या शतकापूर्वींचीं हिंदु राज्यें दक्षिणेस मथुरेकडे व पूर्वेस गंगानदीच्या कांठीं पसरलीं होतीं. या वेळीं दिल्लीच्या पूर्ववैभवाचा कांहीं कालपर्यंत लोप झाला असावा, व पुढें दक्षिणच्या राज्यांची अवनतीची पाळी येऊन, दहाव्या शतकाच्या सुमारास दिल्लीस फिरून वैभव येत चाललें असावें. इ. स. १०५२ सालीं अनंगपाळानें, हल्लींच्या कुतुबमिनारच्या जागेवर असलेला किल्ला बांधला, आणि मथुरेस असलेला चंद्रगुप्त विक्रमादित्याचा जयस्तंभ तेथून काढून आणून दिल्लीस या किल्ल्याशेजारीं रोंविला तो अजूनहि पहाण्यास मिळतो. अनंगपाळाच्या वंशानें सुमारें १०० वर्षें राज्य केल्यावर विशाळदेव नामक अजमीर येथील चव्हाण राजानें दिल्लीस राज्य स्थापलें. याचाच नातू प्रसिद्ध पृथ्वीराज चव्हाण हा होय. कुतुबमिनारच्या लगत आजहि ज्याचे प्राकार दिसतात, ते हल्लींच्या दिल्लीपासून सात आठ मैलांच्या अंतरावरचें जुनें दिल्ली शहर यानेंच वसविलें. याच पृथ्वीराज चव्हाणानें महंमद घोरी याचा प्रथम सरस्वती नदीच्या तीरीं पराभव केला. परंतु दुसऱ्या खेपेस महंमद घोरीकडून त्याचा पराभव झाला. महंमद घोरीचा तुर्की गुलाम कुतुबुद्दीन यानें दिल्ली हस्तगत केली व मुसलमानी राज्याच्या पायाचा दगड सन १२०६ सालीं दिल्लीस बसविला गेला.

## दिल्ली व मुसलमान पातशहा

यानंतर एकामागून एक झालेल्या मुसलमानी राजवंशांची हकीकत

इतिहासवाचकांस माहीत आहेच. येथें सांगावयाचा मुद्दा इतकाच कीं, सन १२०६ पासून सन १८०३ पर्यंत दिल्ली शहर मुसलमान राजांच्या ताब्यांत होतें, तरी ह्या सर्व सहाशें वर्षेभर दिल्ली हीच मुसलमानांची राजधानी होती असें मात्र नाहीं. तघलख व खिलजी यांच्या अमदानींत दिल्ली ही मुसलमानांची राजधानी होती. वेड्या महमद तघलखानें दिल्ली सोडून दक्षिणेंत दौलताबादेस राजधानी स्थापण्याचा दोन वेळां प्रयत्न केला; परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. तघलखांच्या कारकीर्दींत जुन्या दिल्लीजवळ दुसरीं दोन गांवठाणें आणखी वसविण्यांत आलीं; व त्यांपैकीं हल्लींच्या दिल्लीपासून सुमारें चार मैलांवर असलेले तघलखाबाद अद्याप आहे. इब्न बतूता नांवाचा पाश्चात्य प्रवासी चवदाव्या शतकांत उत्तर हिंदुस्थानांत येऊन राहिला होता. त्यानें चार दिल्ली शहरांचें–अर्थात् दिल्ली या नांवाच्या जुन्या व नव्या चार गांवठाणांचें–वर्णन दिलें आहे. इ. स. १३९८ सालीं तैमूरलंगानें दिल्ली शहर हस्तगत केलें. परंतु तो नुसती लूट व गुलाम घेऊन लवकरच समरकंद येथें परत गेला. यानंतर झालेल्या लोदी घराण्याच्या वेळींहि दिल्ली हीच मुसलमानांची राजधानी होती. पुढें बाबरानें इब्राहिम लोदीचा पानपत येथें पराभव करून मोंगल राजवंश स्थापला. पण औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत दिल्ली येथें मोंगल राजांचें कायमचें ठाणें असें नव्हतें. बाबराचे पुष्कळ दिवस लाहोर येथेंच गेले. त्याचा मुलगा हुमायून यानें, हल्लीं पुराणा किल्ला या नांवानें प्रसिद्ध असलेला किल्ला दिल्लीस बांधला. पण हुमायून दिल्लींत असा फार थोडे दिवस राहिला. अकबर जरी दिल्लीचा बादशहा होता तरी त्याचे बहुतेक दिवस आग्रा येथेंच गेले. किंबहुना फत्तेपूर शिक्री येथें बांधलेल्या प्रचंड इमारतीमुळें कांहीं काळपर्यंत मोंगल राजधानी दिल्लीहून उठून या नवीन नगरींत जाऊन राहिली होती असेंहि म्हणतां येईल. अबुल फजल यानें 'ऐन-ई-अकबरी'मध्यें दिल्ली शहराचें वर्णन केलें आहे. पण त्यावरून त्या राजधानीच्या ऐश्वर्यापेक्षां तिच्या खालावलेल्या स्थितीचा उदासपणाच अधिक प्रकट होतो. जहांगिराच्या वेळेसहि आग्रा हीच मोंगलराजधानी होती. त्याचा मुलगा शहाजहान हाहि आग्र्यास बरेच दिवस होता. परंतु हल्लींच्या दिल्ली शहराचें गांवठाण शहाजहानानेंच प्रथम वसविलें. त्यानेंच

जुम्मामशीद बांधिली. पुढें औरंगजेबाच्या वेळेपासून मात्र मोंगलवंशाची समाप्ति होईपर्यंत दिल्ली हीच कायम राजधानी राहिली. औरंगजेबहि मधून मधून आग्र्यास राही. शिवाजीमहाराज संभाजीसह औरंगजेबाकडे दिल्ली येथें गेले, अशी आजपर्यंत समजूत होती पण या वेळीं औरंगजेब आग्र्यास रहात असे; व शिवाजीमहाराज औरंगजेबाच्या कैदेंत पडल्यावर पेटाऱ्यांत बसून निसटून आले ते आग्र्याहून-दिल्लीहून नव्हे—असें आतां निश्चित झालें आहे. औरंगजेबानंतर मोंगल वंश खालावला असतां, सन १७३९ सालीं इराणचा बादशहा नादीरशहा यानें, सन १७५६ सालीं दुराणी अहमदशहा अबदाली यानें, सन १७५९ सालीं मराठ्यांनीं, व १८०३ सालीं इंग्रजांनीं दिल्ली जिंकून हस्तगत केली. परंतु १८५७ सालापर्यंत ती नावानें तरी मोंगलांचीच राजधानी होती. अखेर १८५७ सालीं बंडाचा मोड झाल्यावर शेवटचा मोंगल बादशहा बहादूरशहा याचे मुलगे दिल्लीस मारले जाऊन बहादूरशहास उचलून ब्रह्मदेशांत नेऊन ठेवण्यांत आले, व तेव्हांपासून राजधानी या नात्यानें मुसलमानांचा व दिल्लीचा कायमचा संबंध तुटला.

## दिल्ली व मराठे

मुसलमान लोक व दिल्ली शहर यांचा संबंध सर्वांत अलीकडचा, यामुळें तो विशेष प्रमुख व ढळढळीत दिसतो. तथापि, हिंदु लोकांचा सदर शहराचा संबंध कांहीं थोडाथोडका नाहीं. पौराणिक काळांत दिल्ली ऊर्फ इंद्रप्रस्थ नगरची स्थापना हिंदूंनींच केली; व तेराव्या शतकापर्यंत तें सर्व वेळ हिंदुराजांची राजधानी नसली तरी हिंदुराजांच्याच ताब्यांत होतें. आजहि तेथें मुसलमानांपेक्षां हिंदूंचीच वस्ती अधिक आहे. खुद्द मराठ्यांचा मात्र दिल्लीशीं संबंध फारसा जुना नाहीं. तेराव्या शतकांत मुसलमानांनीं दक्षिण प्रांत जिंकण्यास सुरवात केली व त्यांच्या सुभेदाऱ्या इकडे स्थापन झाल्या. परंतु पुढें लवकरच मुसलमानी सुभेदार स्वतंत्र होऊन त्यांनीं स्वतःचीं राज्यें स्थापिलीं; आणि महाराष्ट्र दोन शतकेंपर्यंत मधूनमधून व जाऊन येऊन या स्वतंत्र झालेल्या मुसलमानी राजांच्या ताब्यांत होतें. दिल्लीच्या बादशहांचा प्रत्यक्ष असा अंमल महाराष्ट्रांत फारच थोडा व

थोडा वेळ होता. औरंगजेबानें दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें बुडविल्यावर महाराष्ट्र हें दिल्लीच्या बादशहांच्या ताब्यांत जाण्याचा संभव होता. परंतु खुद्द शहाजहान व औरंगजेब यांच्या कारकीर्दीत ज्याप्रमाणें शिवाजीनें दिल्लीच्या मुसलमानांशीं विरोध करून यश मिळविलें, त्याचप्रमाणें औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या अखेर राजाराम व त्याचे मराठे सरदार यांनीं मोंगलांची डाळ महाराष्ट्रांत शिजूं दिली नाहीं. औरंगजेबाच्या मरणानंतर दक्षिणेंत त्याच्याबरोबर असलेला त्याचा मुलगा अज्जमशहा यानें दिल्लीचें तक्त मिळविण्याकरितां उत्तरेकडे तोंड फिरविलें; पण लवकरच त्याचा भाऊ मोअजम याजकडून तो मारला गेला; व पुढील सालीं त्याचा भाऊ विजापूरचा सुभेदार कामबक्ष हाहि मारला जाऊन दक्षिणेंत मोंगल निर्मूल झालें. औरंगजेबाचा उरलेला मुलगा मुअजम ऊर्फ बहादुरशहा याच्या कारकीर्दीत दिल्लीस कैदेंत असलेला शिवाजीचा नातू शाहू हा सुटून दक्षिणेंत आल्यानें उलट मराठी राज्याच्या सुस्थितीस मदतच झाली. शाहूच्या कारकीर्दीत मराठे व दिल्लीचे बादशहा यांचा संबंध मित्रत्वाचा होता. दिल्लीच्या बादशहाकडून सनदा आणण्याकरितां बाळाजी विश्वनाथ दिल्लीस गेला असतां तेथें मत्सरी मुसलमान सरदारांनीं रस्त्यांत त्याच्यावर हल्ला करून सनदा हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला, तो प्रसंग प्रसिद्धच आहे.

## बाजीरावाची महत्त्वाकांक्षा

मोंगल बादशहाचा परवाना घेऊन उत्तरेस मुलूख काबीज करीत करीत मराठ्यांचें वजन दिल्लीपर्यंत नेऊन बसविण्याची कल्पना बाळाजी विश्वनाथाचा मुलगा पहिला बाजीराव याचे मनांत चांगलीच जागृत होती. चंबळानदीच्या दक्षिण मुलखाची सर्व जहागीर, दक्षिणच्या सहाहि सुभ्यांची सरदेशपांडेगिरी, आणि अलाहाबाद, बनारस, गया, मथुरा या हिंदु क्षेत्रांची जहागीर हीं मिळण्याविषयीं त्यानें दिल्लीच्या बादशहाकडे उघड मागणीहि केली होती; व ती नाकारण्यांत आल्यामुळें सन १७३६ सालीं बाजीरावानें दिल्लीवर स्वारी करून दिल्लीच्या वेशीबाहेर छावणीचा तळहि दिला होता; पण त्याच्याजवळ थोडे लोक असल्यामुळें त्यास परत फिरावें लागलें. तरी

माळव्याची जहागीर व तेरा लक्ष रुपये बाजीरावास मिळालेच. सन १७३८ सालीं नादीरशहानें दिल्ली घेतली तेव्हां दिल्लीच्या बादशहाच्या कुमकेस जाण्याचा बाजीरावाचा विचार होता. या कामाकरितां वसईची फत्ते झाल्याबरोबर चिमणाजीआप्पा वगैरे सर्व सरदार आणि निमाज नासरजंग यांसहवर्तमान दिल्लीस जाऊन तो नादीरशहाशीं सामना करणार होता. दिल्लीचे मोंगल बादशहावर आपली सत्ता आतां बहुतेक स्थापित झाली आहे अशी मनांतून जाणीव असल्यामुळें, इराणच्या शहानें दिल्ली हस्तगत करून तेथें नवीन बादशाही स्थापित करणें, हें अस्तास जाणाऱ्या मोंगलांप्रमाणेंच उदयास येणाऱ्या मराठ्यांनाहि एक नवीन अरिष्टच उद्भवत आहे असें बाजीरावास वाटलें; आणि हिंदु लोकांबरोबर मुसलमान लोकहि या कामीं खांद्यास खांदा लावून लढतील अशी त्यास अपेक्षा होती. नादीरशहावर स्वारी करण्याकरितां नर्मदा आणि चंबळा यांच्यामधील मुलूख आपण लवकरच 'मराठामय' करून सोडणार असें बाजीरावानें जाहीर केल्याचें ग्रँडडफहि लिहितो. परंतु इतक्यांत नादीरशहा हा मोंगल बादशहा महंमदशहा यास फिरून तक्तावर बसवून, त्याचा अंमल सर्व हिंदुमुसलमानांनीं पूर्ववत् मानावा अशीं हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांस पत्रें लिहून इराणाकडे निघून गेला, त्यामुळें बाजीरावास दिल्लीस जाण्याचें कारण राहिलें नाहीं. पुढील सालीं बाजीराव नर्मदातीरीं मरण पावला. तात्पर्य, शाहूचें तोंड दक्षिणेकडे आणि औरंगजेबाच्या मुलांचें तोंड उत्तरेकडे फिरल्यापासून दिल्लीच्या कारस्थानांत मराठ्यांचा जो प्रवेश झाला त्यास बाजरावानें बरेंच स्वरूप आणिलें.

## शिंद्यांचा दिल्लींत प्रवेश

बाजीरावाच्या मरणानंतर नानासाहेब पेशव्यांनीं माळव्याच्या जहागिरीसंबंधानें फिरून दिल्लीस कारवाई सुरू केली. चिमणाजीआप्पा व नानासाहेब पेशवे या दोघांनीं मिळून दिल्लीच्या बादशहास १७४१ सालीं एक अर्ज केला. त्यांत पंधरा लक्ष रुपये देणगीची मागणी केली असून त्याच्या मोबदला "नर्मदेच्या उत्तर मुलखाचा आम्ही बंदोबस्त ठेवूं, स्वतः दिल्लीस जाऊन बादशहास भेटूं, बादशहाच्या नोकरीस चार हजार मराठे

घोडेस्वार देऊन पांचशें घोडेस्वारांनिशीं एक मातबर मराठा सरदार खास हुजरातीच्या नोकरीकरितां व बादशहाच्या रक्षणाकरितां दिल्लीस ठेवून देऊं" असें आश्वासन दिलें होतें. परंतु तें प्रकरण त्या वेळीं तसेंच राहून गेलें. पुढें लवकरच महमदशहा मृत्यु पावला. इकडे नादीरशहाच्या मृत्यूनंतर प्रथम त्याचा बंदिवान असलेला व नंतर त्याचा सरदार झालेला अफगाण योद्धा अहमदशहा अब्दाली यानें हिरात जिंकून सन १७४८ सालीं मुलतान व लाहोर घेतलें, व दिल्लीकडे रोंख फिरविला. दिल्लीचा वजीर मीरशहाउद्दीम यानें शिंदे व होळकर यांची मदत मागितली व अहमदशहास पदच्युत करून दुसरा अलमगीर यास तक्तावर बसविलें. यामुळें अहमदशहा अब्दाली पुढें चाल करून आला; व हेंच प्रकरण जोरानें वाढत जाऊन दिल्लीच्या कारस्थानांचा परिणाम सन १७६१ सालीं पानपतच्या लढाईंत झाला. ह्या युद्धांत मराठ्यांची जवळजवळ सबंध एक पिढी मारली गेल्यानें मराठ्यांस दिल्लीकडे फिरून पाहण्यास कांहीं वर्षें लागलीं. दिल्लीच्या बादशहाची स्थितीहि या अवधींत चांगलीशी नव्हती. बादशहा शहाअलम हा सुजाउद्दवला व नजीबखान यांच्या तंत्रानें वागूं लागला; त्याची दिल्ली सुटली; व बंगालमध्यें इंग्रज उदयास येऊन सन १७६४ सालीं बादशहानें बंगाल प्रांताची दिवाणी इंग्रजांस दिली. पुढें 'आपणांस दिल्लीस नेऊन तक्तावर बसवावें' असें सन १७६६ सालीं बादशहानें अलाहाबादेहून मराठ्यांकडे बोलणें लाविलें. प्रथम तें त्यांस मान्य करितां आलें नाहीं. पण पानिपतानंतर अवघ्या सात वर्षांत थोरल्या माधवराव पेशव्यानें दक्षिणेंत मराठ्यांचा फिरून चांगला जम बसविल्यामुळें महादजी शिंदे व तुकोजी होळकर यांना सन १७६८ सालीं उत्तर हिंदुस्थानांत प्रवेश करितां आला. मराठ्यांचा मुख्य शत्रु व पानिपतच्या अपयशास कारणीभूत झालेला नजीबखान रोहिला यापूर्वीं नुकताच वारला होता. यामुळें महादजीस खुद्द नजीबखानाचा सूड जरी घेतां आला नाहीं, तरी एकंदरीनें पठाणांस जरब बसविण्याचें त्याचें काम सोपें झालें. सन १७७१ सालीं बादशहानें मराठ्यांकडे फिरून मदत मागितली व त्या सालीं डिसेंबर महिन्यांत—म्हणजे पानिपतच्या लढाईपासून अवघ्या दहा वर्षांच्या आंत—महादजी शिंद्यानें शहाअलम यास बरोबर घेऊन दिल्लींत

प्रवेश केला; व तेव्हांपासून मराठ्यांचें वजन खुद्द दिल्लीच्या दरबारांत जें पडलें तें पुढें सुमारें वीस पंचवीस वर्षें कायम होतें.

## पाटीलबुवांचें यश

नारायणराव पेशव्यांच्या मरणोत्तर पेशवाईतील भांडणामुळें शिंद्यास दिल्ली सोडून दक्षिणेकडे येऊन राहावें लागलें. यामुळें मराठ्यांचा हात दिल्ली येथील कारस्थानांतून सुटत चालला होता; पण सन १७८३ सालीं सालबाई येथें इंग्रज व पेशवे यांचा तह झाल्यानंतर महादजी फिरून द्विगुणित तेजानें दिल्लीस गेला; आणि इंग्रज व मराठे यांचें तूर्त सख्य असल्यामुळें, बादशहानें महादजीस दिल्लीचा सर्व कारभार देण्याच्या कामीं इंग्रजांनीं अडथळा केला नाहीं. महादजीनें बादशहाकडून पेशव्यांच्या नांवानें 'वकील–ई–मुतलक्' ही पदवी व बहुमानाची पालखी घेतली; आणि स्वतः गंगा व यमुना यांचे आसपास राहून तो उत्तर हिंदुस्थानच्या सर्व कारभाराचीं सूत्रें हालवूं लागला. पुढें गुलाम कादर दिल्लीस जाऊन राहिल्यावर त्यानें महादजीचें वर्चस्व कमी करण्याचा कट आरंभिला. या गोष्टीस दुर्दैवी बादशहानेंहि भर दिली. पण तिचा परिणाम अखेर असा झाला कीं, गुलाम कादरानें बादशहावरच उठून त्याचे अनन्वित हाल केले; व दिल्ली शहरांत—नादीरशहा, अहमदशहा किंवा तैमूरलंग यांनींहि न केलेला असा—दिल्लीच्या तक्ताचा त्यानें अपमान केला. अखेर महादजीचा सरदार राणाखान यानें दिल्लींत प्रवेश करून बादशहास सोडविलें; आणि गुलाम कादरास महादजीनें भयंकर शासन केलें. गुलाम कादरची व्यवस्था लागल्यावर महादजीनें बादशहास सन १७८९ सालीं नेमणूक बांधून दिली. नंतर रजपुतांचें शासन करून महादजी दक्षिणेंत परत आला, व सन १७९३ सालीं पुण्यास मरण पावला. दिल्लीस मराठ्यांचा अंमल व व्यवस्था पाटीलबुवांनीं घालून दिल्याप्रमाणें सन १८०३ पर्यंत चालू होती. पण या सुमारास इंग्रज हे मराठे व मोंगल यांस भारी झाल्यामुळें, नाना फडणविसांच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनीं सन १८०३ च्या सप्टेंबर ११ तारखेस दिल्ली येथील लढाईत लॉर्ड लेक यानें शिंद्याचे फौजेचा पराभव केला व या एका घावानें मराठ्यांचा दिल्लीचा संबंध तुटला; एवढेंच नव्हे,

तर त्याच्या योगानें मुसलमानी बादशाहीचाहि अंत होऊन दिल्ली शहर इंग्रजांचे स्वाधीन झालें.

## दिल्लीची रुधिरप्रिय देवता

'दिल्ली' हें नांव उच्चारल्याबरोबर जशी अनेक ऐतिहासिक गोष्टींची आठवण होऊन मनांत कालवाकालव होते, तशी दुसऱ्या कोणत्याहि शहराच्या नांवानें होत नाहीं. कारण या शहरानें जितकें सुख व ऐश्वर्य पाहिलें तितकेंच दुःखहि पाहिलें. पण सुख तेवढें विसरून जाऊन दुःखाची तेवढी आठवण अधिक राहाण्याची मनुष्याच्या मनाची प्रवृत्ति असते. यामुळें दिल्ली हें नांव उच्चारतांच इतिहासज्ञांना दुःखदायक गोष्टींच अधिक आठवतात. दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ हें नगर प्रथम वसविण्यांत आलें तें खांडववन जाळून, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. या प्रसंगीं नाग म्हणजे रूपकदृष्ट्या सर्प, पण वस्तुतः नाग नांवाचे लोक यांची जी कत्तल झाली असें मानितां येईल, त्याच कत्तलीची दिल्लीच्या पुढील इतिहासांत अनेकवार पुनरुक्ति झाल्याचें आढळतें. इंद्रप्रस्थ नगरीच्या वास्तुदेवतेस रक्तप्राशनाची कांहीं अनिवारच हाव असली पाहिजे; कारण असें एकहि शतक किंवा अर्धशतक लोटलें नसेल कीं, ज्या अवधींत दिल्लीस एखादी प्रचंड कत्तल होऊन नगरभूमीवर रक्ताचा सडा शिंपडला गेला नाहीं! सन १३३९ सालीं महमद तघलखानें आपली राजधानी दौलताबादेस नेण्याचा विचार केला, तो दिल्लीच्या नागरिकांस पसंत नव्हता; व तो सक्तीनें अमलांत आणण्याचे कामीं हजारों लोक मारले गेल्याचें सांगतात. सन १३९८ सालीं तैमूरलंगानें दिल्ली घेतल्यावर त्याचे शिपाई लोक एकसारखी पांच दिवसपर्यंत दिल्लीच्या नागरिकांची कत्तल करीत होते! "रस्त्यांतून जाण्यास मार्ग नाहीं इतक्या प्रेतांच्या राशी सर्व शहरभर पसरल्या. हिरे, माणकें, सोनें, चांदी, वगैरे लूट तर किती जमा झाली याची गणतीच नाहीं! पकड, लूट व मारहाण यांशिवाय कोणास कांहीं सुचेना. प्रत्येक शिपायानें निदान पंचवीस गुलाम पकडून आणिले व सर्व दिल्ली शहर ओस पडलें." नादिरशहानें १७३९ सालीं दिल्लीस केलेली कत्तल प्रसिद्धच आहे. पुन्हा एक वेळ इतिहासकाराच्या शब्दांनीं

बोलावयाचें तर "त्या वेळीं जे अनर्थ त्या राजधानीवर कोसळले ते ऐकूनहि अंगावर रोमांच उभे राहतात. इराणी लोकांनीं सर्व शहर जाळून लुटून फस्त केलें. प्रेतांचे ढीग व रक्तांचे पाट यांनीं सर्व रस्ते भरून गेले. तीस हजारांहून जास्त माणसें प्राणांस मुकलीं!" शिवाय व्यक्तिविषयक महत्त्वाकांक्षेनें दिल्लीच्या एकंदर इतिहासांत किती राजवंशांची उलथापालथ झाली व त्या उलथापालथीच्या अनुषंगानें किती कत्तली झाल्या, याची गणती करणें कठिण आहे. राजकारणानें घडून येणारा असा कोणताहि गुन्हा नसेल कीं जो दिल्लीस घडून आला नाहीं! हल्लींच्या दिल्लीच्या आसपास कमींत कमी उध्वस्त अशीं सात जुनीं गांवठाणें दिसतात; आणि जेथें एकहि जिवंत मनुष्य दिसत नाहीं अशा ठिकाणीं मोकळ्या ओसाड किंवा पडक्या इमारती व गवत उगवलेलीं आणि किड्यामुंग्यांनीं घरें केलेलीं जोतीं, पाये वगैरे पहाणाराचें मन उदास झाल्याशिवाय रहात नाहीं. त्यांतूनहि मृत मनुष्यांस पुरून त्यांच्या थडग्यांवर इमारती बांधण्याची मुसलमान लोकांची चाल असल्यामुळें हुमायुनाच्या कबरस्थानासारख्या प्रचंड इमारती शिल्पकला या दृष्टीनें नेत्रांस जरी आल्हाद देतात, तरी मृत्यूची आठवण करून देऊन मनास उद्विग्न करितात. कलकत्त्यास जसें "सिटी ऑफ पॅलेसेस" (प्रासादनगर) म्हणतात तसेंच दिल्लीस "सिटी ऑफ टुम्ज" (स्मशाननगरी) हें नांव आहे. कर्मधर्मसंयोगानें दिल्लीइतके जयस्तंभहि दुसऱ्या कोठें एकत्र पहावयास मिळत नाहींत. म्हणून वर सांगितल्याप्रमाणें थडगीं, जयस्तंभ, मनोरे, कत्तली, राजे लोकांनीं भोगलेलें ऐश्वर्य व आपत्ति या सर्व गोष्टी 'दिल्ली' या नांवाचा उच्चार होतांच आठवून मनुष्याच्या मनांत कालवाकालव झाल्याशिवाय रहात नाहीं!

## दरबार दिल्लीसच कां?

संसारांत मनुष्याचें आयुष्य नेहमींच्या सरासरीपेक्षां अधिक लांबलें तर दुःख पाहिल्याशिवाय डोळे मिटणें त्याला दुरापास्तच असतें. तशीच कांहीं स्थिति जुन्या पुराण्या दिल्लीची झालेली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा तऱ्हेचें हें शहर दरबारास इंग्रज सरकारानें तीन वेळां पसंत केलें, याचें सकृद्दर्शनीं कोणासहि आश्चर्य वाटेल. पण एकतर जुन्या

राजपरंपरेच्या इतिहासानें दिल्ली शहरास लोकोत्तर राजकीय महत्त्व येत आहे—हिंदु व मुसलमान सम्राटांनीं ज्या राजधानींत अनेक शतकें राज्य केलें त्या शहरास हल्लींहि निरंतर मुख्य राजधानीचा मान देणें शक्य आहे किंवा नाहीं हा एक वादच आहे; व हा वाद हल्लीं 'पायोनिअर' पत्रानें जोरानें लोकांपुढें आणिला आहे—परंतु कायमच्या राजधानीसहि जो मान मिळत नाहीं तो दरबारचा मान दिल्लीस मिळण्याचें कारण उघडच असें आहे कीं, पूर्वीं या देशांत हिंदु व मुसलमान सम्राट् ज्या स्थानावर होते त्याच स्थानावर इंग्रज प्रभु आज आहेत, असें सर्व जगाच्या निदर्शनास विशेष रीतीनें यावें. आठवण हा मनाचा खेळ आहे; आणि जुन्याच्या जागीं नवें येईल तेव्हांच जुन्याची आठवण नाहींशी होते असा मनाचा धर्म असल्यामुळें, जें कार्य कायद्याच्या दृष्टीनें १८५८सालीं तमसा नदीच्या कांठीं असणाऱ्या पार्लमेंटच्या सभागृहांत घडून आलें, तेंच कार्य मानवी मनाच्या दृष्टीनें घडवून आणण्यास दिल्लीस दरबार भरविणें हेंच योग्य आहे हें कोणीहि कबूल करील. दिल्ली शहराशीं आपला संबंध कायमचा जोडण्याकरितां इंग्रजांनीं तेथें अद्यापि प्रचंड इमारती बांधल्या नाहींत. किंबहुना इंग्रज हे केवळ काव्यमय, रम्य, पण पोकळ अशा गोष्टीचे भुकेलेले नसून, व्यवहारपटुत्व हाच त्यांचा मुख्य गुण आहे; यामुळें पुढेंमागें ते दिल्लीस अशा इमारती बांधतील किंवा नाहीं याचीहि शंकाच आहे. हिंदुस्थानांत पूर्वींचे राजे लोक राज्यारोहणाच्या प्रसंगीं आपापल्या ऐपतीप्रमाणें हिरेमोत्यांचीं ताटें उधळीत व रस्त्यांतून दोन्ही दोन्ही हातांनीं चलनी नाण्यांची हत्तीवरून खैरात करीत; हा हौसेचा पण फाजील उधळेपणाचा प्रकार इंग्रज राजे इंग्लडांत किंवा खुद्द दिल्लींतहि करीत नाहींत. परंतु अशा नीरस पण व्यवहारदक्ष इंग्रजांनाहि परंपरेचें दास्यत्व सर्वस्वीं झिडकारून अलिप्त राहतां येत नाहीं. खुद्द इंग्लडांतहि नव्या राजाचा १९११ सालीं झालेला मुकुटधारण-समारंभ ज्या विधींनीं व ज्या शब्दोच्चारांनीं करण्यांत आला, तेच विधि व तेच शब्दोच्चार सन ७९५ सालच्या—म्हणजे सुमारें अकराशें वर्षांपूर्वीं झालेल्या—राज्यारोहणाच्या वेळीं उपयोगांत आणिलेले होते, असा दाखला निघतो! एरवींच्या प्रसंगीं इंग्रज राजाचा पोषाखपेहराव इतका साधा असतो कीं, तो हलकारे ललकारे

बरोबर न घेतां चार लोकांत मिसळेल तर तुम्हांआम्हांस ओळखिताहि येणार नाहीं. पण इतक्यां सुसंस्कृत मनाच्या राजास व प्रजेस मुकुट-धारणाविधीचा अगदीं जुनाट व फाटकातुटका कित्ता गिरविल्याशिवाय समाधान वाटत नाहीं! देशी नाटकांतल्या इंद्रसभेतील सोंगासारखा पोषाख आणि बुडकुलींतून पवित्र तेल चमच्यानें घेऊन ठराविक रीतीनें डोक्याखांद्यावर काढलेलीं स्वस्तिकें वगैरे गोष्टी एरवींच्या प्रसंगीं पाहून कोणासहि कदाचित् हंसूच येईल. पण त्याच गोष्टी राज्यारोहणाच्या प्रसंगीं केल्यानें त्यापासून गहन गांभीर्य उत्पन्न होऊं शकतें. अशाच कांहींशा मनोवृत्तीनें दरबार भरविण्याचेहि समारंभ केले जातात; व म्हणून कलकत्ता मुंबईसारखीं प्रचंड व धनाढ्य राजधानीचीं शहरें सोडून दिल्ली-सारख्या मागसलेल्या व एका बाजूच्या शहरीं मुद्दाम जाऊन दरबार भर-विण्यांत येतात हें अगदीं उघड आहे, व या दृष्टीनें पाहतां तें योग्यहि आहे. वास्तविक इंग्रजांसारख्या दर्यावर्दी व समुद्रावर स्वामित्व गाज-विणाऱ्या व्यापारी योद्धयांस मुंबई किंवा कलकत्ता हींच शहरें दरबार भर-विण्यास योग्य दिसावीं. तथापि दिल्ली शहर हें जुन्या ऐतिहासिक उपाधी-नीं वेष्टिलेलें असल्यामुळें, हिंदुस्थानांतील इंग्रज राजाचा दरबार इंग्रजांनीं स्वतः वसविलेल्या व अभिमानास्पद अशा कलकत्ता व मुंबई शहरीं न भरवितां, जेथें पूर्वींच्या हिंदुमुसलमान राजांच्या मोडक्यातोडक्या किंवा रिकाम्या इमारती—व अद्यापि गाडलें गेलें नसल्यास—त्या इमारतींतून संचारणारें दिल्लीच्या रुधिरप्रिय वास्तुदेवतेचें भूत—याशिवाय जुन्या ऐति-हासिक साम्राज्याची आठवण करून देणारें किंवा सांधा जोडणारें दुसरें कांहीं एक अवशिष्ट नाहीं, अशा ठिकाणीं दरबार भरविल्याशिवाय इंग्रज राज्यकर्त्यांचें समाधान होऊं नये, यांतहि कांहीं आश्चर्य नाहीं. विसाव्या शतकां-तील सुधारणा देखील, इंग्रजांसारख्या केवळ व्यवहारदक्ष अशा लोकांच्याहि मनांतील राजकीय भावनेवर किंवा श्रद्धाळूपणावर, हरताळाचा बोळा फिरवूं शकत नाहीं. दिल्लीस दरबार भरविणें हें मेलेल्या हिंदुमुसलमान सम्राटांच्या नाकांवर टिचण्यासारखें उन्मत्तपणाचें कृत्य नसलें तरी, ज्या स्थळीं पूर्वींचे ऐश्वर्यसंपन्न सम्राट् होऊन गेले त्या वास्तूवरच दरबार भरविण्यांत विशेष औचित्य आहे, असें मानणें हें भोळेपणाचें किंवा श्रद्धाळूपणाचें लक्षण

होय यांत शंका नाहीं. पण इंग्रज हे सुधारलेले असले तरी जोंपर्यंत त्यांनीं मनुष्यस्वभाव सोडला नाहीं तोंपर्यंत, दिल्लीस दरबार भरविल्यानें हिंदी प्रजेच्या मनावर साम्राज्याची विशेष छाप बसेल, असें प्रामाणिकपणानें मानण्याइतका भोळेपणा त्यांचे अंगीं मधून मधून चमकल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखेंहि कांहीं नाहीं. आतां दिल्लीस दरबार भरविण्याचें औचित्य पहावयाचेंच झालें तर तें एका दृष्टीनें दिसेल. म्हणजे सर विल्यम लीवॉर्नर यांनीं नुकतेंच एके ठिकाणीं लिहिल्याप्रमाणें इंग्रज सरकारच्या राज्यांत मिळालेल्या शांततेचें खरें चीज, घातपात व रक्तस्राव यांचेंच निरंतर साहचर्य असणाऱ्या दिल्लीसारख्या शहराचें उदाहरण लक्षांत घेतलें असतांच होणार आहे. सन १८०३ सालापासून-५७ सालची धामधूम अपवाद म्हणून सोडून दिली तर-दिल्ली शहरांत नांदणारी स्वस्थता, व तोंपर्यंत पूर्वींच्या काळीं त्या शहरांत माजलेली अस्वस्थता, या दोहोंमध्यें जितका विरोध आहे तितका दुसऱ्या कोणत्याहि दोन गोष्टींमध्यें सांपडणार नाहीं. आतां सर विल्यम लीवॉर्नर भासवितात त्याप्रमाणें वरील विरोध स्पष्ट करून दाखविणें हाच कांहीं दिल्लीस दरबार भरविण्याचा खरा हेतु नाहीं हें निर्विवाद होय. तथापि, दिल्लीचें पूर्ववृत्त लक्षांत घेतां लीवॉर्नरसाहेबांचा हा युक्तिवाद यथार्थ नसला तरी शोभण्यासारखा मात्र खचित आहे.

वाचनालय ता. ता. ग.

# मराठ्यांचे ऐतिहासिक पोवाडे*

"आपली आपण करी स्तुति, तो एक मूर्ख" असें एक मूर्खलक्षण रामदासांनीं लिहून ठेविलें आहे. पण हें लक्षण 'स्वतः'ची स्तुति करणाऱ्या व्यक्तीला लागतें; स्वतःच्या 'राष्ट्रा'ची किंवा 'समाजा'ची स्तुति करणाऱ्या व्यक्तीला लागत नाहीं. फार काय, पण खुद्द रामदासांच्या पुढें हा प्रश्न असता तर त्यांनीं असेंहि लिहून ठेवलें असतें कीं, "आपुल्या राष्ट्राची न करी स्तुति तो शतमूर्ख." स्वतःच्या स्तुतीबरोबर 'वडिलांची कीर्ति' सांगणें हीहि एक निषिद्ध गोष्ट म्हणून रामदासांनीं सांगितली आहे खरी; पण तिचा अर्थ मात्र उघड दिसतो तसा नव्हे. वडिलांची स्तुति करणें किंवा कीर्ति गाणें यांतहि दोन प्रकार असतात. एक प्रकार म्हटला म्हणजे नादान बढाईखोरपणाचा; ज्यांत निव्वळ वडिलांच्या कीर्तीच्या भांडवलावरच सर्व व्यापार भागविण्याचा प्रसंग असतो. असला मनुष्य वेळीं अवेळीं वाडवडिलांच्या नांवाशिवाय बोलावयाचाच नाहीं. त्याला कांहींहि विचारा किंवा तो तुम्हांस कांहींहि सांगो, त्यांत त्याच्या बापदादांची साक्ष किंवा जामीनकी असावयाचीच. त्यांच्या आयत्या पिठावर याच्या रेघा; त्यांच्या कर्तबगारीवर हा आपल्या मिशीला पीळ भरणार! आणि निवळ खानदानी–कीर्तिमान् पूर्वजांच्या पोटीं जन्मास येणें–हीच काय ती याची अवघी लायकी, हेंच याचें सारें शील. समर्थांच्या उक्तीचा कटाक्ष असल्या बढाईखोर स्तुतिपाठकांवरच आहे. पण मूर्खपणा पदरीं बांधून न घेतांहि 'वडिलांची कीर्ति' गातां येणें शक्य असतें. या दुसऱ्या प्रकारच्या स्तुतिपाठकांना आपल्या पूर्वजांच्या लायकीचा अभिमान असतो; पण त्याजबरोबर त्यांना स्वतःच्या नालायकीची जाणीव असून, तशी लायकी परमेश्वरा! आपल्याहि अंगीं येईल काय? अशी आर्त व कळकळीची प्रार्थना त्यांच्या अंतःकरणांतून निघत असते. प्रत्येक मूर्तिपूजकाला आपली देवाची मूर्ति उज्ज्वल असावी अशी इच्छा असते; व यामुळें तो ती मूर्ति शक्य तितक्या मौल्यवान् पदार्थांनीं शृंगारतो. पण "माझ्या देवाच्या

---

* तारीख ९ माहे एप्रिल सन १९१२.

अंगावर मीं हजारों रुपयांचें जवाहीर घातलें आहे, हजारों रुपयांच्या किंमतीची रामाची मूर्ति आज माझ्या मिळकतीच्या यादींत आहे," असें म्हणणाऱ्या उपासकाची भक्ति ही भक्ति कसली? तेंच "हजारों रुपयांच्या जवाहिरांचें तेज एकवटलें तरी, परमेश्वरा! तुझ्या तेजाच्या एका किरणांशा-इतकी तरी शोभा त्याला येणार आहे काय? पण हा त्या तेजाची कल्पना मनांत आणण्याचा केवळ एक अल्प मानवी प्रयत्न आहे" असें म्हणणाऱ्या सगुण रूपाच्या उपासकाची भक्ति ही मात्र भक्ति खरी! या दोघांच्याहि मूर्तीवर जवाहीर आहे खरें; पण एकाची सर्व दृष्टि आपल्या बडेजावीची, दुसऱ्याची दृष्टि पूज्याची पूजा करण्याची! हेंच त्यांतलें अंतर!

आपल्या पूर्वजांचे पोवाडे गाण्यांतहि इष्ट व निषिद्ध असे हे दोन प्रकार आहेत. महाराष्ट्राच्या हल्लींच्या स्थितींत दोन्ही प्रकार संभवतात. मोडकळीस आलेल्या खानदानीच्या घराण्यांतील विद्यमान वंशजांच्या तोंडीं निषिद्ध प्रकारचे पूर्वज-कीर्तिपाठ आढळून येतात. पण उच्च शिक्षणानें, प्रेमळ भावनेनें आणि राष्ट्रीय प्रेरणेनें जेथें जेथें महाराष्ट्राच्या जुन्या पिढीची कीर्ति गाइलेली आढळते, तेथें तेथें मात्र ती इष्टच होय यांत शंका नाहीं. मोठ्या राष्ट्रीय दृष्टीनें पाहिलें म्हणजे मग गोत्र, कुळ, जात हे सारे क्षुद्र भेद लय पावतात; व जेथें ब्राह्मणाचा अभिमान मराठा धरितो व मराठ्यांचें गुण ब्राह्मण घेतो, तेथें राष्ट्रीय भावना खरीच उदित झाली असें समजून चालण्यास हरकत नाहीं. असल्याच भावनेनें मराठ्यांचे ऐतिहासिक पोवाडे संग्रहित करून छापण्याचें काम १८७९ सालीं महाराष्ट्रांत रा० शंकरराव शाळिग्राम यांनीं कै० विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या प्रेरणेनें प्रथम केलें. सदर पुस्तकाची सुधारून वाढविलेली आवृत्ति रा० शाळिग्राम व मि० ऑक्वर्थ, आय्. सी. एस्. यांनीं १८९१ मध्यें काढली, व याच ग्रंथाची तिसरी आवृत्ति हल्लीं रा० शाळिग्राम यांनीं, मुंबईसरकारचे पोलिटिकल सेक्रेटरी व मराठ्यांच्या इतिहासाचे चाहाते व भोक्ते युरोपियन सिव्हिलियन मि० सी ए. किंकेड यांच्या साहाय्यानें प्रसिद्ध केली आहे. आणि या गोष्टीवरून मराठ्यांचे राष्ट्रीय पोवाडे गाण्याची महाराष्ट्राची इच्छा, व तें उघड गाऊं देऊन त्यांचें स्वारस्य सेवून गौरव करण्याची विद्वान् युरोपियन अधिकाऱ्यांचीहि इच्छा कायमच नव्हे तर वाढती आहे हें पाहून कोणाहि

महाराष्ट्रीयास आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं! अशा कामीं युरोपियन लोकांकडून होणारें साहाय्य खरोखरच त्यांस भूषणास्पद आहे. राज्य-कारभाराच्या वेळीं 'आम्ही तुम्हांस जिंकणारे' अशा अभिमानाचा मुखवटा चढवून प्रजेस त्यांना कदर दाखवावी लागत असली, तरी कारभाराची वेळ जाऊन तो उग्र मुखवटा बाजूस काढून ठेवल्यावर, प्रजाजनांच्या अंतरंगांत आपलें अंतरंग मिळवून, त्यांच्या राष्ट्रीयत्वास पोषक अशा गोष्टी जाणूनबुजून व निर्मत्सरबुद्धीनें करणाऱ्या परकीय अधिकाऱ्यांचा धन्यवाद कोणीहि गाईल! मराठ्यांचे पोवाडे गाणें म्हणजे इंग्रजांशीं राजद्रोह करणें नव्हे, ही गोष्ट खुद्द ऑक्वर्थसाहेबांनीं आपल्या विद्वत्वपूर्ण प्रस्तावनेंत १८९० सालीं लिहिली. तेव्हांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वातावरणांत विचित्र अभ्रें व वादळेंहि उठलीं आणि त्यांचा परिणाम भित्याची भीति दुणावण्यांत झाला. पण रा० शाळिग्राम यांच्या पोवाड्यांच्या पुस्तकांच्या नव्या आवृत्तीस प्रस्तावना लिहून किंकेडसाहेबांनीं तें फिरून एकवार जगापुढें मांडून "ही भीति निराधार आहे; महाराष्ट्राच्या विभूतींचे पोवाडे गाण्यास—प्रजाजनांनीं आपल्या पूर्वजांचे गुण आनंदानें घेण्यास—सरकार कधींहि हरकत करीत नसतें व करणार नाहीं," असेंच एकप्रकारें सिद्ध केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कोणत्याहि देशांतील पोवाड्यांत महानुभाव विभूतींचीं चरित्रें व राष्ट्रीय अभिमान जागृत करणारा उदात्त प्रसंग यांचेंच वर्णन असतें. वीररस हा पोवाड्यांतील मुख्य रस कोठेंहि असणार; व त्याचप्रमाणें प्रस्तुतच्या पोवाड्यांतहि तो आहे. पण खुद्द ऑक्वर्थसाहेबांनीं नमूद केल्याप्रमाणें एखाद्या वीराचा पोवाडा होण्यास तो यशस्वीच झालेला असला पाहिजे असें मात्र नाहीं. पानिपतास भाऊसाहेब पडले व मराठे लढाई हरले; व उलटपक्षीं उदगीरची लढाई भाऊसाहेबांनीं जिंकली किंवा त्यांनीं दिल्लीचें तख्त फोडलें; असे तीन प्रसंग असतां पानिपतच्याच लढाईचा पोवाडा झाला, व उदगीरच्या लढाईचा झाला नाहीं—निदान झाला असला तरी पानिपतच्या पोवाड्याइतका लोकप्रिय होऊन टिकला नाहीं—हें, ऑक्वर्थसाहेबांनींच साक्ष दिल्याप्रमाणें, पोवाडे करणाऱ्या शाहीरांच्या आणि ते पोवाडे प्रेमानें गाणाऱ्या मराठे लोकांच्या प्रामाणिकपणाचेंच लक्षण आहे!

विभूतितत्त्व हें केवळ अंगीकृत कार्यांच्या यशःसिद्धीवरच अवलंबून नसतें. निदान हें तरी खरें कीं, चारित्र्याची यशःसिद्धि हीच खरी सिद्धि. अंगीकृत कार्य साधो वा न साधो, केवळ कार्याची सिद्धि ही खरी सिद्धि नव्हे. भारत व रामायण यांतील नायकांचा विजय झाला आहे खरा; पण ग्रीक आद्य कवि होमर याच्या ईलियड नामक महाकाव्यांतील खरा नायक हेक्टर हाच असून तो युद्धांत पडला व मारला गेला; किंबहुना त्याच्या शत्रूनें प्रेतास आपल्या रथाला बांधून फरफटत फिरविलें व त्याची दुर्दशा केली. तथापि, ईलियडला हेक्टरचा पोवाडा म्हटलें तरी त्यांत फारशी चूक होणार नाहीं.

पोवाड्यासंबंधानें दुसरीहि एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे; ती ही कीं, त्यांतील नायक यशस्वी झालेला असलाच पाहिजे हा निर्बंध जसा नाहीं, तसेंच तो तत्कालीन सनदशीर रीतीनें भांडणाराच असला पाहिजे असेंहि नाहीं. सनदशीर व बिनसनदशीर हा भेद वास्तविक फार महत्त्वाचा आहे; व कोणत्याहि बिनसनदशीरवाल्यास–त्याचें उदाहरण राजसंस्थेच्या आद्यतत्त्वास विघातक व सद्यस्तापदायक असल्यामुळें–शिक्षा होणें व त्याच्या कृत्यास राजशक्तीनें आळा घालण्याचा प्रयत्न होणें हें योग्यच आहे; आणि तें ज्या वेळच्या त्या वेळीं व्हावयाचें तसें होतच असतें. पण कालांतरानें सनदशीर व बिनसनदशीर हा सूक्ष्म औपचारिक भेद विसरला जाऊन ज्या त्या कर्त्या पुरुषांच्या अंगच्या अलौकिक गुणांची तेवढी आठवण जनतेस राहते. कायदेशीर व बेकायदेशीर हे मानवी कृत्याचे गुणधर्म अनित्य व अशाश्वत आहेत. पण त्या कृत्यांमधील शौर्य-धैर्यादि उच्च मानवी गुण हे मात्र नित्य व शाश्वत असल्यामुळें कालांतरानें तेच टिकतात. इंग्रजी वाङ्मयांत राजे लोकांप्रमाणें राजबहिष्कृत दरोडेखोरांचेहि पोवाडे झाले आहेत; यावरून ही गोष्ट उघड सिद्ध होते. रॉबिनहूड हा इंग्रजी भाषेंतील पोवाड्यांचा एक अत्यंत लोकप्रिय नायक आहे; पण तो फांशीची शिक्षा झालेला दरोडेखोर होता! त्याच्या अंगीं माणुसकीचे उंची गुण सर्व कांहीं होते. सुष्टांचा कैवारी, दुष्टांचा शत्रु, न्यायी, शूर, उदार, प्रणयी–अशा गुणांनीं युक्त असलेल्या रॉबिनहूडचें व त्याच्या वेळच्या अधिकाऱ्यांचें भांडण होतें; तो त्यांच्या हातीं लागता तर त्यांनीं त्यास फांसा-

वर चढविण्यास कांहीं कमी केलें नसतें; त्याच्या समकालीन पिढीला त्याची स्मृति उघडपणें करणें कठीण गेलें असतें; व कित्येकांना तर तो कोणी मोठा मनुष्य आहे, असेंहि कदाचित् मनांतून वाटलें नसतें. पण पुढील पिढ्यांना त्याच्या चारित्र्याचें खरें मर्म कळल्यामुळें त्यांना रॉबिनच्या बेकायदेशीर वर्तनाचें कांहींच वाटलें नाहीं व त्यांनीं त्याला उमदा नायक बनवून त्यावर पोवाडे केले. इकडे इंग्रजी अमलांत झालेल्या उमाजी नाईक वगैरेंचीहि तीच गोष्ट आहे. तो दरोडेखोर तर खराच, व अखेर फांशीहि गेला; पण त्याच्या दरोडेखोरींत शौर्य, धैर्य, प्रसंगावधान, औदार्य महत्त्वाकांक्षा, माणुसकी वगैरे अनेक उत्कृष्ट गुणांचें मिश्रण झालेलें असल्यानें, पीनल कोडाप्रमाणें शिक्षा झालेल्या या अलौकिक व्यक्तीचे पोवाडे शाहिरांनीं केले; ते गाणारे भिकारी अजूनहि या दरोडेखोराच्या नांवावर आपलें पोट भरतात; व सरकारालाहि, त्या पोवाड्यांपासून दरोडे घालण्यास उत्तेजन मिळेल अशी फाजील भीति वाटत नसल्यानें, तें ते पोवाडे गाण्यास प्रतिबंध करीत नाहीं.

तात्पर्य, मनुष्याचे पोवाडे होऊन लोकांनीं ते गाण्यास त्याच्या अंगीं कांहीं लोकोत्तर गुण असावे लागतात. मग सुदैवानें तो शिवाजीमहाराजांसारखा, अफजुलखानास मारण्याचें धाडस करणारा पूर्ण यशस्वी वीर असो; तानाजी मालुसऱ्यासारखा सिंहगड घेऊन प्राणास मुकलेला अर्धयशस्वी सरदार असो; सदाशिवरावभाऊसारखा पानपतची लढाई हरून स्वपक्षाची कीर्ति व स्वतःचे प्राण गमावणारा सर्वस्वीं अपेशी असा सेनानायक असो; अहिल्याबाईसारखी उदारचरित व पुण्यशील पापभीरू साध्वी असो; किंवा उमाजी नाइकासारखा बेकायदा वागणारा व प्रसंगविशेषीं प्राणहानीकडे न पाहणारा मिश्र गुणविशिष्ट दरोडेखोर असो!

पोवाड्यांचें उत्पत्तिकारण हें असें असल्यामुळें, कोणत्याहि समाजांत तत्कालीन वीरपुरुषांचे पोवाडे ताबडतोब होऊन गाण्यांत येणें अशक्य असतें; आणि ज्यांच्या अंगीं वीररसाचे भाव व विभाव होऊं शकतील असे किंवा इतर लोकोत्तर गुण नसतात, ते इतर रीतींनीं कितीहि चांगले असले तरी त्यांचे पोवाडे होऊन गाइलेले ऐकावयास मिळण्याची प्रायः केव्हांच आशा नको. इंग्लंडांत झालें तरी, 'चेव्ही चेस'च्या लढाईचे किंवा रॉबिन-

हूडच्या पराक्रमाचेंच पोवाडे झालें आहेत; पण इंग्लंडला नेपोलियन-बरोबर दहा बारा वर्षें लढवून पांचपंचवीस लढाया अप्रत्यक्ष रीतीनें घडवून आणणाऱ्या बालमुत्सद्दयांचे—म्हणजे राजकारस्थानी विलियम पिटचे—पोवाडे कधीं झाले नाहींत! महाराष्ट्राच्या ऐतिहासिक पोवाड्यांचीहि गोष्ट अशीच आहे. या पोवाड्यांचा ओघ पेशवाईच्या अखेरपर्यंत टिकला व तेथपासून तो मावळल्यासारखाच झाला म्हटलें तरी चालेल. वास्तविक चारित्र्यानें उदात्त असणाऱ्या लोकांची महाराष्ट्रांतील परंपरा पेशवाई बरोबरच मावळली हें मुळींच खरें नाहीं. परंतु महाराष्ट्रांत स्थापित झालेली शांतता, आधुनिक सुधारणेचा रसहीन प्रवाह व प्रभाव, विशेषतः स्वराज्याचा लोप या गोष्टी नवीन पोवाडे होण्यास प्रतिबंधक झाल्या आहेत. आधुनिक सुधारणेचें मूर्धाभिषिक्त उदाहरण म्हणजे आगगाडी. या आगगाडीपासून इतर अनेक फायदे झाले असले तरी, तिनें महाराष्ट्रीयांची बरीचशी रसिकता कमी केली, निसर्गनिर्मित भूषणास्पद देखाव्यांपासून महाराष्ट्राची दृष्टि ओढून घेऊन भलतीकडे लावली, व पोवाड्यांसारखी जनतेच्या अंतरंगांतून निघणारीं—जनतेचें अंतरंग तल्लीन करून सोडणारीं—राष्ट्रीय काव्यें निर्माण होण्याचा रसिकतेचा झरा आटवून सोडला, असें मि० ऑक्वर्थ यांनीं जें गाऱ्हाणें केलें आहे तें सर्वस्वीं खरें आहे. कालाच्या कलाटणीमुळें, आम्हांस पूर्वी कधीं न मिळणारीं अशीं देशी व विदेशी सौख्यें मिळूं लागलीं आहेत हें खरें. तथापि पोवाडे करण्याचें, पोवाडे म्हणण्याचें व पोवाडे ऐकण्याचें आमचें सुख नष्ट झालें आहे यांत शंका नाहीं. ऑक्वर्थ, शाळिग्राम, किंकेड वगैरे मंडळीच्या परिश्रमानें जुने पोवाडे छापले जाऊन ते विस्मृति-रूपी मृत्यूच्या दाढेंतून तरी बाहेर पडले यांत वाद नाहीं. पण आराम-खुर्चीवर पडून, विजेच्या पंख्यांचा वारा घेत व हवाना सिगारचे झुरके सोडीत वाचलेल्या पोवाड्यांपेक्षां, जुन्या पद्धतीनें म्हटले जाणारे पोवाडे ऐकून होणारें सुख खरोखर किती तरी श्रेष्ठ! रंगपंचमीच्या दिवशीं सायं-काळीं चावडीसमोर पिंपळाच्या पारावर फाटकी तुटकी बैठक घातली आहे; बुदलीनें ओतल्या जाणाऱ्या तेलानें पेटणारे हिलाल पाजळत आहेत; रंगीबेरंगी कपडे घातलेले अर्धे उघडे लोक गोळा झाले आहेत; पायांत तोडा, डोक्यावर कंगणीदार पगडी, व त्यांत तुरा खोवलेला अशी अर्ध–

गोंधळी अर्थात् तमासगीर मंडळी तुणतुणीं खेंचून तिसऱ्या सप्तकांत सूर नेऊन गात व साथ करीत आहेत; कडकडीत डफावर डाव्या हाताची टिचकी व उजव्या हाताची थाप मारून त्यांचा पुढारी एकाहून एक सरस असे पोवाडे आठ–आठवून म्हणत आहे; आणि सर्व श्रोते मंडळी तल्लीन होऊन तटस्थ झाली आहे– अशा अस्सल देशी थाटांत पोवाडे ऐकण्याची गोष्ट कांहीं वेगळीच आहे ! तिचें स्वारस्य ज्यानें अनुभविलें नसेल त्याला तें सांगून काय कळणार ?

पोवाडे म्हणण्याची ही जुनी पद्धत जशी लोपली तसेच पोवाडे होण्याचे विषयहि महाराष्ट्राला तूर्त लोपले आहेत असेंच म्हणणें भाग आहे. अलीकडच्या काळीं पोवाडा कशाचा होणार ? पेशवाई नष्ट झाल्यापासून युद्धाची रम्यकथा फक्त पुस्तकांत वाचावयाला मात्र शिल्लक उरली आहे. दरम्यानच्या काळांत एखाद्या मराठ्या सुभेदारानें साऊडनमध्यें शौर्य दाखवून, किंवा सरहद्दीवरच्या धामधुमींत डोंगर चढून उतरून, शाबासकीची फीत किंवा बहाद्दरीचा एखादा बिल्ला मिळविला असेल. पण ही लढाई कोणाकरितां ? तिची हुकमत कोणाकडे ? तिचें वर्णन ऐकावयास कोणास मिळणार ? व मिळालें तरी त्यानें पोवाडे रचण्यास लागण्यासारखा उत्साह ऐकणाऱ्यांच्या हृदयांत कसा उत्पन्न होणार ? बिनलष्करी पेशाच्या धंद्यांतहि धैर्य–वीर्य दाखविण्याचे प्रसंग येत असतील, नाहीं असें नाहीं. पण पोवाडा करणारानें आज पोवाडा करावा तरी कुणाचा ? कळकळीनें वस्तुपाठ शिकविणाऱ्या मास्तराचा ? कीं 'गाऊन' घालून तडतड इंग्रजी बोलणाऱ्या प्रोफेसराचा ? कीं टांकाच्या एका वळशानें कारवाईचें कारस्थान साधणाऱ्या शिरस्तेदाराचा ? कीं कौन्सिलांत तोंड-पाटिलकी गाजविणाऱ्या नामदाराचा ? कीं धान्याचीं पोतीं विलायतेस पाठवून दलाली मिळविणाऱ्या राइलीच्या एजंटाचा ? ऑक्वर्थसाहेब आधुनिक पोवाड्यांचा शोध करीत असतां त्यांना 'आगगाडी'वर रचलेला एक पोवाडा आढळला होता; आम्हींहि व्हिक्टोरिया महाराणीच्या चरित्रावर एका आधुनिक महामहोपाध्याय–प्रायः पंडितानें–संस्कृतांत लिहिलेलें एक महाकाव्य पाहिलें आहे. पण असले पोवाडे व असलीं महाकाव्यें यांची प्रसिद्धि छापखान्याच्या कंपाझिटरापलीकडे फारशी होणें शक्य नाहीं. मग राष्ट्रीय वीरें संगांत

खेळवूं लाविण्याचें जें पोवाड्यांतील सामर्थ्य तें यांच्यांत कसें येणार? नव्या कालमानाप्रमाणें कांहीं नव्या अशा गोष्टी आम्हांस मिळत आहेत. पण जुन्या कित्येक गोष्टींची जागा कोणत्याहि नव्या गोष्टींनीं भरून निघणें शक्य नाहीं; व ऐतिहासिक पोवाडे ही त्यांपैकींच एक गोष्ट होय!

खुद्द ऑक्वर्थसाहेबांनींच असे उद्गार काढले आहेत कीं, "मराठ्यांचें स्वराज्य गेलें, परक्यांचें राज्य त्या जागीं आलें, व शांतता चांगली खरी, पण तिच्यामुळें सर्व राष्ट्राच्या चरित्रांत एकेरीपणा आला व वैचित्र्य नष्ट झालें. युद्धें हीं वाईट खरीं, पण त्यांच्या योगानें राष्ट्रीय चरित्रपटावर जीं निरनिराळीं चित्रें दिसावयाचीं आणि मनास ताजेपणा व उल्हास वाटावयाचा तें सर्व नाहींसें झालें. तात्पर्य, राष्ट्रांतील जातिवंत कवींना खरी काव्यस्फूर्ति होण्यास जी परिस्थिति लागते ती हल्लीं नाहींशी झाली आहे. मग नवीन पोवाडे कसे निर्माण व्हावेत? आगगाडी पाहून क्षणभर मनास चमत्कार वाटतो खरा; पण विजेच्या दिव्यानें लखलखणारी व तासाला ६० मैल जाणारी पंजाब-मेल डोळ्यांपुढून गेली तरी, स्वदेशी इतिहास बनत असतांना एखाद्या कोनाकोंपऱ्यांत झालेल्या लहानशा चकमकी-इतकेंहि तिच्यानें महाराष्ट्रीय कवीला स्फुरण येणार नाहीं. मग शिवाजी-महाराज व बाजीराव यांचा पराक्रम अगर नानाफडणवीस किंवा पाटील-बुवा यांचें राजनीतिचातुर्य यांची भर कशानें निघून येणार! पोवाड्यांपेक्षां वाङ्मयदृष्टीनें आधुनिक कवींची कविता अधिक चांगली असेल; पण पोवाडे सोडून या कवितेकडे आपण आलों म्हणजे, हिमालयावरील किंवा नर्मदाकांठच्या प्रचंड वनांतून निघून फळझाडांचें बीं विकणाऱ्या एखाद्या नर्सरीवाल्याच्या परसांतील बागेत, किंवा दिवाणखान्यांतील चिनी कुंड्यां-तून खुरटविलेल्या तालतमालांच्या हातभर पानांच्या सावलींत आपण आलों आहों असें वाटतें, याला नाइलाज आहे! आधुनिक कलाकुसरीची कविता महाराष्ट्रांतील शेंकडा ९५ लोकांच्या कानींहि अद्यापि गेलेली नाहीं; उलट, पोवाडे गाण्याची पद्धति नष्टप्राय झाल्यामुळें पोवाडे जवळ जपळ लोपले तरी त्यांची तेजस्वी स्मृति अद्यापि त्यांच्या मनांतून नष्ट झालेली नाहीं. अशा वेळीं पोवाड्यांना जितकें उत्तेजन देतां येईल तितकें थोडेंच होणार आहे. या तेजस्वी पोवाड्यांची ओळख महाराष्ट्रीयांना

बाळपणापासून व्हावी अशा इच्छेनें मि० ऑक्वर्थ यांनीं शालिग्राम यांच्या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत अशी सूचना केली होती कीं, मराठी शाळांतून व इंग्रजी शाळांच्या मराठी अभ्यासक्रमांतून पोवाड्यांचे थोडेंसें शिक्षण द्यावें. या सूचनेनंतर प्राथमिक शाळांच्या अभ्यासक्रमाचीं पुस्तकें ठरविण्याकरितां एक स्पेशल कमिटीहि नेमली गेली होती. परंतु ऑक्वर्थसाहेबांच्या सूचनेचा विचार झाला नाहीं. उघडच आहे, तो कसा होणार ? जेथें सगुण देवांचीं नांवें एकतर्फी व विशिष्टधर्मीय म्हणून आहेत तशीं राहूं देण्यास विचार पडतो, व शिवाजीच्या गोष्टी राहूं दिल्याच तर मोठ्या कष्टानें राहूं दिल्या जातात, तेथें मुलांच्या पुस्तकांत पोवाडे घालून त्यांचें शिक्षण देण्याचें भयंकर घातक कृत्य करण्यास कोण धजणार ? पण हें असें आहे म्हणूनच, शालिग्राम यांच्या पोवाड्यांच्या संग्रहाची तिसरी आवृत्ति निघते, व मे० किंकेडसाहेबांसारखे इतिहासप्रिय सद्गृहस्थ त्यास प्रस्तावना लिहून जगापुढें आणतात, या गोष्टीचा आम्हांस आनंद वाटतो.

# ऐतिहासिक लेखसंग्रहाचें परीक्षण°

"वाडवडिलांची कीर्ति वाढविणें आपल्या हातून होत नाहीं, तर तिचें रक्षण करून ती बुडूं न देणें हें तरी श्रेय आपण घ्यावें... माहिती कितीहि क्षुल्लक वाटली तरी तिचा नीट संग्रह करून ठेवावा, कां कीं, कधीं कधीं एखाद्या अशा क्षुल्लक गोष्टींतहि असें तात्पर्य असेल कीं तिच्या योगानें कदाचित् इतिहासहि फिरूं शकेल."—(निबंधमाला.)

मराठ्यांच्या इतिहासाचें पुनरुज्जीवन व्हावें या इष्ट गोष्टीविषयीं जीं कांहीं साधक कारणें दाखवितां येण्यासारखीं आहेत त्या सर्वांचें सार वरील अवतरणांच्या दोन लहानशा पण चटकदार वाक्यांत उतरलें आहे असें आम्हांस वाटतें. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या हृदयांत, स्वदेश व वाडवडील यांजविषयींचा निस्सीम अभिमान अग्निस्फुलिंगाप्रमाणें सदैव जागृत असून त्यांच्या स्वभावाच्या आवेशाला तेथूनच स्फूर्ति मिळाली होती; आणि त्यांच्या संस्था व त्यांचे लेख यांजमध्यें त्याच तेजाचा क्षणभर दिपवून सोडणारा असा लखलखाट पडला होता. वरील अवतरणांतील वाक्यरत्नें ज्यांमध्यें ग्रथित झालेलीं आहेत तो "इतिहास" या विषयावरील शास्त्रीबोवांचा मनोवेधक निबंध आजच्या स्थितींत वाचण्यांत आला असतां वाचणारास एक प्रकारचें कौतुक वाटतें. निबंधाचे वेळची मराठ्यांच्या इतिहासाची स्थिति व त्याचीच आजची स्थिति यांमध्यें एक प्रकारचें समाधानकारक अंतर पडलेलें आहे हें कोणाहि विचारी मनुष्यास स्पष्टपणें दिसून येईल. शास्त्रीबोवांच्या वेळीं मराठ्यांच्या इतिहासाविषयीं कोणास फारशी आस्था उत्पन्न झालेली नव्हती, येवढेंच नव्हे, तर त्या इतिहासाविषयीं पुरें अज्ञान किंबहुना एक प्रकारचा तिरस्कारहि माजला होता. आमच्या इतिहासाचीं साधनें आजच्यापेक्षां त्या काळीं असलीं तर अधिकच विद्यमान व उपलब्ध असायचीं हें निर्विवाद आहे; असें असतां हल्लीं इतिहासाचे उद्धाराविषयीं सर्वत्र जी कळकळ दिसून येते तिच्या दशांशहि त्या वेळीं असूं नये हा त्या काळच्या लोकांच्या मनांत असलेल्या स्वाभिमानाभावाचाच प्रताप होय असें म्हणावें

° तारीख २८ जून १८९८



सवाई माधवराव व नाना फडणीस

लागतें. असो; तरी पण कांहींहि असलें तरी २०।२५ वर्षांपूर्वी आपल्या इतिहासाबद्दल आपणांमध्यें अत्यंत खेदजनक अनास्था होती ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, हल्लींपेक्षां त्या काळीं मिशनरी वगैरे हितशत्रूंचा सुळसुळाट फार झालेला असून अनुपलब्ध इतिहासाचा शोध राहोच, परंतु उपलब्ध असलेल्या इतिहाससंबंधानेंहि अत्यंत खोडसाळ व विपरीत असे कुतर्क प्रचलित झाले होते. अशा रीतीनें एकपक्षीं आमची स्वतःची अनास्था व दुसरे पक्षीं आमच्या विधर्मी हितशत्रूंचा दुष्ट उद्योग या दोन कारणांमुळें आपल्या इतिहासाची दुर्दशा व नायनाट होऊन जाण्याचा रंग आला होता. अशा स्थितींत स्वाभिमानपूर्ण अशा कोणत्याहि मनुष्याला वाईट वाटणें स्वाभाविक आहे. या दृष्टीनें पाहिलें असतां, शास्त्रीबोवांचे लेखांमध्यें भाषेचा जो एक प्रकारचा कडकपणा दृष्टोत्पत्तीस येतो, तो योग्य किंवा निदान क्षम्य आहे असें कोणासहि कबूल करणें भाग आहे. परंतु शास्त्रीबोवांच्या निबंधाविषयीं 'कौतुक' वाटतें, असें जें आम्हीं वर लिहिलें आहे तें केवळ त्या निबंधांची सणसणीत भाषा किंवा त्यामधून चमकणारा लेखकाचा स्वदेशाभिमान या गोष्टींमुळेंच वाटतें असें नाहीं, तर त्या लेखानंतर व बहुधा त्या लेखांमुळें थोडक्याच काळांत जिकडे तिकडे मराठ्यांच्या इतिहासाचें परिशीलन व शोध यांचा जारीनें उपक्रम कसा झाला, व शास्त्रीबोवांनीं कठोरपणानें परंतु सद्धेतूनें घातलेल्या अंजनानें आमच्या सुशिक्षित लोकांचे डोळे उघडून त्या द्वारें हृदयांत स्वाभिमानाचा प्रकाश कसा पडला, हें पाहून कौतुक वाटतें. मात्र आपण घालून दिलेलें वळण व आपला उपदेश यांजमुळें मराठ्यांचें इतिहासाचे बाबतींत १०।२० वर्षांत केवढें स्थित्यंतर झालें याची प्रचीति पहाण्यास शास्त्रीबोवांस निर्दय काळानें जिवंत ठेविलें नाहीं ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. असो.

मराठ्यांचे इतिहासाच्या उद्धाराचे बाबतींत शास्त्रीबोवांचा काल व आजचा काल यांमध्यें फरक पडला आहे व हल्लींची स्थिति त्या मानानें सुधारली आहे असें वर सांगितलें आहे. पण वास्तविक ही सुधारणा केवळ सापेक्ष होय. पूर्वीपेक्षां हल्लीं इतिहासाचें अगत्य अधिक दिसून येतें हें खरें, तरी पण आमच्या इतिहास-शोधनाचे कामीं जितका उद्योग आम्हीं

करावयास पाहिजे तितका सर्व आम्ही केला आहे, असें कधींहि म्हणतां यावयाचें नाहीं. पूर्वी वाडवडिलांविषयीं आमच्या लोकांचे मनांत तिरस्कार माजला होता, तो जाऊन त्या ठिकाणीं योग्य असा आदर उत्पन्न झाला आहे; व पूर्वीची इतिहासाची अनास्था जाऊन त्या ठिकाणीं एक प्रकारची उत्सुकता आली आहे हें खरें. परंतु ती उत्सुकता तृप्त करून तो आदरभाव सप्रमाण व चिरंतन करून ठेवण्यास ज्या साधनांचा उपयोग करून घ्यावयास पाहिजे त्यांचा उपयोग अजूनपर्यंत आम्हीं करावा तितका केला नाहीं. तथापि 'अकरणात् मन्दकरणं श्रेयः' या न्यायानें इतिहासोद्धाराचे कामीं झाल्या तेवढ्या उद्योगाबद्दल आनंद मानण्यास कांहीं हरकत नाहीं. काळाच्या प्रत्येक घटकेबरोबर आम्ही व आमचे वाडवडील यांमधील अंतर वाढत चाललें आहे व विद्यमान असलेल्या इतिहास-साधनांचा क्षणोक्षणीं विध्वंस होत आहे हें खरें. तरी अशा कामीं अनुकूल मनःप्रवृत्ति उत्पन्न होणें हीच मुख्य गोष्ट असते व ती आज सुशिक्षित लोकांत उत्पन्न झालेली असल्यामुळें आमच्या इतिहासाच्या उद्धाराचें काम पुढेंमागें खचित पार पडणार अशी सदाशा उत्पन्न होणें साहजिक होय.

इतिहासाच्या उद्धाराचें काम दोन मार्गांनीं होणारें आहे. एक जुने कागदपत्र शोधून काढून व जुन्या दंतकथा वगैरे मिळवून त्या छापवून काढणें हा; व दुसरा, अशा रीतींनीं उपलब्ध व प्रसिद्ध झालेल्या माहिती-वरून संशुद्धि, अन्वय, विरोधदर्शन, एकवाक्यता व अनुमान इत्यादि ठरीव रीतींच्या साहाय्यानें, सुसंबद्ध असा इतिहास तयार करणें हा होय. वास्तविक या दोन मार्गांपैकीं पहिला हा अधिक महत्त्वाचा आहे, एवढेंच नव्हे, तर त्याजवरच दुसऱ्याचा सर्व जीव अवलंबून आहे हें उघड आहे. पहिल्या मार्गानें इतिहासाचें द्रव्य तयार होतें, व दुसऱ्या मार्गानें त्या द्रव्यापासून सुंदर आकृति तयार करितां येते. उत्तम शाडू तयार असेल तर साधारण मनुष्यसुद्धां गणपतीच्या आकारासारखी, चालचलाऊ काम भाग-विण्यापुरती मूर्ति तयार करूं शकेल. परंतु मुळीं शाडूच न मिळेल तर अत्यंत कल्पक व गुणवान् मूर्तिकार व त्याजपाशीं उत्तम प्रकारचे सुंदर रंग अशी सामुग्री सिद्ध असूनहि ती अगदीं व्यर्थ. हीच गोष्ट इतिहासाची. असो. जाडी विद्वत्ता, तीक्ष्ण बुद्धि, खोल शोधकपणा, विकसित मन, अगाध

कल्पनाशक्ति व सर्वांहून श्रेष्ठ असा कट्टा स्वदेशाभिमान, इतक्या गोष्टी अंगीं आहेत, परंतु माहितीरूपी सामुग्री हवीतशी सिद्ध नाहीं, तर त्या माणसाच्या हातून इतिहास कसा तयार होईल? इतिहास ही कल्पनेनें बनविण्याची गोष्ट नाहीं, एवढ्यामुळेंच सर्व नडतें! अपूर्ण माहितीनें जो इतिहास लिहिला गेला त्याचा पाया बळकट नसल्यानें तो पुढेंमागें ढांसळून पडणार एवढेंच नव्हे तर, घाईनें इतिहास लिहिल्याच्या योगानें इतिहासलेखनाचे खुद्द हेतूलाच मोठा धक्का बसतो ही गोष्ट विसरतां कामा नये. जगामध्यें सत्य व असत्य यांचा नेहमीं पाठ-शिवणीचा खेळ चाललेला असतो व सत्यापेक्षां असत्याचीच चपळाई जास्त असते. म्हणून असत्यास एकदां 'आटपाटी'ची टाळी मिळाली, व त्यानें आघाडी मारली कीं, सत्यास मागें धांवतां धांवतां पुरेवाट होऊन जाते व पुष्कळ वेळीं सत्यास असत्य गांठतां न आल्यामुळें असत्यच शेवटीं विजयी होऊन बसतें ही जगाच्या अनुभवाची गोष्ट आहे. अपूर्ण माहितीवरून इतिहास लिहिण्याचा प्रयत्न झाला असतां, ऐतिहासिक पुरुष व प्रसंग यांसंबंधानें खोटेच सिद्धान्त प्रचलित होण्याचा व ते एकदां प्रचलित झाले म्हणजे मांगाहून येणारे लोक व इतिहासकार यांची दृष्टि दूषित होऊन इतिहासंशोधन किंवा परीक्षण या कामाची सर्व दिशाची दिशाच चुकण्याचा संभव असतो. श्री०नारायणरावसाहेब पेशवे यांचे वधांत आनंदी-बाईचा खरा हात कितपत होता, व आजकाल लोकांत जिच्यासंबंधानें जितकी कुकीर्ति माजली आहे तितकी ती खरोखरच लोभी, दुष्ट व पापिणी होती किंवा काय? प्रसिद्ध मुत्सद्दी नानाफडणवीस यांजवर स्वामिणी-जारत्वाचा जो भयंकर आरोप दंतकथेनें लादला गेला आहे व ज्याचा अनुवाद ग्रँटडफसाहेबांच्या इतिहासांतहि केलेला आढळतो, तो साधार आहे किंवा निराधार आहे? श्रीशिवाजी महाराज व थोरले बाजीरावसाहेब पेशवे यांच्या हातून, जीं एवढीं प्रचंड देशकार्यें घडून आलीं तीं, त्यांच्या आंगच्या स्वदेशाभिमानानेंच घडून आलीं किंवा त्यांस, श्रीसमर्थ रामदासस्वामी व धावडशीकर ब्रह्मेंद्रस्वामी यांच्या स्वधर्मोपदेशाचें स्फुरण मिळालें यामुळें तीं सिद्ध करण्यास ते समर्थ झाले? पानिपतच्या लढाईत मराठ्यांस जें अपयश आलें, त्यास मल्हारराव होळकरा-

सारखे सरदार खरोखर कितपत कारणीभूत झाले ? साडेतिन्हीपैकीं सबंध एक शहाणा गणलेला सखारामबापू यास शहाणा किंवा नुसता कपटी या दोहोंपैकीं कोणचें विशेषण वास्तविकपणें देणें योग्य होईल ? त्याचप्रमाणें स्वामिभक्त मुत्सद्दी म्हणून साधारणतः प्रसिद्ध असलेले सखारामबापू व महादजी शिंदे यांचा स्वामिकार्यापेक्षां स्वकार्यसाधनाकडे कितपत अधिक ओढा होता, व ते मराठ्यांचे राज्यांत कलह माजवून राज्य घालविण्यास कितपत कारणीभूत झाले ? पुणें शहर जाळण्याचा अपवाद ज्यांच्यावर आला आहे ते गोपाळराव पटवर्धन खरोखरच त्या अपवादास पात्र आहेत किंवा काय ? या व अशाच आणखी कित्येक ऐतिहासिक महत्त्वाच्या वादग्रस्त गोष्टींसंबंधानें १०।२० वर्षांपूर्वी असलेलीं, व अलीकडे नवीन ऐतिहासिक माहिती उघडकीस आल्यानंतर बनलेलीं मतें, यांमध्यें अत्यंत फरक पडला आहे ही गोष्ट मनांत आणली असतां, कच्च्या माहितीवरून बनविलेले सिद्धान्त किती हानिकारक आहेत हें सहज कळण्यासारखें आहे. तात्पर्य, इतिहासोद्धाराचे जे दोन मार्ग वर सांगितले त्यांपैकीं ऐतिहासिक माहिती मिळवून ती प्रसिद्ध करण्याचा मार्ग इतिहासाचे प्राथमिक स्थितींत तरी निदान अधिक श्रेयस्कर आहे.

कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे पूर्वी जे प्रयत्न झाले ते फार अल्प होते असें दिसतें. इ. स. १८६७ सालीं कै० रा० ब० नीळकंठ जनार्दन कीर्तने यांनीं पुणें कॉलेजचे विद्यार्थी असतां "ग्रांटडफकृत मराठ्यांच्या बखरीवर टीका" या नांवाचा एक लहानसा पण मार्मिक निबंध लिहिला आहे. त्यामध्यें निबंधमालाकारांप्रमाणेंच रडकथा गाण्याचें निबंधकाराचें नशिबीं आलेलें आहे. निबंधाचे सालापूर्वी मराठ्यांच्या इतिहासाचे पुनरुज्जीवनाविषयीं जे कांहीं प्रयत्न झाले असतील त्यांचा उल्लेख रा० ब० कीर्तने यांचे टीकेंत समर्पक रीतीनें आलाच असता असें समजण्यास हरकत नाहीं. परंतु या टीकेंत फक्त कै० बाळशास्त्री जांभेकर यांच्याशिवाय इतर कोणाचाही उल्लेख केलेला आढळत नाहीं. यावरून बाळशास्त्रीबोवांखेरीज इतर कोणींच या बाबतींत प्रयत्न केला नसेल असें मानणें प्राप्त होतें. बाळशास्त्री जांभेकरासंबंधानें सुद्धां "यांनीं आपलें लौकिकास शोभेल असें थोडेंबहुत लिहिलें आहे" असा उल्लेख आहे. यावरून त्यांचा प्रयत्न

इतिहासलेखनाचा होता, परंतु जुने कागदपत्र किंवा बखरी तपासून प्रसिद्ध करण्याचा नव्हता असें दिसतें. रा० ब्र० कीर्तने यांच्या टीकेनंतर व कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे इतिहासावरील निबंधाचे दरम्यान "विविध ज्ञानविस्तारा"चे अंकांतून जुने कागदपत्र प्रसिद्ध होण्यास प्रथम सुरवात झाली. परंतु "विस्तारा"कडून होणारें काम फारच थोडें व कालावधीनें होत असे. यानंतरचा दुसरा प्रयत्न कै० शास्त्रीबुवा, व रा० रा० का० ना० साने यांचे हातून झाला. विविधज्ञानविस्तारानें नियमित रीतीनें बखरी व कागदपत्राचे प्रसिद्धीकरितां प्रत्येक अंकांची विवक्षित पानें देण्याचें नाकबूल केल्यामुळें "काव्येतिहाससंग्रह" निघाला. या मासिक पुस्तकाचे द्वारानें तोंपर्यंत जमलेल्या बहुतेक बखरी वगैरेंची झडती झाली. व कांहीं अंशानें बखरींची व लेखांची कमतरता व कांहीं अंशीं प्रकाशकांचा शीण किंवा कंटाळा यांच्या योगानें काव्येतिहाससंग्रह बंद पडला. यानंतर 'भारतवर्ष' निघेपर्यंत ऐतिहासिक लेख प्रसिद्ध करण्याचा उद्योग मोठ्या प्रमाणावर असा कोणीं केला नाहीं. मध्यंतरीं ऐतिहासिक असें वाङ्मय बरेंच प्रसिद्ध झालें; परंतु तें तुटक लेख, लहानमोठीं चरित्रें व क्वचित् ऐतिहासिक विषयावर लिहिलेलीं नाटकें व कादंबऱ्या अशा स्वरूपाचें होतें. मात्र या मध्यंतरींच्या उद्योगांत निरनिराळ्या रीतीनें जुन्या कागदपत्रांचा थोडाबहुत शोध लागला व एकंदरीनें इतिहासद्रव्य शोधण्याकडे प्रवृत्ति अधिक प्रचलित झाली, हें खरें. रा० पारसनीस यांचे उद्योगानें, सातारकरमहाराजांचें दप्तर व कर्नाटकांतील दप्तर, तंजावर येथील कागद, त्याप्रमाणें झांशी, दतिया व आणखी कांहीं उत्तरहिंदुस्थानांतील कांहीं संस्थानांचीं दप्तरें यांजविषयीं शोध लागून शिवाजीमहाराज, व्यंकोजी, ब्रह्मेंद्रस्वामी व उत्तरहिंदुस्थानांतील मराठे सरदार यांजविषयीं बरीच नवी माहिती मिळाली. रा० वासुदेवशास्त्री खरे यांचे नानाफडणविसांचे चरित्राचे अनुषंगानें मेणवलीचें फडणिशी दप्तर व पटवर्धनी दप्तर हीं चाळण्याचें काम निघून त्यामुळें पेशवाईचे मध्यकालासंबंधानें पुष्कळ माहिती उपलब्ध झाली. त्याचप्रमाणें बडोद्यास प्रभुरत्नमालाकारांनीं चिटणिशी बखरी व कागदपत्र बरेच जमा केले. रा० वि. का. राजवाडे—भाषांतर मासिक पुस्तकाचे संपादक—यांनींही पानपतच्या युद्धासंबंधानें अनेक पत्रें जमविलीं (हीं पत्रें

छापण्यास सुरवात झाली असून तीं ग्रंथरूपानें लवकरच लोकांपुढें येतील.) व सर्वांपेक्षां विशेष सांगण्यासारखा लाभ म्हटला म्हणजे पुण्यांतील पेशवाईदप्तरांत प्रवेश होऊन त्यांतील निडवक लेख म्हणजे पेशवे-सरकारच्या रोजनिशा वगैरे प्रसिद्ध करण्याची सरकारानें उदारपणानें परवानगी दिली. वास्तविकपणें पहातां या सर्वांपैकीं फार थोडे अस्सल कागदपत्र आजतागाईत प्रसिद्ध झाले आहेत; व बहुतेक प्रसिद्ध होण्याचे राहिले आहेत. हे प्रसिद्ध होण्यास खर्च बराच लागतो यामुळें ते एकदम ग्रंथ-रूपानें प्रसिद्ध होणें कठीण. मासिक पुस्तकाच्या द्वारानेंच त्यांची प्रसिद्धि होणें सोईस्कर पडतें. परंतु काव्येतिहाससंग्रह बंद पडल्यावर भारतवर्ष सुरू होईपर्यंत दुसरें मासिकपुस्तक यासंबंधानें मुळीं निघालेंच नाहीं. भारत-वर्षाचे फक्त सातच अंक निघाले. पेशवाई दप्तरांतील कागदपत्र छापण्यास अद्याप प्रारंभ व्हावयाचा आहे व तें काम 'बारभाई'चे हातीं पडल्या-कारणानें, वास्तविक श्रम करणार व खर्च करणार यांची उत्सुकता असूनहि ते छापण्यास लवकर सुरवात होईल का नाहीं, व सुरवात झाली तरी तें काम निर्विघ्नपणें पार पडेल का नाहीं याजबद्दल आज कांहींच निर्वाळा देतां येत नाहीं. अशा स्थितींत केवळ आत्मावलंबनाचे जोरावर निघालेलें, आजपर्यंत एक सूत्रानें चाललेलें, एकनिष्ठेनें पुढें चालविलें जाईल असें दृढ आश्वासन देणारें व केवळ ऐतिहासिक कागदपत्रांचे प्रसिद्धीस वाहिलेलें असें लहानसें पण सुंदर मासिकपुस्तक आजमितीस चालू आहे. हें मासिक-पुस्तक म्हणजे मिरज हायस्कूलचे संस्कृत शिक्षक, रा० वासुदेव वामन-शास्त्री खरे, यांनीं चालविलेलें "**ऐतिहासिक लेखसंग्रह**" हें होय.

— २ —

प्रस्तुतचा विषय हातीं घेण्यास कारण म्हटलें म्हणजे रा० खरे यांचा ऐतिहासिक लेखसंग्रह होय. कोणताहि अंक यदृच्छेनें हातीं घेऊन पाहिला असतां या मासिक पुस्तकाचें महत्त्व व त्याची उपयुक्तता किती आहे याची सहज कल्पना करितां येते. परंतु अशा प्रकारच्या मासिक-पुस्तकाचें साहित्य आधीं मिळविण्यास व नंतर तें प्रसिद्ध करण्याचे

योग्यतेस आणण्यास त्याचे संपादकास किती श्रम पडले असतील याची कल्पना मात्र तितकी सहज करितां येण्यासारखी नाहीं. मिरजेसारख्या मागसलेल्या व साधनविरहित गांवीं राहणें; पोट भरण्याच्या धंद्याचा मार्ग अक्षय लकडा, डॉ० भांडारकरांचीं दोन संस्कृत पुस्तकें पढवावयाचीं अशा प्रकारचा नीरस, अनुल्हासी व स्फुर्तिविनाशक व्यवसाय; केवळ जुन्या तऱ्हेनें मिळालेलें संस्कृत शिक्षण; संस्थानी दप्तरांची अभेद्यता; कागदपत्रें पाहण्याचे कामीं कोणत्याहि प्रकारच्या मदतीचा अभाव; नकला वगैरे करण्यास लागणाऱ्या द्रव्यसाधनाची कमतरता; खुद्द मिरजेस छापखाना वगैरे नसल्यानें होणारी विलक्षण गैरसोय व सर्वांहूनहि अधिक म्हणजे उदार लोकाश्रयाचा अभाव! या सर्व विकट अडचणी ध्यानांत आणिल्या असतां, रा० खरे यांच्या मनांत जुन्या इतिहासाबद्दल इतकी कळकळ उत्पन्न व्हावी, व केवळ स्वतःवर अवलंबून राहून त्यांनीं इतिहासोद्धाराचे कामीं इतकी कमाई करावी, हें त्यांस अत्यंत भूषणावह आहे हें कोणीहि कबूल करील. ऐतिहासिक लेखसंग्रहाचें साहित्य सिद्ध करण्यांत आगाऊ गेलेलीं ८।९ वर्षें व पुस्तक आगाऊ अबाधित चालण्यास पुरेसे तयार असलेले लेख प्रसिद्ध करण्यास हल्लींच्या मानानें लागणारीं यापुढील ८।९ वर्षें, यांचा विचार केला असतां रा० खरे यांचा साधारणतः एका जन्माचा उद्योगच झाला असें म्हटलें असतां फार गैर होणार नाहींसें वाटतें. थोड्याच दिवसांपूर्वीं रा० ब० रानडे यांचे मराठी वाङ्मयासंबंधानें टाइम्स आफ इंडियामध्यें जे लेख प्रसिद्ध झाले आहेत त्यामध्यें प्रसंगानुसारानें असें दर्शविण्यांत आलें आहे कीं, मराठी भाषेच्या अभिवृद्धीचें जें काय श्रेय कोणास असेल त्यामध्यें पदवीधरांपेक्षां बिनपदवीधरांचाच हिस्सा विशेष मोठा आहे. या विषयाप्रमाणेंच इतिहासासंबंधानेंहि बिनपदवीधरांना तितकेंच भूषण व पदवीधरांना तितकेंच दूषण आहे हें रा० खरे व त्यांजसारखे आणखी कांहीं इतर गृहस्थ यांचे उदाहरणावरून कबूल करावें लागेल. असो. रा० खरे यांचे मासिक पुस्तकाचें काम दिवसेंदिवस अधिकाधिक सरस होत चाललें आहे. विशेषतः त्याचा नियमितपणा तरी अगदीं वाखाणण्यासारखा व इतर बहुतेक मासिक पुस्तकांनीं अनुकरणीय आहे असें आम्हांस वाटतें.

असो. आतां आपण खरे यांच्या मासिक पुस्तकाचें खरोखर किती महत्त्व आहे हें पाहूं. हें महत्त्व त्यांतील विषयाच्या सूक्ष्म अवलोकनावरून कळणार आहे. ऐतिहासिक लेखसंग्रहांत प्रसिद्ध होणारीं पत्रें कोठून व कशीं मिळालीं याविषयींची हकीकत पहिल्या अंकांतील संपादकाच्या प्रस्तावनेंतच लिहिलेली आहे. ज्या थोड्याशा दप्तरांतून हल्लींचीं मौल्यवान् पत्रें निघालीं, अशीं दप्तरें सर्व पटवर्धनी जहागिरींत मिळून एके काळीं किती असतील व सर्वभक्षक काळ व त्याचेच साहाय्यकारी जे कांहीं इतिहासानभिज्ञ व अभिमानशून्य लोक, या उभयतांचे पराक्रमानें त्यांपैकीं किती दप्तरें मातीस मिळालीं असतील याची सहज कल्पना करितां येईल. असो. ऐ० ले० संग्रहांत येणारे लेख मुख्यतः गेल्या शतकाच्या शेवटच्या पन्नास वर्षांतील हकीकतीसंबंधाचे आहेत. हा काल म्हणजे पेशवाई इतिहासाचा गाभा म्हटला तरी चालेल. पानपतची लढाई झाल्यानंतर खासे थोरले माधवराव व सवाई माधवरावाचे कारकीर्दींत प्रख्यातीस आलेले मराठे व ब्राह्मण सरदार यांनीं आपलें नष्टवैभव पुन्हा परत आणलें व पूर्वीपेक्षां कांकणभर अधिकच लौकिक मिळविला. परंतु पुढें लवकरच आपसांत वैमनस्यें पडून रावबाजींनीं इंग्रजांची कांस धरली व शेवटीं वसईचे तहाचे द्वारें इंग्रजांचें पाऊल महाराष्ट्रांत कायमचेंच घुसलें. एवढा सगळा कारभार १८वे शतकाचे शेवटचे ४०।४२ वर्षांत घडून आला. ऐ० ले० संग्रहांतील कागदपत्र या अशा काळच्या इतिहाससंबंधाचे असल्यानें ते महत्त्वाचे आहेतच, परंतु ते नुसत्या इतिहासकारांनीं लिहिलेले नसून, तो खुद्द इतिहासच घडवून आणणारे जे वीर व मुत्सद्दी यांनीं व तो इतिहास घडत असतांच लिहिलेले असल्यामुळें विशेष महत्त्वाचे आहेत हें निर्विवाद होय. हे कागदपत्र पटवर्धन सरदारांचे दप्तरांतून घेतले आहेत एवढें सांगितलें म्हणजे त्यांत सर्व आलें, त्यांची निराळी शिफारसच करावयाला नको. पटवर्धनांचें घराणें बाळाजी विश्वनाथ पेशव्याचे कारकीर्दींत मूळ उदयास येऊं लागलें. थोरले माधवरावसाहेब यांचे कारकीर्दींत त्यांस सत्तावीस लक्ष रुपयांची जहागीर मिळाली. श्री० माधवरावसाहेबांचा एकंदरीनें पटवर्धन घराण्यावर चांगला लोभ होता, त्यामुळें त्यांचे कारकीर्दींत पटवर्धनांची विशेष भरभराट झाली, ती श्री० सवाई माधवरावसाहेब यांचे कार-

कीर्दीत अखेरपर्यंत सारखी टिकली. पटवर्धन म्हणजे पेशवाई दौलतींचे आधारस्तंभ म्हणून नांवाजले जात होते. प्रत्येक मोहिमेंत आपली आठ हजार फौज घेऊन सुरकारची पडेल ती कामगिरी करण्यास ते तयार असत व नाना फडणविसांची कोणचीहि मसलत पटवर्धनांचे सल्लामसलतीशिवाय सिद्धीस गेली नाहीं. अशा रीतीनें १७६० सालापासून १८०० पर्यंत सर्व मसलती, उलाढाली व गुप्तकारस्थानें यांमध्यें प्रमुखत्वानें काम केलेल्याच गृहस्थांनीं ज्या वेळची त्या वेळीं पत्रद्वारें लिहून ठेविलेली हकीकत अत्यंत विश्वसनीय व महत्त्वाची असणार याबद्दल शंका नाहीं. रा० खरे यांनीं आपल्या प्रस्तावनेंत लिहिलेंच आहे कीं, "प्रत्येक स्वारींत सैन्याच्या हालचाली, वेढे, लुटालुटी, लढाया, छापे, पाठलाग, फितूर वगैरे जे जे प्रकार झाले त्या त्या स्वारींतील सरदारांनीं व कारकुनांनीं इत्थंभूत वर्तमान मिरजेस लिहून कळविलेलें आहे." अशा रीतीनें "ज्यांनीं ज्यांनीं कारस्थानें लढविलीं व पराक्रम केले व पाहिले त्यांनींच लिहिलेला" इतिहास प्रस्तुत पुस्तकाचे द्वारें प्रसिद्ध होत आहे. व तो खरोखरच फार मनोरंजक आहे हें गेल्या तेरा चौदा अंकांचे वाचनाचे अनुभवानें आम्ही सांगतों. ऐ० ले० संग्रहाचा जितका भाग आमचेपुढें आजमितीस आहे तेवढ्यावरून तत्कालीन शेंकडों बारीकसारीक गोष्टींविषयीं निबंधरूपानें माहिती देतां येण्यासारखी आहे. शिवाय त्यांतील उत्तम उतारेही काढून देण्यासारखे आहेत. परंतु इतकें करण्यास आम्हांस स्थळ व काळ अनुकूल नसल्यामुळें तें काम आम्हांस टाळावें लागत आहे, याबद्दल आम्हांस फार दिलगिरी वाटते.

आतां या संग्रहांत आतांपर्यंत पेशवाईची किती कारकीर्द वर्णिली गेली आहे, याचा विचार आपण करूं. रा० खरे हे कागदपत्र सालवारीच्या क्रमानें लावून छापीत आहेत. पहिल्या अंकावरून पाहतां १७६० सालापूर्वींचीहि कांहीं थोडीं पत्रें रा० खरे यांस मिळालीं तीं त्यांनीं प्रथम छापून घेतलीं. हीं पत्रें फारच थोडीं म्हणजे सुमारें २५ आहेत. १७६१ सालापासून मात्र पत्रांचा भरणा पुष्कळ झालेला आहे. तो इतका कीं, बहुधा तारखेगणीक पत्रें मिळालीं आहेत. क्वचित् तर एका तारखेचीं दोन दोन, तीन तीनसुद्धां पत्रें सांपडतात. दुसऱ्या अंकांत माधवराव बल्लाळ पेशव्यांचे कारकीर्दीस सुरवात

होते. इ. स. १७६० सालीं उदगीरच्या लढाईत मोगलांचा पूर्ण पराजय करून त्यांजकडून नानासाहेबांनीं ६२ लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलुख घेतला. पण नंतर लौकरच नानासाहेब मरण पावले, त्यामुळें व पानपतच्या लढाईत भाऊसाहेब व दुसरे अनेक प्रख्यात सरदार व दीड दोन लक्ष फौज जमीनदोस्त झाली, अशी संधि पाहून मोगलानें गेलेला मुलुख परत मिळविण्यासाठीं पुण्यावर प्रचंड सेनेसह स्वारी केली. परंतु अशा विपत्काळींहि मोगलांशीं मराठ्यांनीं अशा निकरानें व शौर्यानें युद्धें केलीं कीं, मोगलांस तह करून घेऊन परत जाणें भाग पडलें. पण रघुनाथराव दादासाहेब व सखारामबापू यांनीं मोगलांस फितूर होऊन तहाचे वेळीं त्यांचा सत्तावीस लक्षांचा मुलुख त्यांस परत दिला. हें त्यांचें करणें मराठे सरदारांस अर्थातच पसंत पडलें नाहीं, त्यामुळें भांडणें झालीं. दादासाहेब व सखारामबापू हे रुसून राजीनामे देऊन घरीं बसले. तेव्हां पेशव्याच्या मातोश्री गोपिकाबाईसाहेब यांनीं बाबुराव फडणीस व त्रिंबकराव पेठे यांस कारभार सांगितला व फौजेचें काम गोपाळराव पटवर्धन यांजकडे दिलें. दादासाहेबांनीं सखारामबापूच्या चिथावणीनें बंड केलें व मोगलाच्या फौजेस मदतीस घेऊन घोडनदी व अळेगांव येथील लढायांत पेशव्यांच्या फौजेचा मोड केला. पारडें फिरतांच नवीन कारभारी कामावरून दूर झाले व कैदेंतहि पडले, व खुद्द माधवराव पेशवे यांस नजरकैदेंत राहणें प्राप्त झालें. दादासाहेब व सखारामबापू यांचा मुख्य राग पटवर्धन सरदारांवर असावा असें दिसतें. त्यांचें पारिपत्य करून त्यांचेकडे असलेली जहागीर व मिरजेचा किल्ला परत घ्यावा म्हणून दादासाहेबांनीं पन्नास हजार फौजेनिशीं स्वारी केली. या फौजेनें मिरजेस वेढा घातला व एका टोळीनें गोपाळरावावर छापा घालून त्याची फौज लुटून फस्त केली. मिरजेंत गोपाळरावाचे वडील गोविंद हरि होते त्यांनीं सव्वा महिनापर्यंत मिरज मोठ्या निकरानें झुंजविली. शेवटीं शरण येऊन मिरजेचा किल्ला दादासाहेबांचे हवालीं त्यांस करावा लागला. गोपाळराव छाप्यांतून निसटून मोंगलाकडे गेले. मोगलानें आदरसत्कार करून त्यांस ठेवून घेतलें. हें पाहून दादासाहेबांनीं पदच्युत केलेले भवानराव प्रतिनिधि, त्याचा मुतालीक गमाजी, बाबुराव फडणीस व दुसरे कित्येक सरदार व जानोजी भोंसले हेही मोगलास जाऊन मिळाले.

तेव्हां मोगलानें कुरापत काढून पुनः पेशव्यांशीं लढाई सुरू केली. इकडे पेशव्यांनीं वऱ्हाड, औरंगाबाद, बेदर, भागानगर हे प्रांत लुटले. मोगलानेंहि पुण्यास येऊन पुणें लुटिलें व जाळिलें आणि आसपासचा थोडाबहुत प्रदेश बेचिराख केला. थोड्याबहुत खंडण्याहि वसूल केल्या व अशा रीतीनें नासाडी करून मोंगल परत गेला. इतकी हकीकत पहिल्या तेरा अंकांत आलेली आहे.

यापुढें मोगल व पेशवे यांचें राक्षसभुवन येथें मोठें युद्ध होऊन पेशव्यांना यश आलें, मोगलांच्या फौजेचा विध्वंस झाला व तहामध्यें पूर्वीं जिंकलेला ६२ लक्षांचा मुलुख सबंध परत मिळून आणखीहि २० लक्षांचा मुलुख मोंगलानें पेशव्यांस दिला वगैरे मजकूर पुढील अंकांतून येणारा असावा असें दिसतें. रा० खरे यांनीं पत्रें छापतांना त्यांच्या पैवस्ती वगैरे दिल्या आहेत. मजकुरांत जीं नांवें किंवा जीं अनुसंधानें आलीं असतील त्यासंबंधाची माहिती विपुल टीपांच्या रूपानें दिलेली आहे, त्याचप्रमाणें प्रत्येक स्वतंत्र प्रकरण सुरू होण्याचे पूर्वीं त्यासंबंधाच्या पत्रांचा सारांश सुसंबद्ध रीतीनें दिलेला आहे. या सर्व गोष्टींमुळें अनुसंधान बहुतकरून चुकत नाहीं व पत्रांतील तुटक वाक्यें, अस्पष्ट उल्लेख व सांकेतिक शब्द यांचा अर्थ बराच समजतो. रा० खरे यांच्या विस्तृत इतिहासज्ञानाचा उपयोग वाचकांस कितपत होतो हें पहाणें असेल तर कांहीं पत्रें टीपा न पहातां वाचावीं म्हणजे समजून येईल.

ऐ. ले. संग्रहासंबंधानें दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, यामध्यें कांहीं कांहीं माहिती अशी प्रसिद्ध होत आहे कीं, ती खरोखर आजपर्यंत अगदीं अनुपलब्ध होती. आजमितीस माहीत असलेल्या ऐतिहासिक प्रसंगांसंबंधानें या लेखसंग्रहांत नवीन वर्णन व निरनिराळ्या हकीकती सांपडतात. इतकेंच नव्हे, परंतु आजपर्यंत फारसे माहीत नसलेले असे ऐतिहासिक प्रसंगहि क्वचित् नवीन सांपडतात. माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीच्या पहिल्या दोन तीन वर्षांचा इतिहास ग्रँटडफसाहेबांनीं फक्त सहासात पृष्ठांत सांगितला आहे. त्याच इतिहासाची हकीकत ज्यामध्यें आहे अशीं पत्रें छापण्यास रा० खरे यांच्या पुस्तकाचीं पांचशें पानें खर्च झालीं आहेत. तसेंच श्री० माधवराव पेशवे

यांच्या कारकीर्दींत झालेलीं देशस्थ व कोंकणस्थ मुत्सद्दी यांजमधील भांडणें व त्यांच्यापासून निज़ामअल्लीनें करून घेतलेला फायदा, यासंबंधानें आजपर्यंत कोणत्याच इंग्रजी अगर मराठी इतिहासांत माहिती आलेली नाहीं, ती ऐ. ले. संग्रहांत सांपडते. म्हैसुरावर मराठ्यांनीं ज्या स्वाऱ्या केल्या त्यांची सविस्तर व विश्वसनीय अशी माहिती आजपर्यंत मिळाली नव्हती; ग्रँटडफनें कर्नल विल्कस यांचे इतिहासावरून दिलेली माहिती थोडी आहे व गैरविश्वसनीय दिसते. त्यासंबंधानें बरीच माहिती ऐ. ले. संग्रहांत मिळेल. तसेंच इ. स. १७७५ पासून १७८० पर्यंत मराठ्यांचें व इंग्रजांचें युद्ध सुरू होतें. त्या वेळची इंग्रजांच्या बाजूची हकीकत फॉरेस्टसाहेबांनीं प्रसिद्ध केली आहे, त्यांत मराठ्यांची बाजू दाखविली गेलेली नाहीं. त्याही संबंधानें मेळ व फरक पाहण्यास लागणारी माहिती ऐ. ले. संग्रहांत बरीच मिळेल. खर्ड्यांची लढाई व बाजीरावशाहींतील धामधूम यांचीहि हकीकत या मासिकपुस्तकांत बरीच सांपडणार आहे. (चौदाव्या अंकापुढें येणाऱ्या हकीकतींत नवी अशी माहिती कोणती येणार असें आम्हीं रा० खरे यांस विचारल्यावरून त्यांनीं वरील माहिती आम्हांस कळविली आहे) व एकंदरीनें पाहतां निदान एक गोष्ट स्पष्ट दिसून येते ती ही कीं, मराठ्यांच्या इतिहासांत प्रमुखत्वास आलेल्या दुय्यम प्रतीच्या पुष्कळ वीरमुत्सद्द्यांची माहिती ग्रँटडफ किंवा इतर कोठें फारशी मिळत नाहीं ती, ऐ. ले. संग्रहांत मिळणार आहे व पत्रव्यवहारांत ती गोंवली गेली असल्याकारणानें ती अस्सल असून विशेष चटकदार लागण्याचा फार संभव आहे. तात्पर्य, ऐ. ले. संग्रहाचे योगानें जुन्या माहिती-वर नवीन ज्ञानाचा प्रकाश पडेल एवढेंच नव्हे, तर नवीन अशीहि पुष्कळ मिळेलसें दिसतें.

— ३ —

मराठ्यांच्या इतिहासाचे हल्लींचे स्थितींत इतिहास लिहिण्यापेक्षां इतिहासाचीं साधनें मिळतील तितकीं जमविणें हेंच काम विशेष महत्त्वाचें आहे व या दृष्टीनें पाहतां रा० खरे यांचें मासिक पुस्तक अत्यंत उपयुक्त होय. पुढें मागें केव्हांतरी असा एखादा मराठ्यांचा इतिहास तयार होणें

इष्ट आहे कीं, ज्यामध्यें विपुल परंतु विश्वसनीय माहिती दिलेली असून, मार्मिक, परंतु निःपक्षपाती टीका केलेली असेल. तसेंच मराठ्यांचे काळचे आचारविचार, कायदेकानू, रीतभात, पोषाखपेहराव, उद्योगधंदे, हत्यारेंपात्यारें इत्यादि इतिहासाच्या महत्त्वाच्या उपांगांचें ज्यांत विवेचन केलेलें आहे व मराठ्यांच्या काळची खरी स्थिति, त्यांचे गुणावगुण वगैरे गोष्टींविषयीं योग्य ज्ञान मिळून हल्लींच्या बदललेल्या स्थितींतहि ज्याचे वाचनापासून सदुपदेश व वैभवाकांक्षेची स्फूर्ति उत्पन्न होईल अशा मराठ्यांच्या इतिहासाची वाण आहे ती होईल तितक्या लवकर दूर करण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येक महाराष्ट्रीयाचें कर्तव्य आहे, ही गोष्ट इतरांप्रमाणें आम्हांसहि कबूल आहे. परंतु ती उणीव भरून काढण्याचे जे मार्ग आहेत त्यांमध्यें इतिहासाची सामुग्री मिळविणें हा मार्ग अधिक महत्त्वाचा व अधिक श्रेयस्कर आहे असें आम्हांस वाटतें. सुवर्ण हवें तितकें संग्रहीं असलें म्हणजे सोनारांचा खरा उपयोग पुढें लागतो. परंतु तोंपर्यंत खाणींत शिरून शोधकदृष्टीनें व दीर्घोद्योगानें कणाकणांनीं सोनें जमविणाऱ्या मजुरांचाच उपयोग अधिक आहे ही गोष्ट निर्विवाद होय. पूर्वजांचे नुसते गुणानुवाद गाण्यापेक्षां त्यांच्या हातची बोटभर पण अस्सल चिठ्ठी मिळविली असतां ऐतिहासिक दृष्ट्या तर आपण मोठी कामगिरी केली असें होतें, एवढेंच नव्हे पण पूर्वजांविषयींचा खरा व टिकाऊ अभिमान उत्पन्न झाला तर याच मार्गानें होईल. वर सांगितलेल्या प्रकारच्या इतिहासाची सामग्री जुन्या बखरी, इंग्रजी इतिहास, व मराठींतील ऐतिहासिक कादंबऱ्या व नाटकें इत्यादिकांमधून कमीअधिक प्रमाणानें पेरलेली सांपडते हें खरें आहे व त्यांतील ग्राह्यांश घेण्यास कोणाचीहि हरकत असणार नाहीं. तथापि त्यांचें महत्त्व अस्सल कागदपत्रांइतकें कधींहि असू शकणार नाहीं, हें उघड आहे.

प्रथम आपण बखरी घेऊं. हल्लीं उपलब्ध असलेल्या बखरींमध्यें त्यांतील इतिहास घडण्याचे काळींच लिहिलेल्या अशा बखरी फारच थोड्या सांपडतील. बहुतेक बखरी त्यांतील इतिहास घडून आल्यानंतर बऱ्याच काळानें लिहिलेल्या आहेत. या गोष्टीमुळेंच त्यांच्या विश्वसनीयतेस थोडासा धक्का बसतो. त्यांतूनहि जुने कागदपत्र वगैरे माहितीचें शोधन

व परिशीलन करून अलीकडील पद्धतीप्रमाणें केवळ इतिहास या दृष्टीनें बहुतेक बखरी लिहिलेल्या असाव्या असें साधारणतः दिसत नाहीं, यामुळें त्यांच्या विश्वसनीयतेबद्दलचा संशय दुणावतो. पुष्कळ बखरींतून तर धडधडीत चुकाच सांपडतात व चटसाऱ्यांमधून पक्षपातीपणा, धर्मभोळेपणा वगैरे खऱ्या इतिहासास अगदीं घातुक अशा गोष्टी कमीअधिक प्रमाणानें आढळून येतात. स्वपक्षपातीपणा हा गुण आहे खरा, परंतु तो खऱ्या इतिहासास बाधक असतो व यामुळें जुन्या बखरी जरी महत्त्वाच्या आहेत तरी त्यांचें महत्त्व सोनें मिसळलेल्या मातीइतकेंच आहे. म्हणजे त्यांतील खरोखर ग्राह्यांश स्वल्प असतो व तो निराळा काढण्यास पुष्कळ परिश्रम व शोधकपणा लागतो. आतां सर्वच बखरी वाईट आहेत असा आमच्या म्हणण्याचा उद्देश नाहीं, परंतु बऱ्याच बखरींसंबंधानें तसें म्हणतां येईल. या सर्वांचाहि उपयोग आहे, परंतु तो त्या बखरी आज ज्या स्थितींत आहेत त्या स्थितींत होणारा नसून पुढें कधींकाळीं अवांतर अस्सल माहिती मिळून त्यांतील गोष्टींचा खरेखोटेपणा ठरवितां आल्यानंतरचा आहे. बखरींवर जे आक्षेप साधारणतः येतात ते हल्लीं ऐतिहासिक लेखसंग्रहांत जीं पत्रें प्रसिद्ध होत आहेत त्यांसारख्या कागदपत्रांवर मुळींच आणतां येत नाहींत ही मुद्द्याची गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. सदरहू कागदपत्र बनावट असतील एवढाच काय तो आक्षेप त्यांजवर येण्यासारखा आहे. परंतु त्याचें निरसन करणेंहि फार सोपें असतें व अशा रीतीनें त्यांची स्वतःची सत्यतेची एकदां शाबिती झाली म्हणजे मग त्यांत असणाऱ्या मजकुराच्या खरेखोटेपणाबद्दल वाद उत्पन्न होण्याचा मुळींच संभव नसतो. बखरींमध्यें ज्या गोष्टी इतिहासास बाधक म्हणून त्याज्य होतात त्याच ऐतिहासिक लेखसंग्रहांतल्या व त्यासारख्या इतर कागदपत्रासंबंधानें इतिहासाचा भागच या नात्यानें ग्राह्य व मनोरंजक होतात.

इंग्रजी इतिहासासंबंधानें पहातां बखरींतील कांहीं कांहीं दोष त्यांजमध्यें दिसून येत नाहींत हें खरें, तथापि ते इतिहास वर वर्णन केलेल्या प्रकारच्या बखरींवरूनच विशेषतः रचिलेले असतात. हाच प्रथमतः त्यांच्यावर मोठा आक्षेप आणतां येतो. हे इतिहासकार विदेशीय असल्याकारणानें त्यांस अस्सल ऐतिहासिक माहिती मिळणें व ती

मिळाली तरी त्यांतील स्वारस्य त्यांस चांगल्या प्रकारें कळणें फारसें शक्य नसतें हें साहजिकच आहे. इंग्रज ग्रंथकारांनीं हिंदुस्थानच्या इतिहासावर जे ग्रंथ लिहिले आहेत, ते साता समुद्रांपलीकडे राहणाऱ्या इंग्लंडांतील वाचकांसाठींच लिहिले आहेत. त्या वाचकांस जी काय माहिती पाहिजे असते ती ही कीं आम्हीं हिंदुस्थान कसें जिंकलें. तेव्हां हीच माहिती सदरहू ग्रंथकार आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांतून देतात हें स्वाभाविकच आहे. प्रसिद्ध इतिहासकार ग्रँटडफ व इंग्लंडांतील प्रसिद्ध छापखानेवाला मरे यांजमध्यें ग्रँटडफचा इतिहास छापण्याचे वेळीं झालेला पत्रव्यवहार प्रसिद्धच आहे. यास्तव त्याचा आम्ही येथें विशेष रीतीनें उल्लेख करीत नाहीं. त्यासंबंधानें येथें सांगण्यासारखी मुद्द्याची गोष्ट एवढीच कीं, ग्रँट-डफनें केवळ आंगच्या इतिहासप्रियत्तेमुळें अनिवार श्रम घेऊन व शेवटीं हजारों रुपयांची नुकसानी सोसून जो इतिहास लिहिला त्यांत सुद्धां वर लिहिल्याप्रमाणें 'आम्हीं हिंदुस्थान देश कसा जिंकला' या दृष्टीनेंच बहुतेक इतिहास लिहिलेला आहे व त्यांत मराठ्यांच्या बाजूची अशी फारच थोडी माहिती दिलेली आहे. असें असतां ज्यांची दृष्टि केवळ हिंदुस्थानच्या नांवावर आपल्या लोकांच्या बढाईच्या गोडशा गप्पा पिकवून चार पैसे उकळावे एवढ्यापुरतीच, अशांच्या "हिंदुस्थानच्या इतिहासां"नीं आमची हौस कशी भागेल हें दिसतेंच आहे. मालकमचा मध्यहिंदुस्थानचा इतिहास, टॉडचें राजस्थान, वुइल्कसाहेबाचा म्हैसूरचा इतिहास इत्यादि ग्रंथांतून एत-द्देशीयांविषयीं त्या त्या ग्रंथकारांनीं आपल्या मतें भरपूर माहिती दिली आहे, तथापि एतद्देशीयांच्या दृष्टीनें ती अपुरी व एकदेशी आहे हें खेदानें कबूल करावें लागतें. या पलीकडे गेलें असतां मरे, मॉरिस वगैरे सटरफटर इंग्लिश ग्रंथकारां-च्या इतिहासाविषयीं मुळीं बोलावयासच नको. ग्रँटडफ इतका निःपक्ष-पातबुद्धीनें लिहिणारा इतिहासकार दुसरा कोणीच झाला नाहीं ही गोष्ट एका अर्थीं निर्विवाद आहे. परंतु त्याच ग्रँटडफची गोष्ट घेतली असतां असें सिद्ध होतें कीं, परकीयानें परकीयांचा उत्तम इतिहास लिहिणें जवळ जवळ अशक्यच आहे. डफसाहेबांवर अप्रामाणिकपणाचे वगैरे निंद्य आरोप पुष्कळांनीं केले होते. प्रारंभीं रा० ब० कीर्तने यांनीं आपल्या टीकेमध्यें त्या आरोपाचा प्रसिद्धपणें व धिटाईनें प्रथम उद्गार काढिला, परंतु पुढें

डफसाहेबांच्या टीपांमधील ज्यांचा उल्लेख केला होता व नव्हता असे बरेच कागदपत्र अलीकडे सांपडल्यामुळें डफसाहेब अस्सल कागदपत्र जाळण्याच्या घोर आरोपांतून मुक्त झाले ही गोष्ट न्यायदृष्टीनें फार उत्तम झाली यांत कांहीं शंका नाहीं; तथापि अप्रामाणिकपणा सोडला तरी ज्यास कदाचित् त्यांचा स्वतःचा उपायहि चालण्यासारखा नव्हता असे इतिहासकार या नात्यानें त्यांच्या अंगीं असलेले दोष त्यांच्या ग्रंथांत ढळढळीतपणें दिसून येतात. इंग्रजांचा व मराठ्यांचा जेथें जेथें संबंध आला तेथें तेथें डफसाहेबांनीं इंग्रजांच्या बाजूचा मात्र सविस्तर वृत्तांत दिला आहे, पण मराठ्यांची बाजू मात्र अगदीं जुजबी तेवढीच दाखविली आहे. इतरत्रहि मराठ्यांमधील दुय्यम किंबहुना पहिल्या प्रतीचे योद्धे, मुत्सद्दी, कर्ते पुरुष, तसेंच मराठ्यांची भाषा, तीमधील प्रसिद्ध ग्रंथकार व महाराष्ट्रांतील साधुसंत, त्यांच्या रसाळ वाणीचे समाजावर झालेले परिणाम, निरनिराळ्या वेळची समाजस्थिति व तिचीं कारणें, धार्मिक विषयावरील समजुती, आचारविचार, ग्रामव्यवस्था, व्यापारकला यांविषयींचा मागमूस तरी त्या ग्रंथांत सांपडेल काय ? वरील प्रकारचा दोष डफसाहेबांचे हातून माहिती अपूर्ण असल्यामुळें झाला असेल असें संभवत नाहीं. तो साधनाचा दोष नसून त्यांच्या इच्छेचाच दोष होता, हें अलिकडे उपलब्ध झालेल्या ज्या कागदपत्रांवरून अप्रामाणिकपणाच्या दोषारोपांतून ते मुक्त झाले त्याच कागदपत्रांवरून सिद्ध होतें. तसेंच दुरभिमान, हेकटपणा व थोडासा मत्सर हेहि मानुषतेस सुलभ असलेले दोष त्यांचे ग्रंथामध्यें दिसून येतातच. सदरहू ग्रंथकारास इंग्रज तेवढे भले व इमानी माणूस दिसतात व मराठे तेवढे कपटी व कुटिल मनाचे असे भासतात. इंग्रजलोकांचे हातून ज्या चुका त्या काळीं घडल्या व नैतिकदृष्ट्या जे अपराध घडले त्यांचें समर्थन करावें या गोष्टीकडे त्यांचा बहुधा कल आहे. शिवाजीनें अफझुलखानाला विश्वासघातानें ठार मारिलें; नाना फडणविसानें आपल्या धनिणीशीं जारकर्म केलें; मराठे सरदार तितके लुटीसाठीं हपापलेले, बेइमानी व खोडसाळ स्वभावाचे; ब्राह्मण मुत्सद्दी तेवढे सारे अधिकारमदानें धुंद होणारे, भ्रष्ट व लुच्चे इत्यादि जीं कित्येक निराधार विधानें डफसाहेबांनीं केलेलीं आहेत त्या सर्वांचें बीज हेंच आहे कीं, साहेबमजकूर हे विदेशी होत. तात्पर्य, इंग्रज-

नगर वाचनालय

लोकांनीं लिहिलेले हिंदुस्थानचे इतिहास क्वचित् दुष्टपणानें व मत्सरानें लिहिलेले बहुधा अपूर्ण व सर्वथा एकदेशीय असे असल्यामुळें प्रारंभीं सांगितलेल्या प्रकारचा इतिहास लिहिणारास त्या ग्रंथांवर आपलें साधन म्हणून फारसें अवलंबून राहतां येणार नाहीं, हें सहज दिसून येईल.

राहतां राहिलीं तिसऱ्या प्रकारचीं साधनें म्हणजे आमचेकडील लोकांनीं लिहिलेल्या कादंबऱ्या व नाटकें या सर्वांसंबंधानें एकच शेरा मारतां येण्यासारखा आहे. तो असा कीं, आमच्यांतील भावी इतिहासकारास त्यापासून बिलकूल मदत होणार नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्यानें त्या ग्रंथांचें होतां होईतों मुखावलोकन सुद्धां न केलें तर बरें. प्रथमतः आधीं तीं नाटकें व कादंबऱ्या म्हणजे इंग्रजी इतिहास, जुन्या बखरी यांतील इकडचा तिकडचा मजकूर गोळा करून त्यांतच आपल्या तर्कटाची भेसळ करून लिहिलेलीं चोपडीं होत. यामुळें इतिहास या नात्यानें सर्वांशीं त्याज्य होत. आमच्यांतील ऐतिहासिक नाटककार किंवा कादंबरीकार आपण ज्या गोष्टीविषयीं लिहितों त्याविषयीं तोंपर्यंत अनुपलब्ध असलेल्या माहितीचा शोध करून मुख्यतः अशाच माहितीपासून उत्पन्न होणाऱ्या चमत्कृतीनें जनरंजन करणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें समजत नाहींत व आपण शिजविलेल्या खिचडींत खरें ऐतिहासिक द्रव्य किती व केवळ स्वकपोलकल्पित गोष्टीचा मसाला किती आहे याचा नीट उल्लेख करीत नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. बोहिमिआच्या किनाऱ्यावर शेक्सपिअरनें जहाज आणून उतरविलें आहे या गोष्टीचें आपण कौतुक करतों खरें, परंतु बोहिमिआ देशाचें विश्वसनीय असें भूगोलवर्णन शेक्सपिअरनें नाटक लिहिण्यापूर्वींच पक्कें ठरून गेलें आहे ही समाधानकारक गोष्ट लक्षांत आणूनच शेक्सपिअरच्या कृतीचें कौतुक करण्यास आपले अंगीं विनोद उरतो. परंतु तेंच शेक्सपिअरच्या नाटकांतील उल्लेखावरूनच बोहिमिआ देशाचें भूगोलवर्णन जर आपल्यास ठरवावयाचें असेल तर वस्तुस्थितीचा इतक्या चमत्कारिक रीतीनें विपर्यास केल्यामुळें एरवीं आपणास होणारा विनोद सुचला नसता! याच गोष्टीचें धोरण इकडेहि लावावयाचें आहे. मराठ्यांचा इतिहास अजून निश्चित व्हावयाचा आहे व त्यांतील कित्येक प्रसंग व कित्येक ऐतिहासिक स्त्रीपुरुष यांचे स्वभाव वगैरे गोष्टी डळमळत

आहेत अशा स्थितींत भलतेच कथाभाग योजून खऱ्याखोट्यांचें बेमालूम मिश्रण करून केवळ कल्पनेला गोड दिसतील असे ऐतिहासिक चित्रपट अलंकारिक वर्णाक्षरांनीं रंगविणें हें आमच्या मतें आमच्या इतिहासास अत्यंत घातक आहे.

— ४ —

आतां हे जुने कागदपत्र वगैरे कसे व कोठें मिळणार, हा प्रश्न राहिला. मराठ्यांच्या समर्पक व विश्वसनीय इतिहासाची साधनसामुग्री केवळ जुन्या बखरी, इंग्रज ग्रंथकारांनीं लिहिलेले हिंदुस्थानचे इतिहास, किंवा 'ऐतिहासिक' या वर्णनाखालीं मोडणारीं नाटकें व कादंबऱ्या यांमध्यें मिळणार नाहीं हें येथवर केलेल्या विवेचनावरून दिसून आलेंच असेल. तसेंच ही सामुग्री मुख्यतः जुन्या कागदपत्रांमधूनच मिळविली पाहिजे हेंहि सांगितलेंच आहे. पेशवाईचा वास्तविक नाश झाल्यापासून आज जवळ जवळ १०० वर्षें होत आलीं. इतका वेळपर्यंत झोंपा काढून आतां कोठें आम्ही जागे झालों आहों. परंतु सर्वभक्षक काळास कधींहि झोंप येत नाहीं. या शंभर वर्षांत त्यानें आमच्या इतिहासाची सामुग्री किती खाऊन टाकिली असेल याची बरोबर कल्पना करणें फार कठीण आहे. यामुळें इतक्या कालावधीनंतर इतिहासाच्या जिर्णोद्धाराचें काम करावयाचें म्हणजे, जळून खाक झालेल्या किंवा धरणीकंपानें जागच्याजागीं गडप झालेल्या वाड्यांतून मालमिळकत उकरीत बसण्यासारखेंच आहे. रोमच्या इतिहासांतील सिबिलच्या ज्ञानपूर्ण ग्रंथाप्रमाणें, जें आम्हीं अनास्थेनें घालविलें त्याच्याचमुळें जें अजून शिल्लक उरलें आहे त्याची किंमत अनंतपटीनें वाढली आहे. जें गेलें तें परत येणार नाहीं हें तर उघडच आहे. परंतु जें उरलें आहे तेवढें सर्व जरी हस्तगत करून घेतां आलें तरी कांहीं कमी नाहीं. जळकें किंवा जमीनदोस्त झालेलें घर उकरीत असतांहि अमोलिक जिनसा पुष्कळ वेळीं अचानक सांपडतात हा अनुभव नेहमीं येतोच. भारतीय युद्धांत कित्येक अक्षौहिणी सैन्याचा ज्या रणांगणांत संहार झाला,

त्याच रणांगणावर लढाऊ हत्तींचे गळ्यांतून तुटून पडलेल्या एका घंटेखालीं चिमणीचीं पोरें बचलीं जाऊन आनंदानें नांदत होतीं ही सुप्रसिद्ध दंतकथा ज्यांना आठवत असेल त्यांना, आज शंभर वर्षेपर्यंत आमच्या इतिहासाच्या सामुग्रीचा संहार चालला असतां अजूनहि सांधीकोपऱ्यांतून बिनमोल माहिती मिळण्याचा संभव आहे हें खरें वाटण्यास कांहीं हरकत नाहीं. अंतरंगांत पेटलेली देशाभिमानाची मशाल घेऊन जो कोणी हल्लींच्या या अज्ञान व अनास्थारूपी तमोमय रात्रींत संचार करण्यास अजूनहि प्रवृत्त होईल त्याला, 'पोकळ गांव'च्या इनामदाराचे पडक्या वाड्याचे वळचणींत, तात्यापंतोजीचे शाळेंत पुस्त्या गिरविणाऱ्या पोरांचे दप्तरांत, अभिमानामुळें जतन केलेल्या परंतु अज्ञानामुळें सतरा गांठी मारून अठरा कुलुपांत ठेवलेल्या कागदपत्रांचे ब्रह्मघोटाळ्यांत, किंवा तागडीतुकाप्पाचे रद्दीचे घुडक्यांत, ज्याच्या योगानें इतिहासचा इतिहास फिरेल अशी माहिती अद्यापिहि मिळेल; नाहीं कोणीं म्हणावें! मात्र हें सर्व होण्यास अभिमानानें उजळलेली व कौतुकानें तीक्ष्ण केलेली अशी दृष्टि असणें जरूर आहे.

सतराव्या व अठराव्या शतकांत आपल्या देशांत स्वराज्य होतें त्या वेळीं मोठमोठे सरदार, कारकून, मुत्सद्दी व राज्यसंस्थापक असे पुरुष शेंकडों होऊन गेले, व रामेश्वरापासून अटकेपर्यंत जिकडे जिकडे भगवा झेंडा गेला तिकडे तिकडे वरील लोकांस अलौकिक बुद्धिचातुर्य व पराक्रम प्रगट करण्याचे प्रसंग आले. या मराठ्यांच्या महत्त्वाकांक्षेमुळें मराठी राज्याचा व्याप एका काळीं फारच मोठा झालेला होता आणि जेथें जेथें आपलें राज्य पूर्वीं होतें त्या त्या ठिकाणीं पूर्वीच्या शतकांतील इतिहासप्रसिद्ध पुरुषांचे जे वंशज अद्यापिहि नांदत आहेत, त्यांजजवळ कांहीं नाहीं तरी बरेच कागदपत्र असले पाहिजेत. माळवा, मध्यप्रांत, बुंदेलखंड, कर्नाटक, तंजावर, मोगलाईमुलूख, गुजराथ या सर्व प्रांतांत सदहू कागदपत्रांविषयीं शोध केल्यास तो सफळ होण्याचा पुष्कळ संभव आहे. खुद्द महाराष्ट्र तर राज्यलक्ष्मीचें माहेरघरच होतें. दूर पर्वतांच्या माथ्यावर पडलेलें पाणी जसें नदीमुखांनीं अखेर समुद्रांत एके ठिकाणीं होतें, त्याप्रमाणें संपत्ति काय किंवा इतर कोणतीहि गोष्ट काय, मराठी राज्याचे अगदीं दूरच्या कोन्याकोंपऱ्यांतहि असलेली, तेव्हां महाराष्ट्रांत येऊन पडा-

वयाचीच. यामुळें तेथें इतिहाससामुग्रीचें मुख्य भांडार जमलेलें असलेंच पाहिजे, व यास्तव उद्योग करणारास खुद्द महाराष्ट्रांत अजूनहि पुष्कळ महत्त्वाचे कागदपत्र उपलब्ध होण्याचा संभव आहे. आतां महाराष्ट्रांत किंवा इतरत्र, हे कागदपत्र ज्यांच्या ताब्यांत आहेत असे पुष्कळ लोक कंगाल असतील, परंतु कित्येक लोक श्रीमान् जहागीरदार व सरंजामी इनामदार असेहि असतील. याकरितां तारतम्यानें ज्यास ज्याची उणीव तें देऊन कसेंहि करून त्यांचे ताब्यांतील कागदपत्र प्रसिद्ध व्हावे असा उद्योग सर्वांनीं आपापल्या परीनें आरंभिला पाहिजे. उद्योग करणारास भेटल्यास जुने हस्तलेख वगैरे मौल्यवान् चिजा, अज्ञान, अभिमान, धर्मभोळेपणा, किंवा भीति, यांपैकीं कोणचेहि कारणामुळें मागें पडून राहिलेल्या असल्या तरी, पुढें येऊं शकतात ही गोष्ट आनंदाश्रमासारख्या संस्थेनें चांगलीच सिद्ध करून दाखविलेली आहे. वरील प्रकारचा उद्योग सफल होण्यास बराच पैसा लागेल हें खरें आहे, तरी पण असले उद्योग पैशापेक्षांहि उत्साहावर फार अवलंबून असतात.

हा उत्साह किंवा जुन्या इतिहासाविषयींचें खरें प्रेम जर आमचे लोकांचे आंगीं असतें तर आजपर्यंत शेंकडों खंडी कागद बेअकली लोकांनीं विकले ते विकले नसते, जाळले नसते किंवा कसरीच्या भक्ष्यस्थानीं पडूं दिले नसते. व हाच उत्साह किंवा हीच प्रीति अद्यापि जरी उत्पन्न होईल तरी अशाच रीतीनें पुढें होणारा संहार तरी वांचेल, यांत कांहीं संशय नाहीं. इंग्लंड देशामध्यें मॅग्नाचार्टासारखे लेख, जवाहिराप्रमाणें मौल्यवान् कोंदणामध्यें कसे घालून ठेविलेले आहेत व यःकश्चित् कागदपत्रसुद्धां फुकट जाऊं नये म्हणून मोठमोठ्या म्युझियम्स् बांधून त्यांमधून आग, हवा, पाणी, यांच्या आटोक्याबाहेर त्यांस कसें सुरक्षित ठेविलेलें आहे; तसेंच, जुन्या काळच्या किंवा लोकप्रिय मुत्सद्द्याच्या किंवा कवीच्या हातची बोटभर चिठ्ठी मिळाली तरी ती मिळविणारास विलायतेंत किती धन्यता वाटते; किंवा तो लोभी असून त्यानें ती विकावयास काढिली असतां तिची त्याला किती प्रचंड किंमत येते; फार काय, पण शेक्सपीयर ज्या खुर्चीवर बसून आपलीं नाटकें लिहीत असे, ती व तिच्या जागीं मांडलेल्या कित्येक कृत्रिम खुर्च्या मोडून गेल्या असतील, हें बहुधा माहीत असतां, कदाचित् आपण पाहूं

ती खुर्ची खरोखरच शेक्सपीअरची असण्याचा संभव असेल, या नुसत्या आशेवर झुलणारे हजारों लोक पैसे देऊन ती पहावयास कसे जातात; इत्यादि गोष्टी ध्यानांत आणिल्या असतां, इंग्रज लोकांचे अंगीं पूर्वजांचा खरा अभिमान आहे म्हणून त्यांचा इतिहासच काय, परंतु त्यांचें स्वराज्य देखील आज उत्कृष्ट दशेस आलें आहे व आपणांमध्यें त्याचाच अभाव असल्यामुळें आमचें स्वराज्य तर गेलेंच, परंतु नुसता इतिहास, नुसती कोरडी आठवणहि शिल्लक राहिली नाहीं हें उघड दिसून येतें. विलायतेंत इतिहासोद्धाराचे कामास राजाश्रय आहे तसा इकडे नाहीं व यामुळें आमच्या इतिहासाचा उद्धार होत नाहीं हें म्हणणें व्यर्थ आहे. कारण विलायतेंत ज्या ज्या म्हणून गोष्टी राजकर्तृक आहेत अशा भासतात त्या सर्व वास्तविक लोककर्तृकच असतात.

दुसरे पक्षीं पहातां जित लोकांना त्यांच्या पूर्वजांविषयींचा अभिमान बाळगण्यासहि शिकवावयाचें इतका पल्कर कधीं कोणच्याहि जेत्यांनीं आजपर्यंत घेतलेला नाहीं व त्यांना तो घेतांहि यावयाचा नाहीं; असें असूनहि आमचें सरकार जरी परकें आहे तरी समंजस व सुधारलेलें आहे, यामुळें आमच्या इतिहासांचे उद्धारास त्यांनीं आजपर्यंत बरीच मदत केली आहे व पुढेंहि ते करतील अशी आम्हांस आशा आहे. जुना इतिहास शिकविण्याचे रीतीसंबंधानें आमचे राज्यकर्त्यांनीं केवळ गैरसमजामुळें जरी पुष्कळ आक्षेप घेण्याचें आरंभिलें आहे, तथापि खुद्द इतिहासाचे संबंधानें त्यांचे मनांत केव्हांहि फारसा अनादर नाहीं. अलेक्झांड्रिया येथील प्रचंड ग्रंथसंग्रहाला आग लावितांना रानटी सुलतानानें जेतृभावाचे जोरावर जो युक्तिवाद लढविला तो ज्यास माहीत असेल त्याच्यानें इंग्रज सरकारकडून झालेल्या मराठी इतिहासाच्या उद्धाराचें गौरव व कौतुकच केल्याशिवाय राहवणार नाहीं. आमचेंच राज्य असतें, तर आमचा आम्हीं इतिहास उत्कृष्ट तयार केला असता, व जुने कागदपत्र राखून ठेवण्यास भक्कम व सुंदर गोपुरेंहि बांधविलीं असतीं. तें सर्व कांहीं कदाचित् यथास्थित झालें असतें. परंतु आज स्वराज्य नाहीं तरी आमचें आम्हींच पुष्कळ करावयाचें आहे, हें कबूल केल्याशिवाय चालावयाचें नाहीं. तात्पर्य काय कीं, जें आपल्याआपण नष्ट झालें किंवा जें कांहीं कोणीं दुष्टाव्यानें नष्ट केलें

तें तर गेलेंच आहे. तरी पण जें कांहीं अजून काळाच्या व दुष्टांच्या तडाक्यांतून वांचलें असेल तें तरी आपलेंसें करून घेणें आपलें कर्तव्य नाहीं काय ? व तें जर आज आपण बजाविलें नाहीं तर त्याबद्दल उद्यां आपणांस कोणास दोष देतां येईल काय ? करितां, हरकोणी, ज्याला इतिहासाची सामुग्री मिळवितां येण्यासारखी असेल त्यानें, यापुढें कंबर बांधून त्या महत्कार्यास लागलें पाहिजे. वरच्या तीन पिढ्यांचें ऋण जसें आपण श्राद्धकर्मानें फेडतों, तसेंच आपल्या समाजाच्या अनंत पिढ्यांच्या पूर्वजांचें ऋण, त्यांच्या इतिहासाच्या उद्धारानेंच फेडिलें पाहिजे व धर्माच्या बाबतींत जसें वाडवडिलांचीं देवस्थानें चालवून त्यांचीं अवदात कर्में आपण सुप्रकाशित करितों त्याचप्रमाणें त्यांचें शहाणपण व त्यांची नीतिमत्ता यांचें ज्यांमध्यें प्रतिबिंब दिसतें अशीं त्यांचीं व त्यांजविषयीं लिहिलेलीं पत्रें व लेख त्यापुढें मांडून त्यांची कीर्ति अक्षय करून ठेवणें, हेंच आपलें कर्तव्य आहे.

## ५ —

असो. ऐ. ले. संग्रहाचे द्वारानें आतांपर्यंत सुमारें ३२५ पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत. यांपैकीं शेंकडा अदमासें पन्नासांवर पत्रें सरदार गोविंद हरि पटवर्धन यांनीं आपला मुलगा सरदार गोपाळराव गोविंद यास लिहिलेलीं आहेत. बाकीचीं थोरले माधवरावसाहेब पेशवे, श्रीमंत रघुनाथराव पेशवे, गोपिकाबाई (माधवरावांची आई), सखाराम बापू, गोपाळराव हरि, कारभारीवर्ग, कारकून लोक वगैरेंनीं लिहिलेलीं आहेत. गोविंद हरीची बहुधा रोजची डाक दिसते. त्यास स्वतःस पत्र लिहिण्याचा कंटाळा नव्हता. गोपाळरावाकडून त्यास दर दोनतीन दिवसां पत्रें जात असावींसें वाटतें. इतकेंहि असून त्याची गोपाळरावाचे आळसाबद्दल कुरकुर व प्रेमळ शब्दांनीं कान उघाडणी चाललेलीच आहे. गोविंदरावाचे पत्रांतील विषयांची विविधता, व त्यांचे माहितीचा ताजेपणा पाहतां, गोपाळरावाप्रमाणें इतर पुष्कळांबरोबर त्याचा असाच पत्रव्यवहार सुरू झाला असला पाहिजे. खालीं कर्नाटका-

पासून तों इकडे औरंगाबाद, भागानगर, नागपूर व इकडे उत्तरेंतील शिंदे होळकरांच्या छावण्या, इतक्या टापूंतील खबरा प्रत्यहीं त्यास मिळत व तो इतरांस देई. लढाया किंवा वेढे अशा प्रसंगींसुद्धां हें पत्रव्यवहाराचें काम अबाधित चाले. त्या काळच्या प्रवासाच्या गैरसोयी व वाटेचें भय इतक्यांतूनहि "जोडीच्या" जासुदांची डाक कशी सर्रास सुरू असे व ती आपलें काम किती जलद व वक्तशीरपणानें बजावी ही मोठी कौतुक करण्यासारखी गोष्ट आहे. हल्लीं जुन्या पिढीचे लोकांत टपालाची संस्था सुरू होऊनहि, पत्रें पाठविण्याचा फार कंटाळा दृष्टोत्पत्तीस येतो. यावरून पेशवाईतील लोकांसंबंधानेंहि तसेंच अनुमान जर कोणी काढूं लागेल तर या गोविंद हरीच्या पत्रांवरून त्यास साफ खोटें ठरवितां येईल. गोविंदरावाप्रमाणें इतर सरदारांची डाक सुद्धां बरीच असावी हें उघड आहे. एकट्या गोविंदरावाचींच इतकीं पत्रें रा० खरे यांस मिळालीं त्याचें कारण कांहींहि असो; परंतु अशींच इतरांचीं पत्रेंहि इतर कोणास जर उपलब्ध होतील तर इतिहासद्रव्याचें केवढें भांडार हातीं लागणार आहे!

गोविंद हरीचीं पत्रें व्यक्तीसंबंधानें कदाचित् एकदेशीय असतील, परंतु त्यांत प्रतिबिंबित होणाऱ्या देशकालवर्तमानाचे खरेपणाबद्दल शंका येण्याचें कारण नाहीं. ऐ. ले. संग्रहांतील पत्रांवरून नानासाहेब, थोरले माधवराव, या पेशव्यांचे कारकीर्दींत पटवर्धन सरदारांचें महत्त्व व वर्चस्व किती होतें तें स्वच्छ दिसून येतें. परंतु मधून मधून त्या काळचे बहुतेक प्रमुख मुत्सद्दी व सर्व राजकारस्थानें यांजवरहि बराच उजेड पडतो. गोविंद हरि हे थोरले बाजीरावांशीं समवयस्क असून, बाजीचिमाजीचे जोडीबरोबर खांद्याला खांदा लावून त्यानें कामें केलेलीं होतीं. नानासाहेब पेशव्यांचे मरणानंतर गोविंदराव हा वृद्ध व गोपाळराव हा कर्ता सरदार असे मानले जात असत. गोपाळराव पटवर्धनांचें महत्त्व शिंदे व होळकर यांचे बरोबरीचें असून, शिवाय पेशव्यांचा व त्यांचा विशेष जिव्हाळा होता. गोपाळरावानें पुण्यास व स्वारींत प्रमुखत्वानें पेशव्यांचे सन्निध असावें व गोविंद हरीनें जहागीर चालवून मुलास आपल्या अनुभवाचें शहाणपण शिकवावें. गोविंद हरि हा शूर, शहाणा, हिकमती, दूरदर्शी, करारी, खरा धार्मिक, नेहमीं सदाशाप्रेरित, पण वेदांती असा दिसतो. साठीच्या उमरीस त्यानें आपल्या

धमकेवर मिरजेचा किल्ला पेशव्यांशीं सव्वा महिना झुंजविला. गोपाळराव मोगलाकडे निघून गेला व मोगलानें पुणें जाळलें तेव्हां पेशवे व इतर लोक त्यास अर्थातच नांवें ठेवूं लागले. लोकापवादाची वार्ता ऐकून गोपाळरावास फार वाईट वाटे व तो तसें आपले बापास लिही. त्या प्रसंगीं गोविंद हरि हा आपल्या मुलाच्या समाधानार्थ जो बुद्धिवाद लिहीत असे त्यावरून त्याची तर्क लढविण्याची खुबी चांगली व्यक्त होते. "आपण एकनिष्ठेनें सेवा केली, फलदाता ईश्वर आहे." "आपण श्रम मानावयास कारण काय ? यजमानांनीं राज्यांतून बाहेर घालविलें, उभें रहावयास स्थळ नाहीं, फौजेवर छापा घालून सत्यानाश केला, निदान झालें तेव्हां जीव वांचवावे याअर्थें नबाबाकडे गेला. पुढें प्राक्तनीं असेल तसें घडेल, चिंता कोठवर करणार." वगैरे लिहून तो गोपाळरावाचें सांत्वन करी. मिरजेच्या किल्ल्यांत बंदोबस्तानें राहून खुद्द पेशव्यांशीं गोविंद हरीनें लढाई केली या अपवादापासून आपला बचाव करण्याकरितां गोविंद हरीनें गोपाळरावास लिहिलेला मजकूर वाचण्यासारखा आहे. रघुनाथराव भांडून निघून गेला असतां गोपाळराव माधवराव पेशव्याचे बाजूस होता. त्या वेळीं शत्रुपक्षाकडच्या व फितूर असलेल्या सरदाराचे घरीं चोरपाळतीनें बातम्या कशा ठेवाव्या, रघुनाथरावास कसें धरावें व एकदोघां तत्पक्षीयांस युक्तीनें साधून जरबेंत आणलें म्हणजे दाब कसा बसेल वगैरे त्याचा उपदेश, त्याचप्रमाणें गोपाळराव मोगलाकडे गेला असतां त्यानें परत यावें यासाठीं पेशव्यांच्या मार्फतीनें गेलेल्या पत्रांस त्यानें सुचविलेली उत्तरें वगैरे गोष्टींवरून गोविंद हरीचें दीर्घ धोरण चांगलेंच कळून येतें.

गोपाळरावावर गोविंद हरीचें अत्यंत प्रेम व त्याचप्रमाणें जरबहि पण अत्यंत होती असें मानण्यास बराच पुरावा आढळतो. गोपाळरावाचें पहिलें कुटुंब निवर्तल्यावर त्याजकरितां कोंकणांतून दोनतीन मुली गोविंद हरीनें आणविल्या. वधू येऊन खोळंबून बसल्या, परंतु गोपाळराव येईना. तेव्हां गोविंद हरीनें आपल्या मुलांस चरचरीत पत्रें लिहिलेलीं आहेत. "वधू आणवून मूर्खपण. परिच्छिन्न लग्न केलें पाहिजे. शंभर बुद्धि कार्याच्या नाहींत." "फिरून ऐसें लिहिण्याचें प्रयोजन नाहीं." "तुम्हीं दहा लग्नें करा. आधीं हें मग दुसरें" इत्यादि कठोर शब्दांनीं त्यानें आपल्या मुलाचा केलेला निषेध वाचण्यासारखा आहे. "शास्त्रविरोध करूं नये." या

मतानें तो शांतिपाठ, जपजाप्य, ग्रहदानें वगैरे करी, परंतु नेहमीं भरंवसा " श्रीपंढरीनाथावर " हें धर्माचें वारें गोविंद हरीस चांगलें उपयोगी पडत असे. मिरज हातची गेली, उभें राहावयास स्थल देखील मिळेना, महिना दहाबारा हजार खर्च खाणारा परिवार बरोबर घेऊन कुटुंबाचीं माणसें एकीकडे व आपण एकीकडे असें भटकत असतांहि गोविंद हरि ईश्वरावर भार टाकून सुखी असे. तात्पर्य, गोविंद हरीसारख्या वरिष्ठ प्रकारच्या सरदाराची हकीकत ग्रँटडफ किंवा इतर कोणच्याहि ग्रंथांत न मिळणारी अशी ऐ. ले. संग्रहांत पुष्कळ मिळते.

गोपाळराव हरीबद्दलहि आजपर्यंतच्या ऐतिहासिक ग्रंथांत फार थोडी माहिती मिळते. गोपाळरावांस नानासाहेब पेशव्यांनीं लिहिलेलीं एक दोन पत्रें संग्रहाच्या दुसऱ्या लेखांत छापलेलीं आहेत. दौलताबादेस गोपाळरावानें वेढा घातला असतां किल्ला लवकर हस्तगत होईना, तेव्हां नानासाहेबांनीं गोपाळरावांस प्रथम कठोरपणानें लिहून नंतर धाकट्या भावंडास लिहितात तसें सलगीनें व प्रेमानें खालीलप्रमाणें लिहिलें आहे. "या उप्पर या पत्रावरून जितका राग येईल तितका त्याजवर ( किल्ल्यावर ) काढणें. जर कार्य झालें असेल तर मग व्यर्थ राग येऊं न देणें. हें पत्र कोणास ठाऊक नाहीं. लेकरादाखल सेवकावर एकांतीं रागें भरल्यास वाईट मानूं नये." तसेंच पुढें एक वेळ गोपाळराव रुसून घरीं बसले असतां "तुम्ही म्हणाल कीं, खावंदांनीं आमची आड कां न चालवावी ? त्यास चिरंजीव दादांनीं भाऊंची अमर्यादा केली. तरी आम्हीं शिक्षा केलीच पाहिजे. कां कीं पुढें बहुत दिवस मर्यादा कैद चालली पाहिजे. तसेंच तुम्हांवर मनापासून कृपा वर्धमान होऊन तुम्हांजवळून मोठीं कामें घेतलींच पाहिजेत" इत्यादि लिहिलें आहे. नानासाहेब पेशव्यांचे मरणानंतर गोपाळराव माधवराव पेशव्याचे बाजूस राहिला व रघुनाथराव पेशवे यांच्यावर जी स्वारी झाली त्यांत सरदार असा गोपाळरावच प्रमुख होता. पुढें चुलते-पुतणे एक झाले तरी त्यानें रघुनाथरावाचा दावा सोडला नाहीं व यामुळें पटवर्धनावर इतराजी होऊन त्याच्या मिरज वगैरे सर्व जहागिरी जप्त झाल्या व गोपाळरावास निजामअल्लीचे आश्रयास जावें लागलें. गोपाळराव हा स्वभावानें तल्लख, तापट व शूर होता. लढाईच्या प्रसंगीं तो अगदीं देहभान

विसरून जाई. गोविंद हरीनें त्यास एक वेळ खालीलप्रमाणें उपदेश केला आहे. "तुम्ही घोडेखालीं उडी टाकतां हें काम घरबुडवें. आधीं शंभर-जण उडी टाकतील, मग तुम्ही उडी टाकणें." गोपाळरावाचा स्वभाव मोठा दुराग्रही असे. नानासाहेब पेशव्यांनीं वर उल्लेख केल्याप्रमाणें कितीहि जीव तोडून लिहिलें तथापि सखारामबापूशीं मिळून राजकारण करणें ही गोष्ट त्याचे हातून घडून आली नाहीं. तसेंच माधवराव पेशव्यांनीं कितीहि निक्षून सांगितलें, तरी रघुनाथरावाशीं त्यानें आमरणांत सख्य केलें नाहीं. निजामअल्लीस जाऊन मिळण्याचे कामीं गोपाळरावाचे हातून जी मोठी चूक झाली तिचें गोविंद हरीनें ठिकठिकाणीं 'समर्थन' केलें आहे. तथापि एकंदरीनें पहातां त्याचें तें कृत्य दुराग्रहामुळें व त्या काळीं मराठे लोकांचें अंगीं दिसून येणाऱ्या एक प्रकारच्या विलक्षण अदूरदर्शित्वामुळें झालें असें म्हणण्यास आम्हांस हरकत वाटत नाहीं.

आतां निजामअल्लीस जाऊन मिळाल्यानंतर पुढें पुण्याची दुर्दशा झाली याबद्दलचा दोष मात्र गोपाळरावास किमपिहि देतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. या दुर्दशेचें मुख्य कारण म्हटलें तर मराठ्यांची शत्रूचे मुलखांत जाऊन आपणच मुलूख लुटण्यास प्रारंभ करण्याची खोड होय. याविषयीं गोविंद हरीनें एके ठिकाणीं मोठ्या मार्मिकतेनें लिहिलें आहे. (नं० २८२चे पत्रांत) "श्रीमंतांच्या दौलतीचा विनाशकाल आला त्यास तुम्हीं चिंता करून काय होणें, ज्याची त्यांनीं आस्था सोडून गोरगरीबें लुटीत, देश जाळीत, भागानगर प्रांतें फिरतात. हे मोंगल त्यांचा देश जाळतात. दे वाण घे वाण आहे." गोपाळराव निजामअल्लीचे आश्रयास जाऊन राहिला होता हें खरें, तथापि त्याचें सर्व चित्त पुणें शहर व आपले लोक यांजकडे होतें. त्रिंबकराव मामा पेठे यांनीं गोपाळराव मोंगलाकडे असतां, त्यास एकदोन पत्रें पाठिवलीं आहेत. त्यांत "प्रस्तुत आम्ही पेंचांत दोन महिने आहों. पुढें सर्व प्रकरण लौकिकरक्षणांविषयीं चिरंजीवाची सोई करणें" म्हणजे मोंगलाकडे आपल्या मुलास असामी लावून द्या, अशी त्यानें गोपाळरावास विनंति करविली होती. तसेंच पुढें नाशीक प्रांतीं मोंगलाची फौज उच्छा-दास गेली असतां "त्या स्थलांचें संरक्षण वस्तब्रांनीं सुद्धां होय ऐसें अगत्य करावें" असें विठ्ठल सुंदर यास सांगून, जो जाईल त्यास अगत्य रक्षण

करण्याविषयीं निरवणूक असावी अशी ही गोविंद हरीमार्फत गोपाळरावास त्यानें विनंति केली होती. पुण्याचे खासगीवाले व तुळशीबागवाले यांनींहि गोपाळरावास "जेणेंकरून गांव वांचे तुम्हांस तें करणें" असें लिहिलें होतें. गोपाळरावानेंही पुणें वांचविण्यास आपल्याकडून कांहीं कमी केलें नाहीं. पेशव्यांनीं मोंगलाईत केलेल्या धूळधाणीचा सूड घेण्यापेक्षां दुसरा हेतु पुण्याकडे पुंडाई करण्यांत मोंगलांचा नव्हता. यामुळें ते गोपाळरावांचे ऐकतील असें नव्हतें. इकडे आल्यानंतरहि मोंगलांनीं सर्व शहर एकजात लुटलें नाहीं. तर त्यांचे फौजेंत असलेल्या मराठ्या सरदारांनींच गांवांतील धनिक लोकांची माहिती देऊन त्यांस लुटविलें. इतकें असूनहि गोपाळरावानें पुणें वांचविण्याची आपल्याकडून शिकस्त केली. मोंगल अवचित येऊन पुणें लुटतील व त्यामध्यें गोपिकाबाई व छोटे नारायणराव पेशवे कैद केले जातील यास्तव गोपाळरावानें गोपिकाबाईस आगाऊ पत्र पाठवून सूचना दिली होती व त्याप्रमाणें गोपिकाबाई सिंहगडावर निघूनहि गेली. गोपिकाबाईनें सूचना घेतली, परंतु तिनें हे सर्व खेळ गोपाळरावाचे असें समजून त्यास मर्मभेदक पत्र लिहिलें. त्यास गोपाळरावानें पाठविलेलें उत्तर नंबर २४९ चे पत्रांत आहे. तें वाचण्यासारखें आहे. आमचे चित्तीं आपल्या राज्याचें अकल्याण असतें तरी मागेंच इकडून जातेसमयीं आम्हांस पुण्यास (स्वारी करण्यास) जा म्हणत होते, परंतु आम्हीं ती गोष्ट कबूल न केली त्यापासून आम्हांस (मोंगल) म्हणतात कीं यांस 'त्यांची (पेशव्यांची) माया सुटत नाहीं.' म्हणून एखादी दंग्याची गोष्ट केली तरी आम्हांस कळूं देणार नाहींत. म्हणून आम्हीं सूचना करविली तें विपरीत मानून सारें अपेश आपण आम्हांवरीच ठेविलें. कालमहिमाच. आपण आमचे भरंवशावर बेफिकीर राहतील. आम्हांवर अपेश येईल म्हणून आम्हीं सूचना करविली ते सारीच मांड आम्हावरि आली. उत्तम आहे. आपण आमचें इमान प्रमाण घेतलें किं दुसरें चित्तांत आणूं नये, त्यावरून आम्ही सर्वस्वास बुडोन राज्यभ्रष्ट झालों. एकूण आपलेकडील माया सुटेना यामुळें 'अतोभ्रष्ट' आपल चित्तांत 'जें करतों तें आम्हीच' यामुळें 'ततोभ्रष्ट.' याउपरी आम्ही दुसरें पत्र सूचनेचें लिहीत नाहीं." हें पत्र वाचून गोपाळरावाचे स्थितीबद्दल वाईट वाटल्या-

वांचून रहात नाहीं. पुण्याच्या रक्षणार्थ पेशव्यांनीं मागें ठेवलेले नारो अप्पाजी तुळशीबागवाले यांचें गोपाळरावास "तुम्हांस शब्द लावावा तरी तुम्ही सर्व प्रकारें तेथून साहित्य करितां" असें सर्टिफिकिट आहे. गोपाळरावानें "आपल्यातर्फे कांहीं कमी केलें नाहीं." तो म्हणतो "या प्रसंगीं अग्रेसर असतों तर बहुतांचा नाश होऊन राज्य ल्यासच जातें. आमचें कर्जेहि फिटतें. परंतु पदरीं लहान माणसाई येते, पुढेंमागें सर्वांचा द्वेष पडतो." म्हणून पुण्याचा बचाव आपण होतां होईतों केला. त्याच्या "चित्तांत पैका न घेतां रक्षण करावें असें मानस होतें परंतु (हैद्राबाद) शहरापासून श्रीमंतांनीं रुपये घेतले व नाश केला व बेद्र जाळलें यास्तव कांहीं तरी खंडणी द्यावी हें मानस यांचें (मोंगलांचें) व द्रव्यदृष्टि फार" म्हणून गोपाळरावाचें कांहीं चाललें नाहीं. तात्पर्य, पुणें जाळल्याचे बाबतींत गोपाळराव पटवर्धनावर बिलकुल दोष रहात नाहीं.

एकंदर पटवर्धन घराण्याचा विस्तार, त्यामध्यें गंजांतील भांड्याप्रमाणें एकाखालीं एक असे एकसारखे शूर लहान मोठे सरदार, त्यांचें दरबारीं असलेलें वजन, प्रसंगविशेषीं त्यांजवर पेशव्यांची गैरमर्जी होऊन सर्व जहागीर खालसा होऊन महत्संकट आलें असतां सर्व पटवर्धन सरदारांची असलेली एक जूट वगैरे गोष्टी या ग्रंथांत चांगल्या दिसून येतात. रा० खरे यांनीं ११० पानांत एक मोठी टीप दिली आहे. त्यामध्यें असें लिहिलें आहे कीं, "त्या वेळीं पटवर्धनांचें घराणें तेजस्वी होतें. प्रत्येक स्वारींत सोळासतरा पुरुष घरचे असत. पण कधीं कोणांत कुरकुर देखील होत नसे, मग तक्रारी, फितूर व भांडणें यांचें नांव कशाला? वडिलांविषयीं मर्यादा, आपसांत एकजूट आणि पुढाऱ्यावर पूर्ण विश्वास या तीन गोष्टींचें बाळकडूच सर्वांस मिळालें होतें. सर्वांची प्रीति व द्वेष, ग्रह व आग्रह, मसलतीचीं धोरणें, व वागणुकीच्या तऱ्हा एकच. अशा संघशक्तीच्या जबरदस्त जोरावर कसेंहि संकट पडलें तरी ते डगमगत नसत. व पाहिजे ती मसलत पार पाडण्याचें सामर्थ्य त्यांमध्यें होतें यांत नवल काय? "एक मेला कीं त्याच्याच तालमेंत तयार झालेला दुसरा त्याचें काम बजावण्यास तयार आहेत" व या विधानास आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या पत्रांत बराच पुरावा मिळतो.

— ६ —

ऐतिहासिक लेखसंग्रहांतील बहुतेक पत्रांत पटवर्धनांविषयींचीच जशी माहिती पुष्कळ मिळते तशी इतरांसंबंधानें मिळत नाहीं. खुद्द श्री० माधवराव पेशवे यांचीं थोडींशीं पत्रें ऐ. ले. संग्रहांत प्रसिद्ध झालीं आहेत; त्यांवरून श्रीमंत माधवराव हे मोठे मातृभक्त होते एवढें मात्र दिसतें. त्यांच्या कारकीर्दीच्या अगदीं अव्वलींतच, रघुनाथरावांचा मूर्खपणा, सखारामबापूंचें कपटपटुत्व, इतर सरदारांचीं दुटप्पी वर्तनें यामुळें त्यांजवर मोठाच बिकट प्रसंग येऊन पडला होता. त्र्यंबकराव मामा व बाबूराव फडणीस हे मुख्य कारभारी रघुनाथरावाच्या चंचळ व बेभरंवशी स्वभावामुळें कारभार करण्याचें पत्करीनात, व सखारामबापूवर माधवरावाचा स्वतःचा विश्वासहि नव्हता. तेव्हां कारभाऱ्यांनीं कसेंहि करून कारभार करण्याचें पत्करावें म्हणून त्यांना कलमवार तहनामे लिहून द्यावे लागले. या सर्व घोंटाळ्यांत माधवरावानें आपली आई गोपिकाबाई हिच्या आज्ञेप्रमाणें वर्तन ठेविलें होतें. आंगीं तारुण्य व हातीं सर्व सत्ता अशी उन्मादकारक स्थिति असतां केवळ आपल्या आईच्या वचनाप्रमाणें चालणारे असे किती लोक सांपडतील! माधवरावाचा स्वभाव प्रेमळ व श्रद्धाळु असावा असें दिसतें. त्यास माणसाची जरी परीक्षा होती तरी दुसऱ्याचे दोषांवर होतां होईल तों पांघरूण घालण्याची त्याची वहिवाट असे. चुलत्यापुतण्यांची लढाई होऊन समेट झाल्यावर रघुनाथरावांसंबंधानें माधवरावानें आपलें मत गोपिकाबाईस कळविलें, त्यांत असें लिहिलें आहे. "नानाप्रकारचें वर्तमान मनस्वी लोक सांगतात व लिहितात तो प्रकार येथें किमपि नाहीं. वडिलीं चित्तांत दुसरा अर्थ आणूं नये. तीर्थरूपांचें चित्त बहुत कोमल आहे.समाचार वरचेवर घेतात. दिवसेंदिवस अधिकोत्तर चित्त कोमल होईल." माधवरावासंबंधानें इतरांच्या पत्रांतून जे उल्लेख आले आहेत ते त्यास भूषणास्पद असेच आहेत. पटवर्धनांची वाताहात झाली असतांहि गोविंद हरि अगर गोपाळराव यांचेच पत्रांत कोठें त्याजविरुद्ध ब्रहि काढलेला आढळत नाहीं. मिरजेच्या वेढयांत खुद्द माधवराव हजर होते व त्यांनीं आपली बाजू संभाळावी अशी पटवर्धनांची अपेक्षा असतां माधवरावानें रघुनाथरावांचें म्हणणें ऐकून पटवर्धनांची जहागीर काढून घेतली होती.

असें असूनहि पटवर्धनांनीं खुद्द माधवरावास कधींहि नांवें ठेविलीं नाहींत, ही गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी आहे. माधवरावाच्या शूरत्वासंबंधानें पाहतां मिरजेच्या वेढयाचें काम चालू असतां आंतील लोक मोर्चे टिकूं देतना, रात्रीचे बाहेर पडून हल्ले करीत, तेव्हां माधवराव स्वतः मोर्च्यांत जाऊन बसत असत, असा गोविंद हरीचे पत्रांत उल्लेख आहे. तसेंच राक्षसभुवनची लढाई ही माधवरावानें पाहिलेली अशी पहिलीच लढाई असतां त्यांनीं त्या लढाईत "आम्हांपेक्षां अधिक झाले" (पत्र ३४७) असा धन्यवाद खुद्द रघुनाथरावाचे तोंडून म्हणवून घेतला. असो.

रघुनाथरावासंबंधानें पाहतां त्याच्या स्वभावाचें वर्णन ठिकठिकाणीं आलेलें आहे. त्र्यंबकरावाचे मतें रघुनाथराव म्हणजे "निर्विकारी (मूर्ख) भरंवसा शब्दाचा नाहीं." (प० २१६) "समुद्रवलयांकित पृथ्वीचें वडीलपण अनायासानें मिळालें" तें गाजविणारा, व "सखारामबापूच्या शब्दानें चालणारा." स्वतःचे मतें रघुनाथराव हा "मनास येईल तें बोलणारा भोळा" असा होता. माधवरावाचे मतें त्याला फक्त दुःसंगाची बाधा होती. एरवीं "तीर्थरूप (रघुनाथराव) स्वच्छ अंतःकरणाचे स्फटिकवत्. संगदोषेंकरून मात्र बुद्धिचांचल्य होतें." गोपिकाबाईशीं रघुनाथरावाचें वर्तन किंचित् कुर्च्याचें असे. मराठे सरदारांस मोंगलाकडे पळून जाण्याचें वळण रघुनाथरावानें जरी प्रथमच घालून दिलें होतें असें नाहीं, तरी पण त्यानें तें त्यांचे नजरेस चांगलेंच आणलें. रघुनाथरावासंबंधानें त्याचे काळीं कोणाच्याच मनांत पूज्यभाव नव्हता. चुलतेपुतण्यांत कलह लागला तेव्हां रघुनाथरावानें गोपिकाबाई वगैरेंस चौकीपहाऱ्यांत ठेविलें. हें पाहून केवळ भिक्षुकीचें अन्न खाऊन स्वस्थ पडलेल्या सात्त्विक ब्राह्मणांसहि रागाचा उमाळा आला व "एकाचें नांव त्याहावें तरी तो राजद्रोही होतो" या भीतीनें सर्व ब्रह्मवृंदांनीं मिळून त्यास पत्र लिहिलें आहे, तें मात्र चमत्कार वाटण्यासारखें आहे (पत्र १०२). रघुनाथरावाचे हातून घडलेल्या सर्व प्रमादांचा पाढा वाचून नंतर "तुम्ही महाराज भोळे. राजाई (राज्य करण्याची अक्कल) तुम्हांस कांहीं कळेना. तुम्हांस कांहींच नकळे. तीन पिढ्या दौलत मिळविली ती तुम्हीं क्षयास नेली" वगैरे शब्दांनीं त्यास यथच्छ वाक्ताडन केलें आहे. जी गोष्ट मोठमोठ्या सरदारांचीहि ऐकूं नये

तीच गोष्ट केवळ हुजऱ्याचे सांगण्यावरून राघोबा करीत असे, अशीहि त्याच्या स्वभावाची एक बाजू संग्रहांत दिसून येते. तात्पर्य, पुढें रघुनाथरावाच्या ज्या दुर्गुणामुळें पेशवाईच्या बुरुजांत इंग्रजांची मुळी शिरली; त्याचें प्रतिबिंब ऐ. ले. संग्रहांत प्रसिद्ध झालेल्या पत्रांत अनेक वेळां दिसून येतें.

पेशवाईतील कलीचा अवतार जो सखारामबापू त्याचें वर्णन मात्र सर्वांनीं एकसारखें केलेलें आढळतें. त्याच्याबद्दल कोणाचाच मतभेद दिसत नाहीं. ज्यानें उठावें त्यानें त्यास शिव्या द्याव्या असेंच त्याचें नशीब किंवा त्याची करणी होती. गोविंद हरीचें तर असें एक सुद्धां पत्र नसेल कीं ज्यामध्यें त्यानें त्या "सकारनामक" सोद्यास लाखोली वाहिली नसेल. त्या शिव्या येथें उतरायच्या म्हटलें तर जागा पुरवणार नाहीं. तो दुष्ट, नीच, कळलाव्या, घरबुडव्या, "परित्राणाय दुष्टांना साधूनां निग्रहायच" हेंच त्याचें अवतारकृत्य, वगैरे शिव्या देऊन झाल्या, परंतु त्या अभिश्रापानें त्याचें कांहीं वांकडें होईना, त्याची सद्दी सुरूच होती व त्याचे शत्रु जे पटवर्धन त्यांस मात्र खडे खात दशदिशा भटकावें लागलें. अशा रीतीनें भंडावून जाऊन हात टेंकल्यावर गोविंद हरीनें शिव्या देण्याचें सोडलें व "त्याचे संग्रहीं द्रव्य आहे,कर्तेपण आहे,सारा राजमंडळाचा कार्यभाग स्वाधीन आहे.सर्व आपलेंच करील. त्याची तपश्चर्या भारी. याप्रमाणें कोणाचेंहि संकल्प सिद्धीस जाणार नाहींत.आमचा कैवारी श्रीपंढरीनाथ समर्थ आहे. आम्ही त्या पाजीची काळजी मुळींच वागवीत नाहीं." वगैरे निराशेचे उद्गार काढण्यापलीकडे त्यांचे हातीं कांहीं उरलें नाहीं. पटवर्धनांचें मत एकपक्षीय होतें. ते विकारवश झालेले होते हें खरें, तथापि एकंदरीनें स्वतः सखारामबापूची कृति निंद्यच होती यांत फारशी शंका नाहीं. तो शहाणा व कर्ता होता. तथापि त्याचें सारें कारस्थान आपल्या पोळीवर तूप ओढण्याचें. त्याच्याचमुळें कोंकणस्थ व देशस्थ यांच्यांतील तंटे झाले. या संबंधांत कोंकणस्थदेशस्थांचा झालेला करारनामा नंबर ६१ चे पत्रांत आहे तो पाहण्यासारखा आहे. रघुनाथरावास हातीं धरूनच त्यानें त्याजकडून पेशवाईच्या नाशाचें बीज रोवविलें. "विठ्ठल सुंदराची शाम्रीति करीन, परंतु आपल्या मनचे हेतु सिद्धीस नेईन" असें तो म्हणे. असा त्याजसंबंधानें गोविंद हरीनें उल्लेख केलेला ऐ. ले. संग्रहाचे १४ अंकांत आढळतो.

पत्रें लिहिणाऱ्या अशा स्त्रिया दोनच आढळतात. एक श्री. गोपिकाबाई व दुसरी सत्यभामाबाई, गोविंद हरीची बायको. गोपिकाबाईचें पेशव्यांचे दरबारांत किती वर्चस्व असे हें सुप्रसिद्धच आहे. नानासाहेब पेशवे असतां तिनें त्यांच्या मनांत रघुनाथराव व सदाशिवरावभाऊ यांच्यासंबंधानें अनेक मत्सराच्या कल्पना भरवून दिल्या. नानासाहेबांच्या पश्चात् तिचाच मुलगा मुख्य पेशवा असल्याकारणानें व विशेषतः तो अल्पवयस्क असल्यानें तिची राज्यकारभारांत ढवळाढवळ चाललेली असे. रघुनाथरावानें माधवरावाचा मोड केल्यामुळें तिला स्वस्थ वसणें भाग पडलें, व त्यामुळें ती उदास असे. परंतु तिचा सारा हेतु आपला मुलगा व आपण यांचे हातीं सर्व सत्ता यावी असा असे व गोपाळराव पटवर्धन मोंगलाकडे गेला असतां त्याचे हातून, आपला हेतु सफळ करणारें कांहीं तरी धाडसी व गुप्त कृत्य करावयाचें तिचे मनांत असावें असाहि गोविंद हरीचे एका पत्रामधून ध्वनि निघतो. गोपाळरावाची आई सत्यभामा इचें एक पत्र आहे तें फार मौजेचें आहे. गोपाळरावाचें दुसरें लग्न करावयाचें असल्यानें कोंकणांतून वधू आणिविल्या होत्या व त्या येऊन खोळंबून बसल्या तरी गोपाळरावाचा ठिकाण लागेना. त्यानें घाईनें येऊन एकदांचें कार्य उरकून घेऊन जावें असें गोविंद हरीनें त्यास कित्येक वेळां लिहिलें; परंतु गोपाळराव ऐकेना. तेव्हां वर सांगितलेलें पत्र सत्यभामाबाईनें आपल्या मुलास मोठ्या रागानें लिहिलें. (पत्र नं. २८०) "नवरी वाईट. आम्हांस परिछिन्न करणें नाहीं म्हणून पत्र आलें. त्यावरून अपूर्व वाटलें. पाटणकर मामांनीं नवरी वाईट आणिली म्हणोन लिहिलें, त्यांस आणावयास गरज काय? कांहीं पैसा तुमचे लग्नांत पाटणकर मिळवीत नाहींत. इतकेंही असून वाईट असती तर आम्हीं काय सर्व वेडीं होतों कीं काय? आणि तुम्ही मात्र शहाणपणें लिहितां! दहापांच मुलींत नवरी चांगली आहे. दहापांच हजारांत चांगली ती तुम्ही करणार. तशी कोण मिळणार? एक पुण्यांत मिळणार तें पुणें दारोदार भटकावयास लागलें. आणि तुम्हींहि तसेंच. आम्ही पहिलीं माणसें, दहापांच हजारांत चांगली आणावी इतकी परीक्षा आम्हांस नाहीं. तुम्हापाशीं कोण परीक्षवंत असेल त्यास सत्वर पाठवून देणें. अधिकोत्तर काय लिहावें?" असें

सणसणीत पत्र प्रत्यक्ष आईचें आल्यावर गोपाळरावानें जाऊन स्वतःस नापसंत अशाच मुलीशीं लग्न केलें, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

आतां १४ अंकांतील पत्रांवरून त्या काळची लोकस्थिति कशी दिसून येते हें आपण पाहूं. पानपतची लढाई व त्यामुळें पुढें लवकरच घडून आलेला नानासाहेब पेशव्यांचा मृत्यु यामुळें पेशवाईस ग्रहण लागण्याची वेळ आली होती. परंतु पूर्वीं संभाजीमहाराजांचे वधानंतर संताजी-धनाजींनीं ज्याप्रमाणें मराठेशाही महापराक्रमानें वांचविली त्याचप्रमाणें माधवराव पेशवे, होळकर, शिंदे व पटवर्धन सरदार यांनींहि मराठ्यांची गेलेली कीर्ति परत मिळविली, व मराठी राज्य वाढविलें. खची केलेल्या झाडाप्रमाणें मराठेशाहीस जास्तच जोर चढला. तथापि यानंतरचे मराठे-शाहीचें वैभव दिपविणारें होतें तरी फार वेळ टिकाऊ असें नव्हतें. कारण मराठी राज्याचे आधारस्तंभ जे मराठे सरदार यांची घडी पानपतचे युद्धापूर्वीं होती तशी टिकली नाहीं. जो तो स्वतंत्र होऊन बसला. खुद्द पेशव्यांनींच या बाबतींत वाईट उदाहरण घालून दिलें होतें. सातारकर महाराज, मराठी राज्याचे खरे मालक हे साताराकिल्ल्यांत कळसूत्री बाहुल्याप्रमाणें नामधारी राजे होऊन राहिले होते. आपल्या वैभवाच्या उगमस्थानावरून पेशव्यांची दृष्टि अगदीं ढळली होती. नवीन पेशवा गादीनशीन होण्याचे वेळीं वस्त्रें आणण्यापुरता काय तो पेशव्यांचा व सातारकरांचा संबंध उरला होता. एरवीं मराठी राज्याचा सर्व कारभार जबाबदार रीतीनें पेशवे चालवीत. वास्तविक पाहतां पेशवे हे इतर सात प्रधानांप्रमाणें महाराजांचे एक सरदार, असें असतां त्यांनींच मराठी राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. तेव्हां इतर प्रधान अर्थातच त्यांचा हेवा करूं लागले. त्याचा परिणाम असा झाला कीं, पेशव्यांचा अधिकार बरेच सरदार मानीनातसे झाले व त्यांना दाबांत ठेवण्याकरितां मोठमोठ्या जहागिरी तोडून देऊन नवीन सरदार त्यास उत्पन्न करावे लागले. यामुळें सत्ता फारच विभागली गेली व त्या मानानें राज्याची बळकटी कमी झाली. १७६३ सालीं म्हणजे माधवराव पेशव्यांचे अमदानीचे प्रारंभीं साताऱ्च्या महाराजांस पदच्युत करणें हें दुय्यम प्रतीच्या सरदारांच्या कारस्थानांपैकीं एक कारस्थान होऊन राहिलें होतें. "आपल्यास साताऱ्यास घेऊन जातों. एका प्रहरांत किल्ला व

राजा हस्तगत करून देतों. याखेरीज वीस लाख रुपये मिळवून देतों. त्यां उपरी राजगृहींच्चीं पदें आपले चित्तास येईल त्याप्रमाणें वांटून द्यावीं" (पत्र १८३) असें प्रतिनिधींचा मुतालीक गमाजीबावा यानें भोंसल्यास कबूल करून त्याची फौज साताऱ्यास आणण्याचे तो मसलतींत होता. मराठी राज्याचा पाया बळकट करण्यास श्रीशिवाजीमहाराजांनीं जे नियम बांधले होते, त्यांचा अम्मल सर्वांनीं एकदिलानें व इमानानें करण्याचें तर एकाच बाजूस राहिलें. परंतु आश्चर्य हें कीं, या वेळच्या मराठे सरदारांना श्रीशिवाजीमहाराजांचें विस्मरणच पडलें असावें असा भास होतो आणि खरोखरच या इतक्या मत्रांत सुखाचे किंवा दुःखाचे उद्गारांत मराठे सरदारांकडून शिवाजीमहाराजांचें नांव सुद्धां कोठें काढलेलें आढळून येत नाहीं, ही गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी आहे. शिवाजीमहाराजांची जर या वेळच्या मराठे सरदारांना आठवण असती तर त्यांचेकडून साताऱ्च्या गादीशीं अशी वर्तणूक खास झाली नसती. अशा रीतीनें स्वराज्याच्या अभिमानापेक्षां स्वार्थपरायणता अधिक प्रबळ झाल्यामुळें निरनिराळ्या दिशेनें ओढणाऱ्या शक्ति प्रबळ झाल्या व अर्थातच मराठेशाहीची घडी विस्कळीत झाली. राज्यांत शिस्त उरली नाहीं व "ज्याचे पदरीं फौज त्याची पृथिवी" या गोविंद हरीचें म्हणीप्रमाणें (पत्र १११) केवळ लष्कराचे जोरावर राज्याचें धोरण बनूं लागलें, व शिपाईगिरीपुढें मुत्सद्दीपणाचें कांहीं चालेना. वास्तविक त्या काळीं पूर्ण स्वराज्य व शिपाईगिरीस भरपूर उत्तेजन या दोन कारणांनीं जवळ जवळ सर्व राष्ट्र लढवय्यें बनून गेलें होतें. परंतु मध्यवर्ति व नियामक अशी राज्यसत्ता प्रबळ नसल्यानें प्रजेच्या लष्करी गुणांचा उपयोग राज्याचे एकीकरणाकडे झाला नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. पेशवे व मराठेसरदार यांजमध्यें वास्तविक सेव्यसेवक भाव जागरूक असा कधीं नव्हताच. त्या परस्परांमध्यें लढाया, तह, जामिनक्या वगैरे होत असत. पेशव्यांची कामगिरी बनवाबनयाची असतां होळकरासारखे सरदार अडून बसत व बिकट प्रसंगाचा फायदा घेऊन त्यांजपासून मोठमोठ्या जहागिरी तोडून घेत (पृष्ठ २०७). तात्पर्य, अशा रीतीनें पेशवे लष्करी कारभारांतच बहुधा गुंतले असल्यामुळें व एकंदरीनें तो काळ धामधुमीचा

असल्यानें इतर गोष्टींकडे पाहिजे तितकें लक्ष राज्यकर्त्यांस द्यावयास सांपडलें नाहीं.

आतां कोणतेंहि राज्य स्थापन होण्याचे वेळीं साधारणतः असेंच असावयाचें व पेशवाई आणखी कांहीं दिवस टिकती व इंग्रजासारख्या परशत्रूशीं त्याची गांठ इतक्या लवकर न पडती तर सर्व दंगाधोपा क्रमानें मोडून जाऊन राज्यसुधारणा अधिक झालीच असती असेंही एक म्हणणें आहे व तें विचार करण्यासारखें आहे. ऐ. ले. संग्रहांतील पत्रांचे काळीं सर्वत्र दंगाधोपा होता ही गोष्ट मात्र खरी आहे व ती आम्ही येथें नमूद करितों. पेशवे मोंगलांच्या मुलखांत शिरून लुटालूट करीत चालले व पुढें राक्षसभुवनाच्या लढाईमध्यें मोगल होता कीं नव्हता असा त्यांनीं करून टाकिला. यामुळें पेशव्यांचे राज्यास बढती व कीर्तीस उजळा मिळाला हें खरें, तथापि त्याच्या पश्चात् मोंगल पुण्यावर आले व शहराच्या बचावाची तरतूद नीट नसल्यानें खुद्द पेशव्यांची राजधानी लुटली गेली व लोक प्राणरक्षणार्थ वाट फुटेल तिकडे पळत गेले, हेंहि विचार करण्यासारखें आहे. पुणेंशहरची लूट व जाळपोळ यासंबंधाचीं ऐ. ले. संग्रहांतील पत्रें, त्यांतील सविस्तर व स्फुट वर्णनामुळें फारच मनोरंजक आहेत. (पत्रें नंबर २५१, २५९, २६०, २६१, २६२,) "पाणी केळीवर नारळी चढतात." "पृथ्वीप्रळय मांडला आहे." "यांत जो वांचेल तो आपलें प्राक्तनानुरूप वांचो." असे सरदारांचे उद्गार; व त्याचप्रमाणें "दादा, पुण्यांतील देव एक लहानमोठा राहिला नाहीं. महादेवाच्या पिंडी व मूर्ति, गणपती, हणमंत सर्व फोडले. पर्वतीस हेंच केलें. सरकारचा वाडा, धर्मशाळा जळल्या. सिंहगडचे सरकारखाने गरीब-गुरीब व घेणाऱ्याचे गांव सात आठ, आजी रविवारीं दोन प्रहरीं येऊन आगी दिल्या. तोफखान्याचे पानशांचे घराजवळ आग लाविली, तों ती नागझरीस येऊन पोहोंचली. सोमवार-मंगळवारांत पांच सात हवेल्या जाळल्या. लोहगडचे माचीस वित्तविषय घेऊन पुण्याचे लोक राहिले होते त्यांस देखील लुटोन फरत केलें. नानाफडणवीस देखील एका वस्त्रानिशीं गडावर गेले." व अखेर "रुपये ( खंडणी ) कबूल करून शेवटीं अब्रू गांवची राहिली नाहीं." अशीं नारो आप्पाजीसारख्या शहरच्या कोतवालानें

केलेलीं वर्णनें वाचून अनेक विचारतरंग हृदयांत एकदम थरारतात. पुण्यावर असे प्रसंग म्हणजे दोन वेळ झालेले आहेत. वर वर्णन केलेला प्रसंग पुण्याच्या इतिहासांत पहिला होय. दुसरा प्रसंग दुसऱ्या बाजीरावाचे कारकीर्दीत होळकरानें आणला.

असो. येथवर ऐतिहासिक लेखसंग्रहाचें परीक्षण यथामति करून त्याच्या अनुषंगानें एकंदर मराठी इतिहासाचे उद्धाराविषयीं सुचले ते दोन शब्द सांगितले. ऐतिहासिक लेखसंग्रह हें मासिक पुस्तक ऐतिहासिक दृष्टया किती महत्त्वाचें आहे हें यावरून दिसून आलेंच असेल. आतां तें व्हावें तितकें मनोरंजक होत नाहीं व त्यामध्यें पोवाडे, दंतकथा, वगैरे गोष्टी येत नाहींत असा या मासिकपुस्तकावर आक्षेप क्वचित् कोणी करितांना आम्हीं ऐकलें आहे. त्यावर आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं; हीं पत्रें मनोरंजक व सुबोध व्हावीं याजकरितां रा. खरे यांनीं आपणाकडून किती प्रयत्न केला आहे हें त्यांनीं दिलेल्या विपुल टीपा वगैरेंवरून दिसून येईल. इतिहास या दृष्टीनें जर कोणी तीं वाचील तर त्यांस कादंबरीपेक्षांही तीं अधिक चटकदार वाटतील असें आम्ही स्वानुभवावरून सांगतों. पोवाडे वगैरे इतर प्रकारचीं इतिहासाचीं साधनें सदर मासिकपुस्तकांत येत नाहींत हें खरें, परंतु सर्वच गोष्टींचा एकालाच पत्कर घेतां येणार नाहीं. ती उणीव इतर लोकांनीं खुशाल भरून काढावी व तसें करण्यास त्यांस इतर मासिक पुस्तकांचें द्वार मोकळें आहे.

# मराठ्यांच्या इतिहासाचा उद्धार*

महाराष्ट्रीय इतिहासाच्या संशोधनाचें काम आज सुमारें तीस पसतीस वर्षें हळुहळू चालूं आहे. तथापि त्या कामाला आजवर संघटनेचें स्वरूप आलेलें नसल्यामुळें, खुद्द महाराष्ट्रीयांवरहि त्याचा ठसा फारसा उमटलेला दिसत नव्हता; मग इतरांवर तो उमटण्याची गोष्टच नको. पण सुदैवानें पुण्यास गेल्या चार वर्षांपासून 'भारत–इतिहास–संशोधक मंडळ' स्थापित झाल्यामुळें ही उणीव अंशतः तरी भरून निघण्याचा बराच रंग दिसतो. लोकांच्या मनावर ठसा उमटण्यापेक्षांहि अधिक महत्त्वाचा असा एक परिणाम अशा संघटनात्मक कार्यापासून होण्याची अपेक्षा असते; व हा परिणाम म्हटला म्हणजे कार्याची परंपरा चालू राहणें. 'भारत–इतिहास–संशोधक' मंडळामुळें ही अपेक्षा देखील सफल होण्याचा संभव दिसतो; आणि गेल्या आठवड्यांत या मंडळाचें संमेलन झालें होतें त्याची केसरींत दिलेली हकीकत ज्यांनीं वाचली असेल त्यांना महाराष्ट्राच्या प्रगतिपर चळवळींत एका नवीन व उपयुक्त संस्थेची भर पडली असें वाटून आनंद झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

'इतिहास–संशोधन' हें कांहीं अंशीं आधुनिक संस्कृतीचें एक फळ आहे ही गोष्ट नाकबूल करण्यांत फारसा अर्थ नाहीं; व तिचें बरेंचसें श्रेय इंग्रजी शिक्षणाला दिलें पाहिजे. इतिहास हा विषय जरी आपल्याकडे सर्वस्वीं नवीन नाहीं तरी इतिहासाकडे पहाण्याची जी दृष्टि आपणांस आली आहे ती सर्वस्वीं नवीन आहे. पूर्वीं आपल्याइकडे लेखनपरंपरेपेक्षां पठनपरंपरेलाच अधिक मान असे. पूर्वीं विद्या आमच्या स्वाधीन होती, पण ती हस्तगत नसून कंठगत होती. तसेंच लेख जुना म्हणून जतन करून ठेवण्याची चाल असली तरी तींत सार्वजनिक हितबुद्धीपेक्षां वैयक्तिक हितबुद्धिच अधिक असे. जुन्या काळींहि लेख सुरक्षित ठेवले जात; पण त्यांचा हेतु इतिहाससंग्रह हा नसे. जयस्तंभ, देवळांतील दीपमाळा, ध्वजस्तंभ, विहार, स्तूप, प्रासाद वगैरे ठिकाणीं राजे लोक आपली कीर्ति मागें

---

* तारीख २ जून १९१५

ठेवण्याच्या हेतूनें नवे लेख कोरीत. पण आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या इतर राजे लोकांनीं कोरलेल्या अशाच प्रकारच्या लेखांचें ऐतिहासिक-दृष्ट्या ते कितपत कौतुक करीत असतील हें सांगवत नाहीं. खासगी लोकहि राजेलोकांपासून लाभणारे अग्रहार, देणग्या, इनामें, वतनें वगैरेंच्या शाश्वतीकरितां ताम्रपट व सनदा मिळवीत; व त्या मोठ्या काळजीनें जतनहि करीत. परंतु अशा प्रकारचे जुने ताम्रपट वगैरे मिळाले असतां त्यांना ते इतिहासाचीं साधनें म्हणून मौल्यवान् वाटत कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. वतनाचा पुरावा म्हणून ताम्रपटाची किंमत पूर्वी वाटत असेल यांत शंका नाहीं; पण वतनाचा संबंध कांहीं एक नसतांहि केवळ ताम्रपटाचीच म्हणून जी किंमत आज आपणांस ज्या दृष्टीनें वाटते ती किंमत त्या दृष्टीनें पूर्व-कालीन लोकांस वाटत नसावी अशी शंका येते.

यास सकृद्दर्शनीं दोन कारणें दिसतात. एक असें कीं, कालमापन व त्यामुळें अनुभवास येणारा वस्तुमात्राचा पूर्वापर संबंध याची जाणीव पूर्वी फारशी नव्हती. चित्रकलेप्रमाणें इतिहासांतहि प्राचीनांस यथास्थितिदर्शनाची गोडी माहीत नव्हती. रंग व रूपरेखा यांच्या दृष्टीनें पाहतां आमच्या जुन्या काळच्या तसबिरी फारच उत्कृष्ट व सफाईदार असत. पण अंतरामुळें वस्तूंचे आकार डोळ्यास लहान मोठे कसे भासतात हें सृष्टी-मध्यें त्यांना नित्य पाहण्यास सांपडत असतांहि चितारी लोक तसबिरीमध्यें तो भास उमटवीत नसत. त्यामुळें उंच व सखल, अलीकडचे व पली-कडचे यांचे डोळ्यांना दिसणारे सापेक्ष आकार बाजूला ठेवून, वस्तुमात्रांना होणारा दृष्टीचा अन्याय दूर करण्याकरितांच कीं काय, ते जवळच्या आणि दूरच्याहि वस्तु तसबिरींत सारख्याच आकाराच्या काढीत असत. हें 'परस्पे-क्टिव्ह'चें ज्ञान नसल्यामुळें चित्रकलेंत आभासाच्या सुखाची जशी हानि होते तशीच इतिहासांत सत्याची हानि होते. कालमापन किंवा पूर्वापरनिर्णय हा इतिहासरूपी लोकरी वस्त्राला आडव्या उभ्या धाग्यासारखा होय. इतिहास कितीहि अद्भुत किंवा सरस असला तरी तो कालमानाच्या या आडव्या उभ्या दोऱ्यांच्या आधाराव्यतिरिक्त राहूंच शकत नाहीं. कालमानाच्या अभावाच्या दोषाला शब्दप्रामाण्यबुद्धीच्या दोषानें पडली तर थोडीबहुत भरच पडली असें म्हणण्यास हरकत नाहीं. शब्दप्रामाण्यबुद्धि ही चिकि-

त्सकबुद्धीस विरोधी व विघातक आहे; अर्थात् जोंपर्यंत कोणतेंहि धर्मग्रंथ-वचन म्हटलें म्हणजे तें सारखेंच प्रमाण मानलें जातें तोंपर्यंत कालाच्या दृष्टीनें तें अलीकडचें का पलीकडचें यांचा निश्चय करण्याची अपेक्षा नसते. अज्ञान-निदान गूढार्थप्रियता-हा श्रद्धेचा पाया, किंवा श्रद्धेचें तें खाद्य असल्यामुळें एखाद्या धर्मग्रंथवचनाचा कर्ता कोण होता व त्याची सापेक्ष योग्यता कोणती हें ठरविण्याच्या भरीस पडून आपली श्रद्धा कमकुवत कोण करणार? आतां इतिहास ही चीज पूर्वी आपणांस माहीत नव्हतीच असें नाहीं. वैदिक काळीं यज्ञ वगैरे प्रसंगीं पुराणें, इतिहास-नाराशंस इत्यादिकांचीं निरूपणें होत असत असें दिसतें. तथापि, तीं फार तर उदात्त काव्यबुद्धीनें किंवा श्रद्धाळु धर्मबुद्धीनें प्रेरित झालेलीं असत; त्यांत सूक्ष्म ऐतिहासिक अशी बुद्धि फारशी नसे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

शब्दप्रामाण्याच्या बुद्धीचें अस्तित्व व इतिहासाचा अभाव यांची व्याप्ति आपल्याकडेच दिसून येते असें मात्र नाहीं. युरोपखंडांतहि जुन्या काळीं अशीच स्थिति होती. म्हणजे शब्दप्रामाण्याचा इतका जोर होता कीं, जें जें म्हणून कागदावर लिहिलें गेलें तें तें खरें असलेंच पाहिजे असें मानणारे लोक फार असत. आमच्याकडे जशीं व्यासाच्या नांवावर वाटेल तीं बाडें दडपलीं जातात, तशींच युरोपांतहि मोठ्या व सुप्रसिद्ध ग्रंथकाराचे नांवानें काय वाटेल तें कोणा वाटेल त्यानें लिहावें; व केवळ तें लेखणीनें आणि शाईनें कागदावर लिहिलें एवढ्याकरितां लोकांनीं त्याच्यावर विश्वास ठेवावा, अशी पद्धत दोनतीनशें वर्षांपूर्वींपर्यंत होती. सर्व विद्या धर्मनिष्ठ मठाधिपतींच्या हातीं, आणि हे मठाधिपति पहावे तर धर्मभोळे-पणाच्या धुमीनें अर्धवट आंधळे झालेले. एकटा सेंट ऑगस्टाईन घेतला तर त्याच्या मतवर्चस्वामुळें युरोपांत एक हजार वर्षेपर्यंत शब्दप्रामाण्यानें इतका धुमाकूळ माजविला होता कीं, व्यवहार, इतिहास, राजकारण अशा गोष्टींकडे चिकित्सक बुद्धीनें ढुंकून पाहण्याचें धाडस कोणासहि करवत नसे. जो कांहीं व्यवहार व इतिहास, किंवा जें कांहीं राजकारण, लोकांच्या लागी होतें तें धर्माच्या अधिराजाच्या परवानगीनें! कोणत्याहि महत्त्वाच्या किंवा किरकोळ गोष्टीचेंहि कारण शोधावयाचें तर तें धार्मिक भोळेपणाच्या मळलेल्या मार्गानें! खऱ्या भक्तीचा उदय मनांत नसतां

व्यवहाराच्या क्षुद्र बाबतींतहि कार्यकारणाची सांखळी परमेश्वराच्या पायां-पर्यंत नेऊन पोंचविण्याची संवय त्यांना लागलेली होती. इतिहासाचा परामर्ष कोणीं घेतलाच तर तो धर्माध्यक्षांनीं. पण ते मांडतील तींच प्रमेयें व मानतील तींच प्रमाणें अशी स्थिति होती; यामुळें इतिहासाला शास्त्रीय स्वरूप येणें शक्य नव्हतें.

इतिहास-संशोधनाच्या पूर्वतयारीचा प्रारंभ युरोपखंडांत १६ व्या किंवा १७ व्या शतकांत झाला. कारण या सुमारास युरोपियन विद्या व भौतिक ज्ञान हीं दोनहि वाढण्यास सुरुवात झाली होती. आणि युरोपांत जी स्थिति १७ व्या शतकांत आली ती गेल्या शतकाच्या अखेरीस आमच्या देशांत आली. या काळापूर्वीं वर सांगितल्याप्रमाणें, शब्दप्रामाण्य व अंधश्रद्धा हीं वावरत होतींच; पण शिवाय आजच्या मानानें त्या वेळीं शिक्षणाचें क्षेत्रहि संकुचित होतें. इतर प्रांतांतील राहो, पण महाराष्ट्राचेंच उदाहरण आपण घेऊं. मराठेशाहींतील किंवा पेशवाईंतील शिक्षणक्रम पाहिला तर असें दिसून येतें कीं, वेदशास्त्रांचें पठनपाठन, आणि तत्सं-बंधीं ग्रंथलेखन व वादविवाद हाच विद्वत्तेचा व विद्याव्यासंगाचा मुख्य प्रांत. व्यवहारांत पडणाऱ्या सुशिक्षित लोकांना आमच्यापेक्षां पुष्कळ अधिक महत्त्वाचीं कामें त्या वेळीं करावयाचीं होतीं यावद्दल वाद नाहीं. कारण खुद्द इतिहास निर्माण करणें ही गोष्ट ऐतिहासिक चिटोरीं गोळा करण्यापेक्षां अधिक महत्त्वाची असें कोणीहि म्हणेल. पण सांगितलें तर कदाचित् आश्चर्य वाटेल कीं, वेदशास्त्र हें सोडून दिलें तर अक्षर, गणित, हिशेब, बखरी, तवारिखा, विक्रमबत्तिशी, वेताळपंचविशी, लटकचाळिशी, भारत–भागवत–रामायण यांतील आख्यानांच्या बखरी यांचें वाचन, स्तोत्रें व काव्यांतील उताऱ्यांचें पठन, जमाखर्चाच्या पद्धति, भूमापन, पत्रव्यवहाराचे मायने–हेंच काय तें मुख्यतः त्या वेळचें ‘उदार शिक्षण’ असून, वर सांगितलेल्या महत्त्वाच्या कामांत न पडणाऱ्या निष्क्रिय विद्या-व्यासंगीयांचीहि मजल यांपलीकडे फारशी जात नसावी. शिवाय बाहेरच्या जगाशीं दळणवळण कमी होतें, छापण्याची कला माहीत नव्हती. विशिष्ट धर्मदृष्टीमुळें देशांतील जगाशींहि व्यवहार संकुचित होता. आणि ज्याला आज ऐतिहासिक दृष्टि किंवा तुलनात्मक चिकित्साबुद्धि असें आपण

म्हणतों तिचें तेव्हां अस्तित्वहि नसल्यामुळें, स्थानिक व सार्वदेशीय इतिहास आणि मनुष्यसमाज यांचे जे निरनिराळे संबंध आधुनिक दृष्टीला दिसतात ते तेव्हां दिसत नसल्यामुळें, इतिहाससंशोधनाची विद्याच मुळीं त्या वेळीं जन्मास आली नव्हती, असें म्हटलें तरी चालेल.

वास्तविक आम्हांला आज पेशव्यांचा काळ जितका जुना तितकाच जवळ जवळ पेशवाईतील लोकांना शिवाजीप्रभृतींचा काळ जुना. दोघांनाहि या दोन्ही काळांचें सारखेंच कौतुक वाटावयास पाहिजे. आम्हीच तेवढे आज परंपरेचे अभिमानी आहों आणि पेशवाईतील लोकांना मात्र प्राचीनपरंपरा प्रिय नव्हती असें मुळींच नाहीं. आज नानाफडणविसांच्या हातचा लेख पाहून आम्हांस जितका आनंद होतो तितकाच आनंद नानाफडणविसांसहि शिवाजीच्या हातचा लेख पाहून खचित झाला असता. पण जितक्या उत्सुकतेनें नानांच्या व त्यांच्या बरोबरीच्या लोकांनीं लिहिलेले कागदपत्र आम्ही आज जतन करून ठेवितों, तितक्या उत्सुकतेनें शिवकालीन पत्रव्यवहार जतन करून ठेवण्याची इच्छा व कळकळ नानाफडणविसांच्या काळच्या लोकांना कदाचित् असेल; पण ती असल्याचा मात्र उल्लेख कोठें दृष्टीस पडत नाहीं. यावर कोणी कदाचित् असें म्हणेल कीं, जिवंत राष्ट्रीला इतिहास-संशोधनाची आवश्यकता काय? इतिहास निर्माण करण्यापुढें इतिहास संशोधनाची काय किंमत? पण या प्रश्नांत फारसा अर्थ नाहीं. कारण एक तर सत्यज्ञान हें फक्त मृत—किंवा मुमूर्षु म्हणा—राष्ट्राचें औषध किंवा अन्न आहे असें विचारांतीं कोणासहि म्हणतां यावयाचें नाहीं. जिवंत राष्ट्रासहि तें उपयोगी पडेलच. कारण पूर्वपरंपरेचा अभिमान हा मुमूर्षु राष्ट्रास काय किंवा सजीव राष्ट्रास काय दोघांसहि सारखाच प्रिय असतो. मुमूर्षु राष्ट्राला तो भावी आशेचा आधार म्हणून प्रिय असेल, तर सजीव राष्ट्राला तो आपल्या वैभवाचें प्रतिबिंब म्हणून आवडेल; पण कोणत्याहि दृष्टीनें कां होईना परंपरेचा अभिमान हा सर्वांसच प्रिय असतो.

आज आम्ही महाराष्ट्राचे लोक खालावलों म्हणूनच आम्हांला इतिहास-संशोधनाचा चाळा आवडतो असें जे म्हणत असतील त्यांना एका प्रश्नाचें उत्तर देणें अवघड जाईल; तो प्रश्न हा कीं, ज्यांचा आजचा काळ चालता आहे—किंबहुना जीं राष्ट्रें आज ऐश्वर्यशिखरास पोंचलीं आहेत अशा

राष्ट्रांतील लोकसुद्धां इतिहास-संशोधन करितात तें कां ? इंग्लंडच्या ऐतिहासिक ग्रंथांतून आज आठ-आठशें, हजार-हजार वर्षांपूर्वीचे लेख उतरलेले वाचावयास आणि संग्रहालयांतून पहावयास मिळतात. इंग्लंडां-तील लोकांना वैभवाच्या दृष्टीनें आज जुन्या काळाकडे पाहण्याचें कारण नाहीं. तरी पण जॉन राजानें तेराव्या शतकांत आपल्या प्रजेस दिलेली मर्यादित स्वातंत्र्याची सनद पाहून त्यांना कौतुक वाटतेंच. इ. स. ५९७ सालीं एदलबर्ट नामक सॅक्सन् राजानें आपल्या हातानें लिहिलेलें पत्र, किंवा अँग्लो सॅक्सन् कवींचे सर्वांत जुने उतारे अशा वस्तूंची संग्रहालयांतून देवळांतल्या मूर्तीप्रमाणें जोपासना, पूजा व अर्चा केलेली आढळते ती काय म्हणून ? अर्थात् इतिहास-संशोधनाच्या आवडीमुळेंच. त्याशीं राजकीय उन्नति अगर अवनति यांचा संबंध नाहीं. सतराव्या शतकापूर्वी युरोपांतील लोकांना आणि एकोणिसाव्या शतकांतील हिंदुस्थानामधील लोकांना परं-परेची आवड सारखीच होती. पण ऐतिहासिक दृष्टीची वाणहि दोघांमध्यें सारखीच होती हीच गोष्ट निर्विवाद होय. हल्लीं सुदैवानें पाश्चात्य शिक्षणा-च्या योगानें ही दृष्टि आपणांस आलेली आहे व दुर्दैवानें त्याच वेळीं जुन्या राष्ट्रीय वैभवाकडे पाहून भूक निववण्याचीहि वेळ आलेली आहे, असा योग जुळला ही गोष्ट मात्र निराळी !

इतिहास संशोधनाची आवड मनुष्यमात्रास दोन हेतूंनीं उत्पन्न होते. एक तर भूतकालीन माहिती ही कल्पनानिर्मित चित्रविचित्र रंगांनीं रंगविलेल्या आणि अद्भुतरम्य अशा वस्त्रांनीं नटविलेल्या व्यक्तींचें व समाजरचनेचें चित्र डोळ्यांपुढें उभें करते व त्यांतल्या त्यांत पहावयाचें तर दुसरें कारण असें कीं, गतकालीन माहिती मिळूं शकते ती स्वभावतःच थोडी व दुर्मिळ असते. आपल्या भोंवतीं चालू व्यवहारांत आढळणाऱ्या अशा ज्या क्षुद्र गोष्टींकडे आपण कधीं ढुंकूनहि पहाणार नाहीं, त्यांजवर केवळ गतकालीनत्वाचा सोनेरी मुलामा चढल्यामुळें त्या संग्रहणीय, मननीय व कौतुकास्पद ठरतात. आम्हांस तर कित्येक वेळां असें वाटतें कीं, केवळ जुन्या काळच्या पण अगदीं नादान अशा एखाद्या मनुष्याचें शरीर मेंढा भरल्यामुळें जतन होऊन राहिलेलें जर आज यदृच्छेनें उपलब्ध झालें, तर वर्तमानकाळच्या सर्वमान्य व सर्वोत्तम अशा व्यक्तींना पहाण्याला जी गर्दी

असेल तिजपेक्षां या भूतकालीन कलेवराला पहाण्याला अधिक गर्दी लोटेल! "कौतुकाच्या दृष्टीनें पहातां, ब्रिटिश 'म्यूझियम' मधील इजिप्शियन 'ममी' ही ब्रिटिश साम्राज्याचा मुकुट धारण करणाऱ्या प्रत्यक्ष राजापेक्षांहि आपणांस अधिक दर्शनीय वाटते" असें जर कोणी सांगितलें तर आम्हांस त्याचें कांहींच नवल वाटणार नाहीं! पण हें कौतुक झालें तरी असल्या वस्तूंच्या दुर्मिळतेमुळेंच होय हें विसरतां कामा नये. इतिहास-संशोधनाचा हेतु अज्ञात अशी माहिती मिळविणें हा आहे खरा; पण इतिहाससंशोधनाला जी खरी लज्जत येते ती केवळ असली माहिती दुर्मिळ म्हणून! सर्व जुन्या काळचें जग अगदीं आजकालच्या जगासारखें मनुष्याला कायमचें डोळ्यापुढें दिसत असतें तर त्याचें ज्ञानभांडार अर्थात् फारच वाढलें असतें. पण मर्माची गोष्ट अशी आहे कीं, मग त्या ज्ञानाची त्याला फार किंमतहि वाटली नसती! आपल्या डोळ्यांसमोर पेढ्याबर्फीचे ढीगचे ढीग लागलेले असतां हलवायाला त्यांतील एखादा तुकडा उचलून तोंडांत टाकावा असें कधींहि वाटत नाहीं. पण तोच मिठाईचा एखादा चुकलामाकलेला तुकडा कुलूप लावलेल्या कपाटांत तावदानांतून मुलास अस्पष्ट दिसला तर त्याला त्याचें जें महत्त्व वाटतें व तो मिळविण्याकरितां तो जी धडपड करितो ती सांगतां पुरवत नाहीं. जुनें हें कौतुकास्पद वाटतें खरें; पण तें कां? तर सर्वभक्षक असा काळ हा वस्तुमात्र खाऊन नाहींसें करितो, आणि केवळ भातुकलीच्या खेळांत जेवणारीं मुलें जशी नखभर वानगी कोठें तरी लपवून ठेवितात तशा प्राचीन व ऐतिहासिक स्मृतींच्या केवळ वानगीदाखल काळ हा किरकोळ थोड्याशा जिनसा कोठें उरूं देतो म्हणून! श्रीकृष्णानें अर्जुनाला अनंत कोटि ब्रह्मांडें समाविष्ट झालेल्या विश्वाच्या रूपाचें दर्शन करविलें, तेव्हां तो अद्भुत रसामध्यें नखशिखांत बुडाला हें खरें; पण तो दिव्य देखावा केवळ क्षणिक व दुर्मिळ होता म्हणून! उदात्त असाहि तो देखावा श्रीकृष्णानें जर अर्जुनास कायमचाच मिळवून दिला असता, आणि घरच्या कपाटांत ठेविलेल्या ताजमहालाच्या संगमरवरी प्रतिमेकडे आपणांस मनांत येतांच वाटेल तेव्हां पहातां येतें इतकें सुलभ जर अर्जुनाला विश्वरूपदर्शन झालें असतें, तर त्याच्या तोंडून

निघालेली स्तुति किंवा आश्चर्याचे उद्गार खचित निघाले नसते असें आम्हांस तरी वाटतें !

असो. प्राचीन वस्तुज्ञानाची आवड ही अशा रीतीनें स्वभावसिद्धच असली तरी ज्याला इतिहास-संशोधन म्हणतां येईल तें आधुनिक संस्कृतीचें फळ आहे ही गोष्ट वरील विवेचनावरून वाचकांचे लक्षांत आलीच असेल. आतां इतिहास-संशोधनाचें जें काम गेल्या ३०–३५ वर्षांत महाराष्ट्रांत झालें, त्याचें थोडेंसें समालोचन करूं.

— २ —

इतिहास-संशोधनाचें महत्त्वाचें असें काम जरी गेल्यां तीस पसतीस वर्षांत विशेष झालें, तरी या संशोधनाच्या इतिहासाची पूर्वपरंपराहि थोडी-बहुत समालोचित करणें जरूर आहे. या पूर्वपरंपरेंत प्रथमतः बखरकारांचा परामर्ष घेतला पाहिजे. आपणांमध्यें पूर्वी ऐतिहासिक दृष्टि फारशी नव्हती, या सामान्य विधानाला जर थोडाबहुत अपवादात्मक विरोध होण्यासारखा असला तर तो बखरनविसांकडून. कारण त्यांचें कामच मुळीं पूर्वकालीन वृत्तांत परंपरेनें व यथातथ्य नमूद करावयाचा हें होतें. बखरी लिहिण्याची कल्पना मराठ्यांनीं प्रायः तवारिखा लिहिणाऱ्या मुसलमानांकडून अनुकरण-प्रियत्वामुळें उचलली. पण तवारिखांप्रमाणेंच बखरींतहि, ऐतिहासिक सत्याची छाननी चिकित्सक बुद्धीनें फारशी झालेली आढळत नाहीं. जें काय आढळतें तें हेंच कीं, बखरींतून बखरनविसांच्या पक्षाचा इतिहास पूर्वीच्या दंतकथांवरून तिखटमीठ लावून, अलंकारिक भाषेनें, चटकदार शब्दांनीं, पण स्वाभिमानपूर्णतेनें आणि अत्यंत सुरस रीतीनें असा वर्णिलेला असतो. इतिहास व ऐतिहासिक कादंबऱ्या यांच्या दरम्यान या बखरींस स्थान देतां येईल. राजपुत्र व अमीरउमराव यांची तरुण पिढी यांना स्वदेशाच्या वृत्तान्ताचें शिक्षण देणें हा बखरींचा मुख्य उद्देश असे; यामुळें बऱ्याचशा बखरी राजाज्ञेनें किंवा निदान राजदरबारच्या आश्रयानें बखर-नविसांकडून लिहविल्या जात. महाराष्ट्राचे इंग्रज इतिहासकार यांनीं

अशा बखरींचा आधार आपल्या इतिहासग्रंथांत बराचसा घेतलेला आहे; व अशा सुमारें पंचेचाळीस पन्नास बखरी आजवर छापूनहि निघालेल्या आहेत. या बखरी फारच स्फूर्तिकारक आहेत; पण कालनिर्णय, हकीकतींचें सापेक्ष महत्त्व व ऐतिहासिक सत्य यांच्या दृष्टीनें त्यांजवर सर्वस्वीं भिस्त ठेवतां येत नाहीं. त्यांचा पुरावा दंतकथात्मक म्हणजे दुय्यम प्रतीचा असल्यामुळें, तत्कालीन कागदपत्रांच्या अस्सल पुराव्यापुढें त्या फिक्या पडतात व केव्हां केव्हां खोट्याहि ठरतात.

कालानुक्रमानें पाहतां बखरीनंतर इंग्रज इतिहासकारांचा परामर्ष घेतला पाहिजे. ऑर्म, स्कॉट वेरिंग वगैरेंनीं मराठ्यांच्या इतिहासावर थोडेंबहुत लिहिलें आहे; पण तें खरोखर थोडें असून, शिवाय त्यांना अस्सल कागदपत्रांचें साहाय्य असावें तितकें नव्हतें. हें साहाय्य असतें तर त्यांनीं त्याचा उपयोग मात्र खचित फार चांगला केला असतां; कारण त्यांना ऐतिहासिक व चिकित्सक बुद्धि होती. मराठ्यांच्या इतिहासाबद्दल त्यांना अभिमान वाटण्याचें अर्थात् कारणच नव्हतें; व क्वचित्प्रसंगीं मराठ्यांविषयींचें वाईट मत त्यांच्या सत्यान्वेषणाच्या मार्गांत आलें असण्याचाहि संभव आहे. पण एकंदरीनें मराठी बखरनविसांपेक्षां त्यांच्यामध्यें सत्यान्वेषणबुद्धि अधिक होती यांत शंका नाहीं. असो; या एकंदर इंग्रज इतिहासकारांमध्यें अग्रपूजेचा मान ग्रँटडफ यालाच दिला पाहिजे. याचें कारण असें कीं, त्यांचा ग्रंथ इतर सर्व इंग्रज ग्रंथकारांच्या ग्रंथाहून अधिक पूर्ण व अधिक विश्वसनीय आहे. इतकेंच नव्हे, तर ग्रँटडफ यानें या कामीं जो स्वार्थत्याग दाखविला तो एखाद्या निःसीम महाराष्ट्रीयासहि भूषणभूत झाला असता. ग्रँटडफ यास साधनसामुग्रीच्या दृष्टीनें पाहतां सर्वत्र अनुकूलता होती. कंपनी-सरकारचे मुंबई व सुरत येथील कागदपत्र तर त्यास पहावयास मिळालेच; पण पेशव्यांचें राज्य खालसा झाल्यामुळें खुद्द पेशव्यांच्या दप्तरांतील सर्व कागदहि त्यास मिळाले, शिवाय विशेष महत्त्वाचा असा एक संग्रह त्यास मिळाला तो सातारच्या राजांच्या घरचा. या संग्रहांत खुद्द पेशव्यांनाहि माहीत नसलेले असे अनेक कागदपत्र असले पाहिजेत; व स्वतः ग्रँटडफ हाच सातारा येथील ब्रिटिश रेसीडेंट असल्यामुळें त्याला या बाबतींत सर्वस्वीं मुक्तद्वारच होतें. बंगालच्या कारभारासंबंधाचे विलायतेंतील ईस्ट इंडिया

कंपनीचे ऑफीसमधील कागदपत्र व पोर्तुगीज सरकारनें पाठविलेले स्वतःच्या कागदपत्रांतील उतारे हेहि ग्रँटडफ यांस मिळाले होते. शिवाय महाराष्ट्रांतील राजेरजवाडे, संस्थानिक, सरदार, देवस्थानांचे व्यवस्थापक वगैरेंकडून अस्सल कागदपत्रें व माहितीचीं टिपणेंहि, कांहीं अधिकाराच्या जोरावर, कांहीं मोहबतीखातर त्यानें मिळविलीं होतीं. मराठी व पर्शिअन् भाषेंतील बाडें ग्रँटडफकडे शेंकडों येऊन पडलीं होतीं व त्यांतील कित्येक तर खुद्द ग्रँटडफच्या संपूर्ण इतिहासग्रंथाएवढीं मोठीं होतीं असें खुद्द ग्रँटडफनेंच लिहिलें आहे. अर्थात् ऐतिहासिक साधनसामुग्री मिळविण्यास जशी परिस्थिति पाहिजे तशी ग्रँटडफ याला होती, यामुळें त्याचा ग्रंथ हें मराठी इतिहासाचें मुख्य भांडार अशा स्वरूपाचा झाल्यास त्यांत नवल नाहीं.

आतां ग्रँटडफ हा किती झाला तरी परकीय; त्याला मराठ्यांचा म्हणून कांहीं विशेष अभिमान असण्याचें कारण नाहीं. शिवाय त्याच्या डोळ्यांदेखत त्याच्याच जातभाईंनीं मराठ्यांचा पाडाव करून त्यांचें सर्व राज्य हिसकावून घेतलेलें; यामुळें इंग्रज हे जेते व मराठे हे जित म्हणून मराठ्यांविषयीं त्याचा अनेक बाबतींत वाईट ग्रह असण्याचा संभव आहे आणि कित्येक बाबतींत तो ग्रह खराहि असणार; कारण त्या वेळीं मराठेशाहींतील गुणांचा लोप होऊन मराठ्यांच्या आंगच्या सर्व दोषांचा परिपाक झालेला उघड दिसत होता. दुसरें असें कीं, त्याच्यापुढें आलेलीं साधनें बरींचशीं दुय्यम पुराव्याच्या स्वरूपाचीं असून, जे अस्सल कागदपत्र त्याजपुढें होते ते सर्व समजून घेऊन व चिकित्सेच्या रसायनानें पचनीं पाडून मग इतिहास लिहिण्याइतका स्वस्थपणा किंवा सवड त्याला नसावी. या सर्व कारणांमुळें गँटडफच्या ग्रंथांत अनेक चुका व दोष राहून गेलेले आहेत; पण निदान आम्हांस आश्चर्य वाटतें तें ग्रँटडफच्या इतिहासांत इतक्या चुका व दोष कसे राहिले याविषयीं नाहीं, तर त्या चुका व दोष सर्व जमेस धरले असतांहि एका इंग्रजानें मराठ्यांचा इतका चांगला इतिहास कसा लिहिला याविषयीं! ग्रँटडफनें हा इतिहास लिहिला यांत त्याचा मुख्य हेतु मराठ्यांचें वैभव इंग्रजांच्या निदर्शनास आणण्याइतका उदात्त नसून इंग्रजांना मराठ्यांची माहिती करून देणें असा स्वार्थी व कुत्सित होता असें कित्येक म्हणतात. पण एक तर त्याच्या लेखांत मराठ्यांविषयीं कांहीं कांहीं बाबतींत

आदरबुद्धि दिसून येते हें कोणाहि सरळ बुद्धीच्या मनुष्यास नाकबूल करितां यावयाचें नाहीं. एरवीं तो हें इतिहासलेखनाचें काम मुळीं अंगावरच घेताना ! शिवाय त्याच्या स्वार्थत्यागावरून पहातां त्याच्या हेतूविषयीं सर्वस्वीं कुत्सित अनुमान काढणें बरोबर होणार नाहीं. त्याच्या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत प्रकाशकानें त्याचें जें आत्मनिवेदन प्रसिद्ध केलें आहे तो सर्वस्वीं शिष्ट सत्यापलाप मानावयाचा असेल तर गोष्ट वेगळी; पण इतर कामें संभाळून, जाग्रणें करून, दुखणाऱ्या डोक्यास गार पाण्याच्या पट्टया बांधून ग्रँटडफनें हा ग्रंथ लिहिला. तो लिहिण्यास कोणीं बक्षिस लावलें नव्हतें. त्याचा ग्रंथ कोणीहि प्रकाशक प्रथम घेईना. मराठ्यांविषयीं माहिती हवी कोणाला ? याकरितां 'मराठ्यांचा इतिहास' हें नांव बदलून 'मोंगल रियासतीचा ऱ्हास' किंवा 'हिंदुस्थानांतील इंग्रजी सत्तेचा उदय' असें ग्रंथास नांव द्या तर तो आम्ही घेऊं असें प्रकाशकानें सांगितलें असतांहि ग्रँटडफ तें नांव बदलण्यास तयार झाला नाहीं. पुस्तक छापून तयार झाल्यावरहि कंपनीच्या कोर्ट ऑफ डिरेक्टर्सनीं त्यांच्या फक्त चाळीसच प्रती विकत घेतल्या. छापखान्याकडे पाठविण्याची प्रत तयार होईपर्यंत लागलेल्या दोन हजार पौंडांपैकीं १७०० पौंड खुद्द ग्रँटडफ यास अंगावर सोसावे लागले. मग नफा मिळणें तर दूरच ! या सर्व गोष्टींवरून त्याच्या हेतूविषयीं तरी शंका राहूं नये. एवढेंच नव्हे तर मराठी इतिहासाच्या निःस्वार्थी, उदार व एकनिष्ठ संशोधकांत त्याची गणना होणें हेंच न्यायास अनुसरून आहे. ग्रँटडफच्या ग्रंथानंतर आम्हांला हजारों अस्सल कागदपत्र उपलब्ध झाले असल्यामुळें त्या ग्रंथांतील शेंकडों चुका दाखवितां येणें आज आपणांस शक्य झालें आहे आणि त्या आजच्या इतिहाससंशोधकांनीं अगत्य दाखवाव्याहि. पण केवळ अशा चुका दाखवितां आल्यामुळें पूर्वीच्या परिस्थितींत लिहिलेल्या या ग्रंथाचें महत्त्व कमीं होऊं शकत नाहीं.

मराठी इतिहासाच्या इंग्रज संशोधकांची यापुढील पिढी म्हटली म्हणजे मुंबई ग्याझेटियरकार मि० कॅम्बेल, मि० फॉरेस्ट, मि० फ्लीट, मि० जॅक्सन वगैरे लोकांची. ग्रँटडफच्या ग्रंथाप्रमाणें मुंबई ग्याझेटियरमध्येंहि पुष्कळच चुका व अपसिद्धान्त आहेत. पण त्यांत एकंदरीनें अनेक देशी व विदेशी

संशोधकांचे श्रम खर्ची पडलेले असून, त्यांतील ऐतिहासिक माहितीचा संग्रह बराच चांगला आहे. उदाहरणार्थ डॉ० भांडारकर यांचा 'दख्खनचा प्राचीन इतिहास' म्हणून जो ग्रंथ प्रसिद्ध आहे तो मूळ ग्यॅझेटियरसाठींच लिहिलेला होता. यावरून ग्यॅझेटियरमध्यें संग्रहित झालेल्या ऐतिहासिक साधनांच्या कार्याविषयीं कांहीं कल्पना येऊं शकेल. ग्यॅझेटियरसंबंधानें एक गोष्ट विशेष लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, हे ग्रंथ सरकारी रीतीनें प्रसिद्ध झाल्यामुळें त्यांचा संपादक या नात्यानें एखाद्या बड्या युरोपियन गृहस्थाचें नांव जाहीर होतें; परंतु त्यांना साहाय्य करणारे अनेक एतद्देशीय विद्वान् शास्त्री वगैरे असत, व त्यांचीं नांवें जरी लोकप्रसिद्ध नाहींत तरी त्यांजकडून झालेलें इतिहाससंशोधनाचें गुप्त दान महाराष्ट्रीय चित्रगुप्ताच्या वहीला जमा झालेलें आहे. पंडित भगवानलाल, रा० पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी वगैरे संशोधक या सदराखालीं येतात. कित्येकांच्या मतें पंडित भगवानलाल यांस इंग्रजी चांगलें येत असतें व ते स्वभावानें जरा कमी भिडस्त असते तर त्यांचा लौकिक डॉ० भांडारकर यांच्या बरोबरीचा व्हावा इतकी त्यांची कामगिरी महत्त्वाची होती.

यानंतर आपण स्वयंस्फूर्तीच्या, व स्वतंत्र अशा देशी संशोधकांकडे वळूं. इंग्रजी विद्येचा प्रसार झाल्यावर परदेशी इतिहास व परदेशी ऐतिहासिक विवेचनपद्धति यांचा परिचय झाल्यामुळें संशोधनाची व चिकित्सेची दृष्टि सुशिक्षित लोकांना येऊं लागली. पण शिक्षणप्रसारास सुरुवात झाली त्या काळीं त्यांचा बराचसा वेळ बालोपयोगी व शालोपयोगी ग्रंथ रचण्यांतच गेला; यामुळें जांभेकरशास्त्री, कृष्णशास्त्री चिपळूणकर अशा बुद्धिवान् व विद्वान् सुशिक्षितांच्या हातून संशोधन व चिकित्सा यांविषयीं कांहीं काम झालें नाहीं. 'अनेक-विद्या-मूलतत्त्व' व कांहीं व्याकरण-विषयक 'निबंध' यांखेरीज मराठी भाषा व इतिहास यांना थोरल्या चिपळूणकर शास्त्रीबोवांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. युरोप खंडांतील देशांचे इतिहास व इतिहासचर्चा वाचून जी चिकित्सक बुद्धि आमच्या इकडे आली तिचीं पहिलीं फळें डॉ० भाऊ दाजी, डॉ० भांडारकर, रा० नीलकंठराव कीर्तने इत्यादि गृहस्थांच्या उद्योगांत दिसून आलीं. पैकीं डॉ० भाऊ दाजी यांच्या संशोधनाचें काम प्राचीन व मध्यकालीन

इतिहासापुरतेंच झालें. डॉ० भांडारकर यांनीं दख्खनचा इतिहास लिहून प्राचीन व अर्वाचीन दोनहि कालांच्या इतिहाससंशोधनाविषयीं आवड प्रकट केली. पण त्यांतल्यात्यांत पाहिलें तर डॉ० भांडारकर यांना आधुनिक इतिहासाचे संशोधक या सदराखालीं मांडतां येणार नाहीं. त्यांचा कल बराचसा प्राचीन संशोधनाकडे आहे. रा० कीर्तने यांची ग्रँटडफवरील टीका हा आधुनिक महाराष्ट्रीय इतिहासचिकित्सेचा पहिला नमुना होय. कीर्तन्यांच्या टीकेनंतर विविधज्ञानविस्तारांतून एक बखर, एक राजनीति व काशीराजाच्या पानपतच्या बखरीचें भाषांतर अशीं तीन प्रकरणें प्रसिद्ध झालीं आणि हाच ऐतिहासिक संशोधनरूपी नदीचा खरा उगम होय. पुढें लवकरच साने, मोडक, चिपळूणकर यांच्या 'काव्येतिहाससंग्रह'-रूपानें ही नदी जी अखंड वाहण्यास सुरुवात झाली ती आजवर एकसारखी वाहत आली असून, दिवसानुदिवस तिचा प्रवाह अधिकाधिक विस्तार पावूं लागला आहे. यापुढें प्रभु लोकांच्या इतिहासाचीं साधनें प्रसिद्ध होऊं लागलीं. बडोदें येथें शिवराजाच्या दोन बखरी छापल्या गेल्या. याच सुमारास मिरज येथें रा० वासुदेवशास्त्री खरे यांच्या इतिहाससंशोधनास सुरुवात झाली. १८९२–९३ सालीं रा० पारसनीस यांनीं झाशीकर राणीचें चरित्र लिहिलें. १८९५ सालीं शिवाजीच्या स्मारकाची चळवळ रा० ब० रानडे यांच्या कल्पनेनें, महाराष्ट्रांतील संस्थानिकांच्या सहानुभूतीनें, व रा० टिळक यांच्या उद्योगानें सुरू झाली. १८९६सालीं रा० पारसनीस यांच्या 'भारतवर्ष' नामक मासिक पुस्तकास सुरुवात झाली. सन १८९७ च्या सुमारास रा० खरे यांचा 'ऐतिहासिक लेखसंग्रह' प्रसिद्ध होऊं लागला. व पुढें लवकरच राजवाडे यांचीं 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' प्रकाशित होण्यास सुरुवात झाली. अशा रीतीनें इतिहाससंशोधनाचें काम बरेंच फैलावून अनेक उपयुक्त लेख व ग्रंथ एकामागून एक बाहेर पडले. त्यांत न्यायमूर्ति रानडे व तेलंग यांचे इतिहासावरील इंग्रजी लेख, रा० ठाकूर यांचा 'थोरल्या माधवरावावरील निबंध', डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीनें छापलेल्या पेशव्यांच्या 'रोजनिशा', खरे यांचें 'नानाफडणविसांचें चरित्र', 'अधिकारयोग' हा निबंध, 'हरिवंशाची बखर' व 'इचलकरंजी संस्थानचा इतिहास', रा० शंकरराव देव व चांदोरकर यांनीं

रामदासाचें चरित्र व ग्रंथ यांसंबंधानें केलेलें संशोधन; रा० सरदेसाई यांनीं लिहिलेलीं इतिहासाचीं पुस्तकें, नातूंचा महादजी शिंदे, जिवबादादा केरकर (बक्षी) यांच्या चरित्रासारखे ग्रंथ, संस्थानिक व जहागीरदार यांच्या घराण्यांचे इतिहास, रा० अनंत नारायण भागवत यांचीं ऐतिहासिक पुस्तकें, रा० राजारामशास्त्री भागवत, रा० भानू, रा० बा. ना. देव वगैरेंचे ऐतिहासिक लेख इत्यादि अनेक प्रकारची ऐतिहासिक सामुग्री अनेकांच्या हातून निर्माण झालेली आहे.

परंतु त्यांतल्यात्यांत पाहतां साने, राजवाडे, खरे व पारसनीस इतक्यांच्याच हातून नांव घेण्यासारखी भरीव कामगिरी झाली. साने यांच्या हातून पूर्वीं सुमारें वीस बावीस बखरी, भूषणकविकृत शिवराजभूषण काव्य व सुमारें ५०० ऐतिहासिक कागदपत्र प्रसिद्ध झाले असून साने हे अद्यापिहि इतिहाससंशोधनाच्या कामीं आपलें लक्ष जागरूक ठेवीत असतात. रा० साने यांचे मितभाषी, टापटिपीचे व सुविनीत ऐतिहासिक लेख हे खरोखर प्रत्येक इतिहाससंशोधकाला अनुकरणीय आहेत. अस्सल ऐतिहासिक कागदपत्र मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध करण्याचें काम राजवाडे, पारसनीस व खरे यांच्या हातून प्रथम सुरू झालें. रा० ब० पारसनीस यांच्या चिकित्सेंत बिनचूकपणा अथवा मार्मिकपणा कमी असला तरी ऐतिहासिक लेख व वस्तु यांचा संग्रह करण्याच्या कामीं त्यांच्या पदरीं पुष्कळ यश पडलें आहे. किंबहुना इतिहास संशोधनाचा जितका अनेकविध उपयोग रा०ब० पारसनीस यांस स्वतःला करून घेतां आला तितका तो राजवाडे व खरे यांसहि करून घेतां आला नाहीं! 'ब्रह्मेंद्रस्वामींच्या चरित्र' प्रसंगानें त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या कागदपत्रांपेक्षां 'भारत-वर्ष' मासिक पुस्तक अधिक आशाप्रद होतें. पण भारतवर्षापेक्षां हल्लीं सुरू असलेल्या त्यांच्या 'इतिहास-संग्रहा'चें महत्त्व फारच अधिक आहे. सातारा व मेणवली येथील दप्तरें, मध्यहिंदुस्थानांतील संस्थानांतून मिळविलेले कागदपत्र व विलायतेंतील इंडिया ऑफिस व ब्रिटिश-म्यूझियम यांतील ग्रंथसंग्रहांतून मिळविलेले कागदपत्रांचे उतारे ही सर्व साधनसामुग्री विचारांत घेतली असतां, रा० ब० पारसनीस यांच्या उद्योगाची कल्पना येते. रा० खरे यांचें काम एका विवक्षित कालापुरतें असलें तरी त्यांच्याइतकी टापटीप, व्यवस्थितपणा व

एकसूत्रता इतर इतिहाससंशोधकांमध्यें क्वचितच दिसून येते. रा० ब० पारसनीस यांजसारखें द्रव्यसाधन किंवा रा०राजवाडे यांच्यासारखें संचार-स्वातंत्र्य नसतांहि रा० खरे, यांनीं आजवर सुमारें ५००० पृष्ठें भरतील इतकी ऐतिहासिक सामुग्री सर्वस्वीं स्वावलंबन व स्वाभिमान यांच्या भिस्तीवर प्रसिद्ध केली आहे, व अद्यापहि त्यांचा उद्योग निश्चयीपणानें सुरू आहे. रा० खरे यांच्या लेखांत रा० सान्यांप्रमाणेंच विवेचकता व नेमस्तपणा असून जमलेल्या ऐतिहासिक साधनसामुग्रीवरून संगतवार इतिहासप्रबंध लिहिण्यास तेच फार योग्य आहेत.

पण या सर्वांहून रा० राजवाडे यांचा उद्योग दांडगा व त्यांचें यश श्रेष्ठ आहे. महाराष्ट्र-इतिहास-संशोधनासंबंधानें त्यांच्या हातून जितकी चळवळ व जितका स्फूर्तिकारक उद्योग झाला तितका आजपर्यंत कोणाहि महाराष्ट्रीय इतिहास-संशोधकाकडून झाला नाहीं या म्हणण्यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं. मराठी भाषेचा किंवा मराठी इतिहासाचा असा कोणताहि काळ नाहीं कीं, ज्यासंबंधानें रा०राजवाडे यांनीं थोडेंना थोडेंतरी संशोधन व थोडी-ना थोडी तरी चर्चा केली नाहीं. या धाडसी संशोधकाच्या हातून महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांवर झालेल्या स्वाऱ्या, पूर्वकालच्या मराठी लष्करांच्या स्वाऱ्यांप्रमाणेंच यशस्वी झाल्या व होत आहेत. पायाळू माणसाला जसें भूमिगत द्रव्य हटकून सांपडतें म्हणतात तशीच कांहींशी स्थिति इतिहास-संशोधनासंबंधानें राजवाड्यांची आहे. त्यांच्या इतक्या बिनमुरवतखोर स्वभावाच्या माणसाच्या हातून ऐतिहासिक लेखांचीं गुप्त भांडारें अशीं कशीं उघडलीं गेलीं हा सकृद्दर्शनीं एक मोठाच चमत्कार वाटतो. ऐतिहासिक लेख मिळविणें, त्यांतील मजकुराची नक्की किंमत करणें, त्यांचा दर्जा लावणें व त्यांवरून प्रमेय सांगणें या गोष्टींविषयीं राजवाडे यांना चिरपरिश्रमानें जणूंकाय एक प्रकारची सिद्धिच प्राप्त झाली आहे असें म्हणतां येईल. मात्र कागदपत्र प्रसिद्ध करण्याच्या कामीं एकसूत्रीपणाच्या अभावाचा दोष त्यांच्या संशोधनाच्या कार्यात उघड दिसून येतो. तसेंच थोडया पुराव्याच्या पायावर अनुमानाची भली मोठी इमारत उठविण्याचें धाडस ते पुष्कळ वेळां करतात; आणि प्रतिपक्षावर टीका करण्याच्या भरांत येण्यास त्यांना फारसा वेळ लागत नसून, भरांत आल्यावर त्यासंबंधीं

एकांतिक व अवमानकारक अशीं विधानें करण्याचा मोह त्यांना सुटत नाहीं. पण संशोधक या नात्यानें त्यांच्या मनोरचनेंत सफाई किंवा मृदुता नसली तरी, त्यांच्या मनोरचनेच्या कोणत्याहि ओबडधोबड भागांतून देखील बुद्धिमत्तेचें तेज मात्र झळकल्याशिवाय रहात नाहीं. त्यांच्या धाडसा-मुळें अलौकिक कल्पना लोकांपुढें विचारास येण्यास मदत होते. शिवाय, त्यांच्या बुद्धीच्या अष्टपैलूपणामुळें व्यापक समाजशास्त्रापैकीं एक भाग या नात्यानेंहि इतिहास व वाङ्मय यांचा परामर्ष त्यांना घेतां आला आहे.

वरील सर्व संशोधकांच्या उद्योगानें ऐतिहासिक साधनांचे आजपर्यंत लहान मोठे असे सुमारें ३५ खंड छापून प्रसिद्ध झाले आहेत. परंतु प्रसिद्ध झालेले कागदपत्र प्रसिद्ध न झालेल्या कागदांच्या मानानें फारच थोडे आहेत. रा० पारसनीस, खरे व राजवाडे यांच्या संग्रहीं, रा० राजवाडे यांच्या अदमासाप्रमाणें, अनुक्रमें २०, ३० व ५० हजार पत्रें असून दर-खंडास सुमारें ५०० पृष्ठांप्रमाणें या कागदांचेच मुळीं १२५–१५० खंड छापून होतील. आणि अनुपलब्ध सामुग्री तर इतकी असावी कीं, तिचे कदाचित् १०००–१५०० हि खंड होतील! कारण ही सामुग्री अद्याप चोहोंकडे पसरलेलीच आहे. आजपर्यंत उपलब्ध झालेल्या साधनांत अठराव्या शतकांतील इतिहासाचीं साधनें बरींचशीं उपलब्ध झालेलीं आहेत; व सतराव्या शतकांतील म्हणजे शिवकालीन इतिहासाचीं साधनें हल्लीं थोडींशीं सांपडूं लागलीं आहेत; परंतु तेराव्या शतकापासून सतराव्या शतकांपर्यंतचीं साधनें अद्यापि जवळ जवळ कांहींच मिळालीं नाहींत असें म्हटलें तरी चालेल. देवगिरी, विजयनगर वगैरे ठिकाणीं या काळांत जिवंत मराठी राज्यें होतीं; पण त्यांविषयीं अस्सल कागदपत्रांनीं शाबीत झालेली अशी माहिती आपणांस कितीशी आहे? मग तेराव्या शतकापूर्वीच्या महाराष्ट्रा-च्या इतिहासाची तर गोष्ट बोलावयासच नको. इतिहास-संशोधनाचा टापू ग्वालेरीपासून तंजावरापर्यंत पसरलेला असून हल्लींचे दहा पांच तुटपुंजे इतिहास-संशोधक एवढ्या कामाला कसे पुरे पडणार? बरें, संशोधक अधिक निर्माण झाले तरी त्यांनीं मिळविलेल्या सामुग्रीचा उपयोग ती प्रसिद्ध झाल्याशिवाय लोकांस कसा होणार? अर्थात् या कामीं संशोधकांप्रमाणें धनिकांचेंहि साहाय्य पाहिजे. कदाचित् इतर धनिक राहोत; परंतु जीं

महाराष्ट्रीय घराणीं धनिक असून ऐतिहासिकाहि आहेत, त्यांच्यावर तरी इतिहास-संशोधनाच्या कार्याचा पहिला हक्क आहे, यांत शंका नाहीं. व याविषयीं रा० राजवाडे यांनीं आपल्या अकराव्या 'खंडा'च्या प्रस्तावनेंत स्फूर्तिदायक असे जे कळकळीचे उद्गार काढले आहेत ते जसेच्या तसे उद्धृत करून हा लेख पुरा करूं. ते उद्गार असेः—"साधनें प्रकाशण्या-संबंधानें एक चमत्कार आज कित्येक वर्षें मी निमूटपणें पहात आहें. तो असा कीं, शिंदे, होळकर, गायकवाड, आंग्रे, पटवर्धन, विंचूरकर, पवार, राजेबहादुर, कोल्हापूरकर, तंजावरकर, फडणीस, प्रतिनिधी, फलटणकर, भोरकर, जतकर, हैद्राबादकर, जयपूरकर, जोधपूरकर, सागरकर व इतर लहानमोठे संस्थानिक, जहागीरदार, इनामदार, देवस्थानवाले व मुत्सद्दी हे अद्यापपर्यंत काय करीत आहेत ! त्यांचीं दप्तरें किंवा त्यांच्यासंबंधाचे कागदपत्र आमच्यासारखा भिकाऱ्यांनीं शोधण्याचा व छापण्याचा प्रयत्न करावा आणि त्यांच्यासारख्या श्रीमंतांनीं अगदींच उदासीन व निद्रिस्त असावें, हा कोठला न्याय ? काय, त्यांचे पूर्वज त्यांचे कोणीच नव्हत ? पूर्वजांनीं संपादिलेल्या जहागिरी व राज्यें भोगण्यास राजी, आणि त्यांचे पराक्रम व इतिहास जाणण्यास गैरराजी; हा न्याय पृथ्वीवर इतर कोठेंहि पहावयास मिळावयाचा नाहीं. वासुदेवशास्त्री खऱ्यांनीं आपलें घरदार विकून पटवर्धन दप्तर छापावें; आणि मिरजकर, सांगलीकर, जमखिंडीकर, ह्यांनीं खुशाल झोंपा काढाव्या ? शिवाजीमहाराज, दमाजी गायकवाड, परशुरामभाऊ पटवर्धन हे आम्हां संशोधकांचे आजे पणजे आहेत आणि संस्थानिकांचे कोणी नाहींत, असेंच म्हणण्याची पाळी आली ! संस्थानिकांची व इनाम-दारांची आपल्या प्रत्यक्ष पूर्वजांसंबंधानें केवढी ही विस्मृति ! केवढा हा अपराध ! ही भरतभूमि पितृपूजेविषयीं प्रख्यात आहे, तींत प्रस्तुतकाळीं पितरांची अशी बोळवण व्हावीना ?"

# मुंबई व इंग्रज°

मुंबई शहर व इंग्रज यांचा संबंध प्रथम सन १६६१ सालीं जडला. अर्थात् 'आम्ही हिंदुस्थानचे किंबहुना खुद्द मुंबई शहरचे फार जुने रहिवाशी आहों' असा इंग्रज लोकांस अभिमान वाटणें योग्य आहे. श्रीशिवाजी-महाराजांची पुण्याची जहागीर इंग्रजांच्या मुंबईच्या जहागिरीहून थोडी अधिक जुनी आहे हें खरें. तथापि, शिवाजीमहाराजांस राज्याभिषेक होण्यापूर्वी दहा वर्षें मुंबईस इंग्रज गव्हर्नर अधिकार चालवीत होता. पुण्यास पेशव्यांची वस्ती किंवा हैद्राबादेस निजामाची वस्ती होण्याच्या पूर्वींपासून मुंबईस इंग्रजांची वस्ती आहे; आणि होळकर, शिंदे, गायकवाड हीं बहुमानाचीं नांवें अस्तित्वांत येण्यापूर्वी मुंबई हें इंग्रजांच्या सत्तेचें एक अधिष्ठान होऊन राहिलेलें होतें, अशी बढाई इंग्रज इतिहासकारांनीं मारली असल्यास ती अयथार्थ नाहीं. खुद्द शेक्सपिअरच्या वेळीं मुंबईत एकहि इंग्रजी अक्षर उच्चारलें जात नव्हतें हें खरें; परंतु त्याच्या मरणापासून अर्धशतकाचे आंतच मुंबईस इंग्रजीचा प्रसार सुरू झाला होता. असो; इंग्रजांचा व मुंबई शहराचा संबंध वर सांगितल्याप्रमाणें सन १६६१ सालीं जडला. त्याचें कारण असें झालें कीं, इंग्लंडचा त्या वेळचा राजा दुसरा चार्लस याचें पोर्तुगीज राज-कन्येशीं लग्न झालें. व या लग्नांत पोर्तुगालचा राजा सहावा अलफान्सो यानें मुंबई हें बेट या राजकन्येला आंदण दिलें. या सुमारास इंग्रजांची डोई हिंदुस्थानांत नुकती कोठें वर येऊं लागली होती. यापूर्वी सुमारें शंभर वर्षें सुरतेस इंग्रजांची वखार होती; पण या वखारवाल्यांचें जीवित व मालमत्ता सर्वस्वीं तेथील मुसलमान सुभेदारांच्या मर्जीवर असे. पश्चिम समुद्रावरील आधिपत्य पोर्तुगीज, सिद्दी व आंग्रे यांच्या दरम्यान वांटलेलें होतें. मुंबई बंदर हातीं आल्यावरही इंग्रजांचा मुंबई इलाख्यांतील मुलूख इतका थोडा होता कीं, साधारण एखाद्या मनुष्यास तो सर्व एका दिवसांत पायानें आक्रमितां येत असे ! या एकंदर जहागिरीचें उत्पन्न सालाचें तीस हजार रुपयेहि भरण्यासारखें नव्हतें.

---

° केसरी, ता. १५ डिसेंबर १९११

खुद्द मुंबई बेट हंफ्रे कुक यानें १६६१ च्या तहाअन्वयें १६६५ सालीं पोर्तुगीज लोकांकडून आपलेकडे घेतलें. त्या वेळीं त्यांत पांचसहा गढ्या, पांचचार पितळेच्या तोफा, शिंदीच्या व नारळाच्या झावळ्यांनीं शिवलेल्या छपरांचीं घरें, व आठदहा हजार कोळ्यामाळ्यांची वस्ती; इतक्याच काय त्या मिळकतीच्या वस्तू होत्या. आज धनाढ्य व अव्वल दर्जाच्या सुखवस्तु बंगलेवाल्यांनीं व्यापलेली 'मलबार-हिल' हें त्या वेळीं निवळ गायरान असून, सगळ्या डोंगरावरील कुरणाचें उत्पन्न सालिना फार तर शेंपन्नास रुपये असेल. इंग्रजांच्या हातीं मुंबई बेट आलें त्या वेळीं खालीं गोव्यास पोर्तुगीज, देशावर विजापूरचा बादशहा, घाटमाथा व कोंकण येथें मराठी राज्यसंस्थापक शिवाजी, व उत्तरेकडे मोगल अशा चारहि बाजूंनीं राजसत्तेस तणावे लागले होते. सुरतेच्या वखारवाल्यांची दुर्दशा मोगल सुभेदार वेळोवेळीं मनास वाटेल तशी करीत असे. जंजिरा, चौल आणि मुंबई या तीन ठिकाणांखेरीज बाकी सर्व कोंकणपट्टीचा मुलूख शिवाजीच्या हातीं होता; व शिवाजी मुंबई बेटावर केव्हां उतरेल याचा नेम नसे. जंजिऱ्याच्या शिद्दीचें सैन्य मधून मधून मुंबईवर येतच असे. हल्लीं मुंबई सरकारच्या ठरावांवर 'जंजिरे मुंबई' असा पत्ता लिहिलेला असतो. तो वाचणारास सन १६७८ सालीं जंजिऱ्याच्या शिद्दयानें वीस हजार फौजेनिशीं शेवरीवर उतरून 'जंजिरे मुंबई' –अर्थात् मुंबईचा किल्ला– यास वेढा दिला होता, हें वाचतांना इतिहासाच्या अघटितघटनापटुत्वाचें कौतुक वाटतें. सन १६९२ सालीं प्लेग येऊन गेल्यावर सुमारें दोनचार मुलकी अधिकारी व शेंसवाशें शिपाई एवढीच कायती मुंबईस इंग्रज लोकसंख्या असल्याचा दाखला सांपडतो. मुंबईस नेमलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांस मधून मधून बंड करण्याची हौसहि येई; व कित्येक इंग्रज अधिकाऱ्यांनीं फ्रेंचांना सामील होऊन देशद्रोहाचे व राजद्रोहाचे कट केल्याचेंहि आढळतें.

या सुमारास डच लोकांचें चोहोंकडे समुद्रावर प्राबल्य असल्यानें त्यांचीं लढाऊ जहाजें मुंबईच्या आसपास गोळीबार करीत असत. मुंबईस असणारें इंग्रज लोकहि त्या वेळच्या स्थित्यनुरूप अशिक्षित व कोत्या समजुतीचे धर्मभोळे असे होते. या बाजूस येऊन पडलेल्या इंग्रजांना सहा सहा महिन्यांतहि एखादें इंग्रजांचें जहाज दृष्टीस पडण्याची मारामार.

अर्थात् ते अडाणी, मागसलेले, दारूबाज, अनीतिमान् असे असत. अशा स्थितींत असणारें मुंबई बेट राजास आंदणादाखल दिल्याबद्दल इंग्लंडांतील लोकांस आनंद वाटण्यासारखा नव्हता. पोर्तुगीज राजकन्या वांझोटी आणि तिच्याबरोबर मिळालेलें आंदणहि तसेंच निष्फळ असें समजून लोक नाराजच होते. हें आंदण घेतलें त्यांत झालें तरी मुख्य हेतु पश्चिम हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य वाढविण्याचा नसून नवीन उदयास आलेल्या डच दर्यावर्दी लोकांविरुद्ध खालावलेल्या पोर्तुगीज लोकांना मदत करण्याचाच होता. अर्थात् चार्लस राजास आपल्या पोर्तुगीज राणीप्रमाणें तिजबरोबर मिळालेल्या आंदणाचाहि कंटाळा येऊन त्यानें सन १६६८सालीं मुंबई बेट "ईस्ट इंडिया" कंपनीच्या हवालीं केलें आणि तिनें सदर जहागिरीच्या स्वामित्वाबद्दल सालीना फक्त दहा पौंड म्हणजे सुमारें १०० रुपये राजास द्यावे असा करार ठरला! पण इंग्रजी राष्ट्राच्या एकंदर इतिहासाची मौजच अशी आहे कीं, त्यांतील बराचसा मनोवेधक भाग राजदंड धारण करणाऱ्या राजाच्या राजकीय महत्त्वाकांक्षेपेक्षां तागडीतुकाऱ्यांच्या दाम व टक्के यांच्या आवडीनेंच घडून आला आहे. हिंदुस्थानांतील दिल्ली, विजापूर, पुणें वगैरे अर्वाचीन-किंवा तक्षशिला, पाटणा, अवंती वगैरे प्राचीन शहरें केवळ राजधान्या-राजेलोकांचीं राहण्याचीं व राजदरबारचीं शहरें-म्हणून प्रसिद्धीस व भरभराटीस आलेलीं होतीं. इंग्रजांच्या इतिहासांतील वास्तुदेवतेची आवड निराळ्या प्रकारची दिसते. तिला राजदरबारच्या वैभवापेक्षां एखाद्या वखारींतील संपन्नता अधिक प्रिय असलेली आढळते व याच नियमास अनुसरून हिंदुस्थानांत मोडणाऱ्या पण इंग्रजांशीं बरेच दिवसपर्यंत संबंध आलेल्या मुंबई नगरीची भरभराट इंग्रज राजांच्या हातून न होतां इंग्रज व्यापाऱ्यांच्या हातून झालेली आहे. जें मुंबई बेट खुद्द इंग्रज राजाचे ताब्यांत असेपर्यंत नापीक, वांझोटें व निरुपयोगी असें वाटत होतें; तें इंग्रज व्यापारी कंपनीच्या हातीं जातांच त्याच्या भाग्योदयास सुरुवात झाली. सन १६८७ सालीं इंग्रज कंपनीनें आपलें सुरतेचें ठाणें मोडून मुंबईस आणिलें. शिवाजी मृत्यु पावल्यामुळें तिला गुजराथेतलें ठाणें उठवून तें व्यापारास अधिक सोईच्या अशा कोंकणपट्टीच्या बंदरावर आणून ठेवण्यास सहजच उत्तेजन

आलें; व पुढें वीस वर्षांनीं दोन्ही व्यापारी कंपन्यांची एक संयुक्त कंपनी झाल्यावर, म्हणजे सन १७०८ सालीं, पश्चिम किनाऱ्याकडील कंपनीच्या मुलुखाचा एक स्वतंत्र इलाखाच बनून, मुंबई ही त्या इलाख्याची राजधानी झाली. सन १७७३ सालीं तिन्ही इलाख्यांवर मिळून गव्हर्नर जनरल नेमण्यांत आला. त्या वेळीं मुंबईचा व कलकत्त्याचा संबंध जडला. मुंबईचा पुढील वृत्तांत मशहूरच आहे.

# उमाजी नाईकाचें चरित्र*

हा चरित्रग्रंथ रा० अनंत नारायण भागवत यांनीं लिहिला असून, त्याची एक प्रत आमच्याकडे अभिप्रायार्थ पाठविल्याबद्दल आम्ही रा० भागवत यांचे आभारी आहों.

"दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं च पौरुषं"-हें अर्थपूर्ण वाक्य वेणीसंहार नाटकामध्यें भट्ट नारायण यानें भारतीय वीर कर्ण याचे तोंडीं घातलें आहे. कर्ण हा केवळ 'सूतपुत्र' होता, अशी अश्वत्थाम्याप्रमाणेंच स्वतः कर्णाचीहि समजूत होती, आणि, वादामध्यें जेव्हां अश्वत्थाम्यानें कर्णाच्या नीच कुलास अनुलक्षून त्याच्या मर्मावर घाव घातला, तेव्हां, कर्णाच्या अंगीं असलेल्या खऱ्या क्षात्रतेजास साजेल अशा प्रकारचें ओजस्वी वाक्य त्याच्या तोंडास आलें व 'सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहं। दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं च पौरुषं' असें तो अश्वत्थाम्यास म्हणाला. असें वर्णन या प्रतिभासंपन्न नाटककारानें केलें आहे. परंतु वरील वाक्य वास्तविक पाहतां कर्णास मुळींच लागू पडत नाहीं. कारण तो खरोखर कुंतीचा पुत्र व अस्सल क्षत्रियच होता. आमच्या मतें हें वाक्य उमाजी रामोशासारख्या हीनकुलोत्पन्न शूर पुरुषासच अधिक यथार्थतेनें लागू पडेल. आज जवळजवळ शंभर वर्षें झालीं—त्या काळीं पेशवाई जाऊन इंग्रज सरकारचा अंमल महाराष्ट्रांत पूर्णपणें स्थापित झाला असतां, केवळ रामोशासारख्या कुलांत जसा एक पुरुष होऊन गेला कीं, त्यानें कांहीं

---

* केसरी, ता. ९ एप्रील १९१०

काळपर्यंत पुणें व सातारा जिल्ह्यांत पुरुषास बायका करून सोडल्या होत्या; आणि खुद्द इंग्रज सरकारच्या पदरीं एवढें मोठें लष्कर असतां प्रजेच्या सुरक्षितपणाविषयीं त्यांना रात्रंदिवस काळजी उत्पन्न करून सोडली होती. हा पुरुष म्हणजे उमाजी नाईक रामोशी हा होय. उमाजीनें आपल्या समकालीन युरोपियन लोकांवर अंगच्या शौर्यादि गुणांनीं इतकी छाप बसविली होती कीं, त्याजबरोबर युद्ध करून त्यांस जिंकणाऱ्या कॅप्टन मॅकिंटॉश नांवाच्या सरदारास त्याचें चरित्र आपल्या हातानें लिहून ठेवावेंसें वाटलें. मग एतद्देशीय लोकांत त्याचे पोवाडे गाइले गेले व तो दरोडेखोर होता हें क्षणभर विसरून ते पोवाडे गाणारे व ऐकणारे हें वीररसपरिपूर्ण अशा त्याच्या चरित्रवर्णनांत आणि श्रवणांत तल्लीन होऊन गेले यांत नवल नाहीं. आजपर्यंत हें चरित्र मराठी वाचकांस केवळ पोवाड्यांतच उपलब्ध होतें; परतु इतिहाससंशोधनाची जी लाट महाराष्ट्रामध्यें उठली आहे तिच्या योगानें उमाजी नाईक 'रामोशी'हि उदयास यावा, ही गोष्ट साहजिकच आहे. कारण इतिहासप्रसिद्धीला फक्त गुणोत्कर्षाचीच अपेक्षा असते. वय व लिंग यांप्रमाणें जातीहि इतिहास लक्षांत घेत नाहीं. एवढेंच नव्हे तर दुर्दैवानें सद्गुणांप्रमाणें उत्कृष्ट अवगुणांचाहि परामर्ष इतिहास घेतो. इतिहासलेखकांकडून वर्णन होण्यास सद्गुण काय किंवा दुर्गुण काय दोन्हीही लोकोत्तर असावे लागतात. ऐतिहासिक दृष्टीला सज्जनांइतकेच दुर्जनहि संग्राह्य वाटतात; पण ते दुर्जन झाले तरी असे असावे लागतात कीं, त्यांच्या योगानें समाजावर त्यांची म्हणून कांहीं वेळ छाप पडलेली असली पाहिजे.

इतिहासाला कसोटीपेक्षां चाळणीचीच उपमा अधिक यथार्थ आहे. चाळणीच्या छिद्रांतून जो जो म्हणून बारीक पदार्थ असेल तो तो खालीं गळून दृष्टीआड होतो; फक्त मोठा व डगळ असेल तोच चाळणींत राहतो —मग ती वाळू असो, धान्य असो, हिरे असोत कीं मोतीं असो. इतिहास म्हणजे केवळ 'संतलीलामृत' असतें किंवा असावें अशी ज्याची कल्पना असेल त्यास ऐतिहासिक विज्ञानाचें इंद्रियच नाहीं, त्याला इतिहासाचें खरें मर्मच कळलें नाहीं, असें खुशाल म्हणावें. 'संसार विचित्र आहे म्हणूनच तो रम्य आहे आणि याकरितां जगांत दुर्जन असावे, त्यांच्याशिवाय चालणार

नाहीं' हें म्हणणें जरा विपरीत भासेल. पण आजपर्यंतच्या जगाच्या इतिहासांत बड्या सज्जनांच्या बरोबरीनें बडे दुर्जनहि होऊन गेलेले नमूद आहेत; दोघांची संख्या जवळजवळ समसमानच भरेल असें म्हटलें असतांहि तोच अर्थ निष्पन्न होतो; मात्र त्यांतील विपरीतपणा भासत नाहीं, इतकेंच काय तें. इंग्रजी भाषेंत सुप्रसिद्ध 'बारा बदमाषांचीं चरित्रें' या नांवाचा एक ग्रंथ आहे; पण आजपर्यंत इंग्लंडांत हेच काय ते व एवढे बाराच बदमाष निर्माण झाले होते, असें त्यापासून अनुमान न काढतां, हे बारा लोक बदमाष होऊन गेले खरे, पण त्यांनीं आपलें नांव अजरामर केलें; असें अनुमान वरील ग्रंथाच्या नांवावरून काढणें अधिक योग्य होईल हें उघड आहे. प्रसिद्धि व चांगुलपणा या शब्दांची समव्याप्ति असावी, पण दुर्दैवानें ती तशी नाहीं. प्रसिद्धि व ऐतिहासिक महत्त्व यांची मात्र व्याप्ति समान आहे. जगांत अनेक सज्जन जन्मास येतात व मरून जातात, असें नित्य घडत असेल; परंतु 'ऐतिहासिक दृष्टीनें' पाहतां 'महत्त्व' हाच काय तो एक खरा गुण दिसतो. नुसतें सज्जन होऊन भागत नाहीं. मनुष्य महत्त्वाचा असून वरतीं सज्जनहि असला तर अर्थात् दुधांत साखर पडल्यासारखेंच झालें. पण इतिहासास सौजन्य नसलें तरी हरकत नाहीं; त्यास दौर्जन्यहि चालेल; पण तें तरी जगास तोंडांत बोट घालावयास लावणारें पाहिजे!

रा० भागवत यांनीं उमाजी नाईकाचें जें चरित्र लिहिलें आहे, तें झालें तरी याच दृष्टीनें. एक वेळ उमाजी नाईकाचा पोवाडा ऐकून इतर श्रोत्यांप्रमाणें त्यांनाहि कौतुक वाटलें. महाराष्ट्रांतील भोर व फलटण या संस्थानांचा इतिहास लिहिण्याचे वेळीं तें नांव त्यांच्या डोळ्यांपुढें फिरून आलें. एवढेंच नव्हे तर या संस्थानांच्या कागदपत्रांत त्यांना उमाजीच्या बंडाची थोडीशी माहितीहि मिळाली. ही माहितीहि व कॅप्टन मॅकिंटॉश यांनीं लिहून ठेवलेलें उमाजीचें चरित्र इतका आधार घेऊन रा० भागवत यांनीं सदर चरित्र मराठींत लिहिलें आहे तें मराठी वाचकांस मनोरंजक वाटेल यांत संशय नाहीं. उमाजीच्या चरित्रांत म्हणण्यासारख्या गोष्टी फारशा घडलेल्या नाहींत. दरोडे, मारामाऱ्या आणि शौर्यानें व शर्तीनें निभावून जाण्याचें प्रसंग व शेवटीं ठराविक कारणानें म्हणजे विश्वासघातानें पकडलें

जाणें याच मुख्य गोष्टी आहेत. दरम्यान नाहीं म्हणावयास 'गप्प बसावयास काय घेशील' या तत्त्वावर इंग्रजांनीं ठरविलेला पगार घेऊन तो कांहीं दिवस पुण्यास नजरकैदेंत होता व आपल्या साकुर्डी गांवीं प्रतिष्ठित पाटील व अधिकारी होऊन सक्तीचा न्यायमनसबा करून एक प्रकारें राज्य करीत होता.

उमाजीचा जन्म १७९१ सालीं झाला. बालपणापासून त्याला हालअपेष्टा व धांवपळ यांचें बाळकडूच मिळालेलें होतें. सन १८१८ सालीं कंपनीसरकारची सत्ता पुण्यास स्थापित झाल्याचे सालींच, उमाजीनें आपल्या कुळास व जातीस अनुरूप असें पहिलें कृत्य केलें व त्यामुळें त्यांस एक वर्षभर कैदेंत काढावें लागलें; पण त्याच्या धामधुमीस सन १८२१ सालापासून प्रारंभ झाला. १८२३ सालीं त्यानें भांबुर्डें येथील सरकारी खजिना लुटला. १८२५ सालीं त्याजकडे सर्व सासवड प्रांतांतल्या रामोशांचें आधिपत्य आलें. १८२७ सालीं उमाजीस पकडण्याकरितां १२०० रुपयांचें बक्षीस सरकारांतून लावण्यांत आलें. याच सुमारास कोल्हापूरकर बोवासाहेब महाराज यांचे कारकीर्दीत जें बंड झालें त्यांत मदत करण्याकरितां उमाजीप्रभृति रामोशांस पाचारण झालें होतें. या वेळीं उमाजी हा खंडण्या वसूल करूं लागला. सन १८२७ सालीं खुद्द गव्हर्नरसाहेब यांस धमकीचें पत्र पाठविण्यापर्यंत त्याची मजल गेली. तथापि त्याला पकडण्याच्या कामीं सतावून गेल्यामुळें सरकारनें त्यास आजवर घडलेल्या खुनांची व दरोड्यांची माफी करून आपल्या नोकरीला ठेवण्याचा निश्चय केला! तहाचें बोलणें सुरू झालें; व कऱ्हेपठार येथील खंडोबाच्या देवळांतील अबदागिऱ्या डोक्यावर धरवून शिंगें, तुताऱ्या, कर्णे, वगैरे वाद्यें लावून शेंदीडशें रामोशांचा घोळका घेऊन चौऱ्या उडवीत एखाद्या लहानशा राजाप्रमाणें उमाजी हा इंग्रजी फौजेच्या कमांडिंग ऑफिसरास भेटण्यास गेला! १८२८ पासून उमाजी दरोडे न घालतां दरोडे हुडकून काढण्याच्या कामीं दंग होऊन गेला होता. उमाजीला महिना तीस रुपये पगार ठरून त्याच्या हाताखालीं पांच नाईक, बहात्तर रामोशी व एक कारकून असा सरंजाम देण्यांत आला. व हें एक वेगळें संस्थानच स्थापित झालें! उमाजी नाईकाची कचेरी भरूं लागली.

साकुर्डी व सासवडच्या आसपास पांचपन्नास मैलांतील तंटे त्याजकडे तोडण्यास येऊं लागले. त्यास किरकोळ फौजदारी अधिकारहि देण्यांत आले होते. त्यांचा उपयोग सक्तीनें करून उमाजी तंट्याचे निकाल लावी. त्याची जरब अशी असे कीं, त्याच्या निकालावर अपील करण्याची पक्षकारांची छातीच होत नसे ! याच वर्षीं त्यानें श्री० छत्रपति प्रतापसिंह महाराजांची गांठ घेतली व त्यांनींहि त्याचा सत्कार केला.

इतकें सगळें झालें खरें; पण उमाजीचा देहस्वभाव त्यास सोडीना. " आधीं होता वाघ्या, मग झाला पाग्या-त्याचा येळकोट राहिना, मूळस्वभाव जाईना ! " ही म्हण उमाजीस अक्षरशः लागू पडण्यासारखी आहे. खरोखरच येळकोटाचा जयघोष करून डोंगरांवरून उड्या घालघालून शिकार करणाऱ्या उमाजीला कायदेकानू, व्यवस्था, न्यायमनसुभा ह्यांचा कंटाळा आला, हें स्वाभाविकच आहे. १८२९ सालापासून फिरून लूटमार व दरोडे यांस त्यानें गुप्तपणें सुरुवात केली. सरकारास त्याबद्दल लवकरच संशय आला पण हे सरकारच्या नोकरानें घातलेले दरोडे;त्याबद्दल उघड बोलावें कोणीं ? अखेर त्यास पुण्यास येऊन स्वस्थ राहण्याबद्दलचा हुकूम झाला. तो त्यानें प्रथम मानला; पण उमाजीसारख्या दरोडेखोरास पुण्यास सरकारच्या नजरेखालीं राहून त्याच्या दृष्टीनें मेलेलें अन्न खाण्याचें कसचें रुचणार ! त्यानें नोकरीस रामराम ठोकून फिरून डोंगरांचा आश्रय केला. इतकें झाल्यावर सरकारास सक्तीचे उपाय योजावे लागले. त्याला पकडण्याचे कामीं फौजेची योजना होऊन ती कॅप्टन् मॅकिंटॉश यांच्या हातीं देण्यांत आली. उमाजीचे दोनतीनशें लोक व ही फौज यांच्या पाठशिवणीचा खेळ पुढें दोन वर्षें चालून अखेर कित्येक रामोशांच्या विश्वासघातानें उमाजी हा फौजेच्या हातीं सांपडला, व सेशन कोर्टांत चौकशी होऊन ता. ३ फेब्रुवारी १८३२ रोजीं त्यास पुणें येथें फांशीं देण्यांत आलें.

उमाजीनें खून, दरोडे वगैरे जे अनेक भयंकर अत्याचार केले त्याबद्दल त्याला या लोकीं शासन तर झालेंच, पण त्याला परलोकींहि अधोगतिच मिळणें योग्य व त्याप्रमाणें त्यास ती मिळालीहि असेल यांत शंका नाहीं.

परंतु आम्हीं प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें उमाजीच्या अवगुणांबरोबरच त्याच्या अंगीं शौर्य, साहस इत्यादि गुणहि असे विलक्षण होते कीं, त्यामुळें त्याच्या शत्रूसहि त्याचें चरित्र लिहावेंसें वाटलें. उमाजी हा निर्व्यसनी, परोपकारी व श्रद्धाळु असा होता. त्यानें श्रीमंतांस त्रास दिला तरी गरीबांवर दयाच केली. त्याच्यासंबंधानें कॅ० मॅकिंटॉशसाहेबांनीं असें लिहून ठेवलें आहे कीं, 'काळाच्या प्रतिकूलतेमुळें, तो मराठी राज्यांत एखादा शूर सरदार झाला असता पण लुटारूपणाचा धंदा पत्करल्यानें दरोडेखोर व बंडखोर झाला'. सरदार होण्यासारख्या गुणाच्या मनुष्यास दरोडेखोरी आठवावी, यासारखी शोचनीय दुसरी कोणतीच गोष्ट नाहीं! परंतु या बाबतींत उमाजीचा काळ व त्याचा आनुवंशिक संस्कार हींच कारणीभूत होत, यांत शंका नाहीं. तसेंच बंडखोरी करूं लागण्यापूर्वीं कांहीं वतनी हक्कांसंबंधानें उमाजीची भोरकर पंतसचिवाविरुद्ध तक्रार व गाऱ्हाणें होतें व त्या तक्रारीची दाद त्याचे समजुतीप्रमाणें यथान्याय न लागल्यामुळें बेदादीचें उट्टें त्यानें बेबंदशाहीनें काढण्याचा प्रयत्न केला, ही गोष्ट चरित्रकारांनीं नमूद केलेली आहे. तथापि कारण कोणतेंहि असो, उमाजीसारख्या सद्गुणी, बुद्धिमान् व पराक्रमी पुरुषाची प्रवृत्ति दरोडे व खून यांसारख्या उपद्रवी व घातक कृत्यांकडे झाली ही गोष्ट अत्यंत शोचनीय होय यांत शंका नाहीं. ग्रीक बादशहा अलेक्झांडर याची व एका दरोडेखोराची गांठ पडली असतां 'माझें फसलें मी सांपडलों, म्हणून मी दरोडेखोर ठरलों; तुझें साधलें म्हणून तुला राज्यपद मिळालें, एरवीं तूं व मी सारखेच' असा युक्तिवाद करून अलेक्झांडर यास सदरहू दरोडेखोरानें निरुत्तर केल्याचें आपण इंग्रजी पुस्तकांतून वाचतों. परंतु एका दरोडेखोरानें दुसऱ्यास निरुत्तर केल्यानें कोणच्याहि दरोड्याचें समर्थन झालें, असें मात्र नाहीं. दरोडेखोरीच्या गुणावगुणासंबंधाचा निवाडा वादी व प्रतिवादी यांच्या परस्परकोटिक्रमावरून करावयाचा नसतो, तर न्यायनीतीच्या सनातन कायदेकानूंवरूनच लावावयाचा असतो. जें जात्या वाईट तें वाईटच. उमाजी नाईकानें मनांत मोठी आकांक्षा धरली होती, हें जरी खरें असलें तरी त्यानें ज्या लोकांस द्रव्य मिळविण्याचे कामीं विनाकारण गांजलें, लुटलें व मारलें त्यांनीं त्याचा असा

कोणता अपराध केला होता ? व त्यांस छळण्याचा त्याला काय अधिकार होता ?

व्यक्तिशः उमाजी नाईकाच्या गुणावगुणांचा येथवर विचार झाला. तथापि त्याचाच पोवाडा आजवर लोकांनीं कां म्हणावा ? इतर दरोडेखोर काय थोडे झाले ? त्यांचा पोवाडा कां झाला नाहीं ? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, आम्हीं प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें, ह्या दरोडेखोरांच्या शौर्याची व कर्तृत्वाची त्याच्या समकालीन लोकांच्या मनांवर फार बिलक्षण छाप पडलेली असली पाहिजे. कालांतरानें या छापेचा परिणाम असा होतो कीं, दुष्टकृत्यें विसरलीं जातात; व मनुष्यमात्रांत साधारणतः शौर्यादि गुणांचा उत्कर्ष कमी असल्यानें, हे गुण ज्यांच्यामध्यें आहेत असल्या व्यक्तीबद्दल त्यांचा आदर मात्र शिल्लक राहून त्यांचे पोवाडे बनतात. असले पोवाडे सर्वत्र देशांत आढळून येतात. 'रॉबिनहुड' याचें नांव माहीत नाहीं असा एकहि इंग्रजी वाचक सांपडणार नाहीं. खरा रॉबिनहुड हा असाच कोणी तरी उमाजी रामोशासारखा दरोडेखोर असावा. तो विनोदी, शूर, थट्टेखोर, परोपकारी व प्रेमळ असा असून, गरीबांवर दया करणें, श्रीमंतांची फजिती करणें वगैरे उदारमनस्कतेच्या दर्शक अशा कित्येक गोष्टींमुळें त्याची लोकप्रियता इतकी वाढली कीं, आज सातशें वर्षेपर्यंत त्याचे पोवाडे इंग्लंडांत चालत असून लहान मुलांच्या पुस्तकांतून देखील त्याजविषयींचे धडे आढळून येतात ! रॉबिनहुडचा ज्यामध्यें संचार असे तें 'शेरवुड' नांवाचें अरण्य, त्याची प्रियतमा मेड मेरियन, त्याचे विनोदी व जिवाचे दोस्त फ्रायर टक व लिटल जॉन वगैरे सर्व मंडळी इंग्रजांत अत्यंत लोकप्रिय आहेत. प्रख्यात कादंबरीकार सर वाल्टर स्कॉट यानें आपल्या 'आयव्हॅनो' नांवाच्या कादंबरींत व 'रोकबी' नांवाच्या कादंबरीमध्यें दरोडेखोरांच्या अद्भुतरसपूर्ण चरित्राचें उत्कृष्ट चित्र काढलेलें इंग्रजीच्या वाचकांस आठवत असेलच. तसेंच, इटाली व स्पेनमधील दरोडेखोर—दर्याकिनाऱ्यावरील जकात चुकवून माल पळवून नेणारे व चांचेपणाचा धंदा करणारे—वगैरे लोकांसंबंधानेंहि त्यांच्या दुर्गुणांकडे दुर्लक्ष करून, रसिक जनता त्यांच्या शूर कृत्यांचे पोवाडे गाण्यास कशी तयार असते, याचा इंग्रजी मासिक पुस्तकें वाचणारांस नित्य अनुभव आहेच. फार लांब कशाला ?

मि० किंकेड यांनीं आपल्या एका ग्रंथांत काठेवाडांतल्या प्रमुख दरोडेखोरा-(Outlaws)च्या चरित्राचें रसभरित वर्णन केलेलें आहे, हें पुष्कळांस माहीत असेलच. मुलांस रात्रीं दारें लावून घेऊन व अंथरुणावर पडून भुतांच्या गोष्टी ऐकाव्याशा वाटतात; आणि मोठीं मनुष्येंहि अद्भुतरसाच्या कामीं मुलांसारखींच असतात, असें म्हणण्यास हरकत नाहीं. उमाजी रामोशाचा आत्मा आपल्या दुष्कृत्यांचा झाडा यमदरबारांत देत असतां, मृत्युलोकीं त्याचे पोवाडे व्हावे व त्याचीं चरित्रें लिहिलीं जावीं, हेंहि वरील चमत्कारिक मनुष्यस्वभावास अनुसरून आहे, एवढेंच म्हणतां येईल.

# आर्यनौकानयन*

गतकालीन कांहीं शतकांत हिंदुस्थानांतील आर्यलोकांचें परदेशगमन बरेंचसें संक्षेपांत आल्यामुळें, आम्ही हिंदुस्थानचे लोक पूर्वकाळीं तरी कधीं हिंदुस्थान सोडून बाहेर जात होतों कीं नाहीं याचीच शंका पुष्कळांस येत असल्यास नवल नाहीं. विद्या व शिक्षण हीं ज्यांच्या आधीन त्यांच्या मनानें, कोणत्याहि कारणानें कां होईना, परदेशगमन निषिद्ध मानलें गेल्यामुळें, परदेशगमनाला प्रायश्चित्त आहे कीं मुळींच नाहीं हाच प्रश्न काय तो मुख्यतः डोळ्यांपुढें वारंवार येतो; आणि दर्यावर्दीपणाच्या धंद्यांतला महत्त्वाचा भाग, व त्या व्यवहारांतील बहुतेक नफा, आमच्या हातून निघून परकीयांच्या हातीं गेलेला आहे अशा आजच्या स्थितींत, पूर्वींच्या काळीं नौकानयनाची कला आम्हांला कितपत अवगत होती, सागर व महासागर यांजवर सफरी करून आम्ही केवढा प्रचंड व्यापार करीत होतों आणि या व्यापाराच्या अनुषंगानें दूरदूरच्या अशा किती देशांत आमच्या वसाहती झालेल्या होत्या या गोष्टींचें ज्ञान हा अर्थातच केवळ तात्त्विक इतिहाससंशोधनाचा विषय होऊन राहिला आहे. समुद्राच्या किनाऱ्या-किनाऱ्यानें फिरून व्यापारउदीम करणारे छोटे मचवे, पडाव किंवा महागिऱ्या यांशिवाय कसलेंहि मोठें भांडें हल्लीं इकडे बांधलें जात

*केसरी, ता. १३ मे सन १९१२.

नाहीं; व शेंदीडशें वर्षांपूर्वींपर्यंत नौकानयनाची जी विद्या आम्हांला अवगत होती–दर्यावर्दीपणाचें जें धारिष्ट आमच्या लोकांमध्यें होतें–तें या दरम्यानच्या काळांत सफाई नाहींसें झालेलें असून इतिहाससंशोधनानें फक्त प्राचीन काळाची स्मृति जागृत करण्यापलीकडे दुसरें सुख हल्लीं राहिलेलें नाहीं.

आज म्हणजे तुम्हांला परदेशीं जाण्यास किंवा परदेशाहून कोणताहि जिन्नस आणविण्यास त्रास पडतो असें मुळींच नाहीं. परदेशीं मुशाफरीस जावयाचें तर नुसतें टॉमस कुक अँड सन्स यांना एक पोस्टकार्ड टाकिलें असतां तुमच्या प्रवासाची सर्व सिद्धता तत्काल होते. तुमचें जडजोखमीचें सर्व सामान चिठ्या मारून जहाजांतील तुमच्या खोलींत बंदोबस्तानें ठेवलें जातें; आणि तुम्ही आजारी किंवा ऐदी असाल तर तुम्हांस खुर्चीवर घालून तुमच्या खुषीनेंच तुमची उचलबांगडी करून धक्क्यावरून आगबोटींत व आगबोटीवरून धक्क्यावर अशा रीतीनें बिनबोभाट चढविण्यांत व उतरविण्यांत येतें कीं, पावलांची टांच भिजल्याशिवाय सातासमुद्रांवरून पृथ्वीप्रदक्षिणा करून तुम्हांस आपले बिन्हाडीं परत आणून सोडण्यांत येईल. इतकें तुमचें दास्य करावयाला टॉमस कुक कंपनी अथवा तशीच दुसरी एखादी कंपनी सहज मिळूं शकते! स्वतः तुम्हांस फार झालें तर शेर-अच्छेर वजनाच्या लुसलुशीत कमाविलेल्या कातड्याच्या पाकिटांत जरूर तेवढें सोन्याचें नाणें किंवा हुंड्यांचें विंडोळें घेतलेलें असलें म्हणजे झालें! व्यापारधंद्याचीहि अशीच गोष्ट आहे. तुमची पत असल्यास एक पोस्ट कार्ड टाका. अगर ती नसल्यास दर्शनी हुंडीची एक चकती जगाच्या वाटेल त्या भागांतील व्यापारी शहरास तुम्ही धाडा, कीं जो लागेल तो परदेशी माल ढाकठीक बांधूनसवरून तुमच्या घरीं येऊन सुरक्षित पडतो. पण राष्ट्रीय दृष्टीनें पहातां या सुखापलीकडचेंहि एक सुख कल्पनागम्य आहे व तें हें कीं, वर सांगितल्याप्रमाणें सफरीस जाऊन येणें तें तुम्हीं तुमच्या स्वतःच्या म्हणजे अर्थात् स्वदेशी कंपन्यांच्या आगबोटींतून जावें-यावें आणि माल आणणें-नेणें तो आपल्या हिंदी लोकांनीं चढत्या व उतरत्या बंदरांत आपल्या बोटींत आपल्या हातानें भरावा आणि उतरावा, म्हणजे अर्थात् ही ने-आण करण्याचा बराचसा नफा तुमचा तुम्हांला मिळावा.

हें सर्व सुख जरी आज नाहीं तरी तें सुख पूर्वी एके वेळीं आपणांस होतें अशी आठवण करून देण्याचें साधन अद्यापि आपणांजवळ आहे ही तरी कांहीं लहानसहान समाधानाची गोष्ट नव्हे. हें साधन म्हणजे इतिहाससंशोधन होय; आणि त्याच्या योगानें जुन्या काळीं नौकानयनाची विद्या व व्यवहार आपल्या देशांत उत्कर्षाला पोंचलेला होता असें सप्रमाण सिद्ध करणारें एक पुस्तक बंगालच्या नॅशनल कॉलेजचे प्रोफेसर राधाकुमुद मुकरजी यांनीं अलीकडे प्रसिद्ध केलेलें असून त्याबद्दल त्यांचें साभार अभिनंदन करणें जरूर आहे. प्रो० मुकरजी यांनीं असें सिद्ध केलें आहे कीं, कमींत कमी दोन हजार वर्षेपर्यंत हिंदुस्थान हा देश नौकानयनविद्येचें आणि समुद्रावरील व्यापाराचें एक केंद्रस्थानच होता! हें प्रमेय सिद्ध करितांना त्यांनीं स्वतःची म्हणून स्वतंत्र अशी कल्पनाशक्ति फारच थोडी चालविली आहे, त्यांत परिश्रमांचेंच काम विशेष आहे. तरी पण तो परिश्रमच इतका व्यापक व पद्धतशीर केलेला आहे कीं, त्यामुळें स्वतंत्र कल्पना चालविण्याचें फारसें कारणच उरत नाहीं. कोणत्याहि इतिहाससंशोधनाची झाली तरी हीच पद्धति असते. तथापि हें संशोधनाचें एकीकरण एकाच विषयावर झाल्यामुळें प्रो० मुकरजी यांना आपली कल्पना सांगोपांग व मूर्तिमंत अशी वाचकांच्या डोळ्यांपुढें उभी करितां आली आहे! या संशोधनाच्या अंगभूत त्यांनीं कोणकोणता ग्रंथसंग्रह घेऊन त्याचा कसकसा उपयोग केला आहे हें लक्षांत येण्याकरितां आम्ही त्यांच्या विवेचनसरणीचा थोडक्यांत खालीं उल्लेख करीत आहों.

कोणत्याहि प्रमेयाला एक प्रत्यक्ष व दुसरा अप्रत्यक्ष असे दोन प्रकारचे पुरावे असतात. प्रो० मुकरजी यांच्या प्रमेयास दोनहि प्रकारचा पुरावा मिळतो. पैकीं प्रत्यक्ष पुरावा संस्कृत व प्राकृत ग्रंथ यांतून, आणि ग्रंथांइतकींच किंबहुना त्यांहून अधिक प्रमाणभूत अशीं जुनीं शिल्पकलेचीं कामें, चित्रें, तसबिरा, नाणीं, यांतून मिळतो. उदाहरणार्थ, कलकत्त्याच्या संस्कृत कॉलेजच्या ग्रंथसंग्रहालयांत प्रो० मुकरजी यांना भोजनरपतिकृत 'युक्तिकल्पतरु' नामक ग्रंथ मिळाला. त्यांत जहाजें कोणत्या लांकडाचीं बांधावीं? तीं कशीं बांधावीं? तीं लांबरुंद कोणत्या प्रमाणानें असावीं? सामान्य व विशेष प्रकारच्या जहाजांचे उपयोग काय? जहाजांतील सामानसुमान काय

व कसें असावें ? त्यांना बाहेरून व आंतून शोभा कशी आणावी ? जहाजांत बसून जाणाऱ्या लोकांच्या सुखाकरितां सोयी कशा कराव्या ? वगैरे सर्व विषयांचें पद्धतशीर वर्णन आहे. जहाजांतील मंदिरें हिरेमोत्यांनीं शृंगारण्यापासून लढाईच्या प्रसंगीं जहाजांची सिद्धता कशी ठेवावी येथपर्यंत या ग्रंथांत वर्णन सांपडतें. अर्थात् हें काल्पनिक नसून अनुभवसिद्ध आहे असेंच म्हटलें पाहिजे. वेदामध्यें नौकानयनाचे उल्लेख आहेत. भारतांत पांडव बसून गेलेल्या नौकेचें वर्णन "सर्ववात सहाम् नावम् यंत्रयुक्ताम् पताकिनीम्" या शब्दांनीं सांपडतें. रामायणांत ( अयोध्याकांड ) लढाऊ नौकांचा उल्लेख आहे. भागीरथीच्या पात्रांत युद्ध करणाऱ्या नौकांचा उल्लेख रघुवंशांत आहे. 'राजपल्लीये' नामक पाली ग्रंथांत बंगालच्या सिंहबाहू राजाचा मुलगा विजय ज्या जहाजांतून गेला त्याचें वर्णन आहे. तसेंच सिंहल राजा जंबुद्वीपाहून सिलोनला गेला, त्या जहाजांचें वर्णन आहे. त्यावरून सातशें आठशें व्यापारी व मुशाफर नेण्यायेवढीं तीं जहाजें मोठीं होतीं असें दिसतें. जातक ग्रंथामध्येंहि असेच पुरावे सांपडतात.

सांची येथील बौद्ध-स्तूपावरील चित्रांत जहाजांचीं स्वच्छ चित्रें आहेत. कान्हेरी येथील लेण्यांत समुद्रप्रवासाचा देखावा कोरलेला असल्यामुळें इसवी सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकासंबंधानें हा पुरावा ग्राह्य होय. पुरी येथील जगन्नाथाच्या देवळांत आणि बिंदुसरोवर येथील भुवनेश्वराच्या देवालयांत प्रो० मुकरजी यांना असाच शिल्पमय पुरावा मिळाला. अजिंठा येथील कोरींव लेण्यांत हाच पुरावा मिळतो. नंबर एकच्या गुहेंत एक चित्र आहे. त्यांत सातव्या शतकांत पुलकेशी राजाकडे आलेला इराणचा राजा खुसरू याचा वकील आपलें अधिकारपत्र सादर करीत आहे असा देखावा असल्याचें मानतात. याचा अर्थ असा कीं, इराणपर्यंत आमचें दळणवळण व दरारहि होता. ग्रिफिथ्स् यानें अजिंठा येथील लेण्यांतील इतर कित्येक चित्रांवरून त्यावेळीं व त्यापूर्वीं परदेशांशीं असलेल्या हिंदुस्थानच्या व्यापाराचें अनुमान काढलेलें आहे. सातव्या-आठव्या शतकांत जावा, कँबोडिया, सयाम, चीन व जपान येथपर्यंत हिंदी लोकांच्या सफरी होत होत्या व कांहीं ठिकाणीं वसाहती झाल्या होत्या. फिलॅडेल्फिया येथील ग्रंथसंग्रहालयांत हिंदुपद्धतीच्या जहाजाचा एक नमुना पहावयास सांपडतो. तसेंच

आंध्रकालीन कित्येक नाणीं सांपडतात. त्यांजवर जहाजांचीं चित्रें आहेत. आणि या कालासंबंधानें म्हणजे यज्ञश्री राजाच्या कारकीर्दींत, हिंदुस्थानचा व्यापार पश्चिमेकडे ग्रीस, रोम, इजिप्तपर्यंत व पूर्वेस चीनपर्यंत चालत होता असें सेवेलसाहेबांचें मत आहे. कारोमांडल किनाऱ्यावर कुरुंबर अथवा पल्लव राजांच्या काळचीं अशींच नाणीं सांपडतात, व या राजांच्या काळीं परदेशांशीं समुद्रावरून आमचा व्यापार चालत होता, असेंच सर वॉल्टर ईलियट यांनीं अनुमान काढलें आहे.

प्रत्यक्ष पुराव्याप्रमाणें अप्रत्यक्ष पुराव्याचाहि परिश्रमपूर्वक शोध व उपयोग प्रो० मुकरजी यांनीं केला आहे. वरुणाला सर्व समुद्रपथांची माहिती होती. व्यापारी लोक सफरीचे धोके मनांत न आणतां समुद्राच्या सर्व भागांवर जात. तुग्रांचा मुलगा भुज्यू यानें शत्रूवर स्वारी केली असतां त्याचें जहाज फुटलें व शंभर वल्ह्यांनीं वल्हविलेल्या आपल्या नावेंत अश्विनांनीं त्याला उचलून घेतलें असे उल्लेख ऋग्वेदांत आहेत. रामायणांत लोहितसागर, यवद्वीप, सुवर्णद्वीप यांचे उल्लेख आहेत, ते हिंदी लोक दूरच्या सफरी करणारे नसते तर आले नसते. सहदेवानें ताम्रद्वीपांतील लोक जिंकले, व सागरद्वीपवासीयांना वश केलें याचें मर्म उघड आहे. धर्मसूत्रांत परदेशगमनाचा ब्राह्मणांपुरता निषेध सांगितलेला असो; तथापि ज्या वैश्यांना परदेशगमन खुलें होतें ते हिंदुस्थानांतीलच होत. समुद्रावरून आणलेल्या मालावर जकात किती घ्यावी, नाविक लोकांनीं नुकसानी कोणती व किती भरून द्यावी, अशाविषयीं स्मृतिग्रंथांतील व्यवहाराध्यायांत नियम सांपडतात. बृहत्संहितेंत समुद्रयानासंबंधीं ज्योतिषशास्त्रदृष्ट्या उल्लेख आहेत. पुराणांतून व काव्यांतून सांपडणारे असले उल्लेख पुष्कळांच्या वाचण्यांत येण्यासारखे आहेतच. रत्नावलींतील सिलोनची राजकन्या समुद्रांत जहाज फुटून वहात चालली असतां दर्यावर्दी व्यापाऱ्यांनीं कौशांबी येथें आणिली असल्याचें सांगितलें आहे. दशकुमारचरितामध्यें रत्नोद्भव आणि मित्रगुप्त यांच्या समुद्रावरील सफरींच्या गोष्टी आहेत. शिशुपालवधामध्यें, श्रीकृष्ण द्वारकेहून हस्तिनापुराला जात असतां वाटेंत अनेक देशाचे व्यापारी जहाजांतून माल भरून जात असलेले त्यानें पाहिलें असें

वर्णन आहे. अशाच रीतिचे अप्रत्यक्ष उल्लेख जातक वगैरे बौद्ध ग्रंथांतून पुष्कळ सांपडतात. . . .

युरोपिअन ग्रंथकारांनींहि हिंदुस्थानच्या परदेशी व्यापारासंबंधानें ठिकठिकाणीं लिहिलें आहे. डॉ० साईस यांच्या मतें हिंदुस्थान व ॲसीरिया देश यांच्या दरम्यान ख्रिस्ती शकापूर्वी तीन हजार वर्षें व्यापार सुरू होता. प्राचीन बॅबिलोनी शब्दसंग्रहांत 'सिंधु' हा शब्द एक प्रकारच्या मलमलीच्या कापडाला लाविलेला आढळतो. नेबुचॅडनेझार या प्रसिद्ध बॅबिलोनी राजाच्या राजवाड्यांत फक्त हिंदुस्थानांत सांपडणाऱ्या अशा कित्येक जातींच्या लांकडांचीं तुळवटें असल्याचा एकानें शोध लाविला आहे! ख्रिस्तापूर्वी पांचव्या शतकांत तांदूळ, मयूर, चंदन वगैरे पदार्थ त्या वेळच्या हिंदी नांवांनींच ग्रीसमध्यें उल्लेखिले जात. प. वा. जॅक्सनसाहेब यांनीं मुंबईच्या गॅझिटिअरमध्यें असें सिद्ध केलें आहे कीं, भडोच व सुपाराबंदर यांच्या व बॅबिलोनियांच्या दरम्यान, ख्रिस्तापूर्वी आठ सात सहा या शतकांत सर्रास व्यापार चालत असे. इजिप्ट व हिंदुस्थान यांजमध्यें पूर्वी चाललेल्या व्यापारासंबंधीं कोणासच शंका नाहीं. या व्यापाराचा अप्रत्यक्ष पुरावा बायबलाच्या जुन्या करारांत सांपडतो. बायबलांतील किंग सॉलोमन व किंग हिरॅम यांच्या काळीं असणारे व्यापाराचे कित्येक मौल्यवान् जिन्नस दक्षिण हिंदुस्थानच्या जमिनींत पिकत होते असें रे. फूक्स यांचें म्हणणें आहे. हिरोडॉट्स् वगैरे ग्रीक ग्रंथकारांच्या ग्रंथांतून असेच उल्लेख सांपडतात. ॲलेक्झांडर सिंधुनदांतून पार झाला तेव्हां त्याला हिंदुस्थानांत बांधलेलीं हजार दोन हजार जहाजें मिळालीं ही गोष्ट तर ऐतिहासिकच आहे!

मौर्य राजांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत मोठमोठ्या गोद्यांमधून जहाजें बांधण्याचा मोठा धंदा चाले असा पुरावा सांपडतो. चंद्रगुप्ताच्या अठरा कारखान्यांपैकीं हा एक सरकारी कारखानाच होता, व बंदरांतील जकातीच्या नियमांचा एक तर ग्रंथच होण्यासारखा आहे! अशोकाच्या वेळीं सीरिया, इजिप्ट, ग्रीस व सीलोन येथपर्यंत समुद्रावरील दळणवळण होतें आणि सैन्याप्रमाणें अशोकाच्या पदरीं मोठें आरमारहि असावें, असें व्हिन्सेन्ट स्मिथ या इतिहासकाराचें म्हणणें आहे. ख्रिस्तापूर्वी दुसऱ्या-तिसऱ्या शतकांत आंध्र राजांच्या कारकीर्दींत दक्षिण हिंदुस्थान व रोम

यांच्या दरम्यान सरास व्यापार चालत असे. दक्षिण हिंदुस्थानांतून कलाकुसरीचा माल विकत नेऊन त्याच्या मोबदला रोमच्या व्यापाऱ्यांनीं दिलेलीं सोन्याचीं नाणीं तिकडील भूमींत अजून सांपडतात. मुसलमानांचें राज्य हिंदुस्थानांत होईपर्यंत बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावरील लोक सीलोन, जावा, सुमात्रा व चीन येथपर्यंत जाऊन वसाहती करीत. पश्चिमेकडे सौराष्ट्रांतील लोक इराणाकडील मुख्य शहरीं वसाहती करून व आपला धर्म संभाळून रहात असत. असे चिनी प्रवासी ह्यू ॲनसंग यानें लिहिलें आहे. पूर्वेकडे बौद्ध धर्माचा प्रसार करण्याकरितां हिंदी भिक्षु धर्मोपदेशक चीन व जपानपर्यंत गेले होते ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. बोधिसेन नांवाचा बौद्ध भिक्षु आठव्या शतकांत जपानांत जाऊन जपानी भिक्षूंना संस्कृत शिकवीत राहिला होता. याच सुमारास दोघां हिंदी गृहस्थांनीं जपानांत कापसाची लागवड सुरू केली असा उल्लेख जपानी सरकारी दप्तरांत आढळतो. दहाव्या शतकांत झालेल्या चोलवंशीय राजांचा ताबा व दरारा समुद्रावरहिं असे व एका चोल राजाच्या कारकीर्दींत तर लखदीव मालदीव वगैरे शेंकडों बेटें त्याच्या आरमारानें काबीज केलीं होतीं. यानंतर झालेल्या काळासंबंधानें विशेष सांगण्याचें प्रयोजन नाहीं. मोगलांच्या कारकीर्दींत व त्यानंतर पुढेंहि कांहीं थोडे दिवस समुद्रावरील व्यापार सुरू असून खुद्द मराठ्यांचें खास आरमार होतें, व गेल्या दोनतीन शतकांत पोर्तुगीज, डच व इंग्लिश यांच्याशीं असलेलें दर्यावर्दी हिंदी लोकांचें दळणवळण आणि परस्परांच्या आरमारावरील लढाया यांचीं वर्णनें इतिहासांत वाचावयास मिळतात. आयने अकबरींत मोगलांच्या आरमारखात्याचें उत्कृष्ट वर्णन सांपडतें; व रा० ब० पारसनीस यांनीं कांहीं वर्षांपूर्वीं लिहिलेला 'मराठ्यांचें आरमार' हा निबंध ज्यांनीं वाचला असेल, त्यांना त्या ठिकाणीं त्या विषयाची बरीच माहिती एके ठिकाणीं वाचावयास मिळाली असेल.

इंग्रजांच्या कारकीर्दींत पहिल्या पहिल्यानें इकडे जहाजें बांधण्याच्या धंद्यास पुष्कळच उत्तेजन मिळालें. सन १७३५ सालापर्यंत सुरतेस जहाजें बांधण्याची गोदी चालू होती; त्यानंतर ती मुंबईस सुरू झाली. मुंबईच्या जहाजें बांधण्याच्या कारखान्यावर लावजी नसरवानजी या नांवाचा पारशी होता; व त्याच्या देखरेखीखालीं इंग्रज सरकारचीं इकडील सर्व जहाजें

बांधलीं जात. १७०२ सालीं इंग्रजांना लढाऊ जहाजें बांधावयाचीं होतीं त्यांकरितां युरोपांतून कामगार आणावे असें चाललें होतें; पण तसें करण्याचें कारण भाग पडलें नाहीं. उलट लावजीशेठनें बांधलेल्या जहाजांची कीर्ति युरोपांत पसरली. यापूर्वींच १७७५ सालीं, मुंबईची गोदी पाहून इतकी मोठी व सोईस्कर गोदी सर्व युरोपांत नाहीं असें एकानें लिहिल्याचा दाखला सांपडतो. मुंबईत जहाजें बांधण्याला विलायतेपेक्षां पाऊणपट खर्च कमी येतो व शिवाय मुंबईत बांधलेलीं जहाजें विलायतेंत बांधलेल्या जहाजांपेक्षां तिप्पट टिकतात, असे सरकारी उल्लेख सांपडतात! कलकत्त्याच्या हुबळी नदीवरील गोदींत १८७६ पर्यंत बरींच मोठीं जहाजें बांधलीं जात. पण सन १८६० पासून या धंद्यास विलायतेस तेजी येऊन इकडे मंदी आली. सन १८११ सालीं एका फ्रेंच गृहस्थानें हिंदी कारागिरीसंबंधानें खालील उद्गार लिहून ठेवले आहेतः—" In ancient times the Indians excelled in the art of contracting vessels; and the present Hindus can in this respect still offer models to Europe, so much so that the English, attentive to everything which relates to naval architecture, have borrowed from the Hindus many improvements which they have adopted with success to their own shipping. The Indian vessels unite elegance and utility and are models of patience, and fine workmanship—" इंग्रज लोकांनीं हिंदु कारागिरीपासून जहाजें बांधण्याच्या विद्येंत अनेक नमुने उचललेले आहेत. हिंदी जहाजांत सौंदर्य व उपयुक्तता हीं दोनहि साधलेलीं असतात."

अशा रीतीनें गेल्या शतकापर्यंत सुस्थितींत असलेल्या या हिंदी कारागिरीचा फिरून उदय होईल का? असा प्रश्न यानंतर आपोआपच सुचतो. पण तूर्त तें चिन्ह दिसत नाहीं, असेंच उत्तर द्यावें लागेल. आपलीं जहाजें आपल्याच देशांत बांधलीं जावीं अशी सर्वांनाच इच्छा असणार; व कॅनडा वसाहतीकडून इंग्लंडला मदतीदाखल मिळणाऱ्या जहाजांसंबंधानें कॅनडांतील मुत्सद्दयांनीं 'आमचीं जहाजें आम्ही बांधूं' अशी अट घातली होती. परंतु प्रधान मि० चर्चिल यांनीं ही मागणी हास्यास्पद ठरविली! खुद्द कॅनडाची ही स्थिति असल्यामुळें हिंदुस्थानांत गोद्या बांधून इकडे जहाजें तयार करू

लागावें व नौका-रचनेच्या या जुन्या विद्येस फिरून चालन द्यावें असें सरकारच्या मनांत येणें शक्यच दिसत नाहीं. अशा स्थितींत प्रो० मुकरजी यांच्या पुस्तकानें झालें तरी कोणती कामगिरी साधणार, असें कोणासहि वाटण्याचा संभव आहे. ठीकच आहे. कारण या बाबतींत इतिहास-संशोधनाच्या हजारों पुराव्यांचे कागद एकत्र शिवले तरी मासे मारणाऱ्या कोळ्याची एखादी यःकश्चित् होडीहि त्यापासून तयार होणार नाहीं ! तरी पण नाविक विद्येबरोबर त्या विद्येची आमची कोरडी आठवणहि जी वठत चालली होती ती प्रो० मुकरजी यांनीं ताजी टवटवीत केली. हा झाला तरी त्यांचा उपकार कांहीं लहान आहे असें म्हणतां येत नाहीं.

# झांशीच्या महाराणी श्री० लक्ष्मीबाईसाहेबांची पुण्यतिथि

"झांशीच्या महाराणी श्री० लक्ष्मीबाईसाहेब यांच्या स्मरणाचा दिवस पाळण्याचा हा उपक्रम नवाच; तथापि असले उत्सव झालेले बरे. वर्षाच्या पंचांगांत सगळे अशा प्रकारचे दिवस नोंदले जावे. यांतील कांहीं दिवस कोणी धार्मिक दृष्टीनें पाळतील, कांहीं दिवस राष्ट्रीय दृष्टीनें पाळतील. रोजनिशींत प्रत्येक पानावर संस्मरणीय वाक्यें दिलेलीं असतात; त्यांचा उपयोग काय ? तर तें वाक्य वाचलें तर तितकाच वेळ त्याच्या चिंतनांत जातो. राणीसाहेबांची पुण्यतिथि पाळण्याचे बाबतींत कांहीं सुज्ञ माणसांच्या मनामध्येंहि गैरसमजच आहे. इतिहासाचे प्रेमी व अनुभवी असे एक गृहस्थ आज मला म्हणाले कीं, लक्ष्मीबाईंची पुण्यतिथि पाळणें बरोबर नाहीं. मी या सभेला हजर रहात नाहीं. लक्ष्मीबाईसाहेबांनीं एवढें घोडें काय मारलें ? मेलेल्या स्त्रीच्या उज्ज्वल चारित्र्याची आठवण करणें यांत गैर काय आहे ? ही सरळ गोष्ट आहे. त्या बंडांत सामील झाल्या एवढाच त्यांच्या बाबतींत दोष दाखविण्यांत येतो. त्या बंडांत सामील झाल्यावर त्यांचा ज्या रीतीनें शेवट व्हावयाचा तो झाला. आज आपण जो उत्साव करीत आहों, तो त्या बंडांत सामील झाल्या याकरितां नसून,

त्यांच्यांत जे उदात्त गुण दिसून आले त्यांची आठवण म्हणून हा उत्सव करीत आहोंत. यांत वर्तमान राजकारण नाहीं व गतकालचेंहि राजकारण नाहीं. लास्ट म्यूटिनीं हीरो म्हणून एकाद्या फाटक्यातुटक्या शिपायाची नोंद तिकडे करण्यांत येते. त्या वेळीं बंडांत सामील असलेला इतकाच त्या हीरोचा अर्थ. बंडाची इतकी आठवण विलायतेंत ठेवण्यांत येते. मग भारतीय योद्धयाच्या तोडीचे पराक्रम ज्या तेजस्वी स्त्रीनें केले, तिची आठवण ठेवणें यांत गैर काय आहे? यांत राजकारण नाहीं. बंड करा असें कोणी सांगत नाहीं. शिवाय आपण जर इतिहास चाळला, तर असें दिसून येईल कीं, ज्या राजकीय दृष्टीनें बंडाला बंड म्हणतां त्या दृष्टीनें लक्ष्मीबाई-साहेबांनीं बंड केलें नव्हतें. इंग्रज सरकारला येथून घालवून द्यावें असा त्यांचा हेतु नव्हता; तर त्यांची सरकारच्या विरुद्ध तक्रार होती. लक्ष्मी-बाईला शेवटीं सरकारकडून जी वागणूक मिळाली, त्यामुळें त्या बेफाम झाल्या व शेवटीं नाइलाजानें बंडांत सामील झाल्या. नानासाहेब बंडवाले म्हणून प्रसिद्ध आहेत; पण खरा इतिहास तसा नाहीं. इंग्रजी अधि-काऱ्यांची खुषामत करणारे, त्यांना मेजवान्या देणारे सरदार अशी त्यांची प्रसिद्धि होती. या सगळ्याचा हेतु बाजीरावसाहेब मेल्यावर जें पेन्शन बंद झालें, तें परत मिळावें असा स्वार्थी होता. मी आपणाला हा जो नवा वृत्तांत सांगत आहें हा मीं ब्रह्मावर्ताला ऐकला आहे. समकालीन लोकांनीं लिहिलेला किंवा सांगितलेला तोच खरा इतिहास. मी १९१६ सालीं ब्रह्मावर्ताला गेलों होतों. बाजीरावांच्या हाताखालीं सरदार असलेले धार-वाडकडचे सुभेदार घराण्यांपैकीं एक वृद्ध गृहस्थ मला भेटले. ते बंडाचे वेळीं हजर होते. त्या गृहस्थांनीं अशी हकीकत सांगितली कीं, इंग्रज या देशांतून जावे म्हणून हें बंड केलें नाहीं, तर इंग्रजांच्या अन्यायाविरुद्ध बंड केलें होतें. नानासाहेबांचे चुलतभाऊ रावसाहेब हे जहाल असून, हिंमतवान् व शूर होते. बेटामध्यें शिकार वगैरे करण्याच्या नादांत ते असत. तोंडांत भट्टा धरून भरलेल्या नदींतून पोहत जाऊन पैलतीर गांठावयाचा व शिकार करावयाची हा त्यांचा व्यवसाय होता. चोहोंकडे बंड झालें. कानपुरास साहेबांची कत्तल झाली. हिंदुमुसलमान हे दोघेहि त्या वेळीं बंडांत सामील होते. हिंदु-मुसलमानांची त्या वेळीं आटोकाट एकी होती. पण बंड फसलें.

दिल्लीच्या बादशहाला आपला राजा करावा असें बंडवाल्यांनीं ठरविलें व ते दिल्लीच्या मार्गानें निघाले. ब्रह्मावर्त टाकून ते एक मुक्काम पुढेंहि गेले; पण लोक उतावळे झाले होते. दिल्ली तर दूर होती. तेव्हां ते जवळपास राजा शोधूं लागले तेव्हां पेशव्यांचा वंशज असल्याचें त्यांना कळलें व ते बंडवाले एक मुक्काम पुढें गेलेले परत ब्रह्मावर्ताला आले. त्या म्हाताऱ्या गृहस्थानें मला जी हकीकत सांगितली ती अशी:-संध्याकाळीं ५ वाजतां ते बंडवाले ब्रह्मावर्तास आले. त्या वेळीं नदीच्या कांठीं रावसाहेब,नानासाहेब वगैरे मंडळी बसली होती. ते बंडवाले नानासाहेबांना म्हणाले कीं, 'आपण आमचे राजे व्हा', त्या वेळीं नानासाहेबांनीं मी होणार नाहीं' असें उत्तर दिलें. तेव्हां बंडवाल्यांनीं सांगितलें कीं, या बंडांत सामील तरी व्हा, नाहीं तर आपल्याला इथल्या इथें तोडूं. रावसाहेबांनींहि नानासाहेबांना भर दिली. बंडवाल्यांचा एकच सवाल कीं, आमचे पुढारी व्हा नाहीं तर मरा! अशा स्थितींत नानासाहेबांना त्यांत सामील व्हावें लागलें. याच्यापूर्वीच कानपूरला पहिली कत्तल झाली होती. त्यानंतर दुसरी झाली. आपलीं बायकामुलें नावेंत बसवून न्या असें साहेबांना नानांनीं सांगितलें. त्याप्रमाणें गंगेंतून नावा चालल्या. बंडवाले यांची कत्तल करा म्हणत होते; पण नानासाहेबांनीं खूप विरोध केला. शेवटीं बंडवाल्यांनीं त्यांचें ऐकलें नाहीं. त्यांनीं तोफ डागून नाव बुडविली व शेवटीं या सर्वांचें खापर नानांच्या माथीं फुटलें. पुढें तेथून नानासाहेब पळाले ते ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत राहिले व अखेर ते नेपाळमध्यें गेले. पुढें त्यांचें काय झालें हें सांगतां येत नाहीं. या सर्वांवरून आपल्या हें ध्यानांत येईल कीं, त्या वेळीं जें बंड झालें तें अन्यायाविरुद्ध झालें व त्यांना नाइलाजानें बंडांत सामील व्हावें लागलें. लक्ष्मीबाई बंडांत सामील झाल्या तरी त्यांत राज्यक्रान्ति नव्हती. त्यांचे जे अलौकिक गुण आहेत, त्यांची मोकळ्या मनानें आठवण करण्यास कांहींहि हरकत नाहीं. यांत सरकारचा गुन्हा नाहीं. कोणतेंहि पाप नाहीं. आपल्यांतील चांगली स्त्री भारतीय योद्ध्याप्रमाणें लढली, किल्ला जातीनें लढविला, अशा तेजस्वी स्त्रीचें गुणवर्णन करणें जरूर आहे. ही एवढी हकीगत सांगण्याचें कारण कांहीं सुज्ञ माणसांना अजूनहि या बाबतींत शंका येते म्हणून हा वृत्तांत सांगितला."

# हिंदुस्थानाची प्राचीन संस्कृति

इ. सन १९१६ च्या डिसेंबर महिन्यांत लखनौ येथें भरलेल्या हिंदी राष्ट्रीय सभेमध्यें जो स्वराज्य विषयक ठराव पसार करण्यांत आला होता; त्यामध्यें असें म्हटलें आहे कीं—

"हिंदुस्थानांतील मोठमोठ्या जातीचे लोक, हे प्राचीन काळींच सुधारलेल्या लोकांचे वंशज असून त्यांनीं आपल्यामध्यें राज्यकारभार चालविण्याची पात्रता असल्याचें निदर्शनास आणून दिलें आहे. आणि ब्रिटिश अमलाखालीं एक शतकांत शिक्षण आणि सार्वजनिक कळकळ या बाबतींत त्यांची पुष्कळ प्रगति झाली आहे. म्हणून हिंदुस्थानास स्वराज्याची प्राप्ति करून देणें, हा इंग्रजी राजनीतीचा उद्देश व हेतु आहे असा जाहिरनामा बादशहांनीं लवकर काढण्याची मेहेरबानी करावी."

हिंदुस्थानचा पूर्ण द्वेष करणाऱ्या टीकाकारांनाहि नाकबूल न करितां येण्यासारखी कोणती एखादी गोष्ट असेल तर ती ही कीं, हिंदुस्थानांत प्राचीन काळीं अत्युत्तम अशी संस्कृति होती. सन १८८२ मध्यें हिंदी सिव्हिल सर्व्हिसच्या उमेदवारांपुढें भाषण करतांना प्रो० मॅक्स् मुल्लर यांनीं हिंदुस्थानाविषयीं खालील स्तुतीपर उद्गार काढले. ते म्हणाले "सर्व जगांत निसर्गदत्त संपत्ति, सामर्थ्य आणि सौंदर्य यांनीं समृद्ध व कांहीं ठिकाणीं तर केवळ नंदनवनच असा देश जर मला दाखवावयास सांगितला तर मी हिंदुस्थानाकडेच बोट दाखवीन. मला जर कोणीं असें विचारलें कीं, भूतलावरील कोणत्या भागांत मानवी बुद्धिमत्तेच्या अत्युत्तम देणग्या विकास पावल्या आहेत व तिनें जीवितगूढांतील प्रश्नांचा उत्कृष्टपणानें छडा लावला आहे व प्लेटो आणि कॅन्ट यांचा अभ्यास करणारांचेंहि लक्ष आकर्षण केलें जाईल अशा रीतीनें त्या प्रश्नांपैकीं कांहींचा समाधानकारक निकाल तिनें कोठें लावला आहे? असें जर मला कोणीं विचारलें तरीहि मी हिंदुस्थानाकडे बोट दाखवीन."

कदाचित् असा आक्षेप घेण्यांत येईल कीं, प्रो० मॅक्स्मुल्लर हा, हिंदी साहित्य व तत्त्वज्ञान यांच्या लालित्यानें व सौंदर्यानें मुग्ध होऊन

हिंदुस्थानचा अंध स्तुतिपाठक बनला होता; शिवाय साहित्य व तत्त्वज्ञान या दोहोंनींच राष्ट्राच्या संस्कृतीला पूर्णता येत नसते ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे म्हणून हिंदुस्थानांत कायम वस्ति केलेल्या आर्य व अनार्य जाति यांनीं समाविष्ट असलेल्या हिंदी लोकांची संस्कृति दर्शविणारी परिस्थिति व त्यांचा पराक्रम यांचा आम्हीं थोडक्यांत सारांश देण्याचें योजिलें आहे.

प्रथमत: आपण हिंदु लोकांकडे वळूं. हिंदु लोकांच्या संस्कृतीची प्राचीनता इतकी दूरवर पोहोंचते कीं; तिला जवळजवळ अनादि अथवा केवळ स्मृतिगम्यच म्हणतां येईल. तथापि, आपण वेदकालीन अथवा पुराणकालीन संस्कृतीची चर्चा करण्याचें सोडून केवळ ऐतिहासिक कालां-तील माहितीवरून पहाण्याचें योजिलें तरीहि आपणांस फार जुन्या काळा-कडे नजर फेंकली पाहिजे. मेकॉलेनें त्या काळाविषयीं विनोदानें असें म्हटलें आहे कीं, 'त्या काळीं इंग्लंडचे लोक आपलीं रंगविलेलीं शरीरें कातड्यांनीं पांघरून रानावनांत स्वैर भटकत असत'. हिंदुस्थानासंबंधीं उत्कृष्ट शास्त्रशुद्ध अशा असंख्य गोष्टी स्पष्ट कालनिर्णयाच्या अभावीं सोडून दिल्या तरी ऐतिहासिक कालीं—मि० व्हिन्सेंट स्मिथ ह्यांनीं हिंदुस्थानांतील ऐतिहासिक कालाचा आरंभ ख्रिस्तीशकापूर्वी ७व्या शतकापासून ठरविलेला आहे—राष्ट्र या दृष्टीनें हिंदुस्थानच्या राजकीय ऐक्याबद्दल पुरावा मिळाला आहे. एवढेंच नव्हे, तर लेखनकलेचा प्रसार व जलमार्गानें होणाऱ्या व्यापाराची भरभराट यांबद्दलहि पुरावा सांपडला आहे. अतिप्राचीन ऐतिहासिक लेखांवरून असें दिसतें कीं, हिमालय व नर्मदा यांमधील हा प्रदेश, स्वतंत्र संस्थानें, कांहीं राज्यें व कांहीं लोकसत्ताक पद्धतीचीं राज्यें यांमध्यें विभागला गेला होता. ख्रिस्तीशकापूर्वी ६ व्या शतकांत कोसल हें प्रमुख साम्राज्य असून जगांतील सर्वांत मोठा धर्मोपदेशक भगवान् गौतम बुद्ध जन्माला येण्याचें भाग्य त्याच्या वांट्यास आलें होतें. आणखी हेंहि ध्यानांत ठेवण्यासारखें आहे कीं, असलीं बहुतेक राज्यें, त्यांचें स्वयंशासनत्व न भंगतां एकाच हिंदुसाम्राज्याच्या छत्राखालीं आणलीं जात असत अथवा त्याचा एक भाग म्हणून गणलीं जात.

प्राचीन काळांतील थोर राजांच्या नाममालिकेंत खालील राजांचीं नांवें

प्रामुख्यानें नमूद केलीं पाहिजेत. दरायसचे समकालीन बिम्बसार व अजातशत्रु, पाटलीपुत्राचा संस्थापक उदय, अलोट संपत्तिवान् महापद्मानंद, राजकारणपटु ब्राह्मण चाणक्य याचा शिष्य प्रसिद्ध क्रान्तिकारक चंद्रगुप्त मौर्य, ग्रीक सत्रप ॲन्टिओकस याचा मित्र बिन्दुसार, भारतीय जगाचा विजेता व भगवान् बुद्धांनीं उपदेशिलेल्या उदात्त नीतितत्त्वांचा प्रचारक अशोक, प्राकृत वाङ्मयाचा पुरस्कर्ता हल, आपल्या स्वतःच्या आरमाराबद्दल व रौप्य नाण्यांबद्दल प्रसिद्ध असलेला यज्ञश्री, नवशक-स्थापक पहिला चंद्रगुप्त, उत्तरेस गंगानदीपासून दक्षिणेस कांजीवरम् मलबारपर्यंत मुलूख जिंकून भारतीय नेपोलियन हें पद प्राप्त करून घेणारा समुद्रगुप्त; पश्चिमेस सिंधुनदावर, पूर्वेस वंगप्रांतावर स्वाऱ्या करून, काठेवाड जिंकून अरबी समुद्रापर्यंत चाल करून जाणारा व ज्याचा दरबार विद्वानांबद्दल सुप्रसिद्ध असे असा दुसरा चंद्रगुप्त, श्वेतहूणावर जय मिळवून रानटी लोकांच्या जुलुमांतून देश मुक्त करणारा स्कन्दगुप्त, चलनी नाण्यांच्या सुधारणेबद्दल प्रसिद्ध असलेला प्रतापादित्य, हत्तीघोड्यांना सुद्धां गाळलेलें पाणी पिण्याला मिळावें इतका आरोग्यशास्त्राच्या सुधारणेंत पुढें गेलेला शिलादित्य, हूण लोकांवर स्वाऱ्या करणारा प्रभाकरवर्धन, आणि सर्व भारतवर्ष एक छत्राखालीं आणण्याची महत्त्वाकांक्षा धरणारा हर्ष. हा हर्ष राजा रणभूमीवर साठ हजार हत्ती व एक लक्ष अश्वदल आणीत असे. हा आपल्या विद्वत्तेबद्दल व भक्तीबद्दल प्रसिद्ध असून, ह्यूएनत्संग यानें त्याची अंतःकरणपूर्वक स्तुति केली आहे.

अर्वाचीन काळांतील खालील हिंदु राजांचाहि उल्लेख केला पाहिजे. दिल्लीचा जेता अनंगपाल; प्रतिभासंपन्न चारणांना अनंत-स्फूर्तिदायक विषय पुरविणारा खंदा रणगाजी पृथ्वीराज; टिरहटच्या दूर प्रांतानेंसुद्धां ज्याची साम्राज्यसत्ता मान्य केली असा कालेचुरी; शांततेंतील सुधारणा व युद्धकला ह्या दोहोंचाहि सारख्याच रीतीनें परामर्ष घेणारा, व नमुनेदार हिंदु राजा म्हणून नाणावलेला माळव्याचा महाराजा भोज. उत्तर व पूर्व हिंदुस्थानांतहि, सेन व पाल घराणीं अशींच प्रसिद्ध आहेत. दक्षिणेंतील राजांमध्यें कर्नाटकचा पुलकेशी हा नांव घेण्यासारखा असून त्याजकडे इराणाहून वकील आले होते. कल्याणीचा विक्रमादित्य, यानें नवा शक

सुरू केला. मि० व्हिन्सेंट स्मिथ यानें दक्षिणेंतील, पांड्य, चेर, केरळ व सत्यपुत्र या राजघराण्यांची माहिती दिली आहे. त्याबद्दल सविस्तर हकीकत देण्याची जरूर नाहीं. पण जातां जातां एवढें सांगितलें पाहिजे कीं, पांड्यराजांपैकीं एकानें ऑगस्टस सीझरकडे आपले वकील पाठविले होते. चोल घराण्यांतील राजा परंतक यांनीं आपली सेना लंकेंतहि नेली होती. त्याच घराण्यांतील राजराज यानें लंकाविजयाचें कार्य पूर्ण केलें एवढेंच नाहीं, तर आपल्या साम्राज्यांत सर्व मद्रास इलाखा, म्हैसूरचा बराचसा भाग व लखदीव मालदीवसारखीं देटें सामील केलीं. त्यानें बांधलेल्या तंजावरच्या भव्य देवालयाच्या भिंतीवर, त्याच्या पराक्रमासंबंधीं लेख व चित्रें कोरलेलीं अद्यापहि दृष्टीस पडतात. राजेंद्रचोलदेव यानें ओरिसा व बंगालप्रांत आपल्या छत्राखालीं आणले होते व त्यानें हिंदी चिनी द्वीपकल्पावर एक आरमारी स्वारी केली होती. याच ओळींत डॉ० भांडारकर यांनीं लिहिलेल्या दक्षिण हिंदुस्थानच्या इतिहासांत नमूद केलेलीं राज्यें, अगर मि० सेवेल यांचें 'विस्मृत साम्राज्य'–विजयानगरचें साम्राज्य–हीं येतात. मि० सेवेलनें म्हटलें आहे कीं, विजयानगरचें साम्राज्य 'आस्ट्रिया'पेक्षां मोठें असून, सोळाव्या व सतराव्या शतकांतील युरोपियन प्रवाशांनीं त्याची राजधानी विजयानगर ही, संपत्ति व भव्यपणा यांमध्यें, माहीत असलेल्या कोणत्याहि पाश्चिमात्य राजधानीशीं अतुलनीय आहे! असे प्रत्यक्ष पाहून उद्गार काढलेले आहेत.

याहूनहि अर्वाचीन काळाकडे येतांच आपणांस महाराजे, शूर योद्धे व राजनीतिज्ञ यांना प्रसवणाऱ्या तीन प्रमुख जातींचा उल्लेख केला पाहिजे. त्या तीन जाती म्हणजे **रजपूत, मराठे** व **शीख** ह्या होत!

रजपूत हे राजकुलोत्पन्न असून त्यांचें शौर्य, धैर्य, एकनिष्ठपणा यांमुळें ते हिंदी भाटांच्या स्फूर्तिदायक गीतांना चिरकालिक विषय होऊन बसले आहेत. ते मोठ्या अभिमानानें आपल्या उत्पत्तीची परंपरा प्रत्यक्ष परमेश्वरापर्यंत नेऊन पोहोंचवितात. **कर्नल टॉड** आपल्या राजस्थानांत म्हणतो, 'राजस्थानांत छोटीं राज्यें ज्यांनीं केलीं व अद्यापहि कित्येक करीत आहेत, त्यांच्या प्राचीन सुप्रसिद्ध घराण्यांची जर युरोपांतील प्रसिद्ध वंशांशीं

तुलना केली तर, श्रेष्ठपणा बहुतेक रजपुतांच्याच वांट्यास जाईल. अत्यंत प्राचीन काळापासून पाहिलें तरी, त्यांच्या पूर्वजांमध्यें दास्याचा अंशहि आढळून येणार नाहीं. सामर्थ्य-हास, मर्यादित राज्यविस्तार, तेजोभंग व कित्येक वेळां त्यांच्या पवित्र वंशांना जबरीनें लावलेले डाग, अशा गोष्टी असल्या तरीहि आपण तेजस्वी राजवंशांत उत्पन्न झालों आहोंत ही जाणीव अंगांत मुरली असल्यामुळें त्यांनीं आपलें उदात्त वर्तन व घराण्याचा अभिमान यांचा लेश सुद्धां टाकिला नाहीं. ह्या तत्त्वानुसार, राजांच्या घराण्यांत कितीहि क्रान्त्या झाल्या, तरी त्यांनीं मर्यादेचें उल्लंघन केलें नाहीं. आणि म्हणूनच सीझरप्रमाणें प्रत्यक्ष जहांगीर बादशहासुद्धां सिसोदिया घराण्याच्या इतिहासाचा टीकालेखक झाला. जहांगिराच्या दरबारीं इलिझाबेथनें पाठविलेला वकील सर टॉमस रो, यानेंहि ह्या घराण्याच्या वैभवाबद्दल पुरावा दिलेला आहे. तें वैभव सर्व रजपुतांच्या घराण्यांत सारखें दिसून येतें. युरोपांत खिस्त-भूमि ताब्यांत घेण्याकरितां झालेल्या युद्धापर्यंत चिलखतें वगैरे माहीतहि नव्हतीं; तीं युरोपियनांनीं अरब लोकांपासून उचललीं; परंतु त्यापूर्वींपासूनच रजपूत वीर चिलखतें, शिरस्त्राणें वगैरे परिधान करीत असत. युरोपांत ट्रायचें युद्ध झालेलें नव्हतें, त्या वेळीं इकडे रजपूत लोक मोठ्या अभिमानानें शौर्याचें चिन्ह म्हणून हीं वीरभूषणें वापरीत असत. अंतःकलहानें रजपूत जरी निर्बल झाले होते, तरी ते मुसलमान अगर मराठे यांजपुढें सर्वस्वी नत असे कधींच झाले नाहींत. त्यांचें शौर्य, त्यांचा रुबाब, त्यांची उदारता, त्यांचा विनय, त्यांचें आदरातिथ्य यांबद्दल परस्थांनीं स्तुतिस्तोत्रें गायलीं आहेत. हे रजपुतांमधील सद्गुण इतक्या क्रान्त्या झाल्या तरी मुसलमानी धर्मवेड व सत्ता यांच्या तडाक्यांतूनहि आजतागाईत जिवंत आहेत. आपल्या वीरकृत्यांनीं व उदार चरितांनीं आपली कीर्ति अमर करून ठेवलेले रजपूत राजपुरुष अनंत आहेत. इतिहासकार कर्नल टॉडनें महाराणा प्रतापाबद्दल म्हटलें आहे, 'अरवली पर्वतांत असा एकही घाट नाहीं कीं जो प्रतापाच्या कृत्यानें पावन झालेला नाहीं. हल्दीघाट ही मेवाडची थर्मापिली व देवीअरची रणभूमि ही मेवाडचें माराथान आहे. जेव्हां राणा प्रताप मृत्युशय्येवर पडला तेव्हां, महाराजांचा जीव कां घोटाळतो, त्यांस कशाच्या यातना होतात, म्हणून विचारलें असतां तो म्हणाला,

" माझी मायभूमि तुर्कांच्या हातीं जाणार नाहीं असें आश्वासन मला मिळाल्याशिवाय मला समाधान वाटणार नाहीं ! "

अर्वाचीन मराठ्यांत सर्वांत जुने देवगिरीचे यादव हे होत. यांनीं १३ व्या शतकापर्यंत राज्य केलें. जगत्प्रसिद्ध वेरुळच्या लेण्यांमुळें तर त्यांची कीर्ति अमर झाली आहे. यानंतरच्या विजयानगरच्या राजांची हकीगत पोर्तुगीज लेखकांनीं, अत्यंत उत्कृष्ट रीतीनें लिहिलेली आहे. हंपी येथील आज मोडकळीस आलेले विजयस्तंभ पाहिले म्हणजे त्यांच्या वैभवाची पूर्ण कल्पना होते. नर्मदा व कावेरी यांच्या दुआबांत राज्य करणारे मराठे, व उत्तरेकडील रजपूत यांचे संबंध कसे होते याबद्दल जरी वाद असला तरी त्यांच्या कर्तबगारीबद्दल मात्र कोणासहि आक्षेप घेतां येणार नाहीं. मुसलमानी सत्तेशीं टक्कर देऊन, मराठी राज्याची संस्थापना करणारे शिवाजीमहाराज हे त्या सर्वांत अत्यंत वैभवशाली होते ! त्यांचे वंशज अद्यापिहि ब्रिटिश सरकारचे आधारस्तंभ मानले जातात. मि० एल्फिन्स्टन यांनीं आपल्या 'हिंदुस्थानचा इतिहास' या ग्रंथांत म्हटलें आहे कीं, " कोणत्याहि हिंदुराज्यापेक्षां मराठ्यांचा राज्यविस्तार मोठा असून त्यांनीं जवळजवळ सर्व हिंदु साम्राज्याचा उपभोग घेऊन आपला लौकिक कायम ठेवला." हिंदुस्थानचा इतिहासकार, सर वुइलियम हंटर हाहि मराठ्यांबद्दल लिहितो, " ब्रिटिशांनीं हिंदुस्थान मोगलाकडून जिंकून घेतलें नाहीं, हिंदूंपासून घेतलें. आम्ही जेते म्हणून उदयास येण्यापूर्वींच मोगल साम्राज्याची वाताहत झालेली होती. आमचीं शेवटचीं युद्धें, दिल्लीच्या बादशहाशीं किंवा त्यांच्या बंडखोर सुभेदारांशीं झालीं नसून मराठे व शीख या दोन हिंदु राज्यांबरोबर झालीं. मराठ्यांबरोबर शेवटचीं युद्धें सन १८१८ मध्यें झालीं."

शिवाजीचा बाप शहाजी हा भाग्यदेवीचा लाडका शिपाई असेल, परंतु त्यानें मोठ्या मुत्सद्दीपणानें विजापूर व अहमदनगर येथील राज्यांच्या द्वारें, दक्षिणेस पसरणाऱ्या मोगलसत्तेस प्रतिबंध केला. तो खराखुरा राजे निर्माण करणारा होता. व अहमदनगरच्या गादीवर एक नामधारी बाहुलें बसवून खरीं राज्यसूत्रें तोच हलवीत असे व मराठी साम्राज्याची इमारत उभारण्याचें काम जरी त्यानें आपल्या मुलावर सोंपविलें असलें तरी त्या

पायाच्या पूर्व तयारीचें खरें काम त्यानें आगाऊच करून ठेवलें होतें. शिवाजीनें जरी 'महाराज छत्रपति' हें पद धारण केलें तरी शहाजीची 'राजा' ही पदवीहि अगदींच पोकळ नव्हती. शिवाजीचें नांव जरी पाश्चात्यांना परिचित असलें तरी त्याच्या खऱ्या चरित्राबद्दल मात्र त्यांस पूर्ण ज्ञान नाहीं. कलुषित इतिहासकारांनीं द्वेषानें डोंगरांतला लुटारू, एवढें त्याचें वर्णन केलेलें मात्र त्यांस माहीत आहे. म्हणूनच आम्ही मराठ्यांचा इतिहासलेखक **ग्रॅन्टडफ** याचा उतारा उद्धृत करितों. तो म्हणतोः–
" शिवाजी हा खरोखरच असाधारण पुरुष होऊन गेला. न्यायबुद्धीला त्याचीं कांहीं कृत्यें निंद्य वाटलीं तरी तो उच्च कोटींतला पुरुष होता हें मान्य केलेंच पाहिजे. अर्धनग्न मावळ्यांच्या झुंडीच्या झुंडी झुंडी गोळा करून त्यांच्या अंतः-करणात प्रचंड उत्साह उत्पन्न करून, त्यांना तो शीतोष्णादि ऋतूंचीहि पर्वा न करतां आपल्यामागें नेत असे. या गोष्टीचा विचार केला म्हणजे त्याच्या परा-क्रमाची कल्पना होईल. त्याचे नीतिसिद्धान्तहि अपूर्व असत. त्या वेळेच्या परिस्थितीचा विचार केला असतां, बलसंपादनार्थ त्यानें अंगिकारलेलाच मार्ग योग्य होता ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. त्यानें केलेली राज्यकारभाराची अंतर्गत व्यवस्थाहि लक्षांत घेतली पाहिजे. त्याला सारख्या लढाया माराव्या लागत, तरीहि त्यानें प्रत्येक विभागाची उत्तम सुधारणा केली होती. नाना युक्त्याप्रयुक्त्या करून संकटांतून तो निभावून जाई. एकादा किल्ला सर करण्यांचा अगर एकादा दूरचा देश जिंकावयाचा तो बेत करीत असो, एकादी चढाई करो अगर पिछेहाट करो, शेंदोनशें स्वारांची शिस्त राखण्याची व्यवस्था करीत असो, अगर एकाद्या देशाच्या राज्यशासनाचे निर्बंध ठरवीत असो; प्रत्येक गोष्टींत त्याच्या चातुर्याबद्दल आदर व त्याच्या युक्तिबुद्धीचें आश्चर्यच वाटतें. मितव्ययता हा एक त्याचा प्रधान गुण होता. व अलोट लूट सांपडली तरीहि, घालून दिलेल्या नियमां-चें त्यानें उल्लंघन केलेलें नाहीं. त्याची धूर्तता, त्याची नम्रता, त्याची निधडी छाती, निश्चय, महत्त्वाकांक्षा व स्वतःच्या स्वार्थाविषयीं बेफिकीर राहून, उत्साह जागृत करण्याची त्याची शक्ति, एकच ध्येय साध्य करण्या-ची त्याची मुत्सद्दीपणाची शिस्त व हातोटी, आणि तुच्छ लेखिलेल्या हिंदूंना राज्यपदावर नेऊन बसविणाऱ्या त्याच्या शहाणपणाच्या कारस्थानांचाहि

विचार केला पाहिजे." कै० न्यायमूर्ति रानडे यांनीं आपल्या 'मराठी सत्तेचा उदय' या पुस्तकांत म्हटल्याप्रमाणें "शिवाजीचा इतिहास, आपणांपुढें त्याची एकच बाजू म्हणजे त्याचीं वीरकृत्यें उभी करतो, परंतु तो जितका उत्कृष्ट सेनानी होता तितकाच राज्यकार्यधुरंधरहि होता, हें आपणांस विसरतां यावयाचें नाहीं. पहिल्या नेपोलियनप्रमाणें शिवाजी हा आपल्या काळांत उत्कृष्ट शासनकर्ता व शासनसंस्थांचा संस्थापक होता व त्यामुळेंच सतत वीस वर्षे मोगलसत्तेशीं झुंजून नाना संकटांशीं टकरा देत, राष्ट्रीय स्वातंत्र्याचा मार्ग सुगम करून तो आपल्या अंगीकृत कार्यांत यशस्वी झाला." शिवाजींत प्राचीन हिंदु राज्यांतील शासनपद्धति व तत्कालीन परिस्थितीस अनुरूप अशी शासनपद्धति यांचें मधुर मिश्रण करण्याची अद्भुत शक्ति होती. तो कीर्तिशाली पूर्वजांचा वंशज होताच, व त्यानें आपणांहि आपल्या वंशजांना बरीचशी कीर्ति राखून ठेविली होती.

हिंदूंच्या पैकीं ब्रिटिशांच्या ताब्यांत गेलेले अगदीं शेवटचे शीख होत. सतत दोन शतकें त्यांनीं मुसलमानांबरोबर मोठ्या शौर्यानें युद्धें केलीं. त्यांच्यांतला शेवटचा वैभवशाली राजा 'पंजाबचा सिंह' म्हणून प्रसिद्ध असलेला रणजितसिंग हा होय! हा आपल्या वयाच्या २०व्या वर्षींच लाहोरचा सुभेदार झाला व त्यानें युरोपियन लष्करी शिक्षकांच्या देखरेखीखालीं इतकी फौज तयार केली कीं, शौर्य व धर्मतेज यांमुळें त्याच्या सेनेची क्रॉमवेलच्या 'आयर्नसाइड्स्'बरोबर तुलना करतां येईल.

हिंदूंच्या प्राचीन राजकीय सुधारणांबद्दल दुसरा एक विचार करण्यासारखा मुद्दा म्हटला म्हणजे त्यांच्या राज्यविस्ताराबद्दल होय! वर ज्या प्रमुख प्रमुख राजांचा संक्षिप्त उल्लेख केलेला आहे त्यांच्या राज्यविस्ताराबद्दलहि थोडासा उल्लेख आला आहे. तथापि आणखीहि कांहीं उदाहरणें देतां येतील. मि० व्हिन्सेंट स्मिथ अशोकाबद्दल म्हणतोः—

"एकंदरींत त्याच्या साम्राज्यांत, आजचें अफगाणिस्थान, हिंदुकुशाच्या दक्षिणेकडील मुलुख, बलुचिस्थान, सिंध, काश्मीर व नेपाळ हीं खोरीं आणि हिमालयाच्या उतरणीवरचा मुलुख यांचा समावेश होत असून अगदीं दक्षिण टोंकाशिवाय सर्व प्रदेश त्याच्या साम्राज्यांत मोडत होता."

समुद्रगुप्ताच्या राज्यविस्ताराबद्दल सदर लेखक म्हणतोः—

"चौथ्या शतकामध्यें उत्तरहिंदुस्थानांतील सर्व सुपीक व लोकवस्तीचा मुलूख समुद्रगुप्ताच्या ताब्यांत होता. पूर्वेस हुगळी व पश्चिमेस चंबळपर्यंत त्याचा राज्यविस्तार असून उत्तरेस हिमालयाच्या पायथ्यापासून तो दक्षिणेस नर्मदेपर्यंत तें पसरलें होतें. सहावें शतकांपूर्वी अशोकाच्या छत्राखालीं जेवढें साम्राज्य होतें. त्याच्याहून समुद्रगुप्ताचें साम्राज्य किती तरी मोठें होतें व म्हणून स्वाभाविकच त्याला समुद्रगुप्त असें नांव पडलें होतें. गांधार आणि काबूलचा राजा कुशान, आक्ससचा राजा, आणि सीलोन व इतर दूरस्थ द्वीपें यांच्याशीं त्याचा राजकीय संबंध होता."

अशा प्रकारचीं प्रचंड राज्यें सैनिकबलाशिवाय जिंकलींहि जात नाहींत व संरक्षिलींहि जात नाहींत. व म्हणूनच प्राचीन हिंदुराजांजवळ प्रचंड शौर्यशालिनी सेना होती असें जर कोणीं सांगितलें तर त्याबद्दल आपणांस आश्चर्यहि वाटण्याचें कारण नाहीं.

चंद्रगुप्ताच्या साम्राज्याचें वैभव वाढविणारी त्याची सेना मनुष्यबलानें प्रचंड, अत्यंत सुव्यवस्थित, जय्यत सामुग्रीनें समृद्ध असून प्राचीन काळीं उपलब्ध असलेल्या सर्व साधनसंपत्तीनें युक्त होती. हें सैन्य खडें होतें व त्याला सरकारांतून वक्तशीर व भरपूर पगार, घोडे, शस्त्रास्त्रें व इतर सामुग्री मिळे. महापद्मनन्दाच्या सेनासागरांत ऐंशीं हजार स्वार, वीस हजार पायदळ, आठ हजार रथ व सहा हजार लढवय्ये हत्ती असत. याशिवाय चंद्रगुप्तानें पुष्कळ सेनासागर वाढवून सहा लक्ष पायदळ, तीन हजार घोडेस्वार, नऊ हजार हत्ती; शिवाय रथ हें सर्व कायमचें सैन्य ठेवून त्यांस वक्तशीर पगार देण्याचीहि व्यवस्था केली होती.

प्रथमदर्शनींच आपला ह्या संख्याबलावर विश्वास बसणार नाहीं; परंतु हिंदी राजांनीं रणांगणावर ज्या सेना नेल्या तिकडे लक्ष दिलें म्हणजे आपली खात्री पटते. उदाहरणार्थः—पोर्तुगीज अखबारनीस नुनेज हा सोळाव्या शतकांतील (१५०९–३०) विजयनगरचा राजा कृष्णदेव याबद्दल असें खात्रीपूर्वक सांगतो कीं, या राजानें रायचूरवर चढाई केली त्या वेळीं त्याजबरोबर ७०३००० पायदळ, ३२६०० स्वार, ५५१ हत्ती व शिवाय बाजारबुणगे होते.

फार प्राचीन काळापासून हिंदी सेनेचे, स्वार, पायदळ, हत्ती, रथ असे

चार विभाग मानले जात असत. परंतु चंद्रगुप्तानें आपल्या असाधारण बुद्धिमत्तेनुरूप आरमारी व पुरवठा अशीं दोन खातीं जास्त जोडलीं. त्या सर्वांची व्यवस्थाहि उत्तम ठेविली जात होती. प्लुटार्क त्याबद्दल लिहितोः "चंद्रगुप्तानें या सेनेच्या साहाय्यानें सर्व हिंदुस्थान पादाक्रान्त केलें एवढेंच नाहीं, तर त्यानें मॅसिडोनियाची फौज हांकून देऊन, सेल्युकसची मोहीम निष्फळ केली."

हिंदूंच्या राज्यशासनाच्या नियमांबद्दल **बाबू प्रमथनाथ बानर्जी** यांच्या ( Public administration in ancient India ) पुस्तकांत विस्तृत विवेचन केलें आहे, तें वाचकांनीं पहावें अशी आमची शिफारस आहे. त्या पुस्तकांत ते लिहितात, "वैदिक काळारंभीं समाजरचना अगदीं साधी असून समाजांत जातिभेद बिलकुल नव्हता, व प्रत्येकजण समान दर्जाचाच मानला जाई. कुटुंबव्यवस्थेंत, कुटुंबांतील वडील मनुष्य हाच प्रमुख समजला जात असे; परंतु आर्य पिता हा आपल्या कुटुंबाचा सर्वस्वीं मालक नसे व रोमन पित्याप्रमाणें आपल्या ताब्यांतील लोकांच्या प्राणावर त्याचा अधिकार नसे. पाश्चात्य देशांत ज्या प्रकारची गुलामगिरी होती त्या प्रकारची गुलामगिरी येथें नव्हती. मॅगॅस्थेनीस यानेंहि 'हिंदु लोक गुलाम बाळगीत नसत' अशी ग्वाही दिली आहे. ग्रामव्यवस्थेचीं कामें ग्रामपंचायतीच्या मार्फत चालत; व सर्व लोकांचें हित-अनहित एकच असल्यामुळें, सर्व कुटुंबें एकाच सूत्रांत संबद्ध झालेलीं असत. प्राचीन काळीं, लोक राजशासनसत्ता मानीत होते. परंतु कित्येक पाश्चात्य लेखक म्हणतात, त्याप्रमाणें हिंदु लोक राजास देवाचा अंश मानीत, ही गोष्ट मात्र निराधार आहे. कारण जनतेनें राजाला केव्हांहि धर्माधिपति मानलेला नाहीं. राज्यशासनाचा उद्देश मोक्षप्राप्ति नसून राजकीय व सामाजिक कल्याण करणें हाच केवळ असे. धर्म व कायदा यांत त्या वेळीं आजच्या इतका स्पष्ट भेद दाखविला नसला, तरी राजा हाच मुख्य शास्ता असून कायद्यांची फक्त अंमलबजावणी करण्याचें काम त्याजवर सोंपविलेलें असे. प्रजेचें राजकीय महत्त्व अगदीं स्वतंत्र असून, धार्मिक आचारांशीं राजांचा कांहीं संबंध नसे. मनुष्याच्या व्यक्तिगत हक्कांपेक्षां त्याच्या सामाजिक हक्कांना जास्त प्राधान्य दिलें जाई. कित्येक युरोपिअन लेखक म्हणतात, त्याप्रमाणें राजाच्या हातीं अनियंत्रित

सत्ता असे व तो आपल्या प्रजेच्या हिताबद्दल अगदीं बेफिकीर असेअसें मानणें चुकीचें होईल. कारण राजाच्या हातीं कायदे करण्याची सत्ता नव्हती हें लक्षांत ठेविलें पाहिजे. देशांतील विद्वान् पंडित व जातींतील प्रमुख लोक आपल्या रीतिरिवाजांस अनुसरून असे कायदे करीत. राजानें फक्त त्यांची अंमलबजावणी करावयाची असे. तात्पर्य, तो कायदे करणारा नसून त्याची बजावणी करणारा मुख्य शास्ता होता. याचप्रमाणें राज्यव्यवस्था व वसुली या बाबतींतहि त्याचे हक्क अत्यंत नियंत्रित असत. कारण राज्यांतील ग्राम-पंचायती, भिन्न भिन्न जाति व व्यापारीवर्ग आपल्या रीतिरिवाजांस अनुकूल अशा पद्धतीनें कायद्यांची बजावणी करण्याबद्दल आग्रह धरीत."

एकमुखी राजसत्ताक राज्यपद्धतीच हिंदूंना माहीत होती असे नाहीं. येथें प्राचीन काळापासून अल्पजनसत्ताक व बहुजनसत्ताक राज्य-पद्धति रूढ होती, अशाबद्दल मि० ऱ्हीस डेव्हीस, मि० व्हिन्सेन्ट स्मिथ, डॉ० सर भांडारकर, मॅक्क्रिंडल वगैरेंचा भरपूर पुरावा आहे याबद्दल त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उतारे खालीं देऊं.

" कपिलवस्तु येथें शाक्य लोक आपला राज्यकारभार व न्यायाचें काम **संथागार** नामक एका सार्वजनिक दिवाणखान्यांत करीत; त्या वेळीं वृद्ध-तरुण सर्व लोक तेथें हजर असत. अधिवेशनप्रसंगीं, अगर अधिवेशन नसेल तर राज्यकाजासाठीं, एक मुख्य अधिकारी निवडला जाई व तो राजा ही पदवी धारण करी; ही पदवी रोमन कौन्सल किंवा ग्रीक आरकान याला समानार्थी आहे."

प्राचीन बुद्ध-लेखांवरून असें सिद्ध झालें आहे कीं, सामर्थ्यवान् एक-तंत्री राजांच्या राज्याबरोबरीचीं लोकतंत्री राज्येंहि होतीं व तीं स्वातंत्र्याचा पूर्ण उपभोग घेत असत. या बुद्धलेखांना त्यानंतरच्या जैन-लेखांनीं पुष्टि दिली असल्यानें त्यांच्या सत्यासत्यतेबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. (ऱ्हीस डेव्हिस.)

पंजाब, पूर्वराजपुताना व माळव्यांतील बहुतेक भाग अशा प्रजासत्ताक संस्थांच्याच ताब्यांत होता.

सन १८९८ मध्यें बंगाल ॲशिएटिक सोसायटीचे अध्यक्ष डॉ० होर्नूल यांनीं जैनधर्मावर व्याख्यान दिलें. त्यांत त्यांनीं जैनधर्माचा संस्थापक

महावीर हा एका अल्पजनसत्ताक राज्यांत जन्मला असें विधान केलें आहे. अल्पजनसत्ताक हा राजसत्ता–लोकसत्ता यांजमधील दुवाच आहे. वैशाली येथें अल्पजनसत्ताक राज्यपद्धति होती, व तिचें नियंत्रण क्षत्रियजातींतील पुढाऱ्यांच्या मंडळाच्या हातीं होतें.

"कांहीं राज्यांवर राजेलोक राज्य करीत व कांहीं ठिकाणीं लोकसत्ता होती. उदाहरणार्थ, महाभारतांत वृष्णींनीं असेंच अल्पजनसत्ताक राज्य स्थापिलें होतें. त्यांचे पुष्कळ पुढारी असत. व कृष्ण हाहि त्यांतील एक प्रमुख होता. त्या कालीं, भारतवर्षांत कोणत्या ना कोणत्या रूपानें लोकतंत्री संस्था अस्तित्वांत होत्या ही गोष्ट निर्विवाद आहे."

"कुमारगुप्त आणि बंधुवर्धन यांच्या मंदेसर येथील शिलालेखावरून, मालव देशांत लोकसत्ताक राज्यपद्धति अंमलांत होती असें दिसतें."

"अम्बष्ठ लोक ज्या नगरांतून रहात तेथें लोकतंत्री राज्यकारभार चाले. करटिअसनें अशाच एका शक्तिसंपन्न जातीचा उल्लेख केलेला आहे. तेथेंहि लोकसत्ताक राज्यपद्धतिच रूढ होती. मलोईनीं जेव्हां शिकंदराचें वर्चस्व मान्य केलें त्या वेळीं त्यांनीं शिकंदरास बजावलें कीं स्वराज्य व स्वातंत्र्य यावर आमचें फारच प्रेम असून, हिंदुस्थानांत डायोनियस आल्यापासून अलेक्झांडरच्या स्वारीपर्यंत आम्ही आपल्या स्वातंत्र्याचें संरक्षण केलें आहे."

"अल्पजनसत्तेचें अत्यंत उत्कृष्ट उदाहरण, लिच्छवीस (Lichavis) यांचें होतें. त्यांतील सर्व प्रमुखांस राजा ही संज्ञा असे."—(पी. बानर्जी.)

भारतीय आर्यांमध्यें त्यांच्या युरोपियन बंधूंप्रमाणेंच स्वतंत्र राजकीय संस्थांबद्दल उपजत आवड होती. बुद्धांच्या पाली ग्रंथांतून प्रजातंत्री राज्यांच्या अस्तित्वाबद्दल बरेच उल्लेख आलेले आहेत.

उपरिनिर्दिष्ट हिंदु राज्यपद्धतीला गोड अशींच फळें आलीं होतीं. देशांत कोठेंहि अशांतीचें नांवहि ऐकूं येत नसे. सर्वत्र शांति व समाधान यांचेंच साम्राज्य होतें. अन्याय, सामाजिक तंटे व क्रान्त्या यांचा मागमूस नव्हता, राजांची महत्त्वाकांक्षा प्रबल होऊन, ते आपलें सामर्थ्य वृद्धिंगत करण्याची हांव धरूं लागले म्हणजे मात्र देशांत अशांतता माजे. प्राचीन-कालीं, हिंदुस्थानांत आलेल्या चिनी यात्रेकरूंनीं जी माहिती मिळवून लिहून ठेविली आहे त्यावरून, निस्संशय असें म्हणतां येतें कीं, चंद्रगुप्त,

विक्रमादित्य यांची राज्यपद्धति उत्तम प्रकारची होती. अधिकारीवर्ग प्रजेच्या कामांत क्वचित् ढवळाढवळ करी. त्यामुळें लोकांस आपल्या इच्छेनुरूप आपली भरभराट करून घेतां येई. भारतवर्षांत विक्रमादित्याचे वेळीं जितकी उत्तम राज्यपद्धति होती, तितकी दुसरी कोणाचीहि नव्हती. सरकारला कांहीं विशेष करण्याची आवश्यकताच नसे. लोक आपणच सर्व करीत. त्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्यास बाध येत नसे.

ह्यूएनत्संगच्या अगोदर सुमारें दोन शतकांपूर्वींचा चिनी यात्रेकरू फाहिएन, याच्या मनावर येथील राज्यशासनपद्धतीचा उत्कृष्ट परिणाम झाला होता व येथील राज्यशासनसिद्धान्त उत्कृष्ट पायावर उभारले आहेत असा त्याचा ग्रह झाला होता. सरकारी उत्पन्नाची मुख्य बाब जमीनमहसुलाची असून, उत्पन्नापैकीं $\frac{1}{6}$ भाग सरकारांत आदा करावा लागे. कर अगदीं माफक असत.

अंमलबजावणीसंबंधानें पाहिलें असतां, जबाबदार मंत्रिमंडळ निवडण्याचें तत्त्व प्राचीन काळापासून मान्य झालें असून प्राचीन शास्त्रकारांनीं राजांना नुसतें प्रधानमंडळ नेमण्याबद्दलच न सांगतां, त्यांच्या सल्ल्याप्रमाणें वागण्याचा उपदेश केला आहे. शुक्रनीतीमध्यें वेगवेगळ्या राजकीय विभागांचें स्पष्टीकरण दाखविलें असून प्रत्येक विभागाच्या अधिकाऱ्यास पुरोहित, प्रतिनिधि, प्रधान, फडणीस, न्यायाधीश, युद्धमंत्रि, सुमंत अशीं नांवें असत. विलक्षण हें कीं, राजाच्या हातून कांहीं वाईट कर्में होत नाहींत, असें मत त्या वेळीं प्रचलित असे. मुद्राराक्षस या संस्कृत नाटकांत नाटककार म्हणतो:—"राजाच्या हातून एकादें वाईट कृत्य झालें तर तो अपराध मंत्र्याचा आहे, कारण महाताच्या हलगर्जीपणामुळेंच हत्ती मस्त होतो।"

राज्यव्यवस्थेच्या सोईसाठीं जमाखर्च, खजीना, टांकसाळ, खनिजपदार्थ, जंगल, व्यापार, जकात, वजनें, मापें, जहाजें बांधणें, पाटबंधारे, विणकाम, अश्वशाला, गोशाला वगैरे वेगवेगळीं खातीं केलीं असून त्या प्रत्येक खात्यावर देखरेख करण्यासाठीं एक प्रमुख अधिकारी नेमला जात असे. पोलिसखातें अस्तित्वांत असे, हें वेगळें सांगण्याची कांहीं जरूरी नाहीं. चोरीस गेलेला माल परत आणून देण्याची जबाबदारी पोलिसांवर असे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हा पोलिससंबंधीं नियम विशेष कडक आहे

असें मानण्याचें कारण नाहीं, कारण तोच नियम राजासहि लागू असे. पोलिसकडून चोरीस गेलेला माल परत न आला तर राजा आपल्या खजिन्यांतून चोरीच्या मालाची किंमत भरून देई. हिंदु राजांचे गुप्त हेरहि असत. त्यांस 'राजाचे नेत्र व कर्ण' असें समजलें जाई. पेन्शन व दीन-दुबळ्यांस मदत देण्याची पद्धत असे, व एकनिष्ठपणें राज्याची सेवा करणारास कायमचीं इनामें अगर रोकड देणग्या दिल्या जात.

वर दर्शविल्याप्रमाणें कायदे करण्याचें काम धर्म व नीति यांत निपुण असे जे लोक असत त्यांचेवर सोंपविलें जाई. कायदा सर्वांगपूर्ण असा जरी नसला तरी स्थानिक व सामाजिक चालीरीतीला धरुन त्याची बजावणी होई. कायद्याचें उगमस्थान त्यांतूनच आहे असें सर हेन्री मेन हा म्हणतो. कायदे तयार करतांना जे दोष रहात त्यांची भरपाई, कायद्याच्या अंमलबजावणी-च्या वेळीं होत असे. कायदेहि तपशिलवार रीतीनें लिहिले गेले नसत. तरी न्याय करणारे पंच कायद्यांचा उद्देश पूर्ण ध्यानांत ठेवून फैसला देत व जातींचे पंचहि न्याय देतांना हें तत्त्व विसरत नसत. राजा हा केवळ नाम-धारी न्यायाधीश समजला जाई. कारण न्याय देण्याचें काम पंचामार्फतच होत असे. त्या वेळीं न्यायकोर्टें व न्यायाधीशहि असत; परंतु त्यांचें काम न्याय देण्याचें नसून ते केवळ सल्लागाराचें काम करीत. ज्या वेळीं लोक-नियुक्त पंचांच्या आवांक्याबाहेर न्यायनिवाडा अवघड होई, त्या वेळीं न्यायाधीश खटल्यांतील मर्म शोधून काढीत. परंतु निकाल सुनावण्याचें काम मात्र राजा करी. दिवाणी व फौजदारी, असे न्यायखात्याचे दोन वेगळे विभाग केले नसले तरी प्रत्यक्ष व्यवहारांत त्यावांचून विशेष अडतहि नसे. प्रत्येक गांवांत एक स्थानिक न्यायालय असून प्रमुख व अनुभवी गृहस्थ यांची पंचायत असे. जातींच्या न्यायपीठांना विस्तृत हक्क होते, तथापि कांहीं किरकोळ बाबतींखेरीज करून त्यांचे हक्क मर्यादित होते. पंचायती-मार्फत निवाडा होणें हें फार महत्त्वाचें समजलें जाई आणि कांहीं विवक्षित पेशांच्या लोकांच्या बाबतींत तरी त्याची बजावणी व्हावी अशी कायदे करणारांची शिफारस असे. अपील व अपिलांवर अपील करणें लोकांस माहीत नव्हतें. अपराध्यांस शिक्षा झटपट होत असल्यामुळें, मुकदमेबाजीचा दुर्गुण लोकांत शिरला नव्हता. तात्पर्य, धार्मिक, व्यावहारिक, रीतिरिवाज

व राजाज्ञा, या प्रत्येकाची अंमलबजावणी करणारीं वेगळीं खातीं होतीं. यामुळें न्यायकार्यालयांत अवास्तव दिनावधि व निष्कारण खर्च होण्याचा केव्हांच प्रसंग येत नसे.

प्राचीनकाळ, मध्यकाळ व ऐतिहासिक काळ ह्या तिन्ही काळीं भारतवर्षात स्थानिक स्वराज्य अस्तित्वांत होतें ही गोष्ट सर्वमान्य झालेली आहे. ग्रामपंचायतीच्या हातीं आपल्या गांवची सुधारणा व व्यवस्था करण्याविषयीं पुष्कळ अधिकार असत. त्या काळीं, जरी भौतिक सुधारणेची अभिवृद्धि झालेली नव्हती व लोकांची रहाणीहि अगदीं साधी असे, तरीहि आपल्या गांवच्या व्यवस्थेबद्दल कांहीं करणें झाल्यास, गांवकरी लोक स्वतंत्रपणें करीत असत. इतकें होतें तरी ग्रामपंचायती मुख्य सत्तेपासून मात्र स्वतंत्र नसत. प्राचीनकाळीं, येथील लोक प्रातिनिधिक सत्तेच्या तत्त्वाला अपरिचित नव्हते हें दाखविण्यासाठीं, हल्लींचे हिंदुस्थानसरकारचे शिक्षणमंत्री सर शंकरं नायर यांनीं १९१४ मार्चच्या मॉडर्न रिव्ह्यूत, Village Government in Southern India हा लेख लिहिला आहे. त्यांत त्यांनीं पुराणवस्तुशास्त्रखात्याच्या सन १९०४–०५ च्या अहवालाच्या आधारें गांवोगांव पंचायती निवडण्याच्या नियमाबद्दल पुष्कळ उतारे उद्धृत केले आहेत. ते नियम सन ९०८ ते सन ९२१ या सालासाठीं जाहीर केले असावे असें दिसतें. निवडणुकीची पद्धत, अगर मतांची व्याप्ति यांच्या सूक्ष्म तपशिलांत शिरण्याऐवजीं सर शंकरं नायर, यांच्या समारोपांतील उतारा देऊं. "मजेची गोष्ट आहे कीं, स्त्रियाहि निवडणुकीस योग्य समजल्या जात; व एक स्त्री तर न्यायमंडळांतहि होती; अशी वस्तुस्थिति असतां, प्रातिनिधिक संस्था व स्वराज्य या चिजा हिंदुस्थानास परक्या आहेत असें कोण म्हणेल?"

वर जी स्थानिक स्वराज्याची अभिवृद्धि दर्शविली, ती कांहीं एकदोन दिवसांत झालेली खास नाहीं. शेंकडों वर्षांचें तें काम असलें पाहिजे व त्यास प्रारंभ खिस्तीशकापूर्वीं कित्येक वर्षें झालेला आहे. मि० व्हिन्सेन्ट स्मिथ यांनीं, 'भारतवर्षाचा प्राचीन इतिहास' या ग्रंथांत, चंद्रगुप्ताच्या वेळच्या स्थानिक स्वराज्याचें खालीलप्रमाणें मोठें मनोरंजक वर्णन केलें आहे.

"राजनगरी पाटलीपुत्र येथील व्यवस्था उत्कृष्ट ठेवणें हें फार महत्त्वाचें समजलें जाई व त्यासाठीं तीस सभासदांचें एक मंत्रीमंडळ

तयार केलें होतें. त्या मंडळांत, युद्धमंडळाप्रमाणें पांच पांच गृहस्थांचें एक मंडळ अशीं सहा पोटमंडळें असत. फार प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत, जातिजातींच्या पंचायती असत. त्यामुळें प्रत्येक जातीस व व्यापारीवर्गास आपले हितसंबंध पाहण्याची संवय असे; त्याचेंच पूर्ण स्वरूप म्हणजे, ही मंडळें होत."

"म्युनिसिपल बोर्डाकडे उद्योग व कलाकौशल्य यांजवर देखरेख करण्याचें काम सोंपविलें असे. अर्थात् मजुरीचा निरख ठरविणें वगैरेबद्दल ते जबाबदार असत."

"दुसऱ्या मंडळाकडे, विदेशीय पाहुण्यांसंबंधीं सर्व व्यवस्था असे. यामुळें परकीय लोकांवर चांगली नजर राहून, त्यांच्या राहण्याची, औषध-पाण्याची, वगैरे सर्व व्यवस्था लागे......ह्या नियमांवरून ही गोष्ट सिद्ध होते कीं, ख्रिस्तीशकापूर्वीं तिसऱ्या शतकांत मौर्य साम्राज्याचें परदेशाशीं सतत दळणवळण सुरू असे."

"तिसऱ्या मंडळाकडे, जन्ममृत्यूची पद्धतशीर नोंद ठेवण्याचें काम असे. ही नोंदणीची व्यवस्था, सरकारी माहितीसाठीं व कर वगैरे बसविण्यासाठीं, मुद्दाम सुरू केली होती. अँग्लो-इंडियन राज्यव्यवस्थेंत कितीहि संस्था निघाल्या असल्या, त्यांच्या आंकडेशास्त्राच्या युक्त्या कितीहि पुढें गेलेल्या असल्या तरी अगदीं अलीकडील काळापर्यंत असे आंकडे मिळविण्याचा प्रयत्न केलेला नाहीं, व बिनचूक संख्या मिळविण्याच्या कामांत कोणीहि इतका त्रास सोसला नाहीं."

आज पब्लिक वर्क्स या नांवानें ओळखलें जाणारें खातें पूर्वकालींहि हिंदु लोकांस पूर्ण माहीत होतें. मोठमोठ्या नगरांच्या व शहरांच्या विस्तारानुरूप सार्वजनिक इमारती बांधल्या जात. राजनगरी पाटलीपुत्र ख्रिस्तीशकाच्या पांचव्या शतकांत वसवली गेली. ती ९ मैल लांब व १॥ मैल रुंद होती. तिच्या सभोंवतालीं प्रचंड तटबंदी असून ६४ वेशी व ५७० बुरूज होते. सातव्या शतकांतील राजनगरी उज्जयिनी हीहि एवढीच प्रचंड होती. कालिदासानें तिचें केलेलें वर्णन, कवीची अतिशयोक्ति म्हणून सोडून दिलें तरी, प्रसिद्ध चिनी प्रवाशानें कनोजच्या या राजधानीचें जें वर्णन केलें आहे त्याबद्दल तरी संशय घेण्याचें कारण नाहीं. "हें नगर

३॥ मैल लांब व पाऊण मैल रुंद होतें, त्याच्या सभोंवतीं खंदक व चांगले मजबूत बुरूज होते. तेथील सरोवरांचें, तलावांचें पाणी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ व तेजस्वी असून त्यांच्यांत पडलेल्या लतापुष्पांच्या प्रतिबिंबामुळें तर फारच मनोहर दिसत असे. फार मौल्यवान् पदार्थांची देवघेव तेथें चाले; त्यामुळें, तेथें सर्व ठिकाणचा माल येत असे. लोक अत्यंत सुखी व संतुष्ट असून त्यांचीं निवासस्थानें फारच रमणीय असत. फलपुष्पांची तर येथें समृद्धि होती."

पंधराव्या शतकांतील इटालियन व पोर्तुगीज प्रवाशांनीं, विजयानगरचें वर्णन केलें आहे तेंहि इतकेंच मोहक आहे. प्रत्यक्ष पाहणारांनीं त्या नगराचें असें वर्णन केलें आहे कीं, त्या नगरचा विस्तार ६० मैल होता. व किमान पक्ष ९०००० वीर युद्धास केव्हांहि सज्ज असत. मद्रास इलाख्यांतील हॉसपेट येथील भग्नावशेषावरून त्याच्या गतवैभवाची कल्पना होईल.

मि० व्हिन्सेन्ट स्मिथ म्हणतो, " अशोकाचे वेळीं, वास्तुविद्या उच्चावस्थे-प्रत पोहोंचली होती यांत शंका नाहीं. त्याबरोबर नक्षी वगैरे कलाकुसरीचें कामहि पूर्णत्वाला गेलें होतें. मोठमोठ्या इमारतींवर नाना प्रकारच्या वेल-पत्त्या वगैरे सुंदर नक्षीकाम कोरून त्या शोभिवंत करीत, मनुष्यांचे व पशुपक्ष्यांचे पुतळेहि फार सुबक होत."

याशिवाय पब्लिक वर्क्सच्या लोकोपयोगी कामांची पुष्कळ अभिवृद्धि झाली होती. ४८ फूट रुंदीचे रस्ते असल्याचीं बरोबर वर्णनें आज मिळत आहेत. रस्त्यांचें अंतर व फूट, ठिकठिकाणीं उभे केलेले रस्ता दर्शविणारे दगड, मेगॅस्थिनिसनें पाहिलेले होते. अशोकाच्या लेखांत रस्त्याच्या दुतर्फा झाडें लावणें, प्रवासी व यात्रेकरू यांच्या आरामासाठीं विश्रान्तिस्थळें बांधणें वगैरेबद्दल उल्लेख आहे. पूल बांधण्याची कला त्या वेळीं बाल्या-वस्थेंत होती. परंतु लहान नद्या, ओढे यांजवर छोटेखानी पूल केले असून मोठाल्या प्रवाहांवर नावांचे पूल उभारलेले असत. मोठमोठे बंधारे बांधून, जमिनीला पाणी पुरविण्याचा प्रघात त्या वेळीं होता. व जे लोक नवीन तळीं बांधीत अगर जुनीं दुरुस्त करीत त्यांना साऱ्याची थोडीबहुत सूटहि मिळे. राजतरंगिणी हा ग्रंथ काव्यापेक्षां ऐतिहासिक महत्त्वाचाच जास्त आहे.

त्यांत पुरापासून अगर दलदलीपासून बचाव व्हावा म्हणून मोठाले बांध घालीत असल्याचा उल्लेख आहे. मि० व्हिन्सेन्ट स्मिथ म्हणतो:—

"साम्राज्याच्या फार दूर प्रदेशांतहि जमिनीला पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून फार परिश्रम घेतले जात, त्यावरून जमिनीला पाण्याचा पुरवठा करणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे असें मौर्य सम्राट् समजत. इजिप्तप्रमाणें येथेंहि सरकारी अधिकारी जमिनीची मोजणी करून प्रत्येकास त्याच्या वांट्याप्रमाणें पाणी बरोबर मिळत आहे कीं नाहीं तें पहात, असें मेगॅस्थेनीस म्हणतो."

ज्यांना हिंदूंच्या औदार्यशीलतेची माहिती आहे, त्यांना प्राचीन काळीं हिंदुस्थानांत धर्मार्थ औषधालयेंहि होतीं याचें आश्चर्य वाटणार नाहीं. मि० व्हिन्सेन्ट स्मिथ म्हणतो:—

"मुंबई व सुरत येथें जीं औषधालयें होतीं—कदाचित् अजूनहि असतील—तीं मौर्य सम्राटांनीं स्थापन केलेल्या या संस्थांचे अवशेष किंवा प्रतिरूपेंच आहेत."

'प्राचीन हिंदुस्थानांत' असा स्पष्ट उल्लेख आहे कीं, राजानें व्यापारवृद्धीविषयीं काळजी घेतली पाहिजे. दुधदुभतें, गुरांची वाढ, खाणी, धातूंचे कारखाने याबद्दलहि उल्लेख सांपडतो. मीठ तयार करणें व दारू गाळणें यांबद्दल सरकारी परवानगी लागे. नौकानयन—नौका बांधणें—या कलेची फारच अभिवृद्धि झालेली होती. परंतु या विषयाबद्दल आपण बाबू राधाकुमुद मुकर्जी यांच्या 'नौकानयन' या सुंदर पुस्तकाचा नामनिर्देश केला असतां पुष्कळ होईल.

सूत कांतणें व कापड विणणें ही कला हिंदुस्थानांत इतकी पूर्णत्वाला गेली होती कीं, जगांत तिला तोडच नव्हती. या कलेला राजाश्रय व उत्तेजन असे. आजकाल असें म्हटलें जातें कीं, हिंदुस्थान हा देश कृषिप्रधान आहे व तसा असणेंच योग्य आहे; परंतु प्राचीन काळीं मात्र तशी स्थिति नव्हती. एक गोष्ट निर्विवाद आहे कीं, शेतकी हा एक प्रमुख धंदा होता, व आजच्याइतकें शेतकीशास्त्र जरी पुढें गेलेलें नसलें तरी, तत्कालीन साधनसामुग्रीच्या मानानें, त्या धंद्याचीहि शक्य तेवढी प्रगति झालेली होती. परंतु हिंदी शेतकी अगदीं अव्यवस्थित, अशास्त्र होती, या

विधानास मात्र बिलकूल आधार नाहीं. हिंदुस्थानसरकारचे शेतकीरसायनशास्त्रज्ञ डॉ॰वोलकर यांनीं नमूद करून ठेवलें आहे कीं, " हिंदुस्थानच्या शेतीसंबंधानें इंग्लंडमध्यें अशा कल्पना पसरल्या आहेत कीं; हिंदी शेती अगदीं मागसलेली आहे; परंतु ही गोष्ट मात्र अगदीं असत्य आहे. हिंदी शेतकरी ब्रिटिश शेतकऱ्याच्या बरोबरीचा आहे. एवढेंच नव्हे तर कित्येक बाबतींत पुढें गेलेला आहे. त्याला प्रतिकूल गोष्ट ही कीं, त्यांची ही स्थिति सुधारण्यास आवश्यक अशीं साधनें तेथें मुळींच नाहींत. जगांत अशी स्थिति दुसरीकडे कोठेंहि नाहीं, त्यामुळें शेतकरी मुकाट्यानें येतील त्या संकटांशीं धिमेपणानें झगडतो. त्याच्याइतका धिमा सहनशील मनुष्य दुसरा सांपडणें कठीण! शेतीचीं साधीं कामें घ्या. जमिनीची मेहनत मशागत करणें, जमिनींत झाडूर वाढूं न देतां ती अगदीं साफ ठेवणें या कामीं हिंदी शेतकऱ्याच्या बरोबरीला कोणी हि लागणार नाहीं. पाणी वर काढण्याच्या युक्त्या, जमिनीच्या गुणधर्माबद्दल त्याला असलेलें ज्ञान, पेरणी-कापणीच्या हंगामाच्या वेळा जाणणें, वगैरे आवश्यक गोष्टींत त्याचा हात कोणीहि धरूं शकणार नाहीं. निरनिराळ्या प्रकारचीं धान्यें एकत्र उत्पन्न करण्याच्या त्याच्या ज्ञानाबद्दल तर आश्चर्य वाटतें. मी माझा मुक्काम पडे त्या ठिकाणच्या आसपास असें पाहिलें आहे कीं, अश्रान्तपरिश्रम, कामाबद्दल निदिध्यास, यामुळें हिंदी शेतीइतकी सुधारलेली शेती दुसरीकडे कोठेंहि माझ्या पाहण्यांत आलेली नाहीं.

खाण्याचीं मुख्य मुख्य धान्यें हिंदुस्थानांतच पिकतात. त्यामुळें हिंदुस्थान हें, परदेशांचें धान्याचें कोठारच होऊन बसलें आहे. व्यापाराच्या बाबतींतहि हिंदुस्थानचें महत्त्व फार आहे. हिंदुस्थानच्या प्राचीन व अर्वाचीन आर्थिक स्थितीची तुलना करणें हा विषयच असा आहे कीं, आपलें लक्ष सहजच तिकडे ओढलें जातें. इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानांत पाय ठेवला त्या वेळीं, हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति कशी होती, हें सांगणें आवश्यक आहे युरोपियन लोकांत लांबलांबचीं समुद्रपर्यटनें करण्याचें साहस उत्पन्न झालें त्या वेळेपासून, युरोपियन व्यापारी मोठ्या संकटांचीं जलपर्यटनें करून येथें येऊं लागले. या गोष्टीवरूनच सतराव्या शतकांत, हिंदुस्थानांत संपत्ति कशा प्रकारची होती याबद्दल वेगळें सांगण्याची जरूरी नाहीं.

बिनधोक्याचा व नजीकचा मार्ग नव्हता तरी, सर्वांचे पाय हिंदुस्थानाकडेच वळत. युरोपियन व्यापाऱ्यांना भूमध्यसमुद्रावरील व्यापाऱ्यांकडून हिंदुस्थानची कीर्ति समजली व ते हिंदुस्थानांत प्रत्यक्ष आल्यावर, त्यांचा अनुभव तंतोतंत खरा ठरला. सन ७७ त थोरला प्लिनी याची कुरकुर होती कीं, प्रतिवर्षी रोमन साम्राज्यांतून, हिंदुस्थानांत, अरबस्थानांत व चीनमध्यें कमींत कमी १० कोटि सेस्टोरिया ( तत्कालीन चांदीचें नाणें ) किंमतीचें सोनें जाई व त्याच्या बदला जो माल परत येई तो त्याच्या मूळ किंमतीच्या शंभर पटीनें विकत असत. सत्राव्या शतकांत बर्नियरनेंहि याच प्रकारचें वर्णन केलेलें आहे. तो म्हणतो, 'हिंदुस्थान हा असा एक प्रचंड वडवानल आहे कीं, त्याच्यांत अनेक मार्गांनीं सोनेंचांदी जाऊन पडते, परंतु त्यांतून परत मात्र कांहीं येत नाहीं'. टॅव्हर्नियरनें हिंदुस्थानांत तयार झालेल्या मालाबद्दल लिहितांना, फक्त कासीमबझारचें वर्णन दिलें आहे. तो म्हणतो, 'बंगालमधील या गांवांतून, २२ लक्ष पौंड वजनाच्या २२ हजार रेशमाच्या गांठीं बाहेर देशीं जातात'. सोन्याचांदीच्या कलाबतूचें काम केलेले रेशमाचे गालिचे व अत्यंत सुंदर अशा शेंकडों वस्तु हिंदुस्थानांत तयार होत असत. डाका येथील मलमल तर इतकी अप्रतिम बनत असे कीं, कित्येक वेळां ती सोन्याच्या भावानें विकली जाई.

हिंदी चित्रकलेसंबंधानें एवढें सांगितलें असतां पुरे कीं, कुशल हिंदी चित्रकारांनीं काढलेले चित्रकलेचे कांहीं उत्कृष्ट नमुने हिंदी अजबखान्यांतून आज सरकारनें जपून ठेवले आहेत व ते अमूल्य समजले जातात. दक्षिण हिंदुस्थानांतील भव्य इमारती व मध्य हिंदुस्थानांतील कोरींव लेणीं पाहिलीं म्हणजे भारतीय कलेचें शुद्ध स्वरूप लक्षांत येतें.

शेवटीं १९ व्या शतकांतील एकदोन ब्रिटिश मुत्सद्यांचें हिंदुसंस्कृतीबद्दल मत नमूद करणें जरूर आहे. हिंदुसंस्कृतीबद्दल सर टॉमस मनरो यानें पुढील उद्गार काढले आहेतः—" हिंदुसंस्कृति याचा अर्थ काय हें मला समजत नाहीं. भिन्नभिन्न प्रकारचें उच्च शास्त्रीय ज्ञान, राज्यशासनपद्धति, दुराग्रह आणि अंधविश्वास सोडून सर्वप्रकारचें व सर्व ठिकाणचें ज्ञान संपादन करणें, या बाबतींत हिंदी लोक युरोपियन लोकांहून कमी प्रतीचे आहेत. परंतु उत्कृष्ट शेतीची पद्धत, शिल्पकामांत अनुपमेय हुशारी, ऐष-

आरामाच्या व उपयोगाच्या कोणत्याहि वस्तु तयार करणें, लिहिणें, वाचणें व गणित वगैरे शिकविण्यासाठीं गांवगन्ना असलेल्या शाळा, अतिथिसत्कार, दानशीलता व सर्वांहून श्रेष्ठ म्हणजे, स्त्रियांबद्दल असलेला आदरयुक्त व्यवहार, हीं जर सुधारणेचीं लक्षणें असतील तर हिंदु लोक युरोपियन लोकांहून केव्हांहि श्रेष्ठच आहेत. व माझी खात्री आहे कीं, सुधारणा ही जर एक व्यापाराची वस्तु झाली तर इंग्लंडला या वस्तु मागविण्यांत फायदाच होईल.

हिंदु लोकांच्यानंतर, हिंदुस्थानाचा महत्त्वाचा घटक बनलेली जात मुसलमानांची होय! सुधारणेच्या सर्व बाबतींत हिंदूंच्या प्रमाणेंच यांनींहि उत्तम काम करून दाखविलें आहे. आज मुसलमानांच्या पूर्वेतिहासांत शिरण्याचें आपणांस कारण नाहीं; परंतु सोईसाठीं सर्व मुसलमान एक समजूं या! आरबसंस्कृतीच्या उच्च कल्पना युरोपांत शिरून तेथें त्यांची छाप पडून त्या दृढमूल झाल्या हें कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं. ज्या वेळीं रानटी लोकांनीं रोमनसाम्राज्य छिन्नविच्छिन्न करून टाकलें व अनेक परस्परविरोधी व हट्टी खिस्तानुयायांच्या कलहानें खिस्तीधर्म हीन स्थितीप्रत जाऊन निस्सत्त्व झाला, त्या वेळीं अरबांनीं आपला धर्म व तलवार यांच्या जोरावर, नवजीवन उत्पन्न केलें. मुसलमानांनीं पूर्वेकडे आपल्या विजयी सेना आणण्यापूर्वींच त्यांनीं पश्चिमेकडे विजय संपादन केला होता. आठव्या शतकांत मुसलमानांनीं भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावरचा सर्व मुलूख कांबीज करून, जिब्राल्टरपर्यंत धडक मारली व अवघ्या दहा वर्षांतच सर्व स्पेन पादाक्रान्त करून फ्रान्समध्यें पॉइटर्सच्या तटापर्यंत जाऊंन धडकले. गिबन म्हणतो:—'या विजयी सेना, जिब्राल्टरपासून लॉयरपर्यंत एक हजार मैल सारख्या पसरल्या होत्या. व हीच त्यांची गति कायम राहिली असती तर, अरबी फौजा, पोलन्ड व स्कॉटलंडमधील हायलन्डवरहि उतरल्या असत्या. नाईल किंवा युफ्रेटिजपेक्षां ऱ्हाईननदी दुर्गम नाहीं. तेव्हां कोठेंहि अडथळा आल्याशिवाय अरबी आरमार, थेम्स-नदीच्या मुखांतहि सुखानें उतरलें असतें व कदाचित् आज आक्सफोर्डच्या विद्यालयांत कुराण पढविलें जाऊन, महमदी धर्माच्या पावित्र्याबद्दल व सत्यतेबद्दल प्रवचनें सुरू झालीं असतीं'.

अरबांची संस्कृति त्यांच्या शौर्याहून कमी नव्हती. स्पेनमध्यें त्यांच्या कलेचीं व विद्याभिलाषाचीं स्मृतिचिन्हें अद्यापिहि दृष्टीस पडतात. त्यांची बरोबरी आजकालचे युरोपियन जेतेहि करूं शकत नाहींत. कारडोव्हा व बगदाद येथील विश्वविद्यालयांची आठवण आजहि विद्याभिलाषी लोकांना होत आहे. कारडोव्हा येथें ६०० मशिदी, ९०० स्नानगृहें व २०००० निवासस्थानें होतीं. स्पेनच्या मुसलमान राजांनीं केलेले कायदे पहिल्या प्रतीच्या ८० नगरांत, व दुसऱ्या, तिसऱ्या प्रतीच्या ३०० शहरांतून चालत. त्या काळीं लोक अत्यंत संपन्न, धनवान् असून, पुष्कळ लोक शेती करीत. स्पेनच्या ज्या लोकांनीं, प्रजा अगर गुलाम या पेशानें मुसलमानी धर्म स्वीकारिला, ते तावडतोब स्वतंत्र होऊन, राज्यकर्त्या मुसलमानांच्या बरोबरीचे होत. बगदादच्या खलिफाचें वर्णन इतिहासकारांनीं अत्यंत सुंदर केलेलें आहे. बगदादला शांतिनगर म्हणत. बगदादच्या खलिफाच्या दरबारची जागा सोन्यामोत्यांनीं मढविलेली होती. इमारतींना स्पॅनिश, आफ्रिकन, ग्रीक वगैरे विविध ठिकाणचे आणि रंगांचे सुंदर संगमरवरी दगड जडविले होते. खलिफांच्या उद्यानांत हजारों कारंजीं असून त्यांतील एक तर शुद्ध पाऱ्यानेंच भरलेलें असे. विद्यालयांना अत्यंत उदार हस्तानें देणग्या मिळत. सुलतानाच्या एका वजिरानें बगदादमध्यें एक विद्यामंदिर स्थापण्यासाठीं दोन लक्ष सुवर्णमुद्रा देऊन, वार्षिक देणगी पन्नास हजार दिनारांची दिली होती. एखाद्या अमिराच्या मुलापासून तों तहत, एखाद्या कारागिराच्या मुलापर्यंत सर्वांना सारखें शिक्षण मिळे, व अशा रीतीनें सहा हजार विद्यार्थ्यांना विद्यादान केलें जाई. गरीब विद्यार्थ्यांच्यासाठीं छात्रवृत्ति ठेवल्या असून, शिक्षकांनाहि आपले गुण व श्रम यांच्या प्रमाणानें वेतन मिळे. इजिप्तच्या बादशाही ग्रंथालयांत उत्कृष्ट लिहिलेले व सुंदर बांधणीचे एक लक्ष ग्रंथ असून, कैरो येथील विद्यार्थ्यांना त्यांचा फार उपयोग होई. परंतु स्पेनमधील उमरावांनीं स्थापन केलेल्या ग्रंथालयापेक्षां, हा संग्रह छोटा वाटेल. कारण त्या संग्रहालयांत, सहा लक्ष ग्रंथ असून, त्यांपैकीं ४४ ग्रंथ संग्रहालयांतील ग्रंथांच्या सूची अथवा याद्या होत्या. त्यांची राजधानी कारडोव्हा, व आसपासच्या शहरीं ३०० वर ग्रंथकार निर्माण झाले व एंडॉलुसिअन राज्यांत

७० ठिकाणीं ग्रंथालयें उघडलीं गेलीं. युरोपांत कृष्ण युग सुरू होईपर्यंत म्हणजे सुमारें ५०० वर्षेंपर्यंत सारखा अरबी विद्येचा प्रसार होत होता.

आतां आपण हिंदुस्थानांतील मुसलमानांकडे वळूं या! महमद गझनवीनें हिंदुस्थानावर स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करून सोमनाथापर्यंत मुलूख आक्रमण केला व अलोट संपत्ति लुटून नेली; अल्लाउद्दीनानें हिंदुस्थानांत मोठमोठे विजय संपादन केले; अगर शिकंदर लोदी याचा कारभार अत्यंत सुखकर असे, या गोष्टींचें वर्णन दिलें नाहीं तरी त्याचा उल्लेख हा केलाच पाहिजे. तैमूरच्या मोगलघराण्यापर्यंत आलों म्हणजे मात्र एकापेक्षां एक विलक्षण राज्यकर्ते दिसतात. मि० सिडनेओवेन हा आपल्या 'India on the eve of British Conquest' ह्या पुस्तकांत लिहितो; "या मोगल घराण्यांत एकापेक्षां एक वरचढ असे लागोपाठ सहा राजपुरुष होऊन गेले; त्यांतील पहिला मोगल साम्राज्यसंस्थापक बाबर व तिसरा अकबर यानें तर साम्राज्याचा पुनरुद्धार करून त्याचा विस्तार केला व त्यानें अशीं युद्धें केलीं कीं, त्याची तुलना चार्लस धी ग्रेटशीं करतां येईल. शिवाय त्यानें लष्करी पद्धतींतहि पुनर्रचना केली. सहावा बादशहा अलमगीर, हा आपल्या तरुणपणापासूनच मोठा लढवय्या असून आपल्या आयुष्याचीं शेवटचीं तेवीस वर्षें एका दीर्घकालीन युद्धांत घालवून युद्धाचा शेवट न होतांच जर्जर होऊन वयाच्या ८६ व्या वर्षीं मृत्युमुखीं पडला." पाश्चात्य लेखकांनीं अकबराची जितकी स्तुति केली आहे तितकी कोणत्याहि पौर्वात्य राजाची केलेली नाहीं. अकबर या स्तुतीस पात्रहि होता. अकबरानें राजकार्यांत जी योग्यता दाखविली आहे त्याचें विस्तृत वर्णन करण्याची आतां आवश्यकता नाहीं. पण जातां जातां एवढें सांगितलें पाहिजे कीं, त्याची वसुलीपद्धत, जमीन मोजण्याची रीति, लोकसंरक्षणाची त्याची योजना, लोकमताला तो देत असलेला मान व त्याची धार्मिक सहिष्णुता या गुणांमुळें त्याचे समकालीन त्याजवर प्रेम करीत करीत व त्याच्या मागचे लोक त्याचीं स्तुतिस्तोत्रें गात आहेत. त्याच्या अर्थशास्त्रपारंगततेबद्दल 'आयने अकबरी' हा ग्रंथ मूर्तिमंत उदाहरण आहे. जहांगीरचा मेहुणा अशफ़रखान यानें इंग्रज वकील टेरी याला एक मेजवानी दिली, तिचें विस्तृत वर्णन त्यानें केलें आहे. तें पाहिलें म्हणजे, उच्च

के...१२

दर्जातील मुसलमानांची शिष्टाचारपद्धति किती उच्च कोटींतील होती याची कल्पना येते. मोगल सम्राट् व्यापारवृद्धीकडे विशेष लक्ष देत असत व त्यामुळेंच एकट्या ईस्ट इंडिया कंपनीलाच नव्हे तर दुसऱ्याहि कित्येक युरोपियन व्यापाऱ्यांना व्यापाराची परवानगी देण्यांत आली होती. मालावर विशेष जकात नसे, तथापि चांदीच्या मालाबद्दल विशेष निर्बंध होते. मोगलांना चिनी मातीच्या भांड्यांचा फार शोक असे व असें सांगतात कीं, अकबर मेला त्या वेळीं फक्त आग्र्यांतच पंचवीस लक्ष रुपयांहून अधिक किंमतीचीं नक्षी केलेलीं भांडीं पूर्वेकडील चीन व पश्चिमेकडील व्हेनिस येथून आलेलीं होतीं. देशांत शांतता व सुबत्ता नांदत असल्याशिवाय, अशा प्रकारचा व्यापार अर्थातच चालत नाहीं. मि० व्हिन्सेन्ट स्मिथ आपल्या 'अकबर' या पुस्तकांत लिहितो कीं, अकबराच्या वेळीं वाहतुकीचे रस्ते फारच सुरक्षित असले पाहिजेत. कारण टेरी वकिलानें सुरतेहून मध्यहिंदुस्थानापर्यंत ४०० मैलांचा प्रवास अवघ्या ४ युरोपियन व २० एतद्देशीय अनुचरांसमवेत अगदीं सुखरूप केला. अकबराला लिहितां-वाचतां येवो अगर न येवो; परंतु त्यानें जें जें पाहिलें व ऐकलें तें तें सर्व आपलेंसें करून टाकलें यांत शंका नाहीं. त्याच्या दरबारांत भोज किंवा विक्रमादित्य यांच्याप्रमाणें उत्कृष्ट विद्वद्रत्नें चमकत होतीं. त्याला विद्याभिरुचि इतकी होती कीं, त्यानें उत्कृष्ट ग्रंथ सुंदर अक्षरांत लिहून त्यांत कुशल चित्रकारांच्या हातचीं अप्रतिम चित्रें घालून तयार केले होते. असे ग्रंथ सुमारें २४००० असून त्यांची किंमत ६५ लक्ष रुपये होती असा कांहीं इंग्रज लेखकांचा अंदाज आहे. अकबरानें इमारती बांधण्याची वेगळीच शैली काढली व तिला एका हिंदु कारागिराकरवीं दृश्य स्वरूप दिलें. त्यांत हिंदु व मुसलमान दोन्ही शिल्पशास्त्रांचा मधुर संगम झालेला दिसून येतो.

मेकॉलेनें आपल्या 'लॉर्ड क्लाइव्ह' या निबंधांत लिहिलें आहे:—

"सोळाव्या शतकांत बाबर व अकबर यांनीं जें साम्राज्य स्थापिलें तें त्या वेळीं जगांत अत्यंत मोठें व वैभवशाली होतें. कोणत्याहि युरोपियन राज्यांत एका राजाच्या अमलाखालीं एवढ्या लोकवस्तीचा मुलूख नव्हता व त्यांच्या खजिन्यांत इतकी संपत्तीहि जमा होत नसे. ज्यांनीं सेन्ट पिटर पाहिलें आहे, ते लोकहि येथील इमारतींचा मोहकपणा पाहून चकितच

होऊन जात. दिल्लीच्या तख्ताभोंवतालची अनुपमेय शोभा पाहून ज्यांनीं व्हर्सेलिसचें वैभव पाहिलें आहे त्यांचेहि नेत्र दिपत. एकाद्या मोगल सुभेदाराच्या हाताखालीं फ्रान्सच्या राजापेक्षां, जर्मनीच्या बादशहापेक्षां जास्त प्रजा असे. व सुभेदारांच्या हाताखालच्या सरदारांच्या ताब्यांतहि टस्कनीचा डयूक किंवा सॅक्सनीचा इलेक्टर यांच्या बरोबरीचा उत्पन्नाचा प्रदेश असे."

इंग्रजांचें हिंदुस्थानांत आगमन होण्याचे वेळीं हिंदु व मुसलमान संस्कृतीचें संम्मीलन झाल्यावर हिंदुस्थानची जी स्थिति होती तिचें संक्षिप्त वर्णन 'Colonies and dependencies' या पुस्तकाच्या ग्रंथकारानें खालील-प्रमाणें दिलें आहेः—

"प्राचीन काळीं ग्रीक, अरब व इटालियन यात्रेकरू हिंदुस्थानांत येत. ते सर्व हिंदुस्थानांतील परिणत संस्कृति पाहून चकित होऊन जात. गजबजलेलीं शहरें, अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केलेली शेती, कलाकौशल्य, तयार केलेल्या नानाविध चिजा, प्रचंड व्यापार, सुंदर इमारती ह्या सर्व गोष्टी हिंदी संस्कृतीच्या निदर्शक होत! गतकालीं इजिप्त किंवा बाबिलोनमध्यें शेंकडों वर्षांच्या संस्कारानें ज्याप्रमाणें एकप्रकारचें सामाजिक संघटन उत्पन्न झालें होतें त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतहि होतें. त्या वेळीं सामाजिक आयुष्यक्रम आजच्यापेक्षां विविध असे. निरनिराळीं राज्यें म्हणजे, लोकांना आपल्या उच्च महत्त्वाकांक्षा पूर्ण करावयाचीं ठिकाणेंच होतीं. जीवित सुखकर असून कलाकौशल्याची अभिवृद्धि झाली होती. मोठमोठ्या शहरांत कारागीर रहात व ते आपल्या कौशल्यांत इतके निपुण होते कीं, त्यांच्या कौशल्याबद्दल आज आपणांस तोंडांत बोटच घालावें लागतें. व्यापारी व सावकार यांच्याजवळ अगणित संपत्ति असे. देशांत जर अशांति असती तर इतक्या अलोट धनाचा त्यांना संग्रहच करतां आला नसता. १८व्या शतकांत सुरत ही युरोपियन व्यापाऱ्यांची जंगी पेठ होती. त्या वेळची तेथील लोकसंख्येची गणति चार लक्षांपासून आठ लक्षांपर्यंत करतात. बंगालची राजधानी मुर्शिदाबाद येथें सन १७५७ मध्यें क्लाइव्ह शिरला. तो लिहितो, हें नगर लंडनइतकें मोठें, गजबजलेलें व संपन्न आहे. फरक इतकाच कीं, लंडनपेक्षां येथील लोक

किती तरी पटीनें अधिक संपत्तिमान् आहेत." १७ व्या शतकांत हिंदुस्थानचें वैभव अगदीं कळसास जाऊन पोहोंचलें होतें.

अशा प्रकारचे लोक येथें होते. व या प्रकारचीं राज्यें व साम्राज्यें होतीं. तेव्हां अशा पूर्वजांच्या वंशजांनीं पाश्चिमात्यांचें शिक्षण व संस्कृति यांची जोड मिळाल्यावर राज्यकारभारांत समान हक्क मिळवून हिंदी स्वराज्य संस्थापनेची आकांक्षा धरावी यांत आश्चर्य वाटण्यासारखें काय आहे ?

# शिवचरित्रप्रदीप*

प्रस्तुत पुस्तक मुख्यतः शिवजन्मतिथीच्या वादाला उद्देशून तयार केलेलें आहे. तथापि तो प्रसंग साधून शिवकालविषयक असे अनेक लेख, टिपणें, शकावल्या वगैरे मिळून अवांतर मजकूर इतका चांगला व इतका पुष्कळ या ग्रंथांत दिला आहे कीं, शिवजन्मतिथीचा वाद हें त्यांतलें एक केवळ उपांग ठरेल. त्यांतल्या त्यांत वाचकांच्या दृष्टीला आणण्यासारखे भाग म्हटले म्हणजे जेधे यांची शकावली व करीना, शिवापूरकर देशपांडे यांचे वहींतील व घोडेगांवकर वहींतील शकावल्या, गदाधर प्रल्हाद शकावली, अफझुलखानासंबंधीं व इतर कांहीं शिवकालीन अस्सल पत्रें, भोंसले वंशावळ, राजव्यवहारकोश, शहाजीविषयक शकावली, तंजावरचा शिलालेख वगैरे होत. मुख्य शिवजन्मतिथीच्या वादासंबंधानें प्रकाश पाडणारे भाग खालील आहेत—लो० टिळक व इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं पंचवीस वर्षांपूर्वीं केलेली चर्चा, राजवाडे यांनीं राधामाधवचम्पूच्या प्रस्तावनेंत अलीकडे केलेली चर्चा, निरनिराळ्या बखरींतून उतरून घेतलेलीं शिवजन्माचीं वर्णनें, श्री० व्यंकटेश बापूजी केतकर यांचें शिवजन्मतिथीविषयीं केलेलें ग्रहगणित, कै० वासुदेवशास्त्री खरे यांनीं मालोजी शहाजीवरील निबंधांत उल्लेखिलेलें शंकास्थान, शिवभारत व तंजावरचा शिलालेख यांमध्यें असलेल्या जन्मतिथीचा उल्लेख, आपटे व करंदीकर यांचे जन्मतिथीची चर्चा करणारे ऐतिहासिकदृष्ट्या व ज्योतिषशास्त्रदृष्ट्या लिहिलेले लेख इत्यादि.

*केसरी, ता० २ फेब्रुवारी १९२६.

वरील यादीवरून प्रस्तुत ग्रंथांतील लेखांच्या महत्त्वाची कल्पना सहजच येईल. आतां संग्रहकारांनीं विषयांसंबंधीं अनुक्रम आणि एकसूत्रता ठेवावी ती न ठेवल्या कारणानें ग्रंथाला एक प्रकारें कथेचें किंवा गोधडीचें स्वरूप आलें आहे. इतका मौल्यवान् मजकूर देऊन तो यथाक्रम एकत्र न दिल्यानें मुख्य विषयासंबंधानें वाचकांचें अनुसंधान राहत नाहीं, हा एक दोष असा आम्हांला वाटतो. पण गोधडी झाली तरी शालजोड्यांच्या तुकड्यांची आहे हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. कदाचित् ग्रंथरचनेंतील ही अव्यवस्था ग्रंथाची मूळ कल्पना कसकशी परिणत झाली याविषयींची साक्ष देते. हा दोष बगळला असतां इतक्या किंमतींत इतके महत्त्वाचे शिवकालीन मूळ लेख आणि चर्चा लेख एकत्र संग्रहित असे वाचकाला कोठेंहि मिळणार नाहींत. याकरितां प्रत्येक इतिहासभक्तानें हा ग्रंथ विकत घेऊन प्रकाशकांनीं, केवळ हौसेनें, इतिहासप्रेमानें व सत्यनिर्णयाच्या इच्छेनें; डोक्यावर घेतलेलें खर्चाचें ओझें उतरण्यास अवश्य मदत करावी अशी आमची विनंति आहे.

मुख्य वादासंबंधानें कोणीहि हें कबूल करील कीं, शिवजन्माची नवी तिथी एकदम कोणी मान्य करो वा न करो, पण आपटे व करंदीकर यांनीं केलेल्या चर्चेवरून नव्या दिशेनें विचाराचें उद्बोधन तीव्र होतें. अशा वादांत एखाद्या नव्या शोधाचा किंवा ऐतिहासिक गोष्टींचा स्वीकार करणें न करणें ही गोष्ट सर्वस्वी कोणाच्याहि इच्छेवरच अवलंबून राहणार; त्यांत जुलूम जबरदस्ती होऊं शकत नाहीं व कोणी करीतहि नाहीं. प्रत्यक्ष दृक्प्रत्ययासारखें निर्णयसाधन उपलब्ध असतांहि, पुष्कळ लोक पंचांगशुद्धि न स्वीकारतां परंपरागत पंचांग प्रमाण मानून व त्याप्रमाणें धर्मव्यवहार करून पुण्य जोडलें असें समजतात. तर ऐतिहासिक सत्यनिर्णय कितीहि खात्री पटविण्यासारखा असला तरी तो किती मानणार? म्हणून प्रस्तुत वाद उपस्थित करणारांना देखील अशी मोठी आशा नसेल कीं, त्यांचा निर्णय सर्व इतिहासप्रेमी लोक एकदम मानतील. किंबहुना हल्लींच्या पंचांगवादामुळें महाराष्ट्रीय समाजांत तिथि, संक्रांति, अधिक मास हे जसे आपापल्या आवडीप्रमाणें निरनिराळे पाळणारे लोक आढळतात, त्याप्रमाणें ज्यांना नवीन शिवजन्मतिथिनिर्णय पटला ते एका तिथीला आणि

ज्यांना तो पटला नाहीं ते दुसऱ्या तिथीला असे दोनदोन जन्मोत्सवहि कांहीं दिवस होत राहणें संभवनीय आहे.

रामकृष्णादिकांची म्हणजे केवळ पौराणिक विभूतींची जन्मतिथि एकच मानली जाते. तींत मतभेद नाहीं! आणि ज्यांच्या जन्मतिथीचा पुरावा प्रत्यक्ष कागदोपत्रीं मिळण्याचा संभव असतो अशा ऐतिहासिक पुरुषांच्या जन्मतिथीविषयीं मात्र वाद व विविधता राहावी हें सकृद्दर्शनीं चमत्कारिक वाटतें. पण पूर्ण अज्ञानापेक्षां विकल्प उत्पन्न करणारेंहि ज्ञान कोणी झाला तरी अधिक श्रेयस्करच मानील. नवी तिथि सर्वसंमत न झाल्यामुळें निरनिराळे उत्सव झाले तर त्यांतहि वस्तुतः कांहींच हानि नाहीं. जन्मतिथीचा उत्सव असला तरी त्यांत जन्मतिथीपेक्षां ज्याची ती जन्मतिथि त्याचा उत्सव हीच अधिक महत्त्वाची गोष्ट असते. यामुळें वर्षांतून एकदां केव्हां तरी सोयीप्रमाणेंहि उत्सव कोणीं केला असतां त्यांत कांहींच बिघडत नाहीं. उलट आम्ही असेंहि घेऊन चालतों कीं, ज्यांनीं नवी जन्मतिथि आज आपल्या मतें निर्णायक म्हणून स्वीकारिली आहे त्यांनाहि जर उद्यां उलट दृष्टीचा अधिक व निर्णायक पुरावा मिळाला तर तेहि आपली चूक कबूल करून आपलें मत खचित बदलतील आणि फिरून पूर्वींच्या तिथींतच उत्सव करूं लागतील. कारण या कामीं अभिमान सत्याचा, व्यक्तीचा नव्हे.

प्रस्तुत वाद असा आहे कीं, त्यांतल्या त्यांत अधिक जुने- विशेषतः शिवकालीन--असे जे ऐतिहासिक आधार नव्या तिथीविषयीं उपोद्बलक सांपडतात त्यांना कितपत महत्त्व द्यावयाचें? या दृष्टीनें पाहतां बखरीपेक्षां शिवभारत किंवा जेधे शकावली यांचें महत्त्व कोणीहि मान्य करील असें आम्हांस वाटतें. समकालीन पुरावा, पण तो अविश्वसनीय, खोटा, बनावट, असें कोणत्याहि स्वतंत्र गमकानें ठरवितां आल्यास गोष्ट वेगळी. पण वरील दोन आधारांविषयीं जोंपर्यंत तशा प्रकारचे आक्षेप सिद्ध झालेले नाहींत तोंपर्यंत समकालीन पुरावा या नात्यानें त्या साधनांचा श्रेष्ठ दर्जा मान्य करणें प्राप्त होतें. जेधे शकावलीविषयीं जे आक्षेप उत्पन्न होतात ते जमेस धरून त्यांचीं उत्तरें आपटे यांनीं दिलेलीं आहेत तो मजकूर, आणि जेधे शकावलीच्या विश्वसनीयतेविषयीं उदाहरणांसह दिलेला मजकूर,

हा सर्व भाग या दृष्टीनें वाचकांनीं अवश्य वाचावा. उलट बखरींमधून जन्मतिथीविषयीं जीं विधानें आढळतात त्यांत परस्पर मेळ किती थोडा आहे हें आपटे यांनीं स्पष्ट करून दाखविलें आहे, तोहि मजकूर कसोशीनें वाचकांनीं वाचावा अशी आमची शिफारस आहे. या दृष्टीनें २५८ ते २७५ या पानांत या ग्रंथाचें सारसर्वस्व आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्योतिषविषयक चर्चा, किंवा ऐतिहासिक विषयक पण टीकाप्रतिटीकारूप कोटी-प्रतिकोटीरूप किंवा आनुषंगिक मंडनपर व खंडनपर ही सर्व चर्चा देखील मार्मिक वाचकांस मनोरंजक वाटेल. परंतु ऐतिहासिक सत्य-निर्णयाच्या सर्वसंमत नियमांच्या कांटेकोर दृष्टीनें पाहावयाचें तर आम्हीं वर दर्शविलेल्या भागांवरच वाचकांनीं मुख्य दृष्टि द्यावी अशी आमची त्यांना सूचना आहे.

शिवजन्मतिथिनिर्णयासारखे इतर वाद यापूर्वी इतिहाससंशोधनांत निघाले नव्हते असें नाहीं. १०।५ लेखकांविषयीं असें दाखवितां येईल कीं, त्यांनीं नवा पुरावा स्वीकारून आपले जुने निर्णय स्वतःच चुकीचे ठरविले. परंतु जन्मतिथीचे उत्सव सर्वत्र होत असल्यामुळें या एका गोष्टीं-तील विचारक्रान्ति फारच मोठ्या प्रमाणावर परिणामकारक होणार म्हणून या वादाला अधिक महत्त्व आलेलें असावें. तिथिनिर्णय व उत्सव यांचा जर कांहीं अर्थाअर्थी संबंध नसता तर, नव्या तिथिनिर्णयासंबंधानें शिव-कालीन पुराव्याला अधिक महत्त्व द्यावें लागेल आणि जेधे शकावलीचा उल्लेख निर्णायक मानला पाहिजे, याविषयीं इतका वाद झाला असता असें आम्हास वाटत नाहीं. असो. या वादाचा निर्णय आमच्या मतें कसाहि असला तरी इतर कोणी तो तसाच मानावा असा आमचा आग्रह नाहीं. परंतु हल्लींच्या या उत्कट वादामुळें ऐतिहासिक संशोधनांत सत्य-निर्णयाचे खरे नियम कोणते याचा वारंवार उच्चार होऊन ते वाचकांच्या मनावर चांगले बिंबले तरी देखील प्रस्तुत ग्रंथ प्रकाशित करण्याचा प्रका-शकांचा हेतु सफल झाला असें आम्ही मानूं व तेहि मानतील.

# पानिपतचे धर्मवीर

[ उपव्याख्यान ]

आजचे व्याख्याते रा० पेंडसे यांनीं पानिपतचें जें वर्णन केलें आहे तें मन तल्लीन करून सोडणारें होतें. मी प्रत्यक्ष पानिपतचें रणमैदान, दिल्ली वगैरे प्रदेश या दृष्टीनें स्वतः हिंडून पाहून आलों असल्याकारणानें, व्याख्याते युद्धाचें वर्णन करीत असतां माझ्या डोळ्यांसमोर त्या प्रसंगाचें एक मोठें चित्रच उभें राहिलें होतें. अंगीकृत कार्याकरितां मराठे वीरांनीं धारातीर्थीं देह ठेविले, या दृष्टीनें आजच्या दिवशीं या प्रसंगाचें स्मरण करणें युक्त आहे. जय किंवा पराजय या एकाच दृष्टीनें पानिपतच्या प्रसंगाकडे पाहणें योग्य किंवा न्याय्य होणार नाहीं.

महंमदअल्लींचें उदाहरण घेऊन मुसलमान लोक पानिपतची आठवण काढून हिंदूंना चिडवीत असतात असें जें व्याख्यात्यांनीं सांगितलें तें कांहीं खोटें नाहीं. महंमदअल्लींकडून होणारी ही गोष्ट मीं स्वतः अनेक वेळ पाहिली आहे. वादाच्या भरांत ते आले कीं नेहमीं मला म्हणतात, 'Let us fight Panipat over again.' परवां कानपुरास सरोजिनीबाईच्या सन्मानाकरितां जावयास महंमदअल्ली व मी जोडीनें जात असतां कोणी एकजण म्हणाला, "हे पहा मराठे व रोहिले एकत्र मिळून चालले आहेत." त्या वेळीं काय किंवा इतर वादाच्या वेळींहि महंमदअल्लींच्या तोंडीं जो शब्द येतो तो हा कीं, "आपण पुन्हा एकदां पानिपत खेळूं."

पण यावर मीं त्यांना दोन उत्तरें दिलीं. मीं म्हटलें, "पानिपतची आठवण तुम्ही वारंवार काढतां. पानिपत कसें काय झालें हें आपणां दोघांनाहि कळतें! पण पानिपत कशाकरितां झालें, तें तुम्हांस मान्य आहे काय? परदेशीय मुसलमानांचा व आमचा संबंध नाहीं. हिंदुस्थानांत हिंदु व मुसलमान आम्ही एकमेकांचें पाहून घेऊं, याला तुम्ही तयार आहां काय? परक्या अबदालीनें दिल्लीवर स्वारी केली. त्याला शह बसावा म्हणून पानिपत झालें व इब्राहीम गारद्यासारख्या मुसलमानानेंहि त्या प्रसंगीं मराठ्यांना साह्य केलें. तेव्हां हिंदूंचा तुम्हीं पराजय केला यापेक्षां हिंदी मुसलमान हिंदु-

रके मुसलमान हा मुद्दा मुख्य आहे हें विसरून चालणार नाहीं. दुसरें कारण मीं त्यांना सांगितलें तें असें कीं, पानिपतास जें झालें तें आम्हीं पुढें चाळीस वर्षांत सव्याज भरून काढलें, त्याची वाट काय? पानिपतच्या नंतर दहा वर्षांच्या आंतच मराठ्यांच्या पुनः दिल्लीकडे स्वाऱ्या होऊं लागल्या व पुनः त्यांनीं दिल्लीचा बादशहा आपल्या खांकोटीस मारला! हंटर या इंग्रजी इतिहासकारानेंच असें लिहून ठेविलें आहे कीं, १८०३ सालीं आम्हीं राज्य जिंकलें तें मोगलांकडून नव्हे, तर मराठ्यांच्याकडून! पानिपतानंतर मुसलमानांचें काय राहिलें? पानिपतानंतर अब्दालीची तर इतकी दुर्दशा झाली कीं, त्यानें पुनः दिल्लीचें तोंडहि पाहिलें नाहीं! दिल्लीचें राजकारण शेवटीं व शेवटपर्यंत मराठ्यांनींच आपल्या मुठींत ठेविलें.

महंमदअल्लींसारख्या विद्वेषी प्रतिस्पर्ध्यांना अशीं प्रत्युत्तरें वेळोवेळीं ऊन गप्प बसविलें पाहिजे. अहसकारितेच्या भरांत सुद्धां या सुशिक्षित म्हणविणाऱ्या पुढाऱ्यांची अशी भावना कीं, केमालपाशा इंग्रजांच्या हातून हिंदुस्थानास स्वराज्य मिळवून देणार! आणि एकादा धर्माचा अवतार नवीन उत्पन्न होतो त्याचप्रमाणें म्हणे आम्हीं त्याच्या आगमनाची तयारी करावी म्हणून हे आम्हांस सांगतात! हिंदु-मुसलमानांच्या तंट्यांतली खरी दृष्टि काय आहे ती लक्षांत घ्या. मुसलमान झाला तरी तो सरहद्दींच्या आंतला आहे कीं बाहेरचा आहे, ही दृष्टि ठेवून शंभर वर्षांपूर्वींचें राजकारण चाललें होतें. दिल्लीच्या राजकारणाची वांटणी हिंदुस्थानांतले हिंदु-मुसलमान आम्ही काय वाटेल ती पाहून घेऊं. परक्या–हिंदुस्थान बाहेरच्या-माणसाला त्यांत लक्ष घालूं देणार नाहीं; ही दृष्टि तुम्हांस मान्य आहे काय?

पण राजकारणांतली ही दृष्टि नसलेले मोठे लोकसुद्धां भोळसटपणानें कशा घोडचुका करतात त्यांचें विषयांतूनच विषय निघाला, म्हणून एक उदाहरण सांगतों. तुम्हांलासुद्धां ऐकून इतक्या भोळ्या स्वभावाचा अचंबा व चमत्कार वाटेल. दोन वर्षांपूर्वीं अफगाणिस्थानाचे परराष्ट्रीय वकील हिंदुस्थानांत आले असतां महंमदअल्लींच्यातर्फे हिंदी पुढाऱ्यांची भेट घेण्याची त्यांनीं इच्छा दर्शविली, त्याप्रमाणें त्यांनीं आपल्याकडेच आम्हांला हाचें आमंत्रण दिलें. त्या प्रसंगीं महंमदअल्ली, मी, नेहरू वगैरे बरीच मंळी असून राजगोपाळाचार्यहि हजर होते. समारंभ आटोपल्यानंतर

वकीलसाहेबांनीं बोलून दाखविलें कीं, "आमच्या राजेसाहेबांनीं अशी सदिच्छा दर्शविली आहे कीं, हिंदुस्थानास लवकरच स्वराज्य प्राप्त होवो !" ही दरबारी भाषा कोणास समजत नाहीं ? लगेच मोतीलाल नेहरू यांनीं उठून सांगितलें कीं, "आपण आपल्या राजेसाहेबांना कळवावें कीं, हिंदुस्थानास स्वराज्य मिळावें अशी सदिच्छा आपण दर्शविली हे आपले फार उपकार आहेत." दरबारी भाषा व दरबारी उत्तर हीं बरोबर झालीं. पण यावर राजगोपाळाचार्यांना बोलण्याची हुक्की आली ! त्यांनीं वकिलांस सांगितलें, " कृपा करून आपल्या महाराजांस कळवा कीं, आमच्या देशास स्वराज्य मिळाल्यावर आपण हिंदुस्थानावर स्वारी करूं नये ! "—( हंशाच हंशा ) दुभाष्यानें वकिलांस राजगोपाळाचार्यांचें म्हणणें समजून सांगितलें, वकीलसाहेबहि हंसून म्हणाले, " अगदीं बरोबर. तुमची मागणी रास्त आहे. महाराजांना सांगून मी सरकारी गॅझेटांतच तसें प्रसिद्ध करवितों." स्वराज्य मिळाल्यावर हिंदुस्थानावर स्वारी करूं नका म्हणून हे वकिलाला सांगणार आणि अमीराच्या मनांत स्वारी करावयाचीच आल्यास राजगोपाळाचार्यांच्या सल्ल्यामुळें तो थांबणार ! आतां या भोळसटपणाला तुम्ही काय म्हणाल ? म्हणून मी पुनः म्हणतों कीं, या प्रश्नाकडे पहावयाची दृष्टि समजली पाहिजे. व ती दृष्टि हीच कीं, हिंदुस्थानांतले प्रश्न सोडवावयाचे असतील तर हिंदी मुसलमानांनीं हिंदुस्थानाबाहेर मदत पाहूं नये. पण महंमदअल्ली एक डोळा आमच्यावर ठेवणार व एक बाहेर ठेवणार, यानें कसें बनणार ? म्हणूनच मीं त्यांना विचारलें, पानिपत ज्या कारणाकरितां झालें तें राजकारण तुम्हांस मान्य आहे काय ?

व्याख्यात्यांनीं पानिपतास पडलेल्या वीरांना धर्मवीर असें म्हटलें. माझें म्हणणें इतकेंच कीं, धर्मवीर खरे पण त्यांचा धर्म कोणता ? व्यक्तिधर्म कीं जातिधर्म ? कर्तव्यकर्म करीत असतां त्यांनीं धारातीर्थीं देह ठेविले हा व्यक्तिधर्म होय, व तो त्यांनीं उत्तम रीतीनें पाळला. पण जातिधर्माचा म्हणजे हिंदुधर्माचा प्रश्न या ठिकाणीं होता असें दिसत नाहीं. दत्तोपंत आपटे यांनीं म्हटल्याप्रमाणें भाऊसाहेबांची दृष्टि धर्मावर नसून राजकारणावर होती. हिंदुधर्माकरितां मराठ्यांनीं पानिपत केलें हें म्हणणें इतिहासाला धरून नाहीं. शाहूपर्यंत दक्षिणेंत मुसलमानांचे हल्ले होत त्या वेळ-

चीं युद्धें धर्माकरितां झालीं असें एक वेळ म्हणतां येईल. परंतु शाहूनंतर उत्तरेकडून दक्षिणेवर स्वारी झाली नाहीं. मग दक्षिणेकडून उत्तरेकडे उलट अहेर सुरू होऊन स्वाऱ्या होऊं लागल्या. पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ यानें दिल्लीस प्रथम जाऊन प्रथम चौथाईच्या सनदा आणल्या व बादशहाच्या नांवाखालीं आपला अंमल चालूं केला. मुसलमानी पातशाही त्यांनीं नाकबूल केली नाहीं. इंग्रजांनीं बंगालच्या दिवाणीच्या बाबतींत जें केलें तेंच मराठ्यांनीं दिल्लीच्या राजकारणांत केलें. त्यांनीं तरी दुसरें काय केलें ? बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांनीं जें दिल्लीच्या राजकारणांत केलें तेंच पुढें नानासाहेब यानें बरोबर चालविलें; दिल्लीवर आपला कबजा ठेवण्याकरितां मराठ्यांचा सर्व प्रयत्न होता; व परक्या अबदालीनें दिल्लीवर येऊन स्वारी केली म्हणून पानिपत झालें. दोन वर्षे उत्तर हिंदुस्थानांत कटकट चालूं होती. त्याचा अखेर परिणाम पानिपतांत झाला.

धर्मवीर हें नांव न देण्याबद्दल माझें दुसरें कारण असें आहे, कीं गेल्या शंभर वर्षांच्या राजकारणांत मुसलमानांनीं आपल्या धर्माकडे ज्या दृष्टीनें पाहिलें तितक्या कडव्या दृष्टीनें आम्हीं आपल्या धर्माकडे केव्हांहि पाहिलें नाहीं. मराठ्यांचा हा गुण म्हणा, दोष म्हणा, ही गोष्ट कोणास अप्रिय वाटेल. पण अप्रिय वाटली तर यापुढें सुधारण्याचा प्रयत्न करा. पण ऐतिहासिक सत्य हें अप्रिय असलें तरी जसेंच्या तसें स्पष्टपणें बोलून दाखविण्याची तयारी पाहिजे. इतिहास पाहिला तर मराठे हे धर्माला राजकारणापेक्षां प्राधान्य देतात असें दिसत नाहीं; राजकारणच मुख्य मानतात. आपलीं धर्मक्षेत्रें त्यांनीं मुसलमानांपासून प्रयत्न केला असता तर मिळणें कांहीं अशक्य नव्हतें. पण करतो कोण ? जय झाला तर फार तर तहांत धर्मक्षेत्रें सोडविण्याचें कलम घालतील ! पण पाश्चात्य राष्ट्रें सर्रहा धर्मयुद्धावर निघत त्याप्रमाणें मराठ्यांनीं काशीक्षेत्र सोडविण्याकरितां मोहीम केली असें झालें नाहीं. एकट्या नानासाहेबांनीं मात्र प्रयत्न केला. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं, बनारसपासून चार मैलांच्या आंत मराठ्यांचें सैन्य आलें असें कळतांच गंगेवर ब्राह्मण उघडेबोडके स्नानसंध्या करीत होते त्यांनीं तसेंच धांवत जाऊन विनंति केली कीं, काशीक्षेत्र काबीज करूं नये ! तुम्ही परत गेल्यावर आमची गांठ

मुसलमानांशीं आहे. अर्धे देऊळ अर्धी मशीद अशी स्थिति असली तरी "गंगेस स्नानसंध्येला पाणी उदंड आहे" ही त्या वेळची धार्मिक वृत्ति! तेराव्या शतकांत महमुदानें स्वारी केली तेव्हां त्याचा एक सरदार देवळें व मूर्ति फोडीत गेला तो केपकामोरीनच्या टोंकापर्यंत! व तो सर्व हिंदु लोकांच्या प्रांतांतून! मराठ्यांना धर्माचा अभिमान, तर त्या वेळीं एकातरी हिंदु राजाला धर्माची लाज असावयास पाहिजे होती. तेरावें शतक काय किंवा पुढें काय, हाच क्रम पुढेंहि दिसतो. म्हणून धर्मकारणापेक्षां राजकारणी स्वभावच मराठ्यांचा दिसतो. हा गुण म्हणा, दोष म्हणा; दोष वाटला तर काढून टाका. पण मराठे धर्माला राजकारणापेक्षां वरचें स्थान देत नसत, असें इतिहासावरून स्पष्ट दिसतें. ऐतिहासिक सत्य म्हणून तें आपणांस कबूल करणें भाग आहे. जातिधर्म म्हणजे हिंदुधर्म या दृष्टीनें पानिपतच्या वीरांना धर्मवीर असें म्हणावयाचें नसून, आपद्धर्माचे प्रसंगीं ब्राह्मणांनीं क्षत्रियधर्म देखील स्वीकारला, अंगीकृत कार्याची तड पोंचविण्यासाठीं मराठ्यांनीं धारातीर्थीं देह ठेविले, म्हणजे त्यांनीं व्यक्तिधर्म उत्तम रीतीनें पाळला म्हणूनच त्यांचें आज स्मरण करावयाचें आहे.

समाप्त